म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १६१४

# , मराठी मने


प्रल्हाद केशव अत्रे

प्रकाशन क्रमांक
१२१

REFBK-0016595

ग. प्रां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबआी ४

मूल्य तीन रुपये



ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
८५०८५

# मराठी माणसे, मराठी मने

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
नौपाडा शाखा.
अ क्र. ....... विभाग . . .
क्रमांक ........ .... नों दि. . .

प्रल्हाद केशव अत्रे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १६५९५

प्रकाशन क्रमांक

REFBK-0016595

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबअी ४

मूल्य तीन रुपये

आवृत्ती पहिली : १३ ऑगस्ट १९५६
आवृत्ती दुसरी : जून १९५८
आवृत्ती तिसरी : नोव्हेंबर १९५९
आवृत्ती चौथी : जून १९६२
आवृत्ती पाचवी : जुलै १९६३
आवृत्ती सहावी : मे १९६४
आवृत्ती-सातवी : जुलै १९६८

( सर्वाधिकार प्र. के. अत्रे यांचे स्वाधीन )

मुखपृष्ठ सजावट
केशव फडके

मुद्रक : चिं. स. लाटकर, कल्पना मुद्रणालय, ' शिव-पार्वती ', ४६१।४ सदाशिव, पुणे २
प्रकाशक : ग. पां. परचुरे, ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, गिरगाव, मुंबई ४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.
अ. क्र. ............ विभाग ..............
क्रमांक ............ नों. दि. ..............

# अनुक्रम

| | |
|---|---|
| नाना शंकरशेट | १ |
| बाळशास्त्री जांभेकर | ९ |
| महात्मा ज्योतिराव फुले | १७ |
| लो. बाळ गंगाधर टिळक | २५ |
| धोंडो केशव कर्वे | ३४ |
| पंडिता रमाबाई | ४२ |
| गाडगे महाराज | ४८ |
| स्वातंत्र्यवीर सावरकर | ५६ |
| नाट्यछटाकार दिवाकर | ६५ |
| आचार्य विनोबा भावे | ७५ |
| डॉ. भीमराव आंबेडकर | १०१ |
| साने गुरुजी | ११४ |

# आचार्य प्र. के. अत्रे-साहित्य

## नाटके

साष्टांग नमस्कार
घराबाहेर
अुद्याचा संसार
भ्रमाचा भोपळा
मी अुभा आहे ?
पराचा कावळा
वंदे मातरम्
पाणिग्रहण
जग काय म्हणेल ?
अेकच प्याला
कवडीचुंबक
गुरुदक्षिणा
वीरवचन
वसंतसेना
ब्रह्मचारी

## काव्य

झेंडूची फुले
गीतगंगा

## कथासंग्रह

बत्ताशी आणि इतर कथा
ब्रँडीची बाटली
साखरपुडा
वामकुक्षी

## अितर

मी कसा झालो ?
हशा आणि टाळ्या
हास्यकथा
पत्रकार–अत्रे
चांगुणा ( कादंबरी )
ललित वाङ्मय
अत्रे उवाच
स्वराज्याचा अरुणोदय
निशिगंध
दूर्वा आणि फुले
मराठी माणसे, मराठी मने
मुद्दे आणि गुद्दे
साहित्य यात्रा
भ्रमंती
पंचामृत
समाधीवरील अश्रू
पाच भावांची गोष्ट
मोहित्यांचा शाप
दलितांचे बाबा
संत आणि साहित्य
केल्याने देशाटन

७५०७९ वि: निबंध
१९९४ नों: दि: २६।३।७९
१६५९५

# मुंबईचे अनभिषिक्त सम्राट

## नाना शंकरशेट

भौगोलिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आर्थिक दृष्ट्या मुंबई महाराष्ट्राचीच आहे. पण आज ज्या स्वरूपात मुंबई आपणास दिसते आहे, तिचा पायासुद्धा एका महाराष्ट्रीयाने घातला आहे, ह्या गोष्टीची सर्वांना आठवण करून देण्याची वेळ आलेली आहे. केवळ मुंबईमधल्याच नव्हे, तर मुंबई इलाख्यातल्या सार्वजनिक जीवनाच्या प्रारंभात एका असामान्य महाराष्ट्रीयाचे कर्तृत्व होते, ही गोष्ट महाराष्ट्राला अतिशय अभिमान वाटण्यासारखी आहे. या थोर महाराष्ट्रीयाचे नाव जगन्नाथ उर्फ नाना शंकरशेट हे होय. 'मुंबईचा अनभिषिक्त राजा' ही पदवी जर यथार्थत्वाने कोणाला देता येईल तर ती नाना शंकरशेट यांनाच. ही पदवी दुसऱ्या कोणाही माणसाला लावता येणार नाही. गेल्या दीडशे वर्षांत मुंबईमध्ये अलौकिक चारित्र्याची आणि कर्तृत्वाची अनेक माणसे होऊन गेली. पण त्या सर्व मंडळींमध्ये नाना शंकरशेट ह्यांच्याएवढा प्रचंड माणूस कोणीही दाखवता येणार नाही. एखाद्या डोंगरामधून जशी एखादी नदी उगम पावावी, त्याप्रमाणे आजची मुंबई ही ह्या एका प्रचंड माणसाच्या कर्तृत्वामधून उगम पावल्यासारखी वाटते. नाना म्हणजे बुद्धी, विद्वत्ता आणि कर्तृत्व ह्यांचा एक महासागर होता. आणि ह्या त्यांच्या गुणांना श्रीमंती आणि दातृत्व ह्यांची

विलक्षण जोड मिळाली होती. त्यामुळे मुंबईचे नेतृत्व आपोआपच त्यांचेकडे चालत आले. नाना हे जनतेचे स्वयंभू नेते होते. मराठ्यांचे राज्य ज्यावेळी गेले त्यावेळी नाना अवघे पंधरा वर्षांचे होते. स्वराज्याचा सूर्य त्यांच्या डोळ्या-देखत मावळला. सर्वत्र अंधार पडला. इंग्रजांचे राज्य सुरू झाले. त्यांची भाषा परकी. संस्कृती परकी. त्यांच्या राजवटीत आपले भवितव्य काय आहे ह्याचा जनतेला बोध होईना. अशा बिकट काळात परकीय राज्यकर्ते आणि स्वकीय जनता यांचा दुवा साधण्याचे अद्‌भुत कार्य नानांनी केले. ज्या काळात शाळा नव्हत्या, कॉलेजे नव्हती, विश्वविद्यालयही नव्हते, त्या काळात विद्या संपादन करणे किती अवघड असले पाहिजे ? पण तशाही परिस्थितीत मराठी, संस्कृत आणि इंग्रजी भाषेत नानांनी विलक्षण प्राविण्य मिळविले. त्यामुळेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची राज्यकर्त्यांच्या मनावर एकदम छाप बसली. इतकी की, नानांना विचारल्याखेरीज कोणतीही गोष्ट करणे त्यांना मुष्कील झाले. इंग्रजांच्या दरबारातले नाना हे हिंदी जनतेचे पहिले वकील होते म्हणा ना ! पारतंत्र्याच्या काळात स्वजनांशी द्रोह केल्याखेरीज सरकारच्या विश्वासास पात्र होणे कठीण होते. पण परकीय राज्यकर्त्यांपुढे कोणतीही लाचारी न पत्करता किंवा लोकहिताला कोणत्याही रीतीने मुरड न घालता राजा आणि प्रजा ह्यांचा मोठ्या प्रतिष्ठेने आणि दिमाखाने विश्वास संपादन करण्याचे अत्यंत दुर्लभ कार्य नानांनी केले !

पेशवाई बुडाल्यानंतर मुंबईचा पहिला गव्हर्नर माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन हा झाला. नवीन राजवटीचा पाया घालण्याची जबाबदारी त्याच्यावर आली. लोकांची सुधारणा कशी करावी हा फार मोठा प्रश्न त्याच्यापुढे होता. त्याने नानांना हाताशी धरले. नाना त्यावेळी अवघे वीसएकवीस वर्षांचे होते. नानांनी एल्फिन्स्टन-साहेबास स्पष्टपणे सांगितले की, “ विद्यादानाखेरीज आमच्या लोकांचा उद्धार होणार नाही.” एल्फिन्स्टनसाहेबास ते पटले. नानांच्या सल्ल्याप्रमाणे त्यांनी विद्यादानाचे कार्य सुरू केले. तथापि, त्या कामी त्यांनी मिशनऱ्यांचे साहाय्य घेतले. त्यामुळे विद्याप्रसाराचे काम जेवढे झपाट्याने व्हायला पाहिजे होते तेवढे होईना. लोकांचा मिशनऱ्यांवर विश्वास नव्हता. तेव्हा नानांनीच स्वतः पुढाकार घेऊन १८२२ साली ‘बाँबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी’ ही संस्था काढली. ह्या देशातल्या जनतेमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने निघालेली हीच पहिली सार्वजनिक संस्था होय. आणि तिचे संस्थापक नाना

शंकरशेट होत. सदाशिवपंत छत्रे, जगन्नाथशास्त्री क्रमवंत, बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर अशा महाराष्ट्रीय विद्वानांना हाती धरून नानांनी मुंबईत ठिकठिकाणी शाळा उघडल्या. अव्वल इंग्रजीत जी पहिली विद्वानांची पिढी निर्माण झाली तिचे सर्व श्रेय नानांनाच दिले पाहिजे. माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनसाहेब गेल्यानंतर त्यांच्या शैक्षणिक कार्याचे मुंबईत काहीतरी स्मारक करावे असा नानांच्या मनात विचार आला. त्यांनी पुढाकार घेऊन साडेचार लाख रुपये फंड जमविला. त्यातूनच पुढे उच्च शिक्षण देण्यासाठी 'एल्फिन्स्टन कॉलेज' काढण्यात आले. त्या निधीचे नाना हे शेवटपर्यंत विश्वस्त होते. त्यानंतर मुंबई इलाख्यातील शिक्षणप्रसाराच्या कामावर नियंत्रण करण्यासाठी सरकारने 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' ची स्थापना केली. ह्या बोर्डावर जे तीन हिंदी सभासद सरकारने नेमले, त्यांत नाना होते. बाकीचे दोन सभासद दरवर्षी बदलत. पण बोर्डाच्या आरंभापासून तो शेवटपर्यंत सरकारने नानांना काही बदलले नाही. १८५६ साली ह्याच बोर्डाचे रूपांतर सरकारने विद्याखात्यात केले. इंग्रजी शिक्षणाच्या प्रसाराने जनतेमध्ये एकदम जागृती झाली. सार्वजनिक हिताची आवड तरुणांत उत्पन्न झाली. १८४५ मध्ये दादाभाई नौरोजी, डॉ. भाऊ दाजी आणि विश्वनाथ नारायण मंडलीक ह्यांनी 'स्टूडंटस् लिटररी ॲण्ड सायंटिफिक सोसायटी' मुंबईत काढली. तिला नानांचाच सर्वतोपरी आश्रय होता. या संस्थेच्या विद्यमाने १८४८ साली नानांनी आपल्या स्वतःच्या घरात मुलींची शाळा काढली. त्या काळात मुलींची शाळा काढणे किती धाडसाचे आणि धोक्याचे होते याची आज कल्पना येणार नाही. ही शाळा काढल्याबद्दल लोकांनी नानांना सळो की पळो करून सोडले. पण नानांनी त्यांना बिलकूल दाद दिली नाही. अशा रीतीने मुंबई इलाख्यात स्त्री-शिक्षणाचा पायासुद्धा नाना शंकरशेट ह्यांनीच घातला. १८३८ साली मुंबई इलाख्याचे गव्हर्नर सर रॉबर्ट ग्रँट हे मुंबईत मरण पावले. त्या वेळी त्यांचे स्मारक मेडिकल कॉलेज काढून करावे ही कल्पना नानांनीच काढली. 'ग्रँट मेडिकल कॉलेज' हे त्याच कल्पनेचे फळ होय. १८५९ साली 'मुंबई युनिव्हर्सिटी' स्थापन झाली. तिच्या फेलोच्या जागी सरकारने पाच हिंदी माणसांची नेमणूक केली. त्यांत नाना शंकरशेट आणि डॉ. भाऊ दाजी हे दोन महाराष्ट्रीय, दोन पार्शी आणि एक मुसलमान होता. त्यांमध्ये गुजराती कोणीही नव्हता हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. आज मुंबई इलाख्यामध्ये विद्यादानाचा

जो विराट वटवृक्ष पसरलेला दिसतो आहे, त्याचे बीजारोपण नाना शंकरशेट ह्यांनी केले आहे हे प्रत्येक महाराष्ट्रीयाने ध्यानात धरावे. आम्हीच हे म्हणतो असे नव्हे. महर्षी दादाभाई नौरोजींनीच मुळी तसे लिहून ठेवले आहे : "we Natives owe much debt to Jagannatn Sankersett who was among the first, that first sowed the seeds of education and watched and nursed it to its present healthy growth."

नाना शंकरशेट ह्यांचे वडिलांनी व्यापारात अलोट पैसा मिळवला होता. नाना हे लक्ष्मीपुत्र होते. असे असता जनसेवेमध्ये आपले सर्व आयुष्य खर्चण्याची त्यांना त्या काळात बुद्धी व्हावी, ह्याचे आश्चर्य वाटते. लोकसेवेचा त्यांचा दृष्टिकोण फारच व्यापक होता. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात लोकांची सुधारणा व्हावी ह्यावर त्यांचा कटाक्ष होता. इंग्रजांचे राज्य नवीनच सुरू झाल्यानंतर जनतेची सर्व बाजूंनी अडवणूक होऊ लागली. जनतेची अनंत दुःखे होती. ती निवारण करण्याचे सामर्थ्य फक्त सरकारजवळ होते. पण जनतेचा आवाज सरकारला कसा ऐकू यावयाचा ? ह्या सर्व गोष्टींचा विचार करून १८५२ साली मुंबई शहरात 'बॉम्बे असोसिएशन' नावाची एक राजकीय संस्था नाना शंकरशेट आणि दादाभाई नौरोजी ह्यांनी काढली. ह्या संस्थेचे उद्घाटन नानांच्या अध्यक्षत्वाखाली झाले. त्यावेळी ते म्हणाले, "या देशातील रयतेचे कल्याण करावे अशी इंग्रज सरकारची फार इच्छा आहे हे खरे. पण आमची अशी काही दुःखे आहेत की, ती सरकारच्या नजरेस येत नाहीत. म्हणून ती सरकारच्या नजरेस आणून द्यावीत आणि रयतेच्या सुखाकरता सरकारला हरएक गोष्टीत साहाय्य करावे म्हणून ही संस्था काढली आहे."

मुंबईस पुढे पहिली राष्ट्रीय सभा भरली ती ह्याच संस्थेच्या विद्यमाने. म्हणजे कॉंग्रेसची स्थापना होण्याआधी कित्येक वर्षांपूर्वी ह्या देशात सनदशीर चळवळ सुरू करण्याचे श्रेय नाना शंकरशेट आणि दादाभाई नौरोजी ह्या दोघांकडेच जाते. मुंबईच्या राजकीय जीवनाचा प्रारंभ एका महाराष्ट्रीयाने आणि एका पारशाने केलेला आहे. ह्या संस्थेच्या प्रयत्नामुळे नेटिव्हांस मुंबई इलाख्याच्या कायदेकौन्सिलात जाऊन बसण्याचा अधिकार प्राप्त झाला. त्याप्रमाणे सदर कौन्सिलात निवडून आलेले नाना हे पहिले हिंदी गृहस्थ होत. नाना चार-साडेचार वर्षे

कौन्सिलात होते. त्या काळात त्यांनी तेथे लोकहिताची जी कामे केली त्यांचा एक स्वतंत्र ग्रंथच होईल. कायद्याचे त्यांना उत्तम ज्ञान होते. त्यामुळे कोणत्याही प्रश्नावर इंग्रजीमध्ये ते उत्कृष्ट भाषण करीत. गव्हर्नरावर आणि मोठमोठ्या अधिकाऱ्यांवर त्यांचे फार वजन होते. कोणताही नवीन कायदा करताना लोकमत अजमावण्यासाठी गव्हर्नरसाहेब प्रथम नानांचाच सल्ला घेत. १८३० साली बेंटिंकसाहेबांनी सतीची चाल बंद केली. त्यामुळे जनतेत फार असंतोष उत्पन्न झाला. त्यावेळी त्या कायद्याला लोकमत अनुकूल करण्यासाठी मुंबईचे गव्हर्नर माल्कमसाहेब ह्यांनी नानांचीच मदत घेतली. सतीची चाल अमानुष आहे ही गोष्ट नानांनी जनतेच्या मनावर बिंबवली. म्हणून त्या कायद्याला महाराष्ट्रात कोठेही विरोध झाला नाही. १८६४ साली कौन्सिलमध्ये असताना म्युनिसिपल ॲक्ट पास करून घेण्यासाठी नानांनीच पुढाकार घेतला. त्याप्रमाणे मुंबई शहराच्या आरोग्याची आणि सुखसोयींची व्यवस्था करण्यासाठी स्वतंत्र 'म्युनिसिपल कमिशन' नेमण्यात आले. त्यावर नानांची नेमणूक झाली. ह्याच कमिशनचे रूपांतर पुढे 'म्युनिसिपल कॉर्पोरेशन' मध्ये झाले. 'मुंबई नगरपालिकेचा प्रारंभ आणि वाढ' या ग्रंथात दिनशा एदलजी वाच्छा ह्यांनी म्हटले आहे की, "मुंबई म्युनिसिपालिटीचा जो भव्य पसारा आपण आज पाहतो आहोत त्याचे श्रेय त्या वेळेच्या प्रमुख सरकारी अधिकाऱ्यांइतकेच नामदार जगन्नाथ शंकरशेट ह्या महाराष्ट्रीय पुढाऱ्याला द्यायला हवे!" अशा रीतीने मुंबई शहराच्या शैक्षणिक आणि राजकीय जीवनाप्रमाणे, मुंबईच्या नागरिक जीवनाचीही मुहूर्तमेढ नाना शंकरशेट ह्यांनीच रोवली!

आजकाल 'जस्टिस ऑफ द पीस' किंवा जे. पी. होणे ह्याला फारशी किंमत राहिली नाही. पण इंग्रजांचे राज्य जेव्हा या देशात सुरू झाले तेव्हा ह्या पदवीला फार महत्त्व होते. समाजामधील जे अत्यंत अब्रूदार आणि वजनदार पुढारी असतील त्यांच्यापैकीसुद्धा अगदी निवडक लोकांना 'जे. पी.' केले जात असे. जनतेला न्याय मिळावा म्हणून राजाने नेमलेले जे प्रतिनिधी ते जे. पी. अशी मूळची त्यांच्यासंबंधीची कल्पना होती. १८३५ साली व्हिक्टोरिया राणीने मुंबई शहरात पहिल्याने बारा जे. पी. नेमले. त्यांत सात पार्शी, चार महाराष्ट्रीय आणि एक गुजराती होता. ह्या चार महाराष्ट्रीयांत नाना शंकरशेट होते. हिंदी लोकांना जे. पी. नेमण्याची ही खटपटसुद्धा सरकारदरबारी नानांनीच केली. त्या काळी फौजदारी खटले 'पेटी सेशन' पुढे चालत. 'पेटी सेशन' म्हणजे एक मॅजिस्ट्रेट

आणि दोन जे. पी. हिंदी माणसांना जे. पी. पदवी मिळाल्यापासून त्यांना ‘ पेटी सेशन ’ मध्ये बसण्याचा अधिकार आपोआप प्राप्त झाला. त्या काळी खुनासारखे खटले सुप्रीम कोर्टाच्या सेशनपुढे चालत. त्या सेशनात चोवीस गोरे पंच नेमले जात. त्याला ‘ ग्रँड ज्यूरी ’ म्हणत. ह्या ज्यूरीमध्ये हिंदी माणसाचा समावेश केला जावा अशी नानांनी खटपट केली. तो यशस्वी होऊन १८३६ साली, त्यावेळचे मुंबईचे गव्हर्नर सर जॉन मालकम ह्यांनी ग्रँड ज्यूरीमध्ये बसण्याचा हिंदी माणसांचा हक्क मान्य केला. त्या काळी ‘ स्मॉल कॉज ’ कोर्टातले खटले चालविण्याचा फक्त बॅरिस्टर लोकांना अधिकार असे. वकिलांना तेथे जाता येत नसे. बॅरिस्टर लोकांची फी फार जबर असे. त्यामुळे गरिबांचे फार हाल होत. म्हणून नानांनी त्या कामी सरकारात आपले वजन खर्च करून ‘ स्मॉल कॉज ’ कोर्टामध्ये काम करण्याची परवानगी वकिलांना मिळवून दिली. हिंदी लोक हे गोऱ्या लोकांपेक्षा बुद्धीने आणि कर्तृत्वाने कोणत्याही प्रकारे कमी नाहीत आणि गोऱ्या लोकांना जे विशेष अधिकार व सवलती मिळतात, त्या हिंदी लोकांनाही मिळावयास पाहिजेत ही नानांची सतत दृष्टी असे. पारतंत्र्याच्या प्रारंभकाळात शास्ते आणि शासित ह्यांच्यातले अंतर शक्य तितके कमी करण्याचा नानांनी जो प्रयत्न केला त्यावरून राजकारणा-संबंधीची त्यांची दृष्टी केवढी सूक्ष्म होती हे दिसून येते. मुंबईच्या सांस्कृतिक आणि बौद्धिक जीवनात विविधता आणण्यासाठी त्या काळात ज्या निर-निराळ्या संस्था स्थापन झाल्या त्या सर्वांशी नाना शंकरशेट यांचा संबंध होता. रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेचे जे प्रचंड ग्रंथालय ‘ टाऊन हॉल ’ मध्ये आहे त्याला नानांनी फार मदत केलेली आहे. विज्ञानाचे अनेक मौल्यवान् ग्रंथ नानांनी आपल्या पैशांनी घेऊन त्या संस्थेला दिले. मुंबईच्या ‘ ॲग्री-हॉर्टिकल्चरल सोसायटी ’चे आणि ‘ जॉग्रफिकल सोसायटी ’चे ते उत्पादक होते. राणीच्या बागेचे उद्‌घाटन नानांच्या हस्तेच झाले. त्या बागेत जे ‘ पदार्थ-संग्रहालय ’ आहे, त्याला नानांनी पैशाची खूप मदत केली. त्या संग्रहालयाचे स्थापनेपासूनचे ते अध्यक्ष होते. धोबीतलावावर ‘ फ्रामजी कावसजी इन्स्टिटयूट ’ म्हणून एक संस्था आहे. तिच्या प्रशस्त इमारतीत त्या काळात मोठमोठ्या राजकीय आणि सामाजिक सभा भरत असत. ह्या संस्थेची स्थापना नानांच्या हस्ते झाली. पण नानांचे सर्वात महत्त्वाचे काम म्हणजे बोरीबंदरपासून पुण्यापर्यंत आगगाडीचा फाटा पहिल्याने काढण्याचे कामी त्यांनी आणि सर जमशेटजी

जिजीभाई ह्यांनी घेतलेला पुढाकार. पहिली आगगाडी १६ एप्रिल १८५३ या दिवशी संध्याकाळी पाच वाजता बोरीबंदराहून सुटली. ती ठाण्यापर्यंत जाऊन पुन्हा रात्री आठ वाजता परत आली. ह्या गाडीत लॉर्ड एल्फिन्स्टन, नाना शंकरशेट आणि इतर मोठमोठे अधिकारी होते. त्यानंतर दहा वर्षांनी खंडाळ्याचे बोगदे पुरे होऊन आगगाडी पुण्यापर्यंत पुरी झाली. १८६३ साली खंडाळ्याचा बोगदा सुरू झाल्यानंतर महाराष्ट्रीय लोक घाटावरून मुंबईला येऊ लागले असे काही लोक म्हणतात; पण मुंबईची आगगाडीच मुळी एका महाराष्ट्रीयाने सुरू केली हे त्यांना कुठे माहीत आहे? अशा रीतीने जवळजवळ चव्वेचाळीस वर्षे विविध तऱ्हेची नानांनी अव्याहतपणे लोकसेवा केली. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी मुंबईतील थोर थोर इंग्रज आणि हिंदी नागरिकांची एक मोठी सभा 'टाउन हॉल' मध्ये भरली. त्या सभेत दादाभाई नौरोजींनी भाषण करून नानांच्या लोकसेवेचा मुक्तकंठाने गौरव केला. त्या सभेने नानांचा संगमरवरी पुतळा उभारण्याचे ठरविले. अशा रीतीने मुंबईच्या जनतेने नानांचे स्मारक त्यांच्या ह्यातीत करून त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

सरकारचा आणि जनतेचा संपूर्ण विश्वास संपादन करणारा एवढा पुरुष त्या काळात आणि त्यानंतरही झालाच नाही. एखाद्या राजासारखे ते श्रीमंत होते. पण त्यांच्या घरात जनतेला मुक्तद्वार होते. कोणी कसल्याही कामासाठी नानांच्या घरात खुशाल घुसावे आणि नानांच्या कानावर ते घालावे. नानांना आळस म्हणून माहीत नव्हता. अंगरखा–पागोटे घालून नाना तडक बाहेर पडत. १८३७ साली भिवंडी येथे विठ्ठलाच्या पालखीबाबत मुसलमानांनी दंगा केला. आणि देवळात शिरून विठोबाची मूर्ती फोडली. दंगेखोर मुसलमानांवर हिंदूंनी फिर्यादी केल्या. पण निकाल हिंदूंच्या विरुद्ध लागला. तेव्हा मुसलमानांच्या मस्तवालपणाला पारावारच उरला नाही. शेवटी न्याय मागण्यासाठी गावकरी नानांकडे आले. नानांनी गव्हर्नरसाहेबांना सांगून त्या खटल्याची फेरतपासणी करविली. त्यात सर्व दंगेखोरांना कडक शिक्षा होऊन हिंदूंना न्याय मिळाला. काठेवाडात द्वारकेच्या पवित्र मंदिरात गोरे सोजीर शिरून त्यांनी तेथल्या मूर्ती भ्रष्ट केल्या. तेव्हा गुजराती लोकांत हाहाःकार उडला. गुजराती लोक सगळे नानांकडे धावले. तेव्हा नानांनी गव्हर्नरांना सांगून गुन्हेगारांना कडक शासन करविले आणि मूर्तीची यथासांग प्राणप्रतिष्ठा करविली. हे सांगावयाचे

कारण म्हणजे त्यावेळच्या मुंबईतल्या गुजरात्यांचे पुढारीपणही नानांकडेच होते. १८६३ साली क्वीन्स रोडवरील हिंदूंचे ‘सोनापूर’ हे स्मशान तेथून हलवून शिवडीला न्यावे असा एका साहेबाने कौन्सिलात ठराव आणला. त्याचा निकाल होईपर्यंत ‘सोनापूर’ बंद करण्यात आले. साऱ्या मुंबई शहरात हाहाःकार उडाला. त्याच दिवशी मेलेल्या एका गुजराती वाण्याचे प्रेत त्याच्या नातेवाइकांनी नानांच्या अंगणात आणून ठेवले. आणि ‘ह्या प्रेताची व्यवस्था आता तुम्हीच लावा’ असे त्यांनी नानांना सांगितले. नाना अंगरखा-पागोटे घालून तसेच गव्हर्नराकडे गेले. आणि त्यांनी ‘सोनापूर’ बंद झाल्याने जनतेची मने कशी बिथरली आहेत हे त्यांना सांगितले. शेवटी गव्हर्नरांनी तो हुकूम तहकूब केला. आणि त्यानंतर कान्सिलमधला मूळ ठरावही त्या साहेबाने मागे घेतला. आहे त्या जागेवर सोनापूर आज जे दिसते आहे ते नानांमुळे. म्हणून त्यावेळचे लोक विनोदाने त्याला ‘नानापूर’ किंवा ‘नानांचा धक्का’ असे म्हणत असत. मराठी नाटकांना मुंबईत नाटकगृह नव्हते. म्हणून नानांनी एका साहेबाकडून ग्रँटरोडवर एक थिएटरही बांधविले. त्याखेरीज दवाखाने, धर्मशाळा, देवळे मुंबईत आणि महाराष्ट्रामध्ये नानांनी कितीतरी बांधली. नानांच्या प्रचंड लोकसेवेचे इत्थंभूत वर्णन एवढ्या लहानशा मर्यादेत करणे अशक्य आहे. ३१ जुलै १८६५ रोजी वयाच्या त्रेसष्टाव्या वर्षी नाना मरण पावले. त्यावेळी ‘टाइम्स ऑफ इंडिया’ मध्ये त्यांच्यावर जो ‘मृत्युलेख’ आला, त्यात त्याने त्यांची ‘नाना फडणविसा’शी तुलना केली होती. खरोखर, आधुनिक भारत निर्माण करणाऱ्या आद्य पुरुषांत नाना शंकरशेट ह्यांचा निःसंशय समावेश करावा लागेल. आणि आजच्या मुंबईचे तर ते जनकच होत ही गोष्ट अगदी निर्विवाद आहे. ग्रँट मेडिकल कॉलेजापासून तो एल्फिन्स्टन कॉलेजापर्यंत आणि ‘राणीच्या बागे’पासून तो ‘सोनापुरा’ पर्यंत त्यांची सर्वत्र मूर्तिमंत स्मारके पसरलेली आहेत. नानांच्या माहात्म्याची महाराष्ट्राला जेवढी ओळख असावयास पाहिजे तेवढी नाही, ही दुःखाची गोष्ट आहे. नानांचे आपल्यावर केवढे ऋण आहे ह्याची प्रत्येक महाराष्ट्रीयाने माहिती करून घ्यावी. मुंबईची वाढ अ-महाराष्ट्रीयांनी केली असा जे कोणी लोक दावा करतात, त्यांना नानांचे चरित्र हे एक प्रचंड उत्तर आहे. म्हणून दर वर्षी ‘एकतीस जुलै’ रोजी नानांची पुण्यतिथी भक्तिभावाने सर्व महाराष्ट्रात साजरी करावी. नाना हेच खरे ‘मुंबईचे अनभिषिक्त सम्राट’ होऊन गेले !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.
अ क्र. .......... विभाग ..........
क्रमांक .......... नों दि.

राष्ट्रजागृतीचे अग्रदूत

# बाळशास्त्री जांभेकर

पेशवाई गेली आणि देशात इंग्रजांची राजवट सुरू झाली. नवीन ज्ञान, विज्ञान आणि संस्कृती आली. सर्वसामान्य जनता तर भेदरून गेली. जी थोडी विद्यावंत आणि विचारवंत माणसे होती ती दिपून गेली. त्यांची कर्तबगारी अगतिक झाली. पारतंत्र्याच्या अंधारात समाज चाचपडू लागला. त्याला मार्ग दिसेना. एक युग संपले होते. दुसऱ्या युगाला प्रारंभ होत होता. अशा विकट काळात सर्व परिस्थितीचा धैर्याने आणि व्यापक दृष्टीने विचार करून समाजाला जागृत करणारा आणि मार्ग दाखविणारा एक बुद्धिमान पुरुष जन्माला आला. त्याचे नाव बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर. आपले राज्य का गेले आणि इंग्रजांचे राज्य या देशात का आले ह्याचे अचूक निदान करणारा हा महाराष्ट्रातला पहिला पुरुष होता. इंग्रजांचे वैभव पाहून तो गडबडून गेला नाही. त्यांची विद्या आपण हस्तगत केली पाहिजे, त्यांच्या ज्ञानाचा आणि विज्ञानाचा जनतेत प्रसार केला पाहिजे, त्याखेरीज जनतेत सामर्थ्य निर्माण होणार नाही, जनता जागृत होणार नाही-ही राष्ट्रोद्धाराची विशाल दृष्टी ह्या पुरुषाजवळ होती. सुदैवाची गोष्ट की लोककल्याणाच्या ह्या विविध कल्पना मूर्त स्वरूपात आणण्याचे प्रचंड बौद्धिक सामर्थ्य त्यांना लाभलेले होते.

बाळशास्त्री हा एक बुद्धीचा चमत्कारच होता. एका व्युत्पन्न पुराणिकाचे ते पुत्र होते. त्यामुळे बारा-तेरा वर्षांच्या वयातच त्यांचे सर्व संस्कृत आणि मराठी अध्ययन पूर्ण झाले होते. त्यानंतर ते इंग्रजी शिकावयाला मुंबईला आले आणि दोन तीन वर्षांच्या आत एखाद्या पदवीधराला दिपवून टाकण्याइतके इंग्रजी भाषेचं ज्ञान त्यांनी संपादन केले. एवढेच नव्हे तर त्याचबरोबर विविध विषयांतही त्यांनी जी प्रगती केली ती पाहून आपण थक्क होतो. शाळेत विद्यार्थी म्हणून शिकत असतानाच ते तेथे गणिताचे अध्यापक झाले. अवघ्या सतराव्या वर्षी त्यांनी ' नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी ' च्या नेटिव्ह सेक्रेटरीच्या जागेसाठी जो फडर्या इंग्रजीत अर्ज केला तो अद्यापि उपलब्ध आहे. त्यात त्यांनी आपल्याला ' संस्कृत, इंग्रजी, मराठी, उच्च गणित, भूगोल, गुजराथी, बंगाली, आणि फार्शी ' इतके विषय येत असल्याचे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. ह्या अर्जाप्रमाणे त्यांना प्रथम ' डेप्युटी सेक्रेटरी ' आणि मागाहून दोन वर्षांनी ' सेक्रेटरी ' म्हणून नेमण्यात आले. इतक्या लहान वयात एवढा बहुमान मिळविणारे त्या काळात बाळशास्त्री हे पहिले महाराष्ट्रीय विद्वान होते.

त्यानंतर काही दिवस अक्कलकोटच्या अल्पवयी युवराजाचे शिक्षक म्हणून बाळशास्त्र्यांची सरकारने नेमणूक केली. तेथे असताना ते कानडी शिकले. त्याच सुमारास मुंबईचे पहिले गव्हर्नर माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन ह्यांचे स्मारक म्हणून. मुंबईत एल्फिन्स्टन कॉलेज निघाले. त्या कॉलेजात शिकविण्यासाठी इंग्लंडहून नामांकित इंग्रज प्राध्यापक आणविण्यात आले. पण पहिले ' असिस्टंट प्रोफेसर ' म्हणून बाळशास्त्र्यांची नेमणूक करण्यात आली. हिंदू विद्वानाला मिळालेला तो अभूतपूर्व मान होता यात काही शंका नाही. ह्या कॉलेजात बीजगणित आणि ग्रहगणित हे विषय बाळशास्त्री शिकवीत. मध्यंतरी मुख्य प्राध्यापक रजेवर इंग्लंडला गेले असता त्यांच्या जागी दोन वर्षे बाळशास्त्री ह्यांचीच योजना करण्यात आली. ह्या कॉलेजात प्रोफेसर असताना त्यांच्याच हाताखालून महर्षी दादाभाई नौरोजी आणि प्रा. केरूनाना छत्रे हे महापुरुष शिकून तयार झाले. जवळजवळ दहा-अकरा वर्षे एल्फिन्स्टन कॉलेजात अध्यापनाचे कार्य केल्यानंतर त्यांना शिक्षकांच्या अध्यापनवर्गाचे 'डिरेक्टर' आणि इलाख्यातील मराठी शाळांचे इन्स्पेक्टर म्हणून सरकारने नेमले. ह्या कामावर असताना वयाच्या अवघ्या चौतिसाच्या वर्षी ते अकस्मात् निधन पावले. बाळशास्त्र्यांच्या अंगी अष्टपैलू विद्वत्ता

होती. त्यांना येत नव्हता असा एकही विषय नव्हता. ह्यामुळेच मुंबई इलाख्यात विद्येचा आणि शिक्षणाचा पाया घालण्याचे महान कार्य त्यांनी केले. त्या काळात काही विश्वविद्यालय नव्हते, वा महाविद्यालयही नव्हते. ज्ञानाची साधने अत्यल्प होती. मुद्रणकलाही नुकतीच सुरू झाली होती. आणि ती अत्यंत प्राथमिक अवस्थेत होती. अशा परिस्थितीत देशात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी निरनिराळ्या विषयांच्या अभ्यासासाठी पाठ्यपुस्तके तयार करणे किती अवघड होते! पण ते काम बाळशास्त्री यांनी जवळजवळ एकट्यानेच केले. इतिहास, भूगोल, व्याकरण, गणित, छंदःशास्त्र, नीतिशास्त्र ह्या सर्व विषयांमधली पहिली पाठ्यपुस्तके मराठी भाषेत बाळशास्त्र्यांनी रचली. मुंबई इलाख्यातील विद्याखात्याची मुहूर्तमेढच बाळशास्त्र्यांनी रोवली म्हणानात! वाङ्मय आणि विज्ञान ह्या दोन्ही शाखांमध्ये बाळशास्त्री निष्णात होते. गणित आणि ज्योतिषशास्त्र ह्या विषयांत त्यांचा अधिकार फार मोठा होता. 'शून्यलब्धि' ( Differential Galculus ) वर मराठी भाषेत त्यांनी पहिले पुस्तक लिहिले. भारतीय शिलालेख आणि ताम्रपट ह्यांचे संशोधन करून त्यांनी विद्वत्तापूर्ण निबंध लिहिले. या दृष्टीने 'आद्य इतिहाससंशोधक' असेही त्यांना संबोधणे उचित होईल. सगळ्यात त्यांचे महत्त्वाचे संशोधन म्हणजे एकशे आठ वर्षांपूर्वी शके १७६७ मध्ये 'ज्ञानेश्वरी' ची पहिली छापील पोथी पाठभेदांसह संपादून बाळशास्त्र्यांनी प्रसिद्ध केली. बहुजनांच्या हातात छापील स्वरूपात 'ज्ञानेश्वरी' हा महान ग्रंथ बाळशास्त्र्यांनी प्रथम ठेवला. हे त्यांचे महाराष्ट्रावर केवढे उपकार होत! बाळशास्त्र्यांच्या विद्वत्तेला कल्पकतेची आणि लोककल्याणाच्या दृष्टीची अपूर्व जोड मिळाली. समाजोद्धाराची अगदी स्पष्ट आणि तपशीलवार योजना बाळशास्त्र्यांजवळ तयार होती. त्याचे 'नीलचित्र' रेखाटण्याचे पहिले कार्य त्यांनी केले.

एवढे सांगूनही बाळशास्त्र्यांच्या उंचीची आजच्या लोकांना चांगलीशी कल्पना येणार नाही. लोक म्हणतील, आले लक्षात. बाळशास्त्री एक अत्यंत बुद्धिमान आणि विद्वान् पुरुष होऊन गेला. त्याने विविध विषयांवर ग्रंथ लिहिले. एवढेच ना? नव्हे. मुंबईतल्या आणि महाराष्ट्रातल्या सार्वजनिक जीवनाचा पाया बाळशास्त्र्यांनी घातला. वृत्तपत्र ही सार्वजनिक जीवनातील केवढी प्रचंड शक्ती आहे ह्याची कल्पना आज सर्वांना आहेच. पण एकशेएकवीस वर्षांपूर्वी ती

कल्पना बाळशास्त्र्यांना होती. वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी १८३२ च्या जानेवारीत बाळशास्त्र्यांनी मराठी भाषेतले पहिले वर्तमानपत्र ' दर्पण ' सुरू केले. म्हणून ' मराठी वृत्तपत्राचे जनक ' ही पदवी यथार्थत्वाने त्यांना शोभते. हे वृत्तपत्र मराठी आणि इंग्रजी भाषेत निघत असे. त्यातले इंग्रजी लेख बाळशास्त्री स्वतः लिहीत आणि त्याचे मराठी भाषांतर त्यांचे मदतनीस करीत. वीस-एकवीस वर्षांच्या तरुण संपादकाने त्या काळात इंग्रजीत केलेले हे वृत्तपत्रीय लेखन वाचून आजही बुद्धी थक्क होते. आजच्या कोणत्याही नामांकित इंग्रजी वृत्तपत्राच्या अग्रलेखीय स्तंभात शोभतील असेच ते लेख आहेत. इंग्रजी लिहिण्याची त्यांची ती डौलदार आणि प्रासादिक शैली बघून इंग्रजी भाषा त्यांच्याजवळ अक्षरशः ' पाणी भरते आहे ' असेच वाटते! वृत्तपत्राचे सामर्थ्य काय आहे ह्यासंबंधी ' दर्पण ' च्या दुसऱ्याच अंकात बाळशास्त्र्यांनी जो लेख लिहिलेला आहे तो ध्यानात ठेवण्यासारखा आहे. " ही शक्ती आपल्या देशात पूर्वी असल्याचा इतिहासात दाखला नाही. सर्व जगामध्ये पाश्चात्त्य राष्ट्रांची जी प्रगती झाल्याचे आपणाला दिसते त्याचे प्रमुख कारण म्हणजे वृत्तपत्रे. ज्ञानप्रसाराचे आणि लोकजागृतीचे हे अद्‌भुत साधन आहे, ज्ञान आणि विज्ञान ह्यांचा पुरस्कार करणे, सार्वजनिक नीतिमत्ता सुधारणे, जनतेला त्यांची कर्तव्ये सांगणे, राज्यकर्त्यांच्या हुकूमशाहीला लगाम घालणे हे सामर्थ्य वृत्तपत्रांच्या अंगी आहे. ज्या देशांत वृत्तपत्रांना लोकांच्या मनावर परिणाम करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य मिळाले आहे ते देश खचित धन्य होत!"

मुंबई इलाख्यामध्ये देशी भाषेत वृत्तपत्र काढण्याच्या मुळाशी बाळशास्त्र्यांची दुसरीही एक भूमिका होती ती अशी: बंगाल प्रांत हा मुंबई प्रांताच्या आधी साठ-सत्तर वर्षे इंग्रजांच्या ताब्यात गेलेला होता. शिक्षणाच्या आणि देशी भाषेतील वृत्तपत्रांच्यामुळे बंगालमधील जनतेची केवढी प्रगती झालेली होती हे बाळशास्त्र्यांना चक्क दिसत होते. ते म्हणाले, ' मुंबई प्रांत बंगालच्या मागे का राहावा ? " नुसता शिक्षणाचा प्रसार करून भागावयाचे नाही. प्रतिगामी आणि सनातनी मतांचा लोकांच्या मनावर जो पगडा आहे तो दूर झाला पाहिजे. त्याखेरीज जनतेची प्रगती होणार नाही ह्याची बाळशास्त्र्यांना जाणीव होती. आणि त्याचा स्पष्ट उल्लेख ' liberty of sentiment ' ह्या शब्दांनी त्यांनी त्या लेखात केलेला आहे. लोकांच्या भावना उदार झाल्या पाहिजेत. जीवनाकडे पाहण्याचा

त्यांचा दृष्टिकोण विशाल झाला पाहिजे ह्याबद्दल बाळशास्त्र्यांचा विशेष कटाक्ष होता. देशी भाषेत वृत्तपत्र निघाल्यावाचून ही गोष्ट होणे अशक्य आहे हे ओळखूनच त्यांनी आपले वृत्तपत्र मराठी आणि इंग्रजी भाषेत सुरू केले. हे पत्र आठ वर्षे चालले होते. ह्या आठ वर्षांतील सर्व उपलब्ध लेख वाचून पाहता बाळशास्त्र्यांनी आपली संपादकीय जबाबदारी उत्कृष्टपणे पार पाडली ह्यात मुळीच संशय राहत नाही. त्या काळात सरकारवर टीका करणे किती अवघड होते! पण जेथे प्रसंग पडला तेथे मोठ्या रुबाबाने आणि प्रतिष्ठित भाषेत सरकारवर टीका करण्यास ते मुळीच भ्याले नाहीत. हिंदी जनतेतील सर्व दोष नष्ट व्हावेत, त्यांच्या अडचणी, समजुती आणि आचार दूर व्हावेत आणि राज्यकर्त्यांनी त्यांची लायकी वाढवून राज्यकारभार करण्याची त्यांना हळूहळू संधी द्यावी ही दृष्टी धरून बाळशास्त्र्यांनी सर्व संपादकीय लेखन केलेले आहे. त्या काळात एवढे उच्च दर्जाचे पत्रपांडित्य बाळशास्त्र्यांजवळ असावे हे बघून आश्चर्य वाटते.

सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रामध्येही बाळशास्त्री आघाडीवर होते. त्या काळामध्ये केवळ जनताच अडाणी होती असे नव्हे तर विद्वान माणसेही अत्यंत प्रतिगामी आणि अनुदार वृत्तीची असत. सनातनी विचाराचे आणि आचाराचे प्रचंड दडपण समाजावर पडलेले होते. ते दूर करण्याचा नुसता प्रयत्न करणे हे सुद्धा त्या काळात महापातक समजले जात असे. कुत्र्याच्या गळ्यातील साखळी काढण्याचा जो प्रयत्न करतो त्याच्याच हाताला कुत्रे प्रथम डसते. ही समाजाची त्यावेळची वृत्ती होती. इंग्रजी राज्याबरोबर इंग्रजी विद्या आली खरी; पण ह्या इंग्रजी विद्येचे बोट धरून इंग्रजांचा धर्म आणि संस्कृतीही आली. आणि त्यामुळे धर्मांतराचे फार मोठे संकट हिंदू समाजावर आले. हिंदू धर्मातून कोण बाहेर जाते याची हिंदू समाजाने आजपर्यंत कधीच पर्वा केलेली नाही. तेव्हा बाहेर जाणाऱ्यांना परत कसे आणावे ह्याची चिंता करण्याचे त्याला कधी कारणच पडले नाही. पण धर्माकडे पाहण्याची बाळशास्त्र्यांची दृष्टी फार विशाल आणि संग्राहक होती. इंग्रजी विद्येच्या प्रसाराबरोबर ख्रिस्ती धर्माचा प्रसार होतो आहे हे त्यांच्या लक्षात आले. पाश्चात्त्यांच्या ज्ञानाचे आणि विज्ञानाचे ते कट्टे पुरस्कर्ते होते. पण त्याचबरोबर त्यांना हिंदू संस्कृतीचा आणि धर्माचा प्रखर अभिमान होता. मात्र धर्माभिमानाला उदार भावनेची जोड मिळायला हवी अशी त्यांची भूमिका होती. त्या काळात धर्माचा अशा दृष्टीने विचार करणे ही काही सामान्य

गोष्ट नव्हती. इंग्रजी शिकलेले त्या वेळचे कित्येक विद्वान आणि पंडितशास्त्री सुद्धा ख्रिस्ती धर्मांत गेले. पण सर्वांपेक्षा जास्त इंग्रजी विद्या हस्तगत करूनही बाळशास्त्री यांनी आपले स्वत्व आणि स्वाभिमान मुळीच सोडला नाही. आपल्या वृत्तपत्रात धर्मांतराची बातमी ते अगदी कटाक्षाने देत. पुढे एका धर्मांतराच्या प्रकरणाशी त्यांचा चमत्कारिक रीतीने संबंध आला. तो असा: शेषाद्री नावाच्या एका ब्राह्मणाची दोन मुले नारायण आणि श्रीपती ही मुंबईला रे. नेस्बिटने चालवलेल्या एका ख्रिस्ती मिशनऱ्याच्या शाळेत राहिली. काही दिवसांनी नारायण शेषाद्री ह्याने ख्रिस्ती धर्मांत प्रवेश केला. त्यामुळे मुंबईमध्ये खूपच खळबळ उडाली. नारायणाचा धाकटा भाऊ श्रीपती हा त्यावेळी बारा वर्षांचा होता. नारायणाच्या मागोमाग तोही ख्रिस्ती होऊ नये म्हणून बाळशास्त्री आणि नाना शंकरशेट यांनी पुढाकार घेऊन त्याच्या वडिलांना पुढे केले आणि 'सुप्रीम कोर्टा'कडून श्रीपतीचा मोठ्या शिकस्तीने ताबा मिळवला. पण त्यानंतर फारच संकट निर्माण झाले. श्रीपती ख्रिस्ती धर्मांत गेला नव्हता. पण तो सत्तावन दिवस पाद्र्याच्या घरात राहिला होता. अभक्ष्यभक्षणाचे आणि अपेयपानाचे 'महापातक' त्याच्या हातून घडले होते. तेव्हा अशा भ्रष्ट मुलाला परत हिंदू धर्मांत कसे घ्यावयाचे हा प्रश्न निर्माण झाला आणि त्यावर सनातनी मंडळीत दोन तट पडले. श्रीपतीला शास्त्रोक्त प्रायश्चित्त देऊन आणि शुद्ध करून स्वधर्मांत घेता येईल हा पक्ष बाळशास्त्र्यांनी उचलला. त्याच्या उलट दादाजी धाकजी म्हणून पाठारे प्रभु पुढारी मुंबईला होते. एकदा भ्रष्ट झालेला हिंदू शुद्ध करून स्वधर्मात घेण्यास शास्त्राची अनुज्ञा नाही ह्या पक्षाचे नेतृत्व त्यांनी पत्करले. बाळशास्त्र्यांनी काही धर्मशास्त्रज्ञांची आणि शंकराचार्यांची शुद्धीकरणाला अनुज्ञा मिळविली, आणि श्रीपतीला 'पूर्वांग' प्रायश्चित्त देऊन पुढील प्रायश्चित्तासाठी काशीला रवाना केले. श्रीपती काशीहून शुद्ध होऊन परत स्वधर्मात आला खरा. पण बाळशास्त्र्यांच्या विरोधक शास्त्री मंडळींनी असे शुद्धीकरण शास्त्राप्रमाणे करता येत नाही असा निर्णय काशीच्या 'विद्वन पंडिता' कडून आणविला. त्याचा परिणाम असा झाला की, बाळशास्त्र्यांवर सनातनी शास्त्र्यांनी बहिष्कार टाकला. शेवटी आपल्यामुळे समाजात फूट पडू नये म्हणून 'विष्णवे नमः' असे म्हणून त्यांना प्रायश्चित्त घ्यावे लागले. तथापि, श्रीपती शेषाद्री ह्याला शुद्ध करून घेण्याच्या कामी पुढाकार घेतल्याबद्दल बाळशास्त्री ह्यांचा त्यावेळच्या समाजाने खूपच छळ

केला. वस्तुतः खिस्ती धर्मात हिंदूने जाऊ नये अशा मताचे ते. पण ज्या अर्थी ते उदारमतवादी होते त्या अर्थी त्याचा कल खिस्ती धर्माकडे आहे, ते मिशनऱ्यांच्या भेटीला वारंवार जातात आणि त्यांच्यावरोबर 'ग्लासातून पाणी पितात आणि पावबिस्कुटे खातात' अशाही कंड्या त्यांविरुद्ध उठवायला लोकांनी कमी केले नाही. ह्या प्रकरणानंतर बाळशास्त्री लवकरच मरण पावले. तेव्हा 'आमच्या शापाने बाळशास्त्री मेला!' असे कित्येक ब्राह्मण फुशारकीने म्हणू लागले आणि कित्येक ब्राह्मण तर 'श्रीपती शेषाद्रीला हिंदू धर्मात घेतल्याचे पातक केल्याबद्दल यमपुरीत बाळशास्त्र्यांचा यम कसा छळ करीत असेल' याची मिटक्या मारीत कित्येक दिवस वर्णने करीत असत. सामाजिक आणि धार्मिक सुधारणा ही बुद्धिवादाने आणि तारतम्याने करावयाला पाहिजे, ही बाळशास्त्र्यांची भूमिका होती. म्हणून सर नारायण चंदावरकर ह्यांनी एका सामाजिक परिषदेत 'आद्य समाजसुधारक' असा त्यांचा गौरवाने उल्लेख केला.

अशा रीतीने परकीय राज्याच्या पहिल्या प्रहरात राष्ट्रजागृतीच्या विविध आघाड्या उघडण्याचा अग्रेसर प्रयत्न करणारे बाळशास्त्री हे एक महाराष्ट्राचे द्रष्टे आणि स्रष्टे महापुरुष होते. त्यांच्या विद्वत्तेचा आणि कर्तृत्वाचा सरकारात आणि जनतेत फार मोठा दबदबा होता. म्हणून त्यांच्या अकालनिधनानंतर सर्वांना फार मोठे दुःख झाले. 'असा बुद्धिमान आणि कर्तृत्ववान् पुरुष पुष्कळ वर्षांत झाला नाही' असाच सर्वांचा त्यावेळी अभिप्राय पडला. महर्षी दादाभाई नौरोजी हे तर त्यांच्या हाताखाली शिकले होते. त्यांच्या मनावर बाळशास्त्र्यांच्या बुद्धिमत्तेचा, विद्वत्तेचा आणि चारित्र्याचा फारच खोल ठसा उमटलेला होता. बाळशास्त्र्यांचे शिष्य केशवराव भवाळकर म्हणून होते. त्यांनी आपल्या चरित्रात बाळशास्त्र्यांनी शिक्षकांना एकदा केलेल्या उपदेशाचा सारांश दिलेला आहे. तो वाचल्यानंतर बाळशास्त्र्यांच्या विशाल दृष्टिकोनाची आणि अथांग ज्ञानलालसेची कल्पना येते. तो उपदेश असा :

"पूर्व काळचे महाप्रबुद्ध ऋषिजन हे अरण्यवास पत्करून विद्यासंपन्न होत आणि विद्यादान करीत. त्यांनी आपल्या देशात अपूर्व ज्ञानभांडारे भरून ठेवली आहेत. ती इतकी तुडुंब आणि ओतप्रोत आहेत की, ती नुसती चाळायला सबंध जन्म पुरायचा नाही. त्या ऋषींचे आपण वंशज म्हणवतो. मग विद्याभ्यास अन् विद्यादान करण्याची आपणास का लाज वाटावी? विद्या शिकून

तुम्हांला कारकून किंवा अंमलदार व्हावेसे वाटते. शिक्षकाचा व्यवसाय लोक हलका मानतात. पण तसे नाही. प्रजा मूढ आहे. म्हणून सरकारी नोकरांचे महत्त्व. विद्याप्रसार जसजसा होत जाईल तसतसे सरकारी नोकरांचे ढोंगसोंग अन् थाटमाट नाहीसा होईल. प्रजा शहाणी आणि समजूतदार झाली म्हणजे कारकुनीला कोण विचारतो ? म्हणून विद्याभिलाषी व्हा. विद्याभ्यास करा. लोकांना सुशिक्षण द्या. सरकार व प्रजा, धनी व चाकर, आईबाप व पुत्र ह्यांमध्ये प्रेमभाव निर्माण व्हावा, स्वदेशाभिमान आणि स्वधर्माभिमान लोकांच्या मनात उपजावा, असा प्रयत्न करा. हेच आपले ऋषिवंशजांचे कर्तव्य. गुरु दसपट ज्ञानी असेल तर तो एकपट ज्ञान शिष्यास देऊ शकेल. शंभरपट ज्ञानी असेल तर तो शिष्यास दसपट ज्ञान देईल. म्हणून जास्तीत जास्त विद्या-संपन्न व्हा."

आजच्या शिक्षकांनीही मुखोद्गत करून ठेवण्यासारखा हा उपदेश आहे. अशा या महाराष्ट्राच्या आद्य ज्ञानमहर्षींचे, आद्य पत्रकाराचे आणि आद्य समाजसुधारकाचे शंभर वर्षे होऊन गेली तरी महाराष्ट्राने काहीही स्मारक करू नये ही अत्यंत दुःखाची गोष्ट आहे. महाराष्ट्राच्या कृतज्ञताबुद्धीला हे फार मोठे लांछन आहे. बाळशास्त्र्यांचे सारे कर्तृत्व मुंबईत झाले म्हणून मुंबई सरकार, मुंबई कॉर्पोरेशन आणि मुंबई विश्वविद्यालय ह्यांनी बाळशास्त्र्यांच्या योग्यतेला शोभेल अशा तऱ्हेचे एखादे लोकोपयोगी स्मारक, उदाहरणार्थ, त्यांच्या नांवाने एखादे वृत्तपत्र शिक्षणाचे महाविद्यालय उघडून वा एखाद्या महाविद्यालयात उच्च गणिताच्या अध्यापनाची त्यांच्या नावाने व्यवस्था करून, त्यांच्या थोर ऋणातून मुक्त व्हावे असे आम्हांस वाटते. जनतेनेही ह्या स्मारकाला सक्रिय मदत करून ह्या महापुरुषाने केलेल्या उपकारांची अंशतः तरी फेड करावी !

उपेक्षितांचा पहिला पुढारी

# महात्मा ज्योतिराव फुले

महान पुरुषांचे राष्ट्र तेच महाराष्ट्र. या महाराष्ट्रात आजवर डोंगरासारखी मोठी माणसे होऊन गेली आहेत. त्यांपैकी महात्मा फुले हे एक होते. महाराष्ट्राच्या वैचारिक भूमीतील प्रमुख शक्ती ब्रिटिश अमदानीच्या गेल्या शतकात प्रकर्षाने प्रत्ययाला आली. पाश्चात्त्य संस्कृतीच्या शिंपणाने त्या काळात बुद्धिवादी माणसांचे वारेमाप पीकच आपल्या महाराष्ट्रभूमीत आले. महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, विष्णुबोवा ब्रह्मचारी, आगरकर, लोकहितवादी, चिपळूणकर, टिळक अशी अनेक रत्ने त्या काळात पैदा झाली.

व्यक्तीचे कार्य हे त्याच्या काळच्या परिस्थितीची प्रतिक्रिया किंवा अटळ परिपाक असते. म्हणून कोणत्याही व्यक्तीच्या कार्याचे योग्य मूल्यमापन करायचे तर त्याच्या काळातील परिस्थिती आधी समजावून घेतली पाहिजे. कोणत्याही प्रकारची क्रांती ही त्यावेळेच्या भौगोलिक आणि ऐतिहासिक परिस्थितीचा परिपाक असते. १८१८ साली पेशवाईचा शेवट झाला. दुसरा बाजीराव कसा होता, या प्रश्नाशी आपल्याला येथे फारसे कर्तव्य नाही. परंतु तो त्या काळी पराकोटीला पोचलेल्या ब्राह्मणशाहीच्या--म्हणजे भिक्षुकशाहीच्या—आहारी गेलेला होता. इंग्रजांच्या हल्ल्याला तोंड कसे द्यावे या बाबतीत राजकारणी पुरुषांचा किंवा

सेनानींचा सल्ला घेण्याऐवजी आपल्या उपाध्यायाचा सल्ला घेण्याइतकी भिक्षुक-शाहीची पक्कड त्याच्यावर होती. याचा व्हायचा तोच परिणाम झाला आणि इंग्रजांना आपल्या राज्याची स्थापना करणे सहज शक्य झाले. रमणे, सहस्त्रभोजने इत्यादी गोष्टींसाठी या पुण्यात महाराष्ट्रातलेच केवळ नव्हे तर साऱ्या हिंदुस्थानातले भिक्षुक भोजनभाऊ त्या काळी गर्दी करून राहिले होते, आणि त्यांचेच प्राबल्य पुण्याच्या रस्त्यारस्त्यातून दिसून येत होते. बुद्धिवादाला जागाच नव्हती. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत यां प्रवृत्तीचा कडेलोट झाला आणि मराठी राज्य लयाला गेले. राज्य गेले तरी वरील प्रवृत्ती पुण्यात ठाण मांडून बसली होतीच. या प्रवृत्तीची अनिष्टता ओळखून समाजाला जागे करण्याची कामगिरी पहिल्या प्रथम महात्मा फुले आणि लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांनी अंगावर घेतली. लोकहितवादी देशमुख हे ब्राह्मण आणि फुले माळी जातीचे. लोकहितवादी यांची शतपत्रे आपण अवश्य वाचा. फुल्यांचे त्यावेळचे लिखाण वाचा. दोघांनीही बुद्धिवादाला आवाहन करून भ्रामक समजुती आणि अर्थशून्य समाजविघातक पुरातन धर्मकल्पना यांवर विदारक टीकास्त्रे सोडली. फुले हे अब्राह्मण होते हा केवळ अपघात किंवा योगायोग होता. लोकहितवादी आणि फुले या दोघांनी जातिभेद, अज्ञान, आणि स्त्री-जीवनातील विविध प्रकारच्या अनिष्ट बंधनात्मक अडचणी या गोष्टींवर अखंडपणे हत्यार उपसले.

१८३२ साली बुधवारवाड्यात पहिली इंग्रजी शाळा त्यावेळचे पुण्याचे कलेक्टर रॉबर्टसन यांनी काढली. पुणे हीच हिंदुस्थानची राजधानी करण्यालायक जागा आहे असे त्यावेळचे व्हाइसरॉय यांना वाटले. गणेशखिंडीत आज पुणे विद्यापीठाला मिळालेली जागा व्हाइसरॉयचे निवासस्थान व्हायचे होते. पण पुढे बेत बदलला. पुण्याचे महत्त्व थोडेथोडके नव्हते. कॉंग्रेसचा जन्मही पुण्यास हिराबागेत झाला आणि न्यायमूर्ती रानडे यांनीच कॉंग्रेस स्थापन केली. भारताच्या बहुतेक चळवळी, राष्ट्रीय उपक्रम या पुण्यात प्रथम सुरू झाले, हा इतिहास आहे. फुले रॉबर्टसन साहेबांनी सुरू केलेल्या इंग्रजी शाळेत विद्यार्थी म्हणून दाखल झाले. शिकण्यासवरण्याला फुल्यांच्या वडिलांचा विरोध होता तरी तो न मानता त्यांनी इंग्रजी शिक्षण घ्यायला सुरवात केली. त्यांच्या वेळी शिकणे-सवरणे ही वरच्या जातीची मिरासदारी समजली जाई. फुले यांना इंग्रजीप्रमाणेच संस्कृत शिकावयाचे होते पण ‘ शूद्रा ’ ला संस्कृत शिकवायला शिक्षक प्रारंभी

प्रतिकूल होते. पुढे शाळेत अशा शिक्षकांविरुद्ध शिस्तीचा बडगा उचलला जाताच सर्वांना संस्कृत शिकण्याची सोय झाली.

फुले हे काही काळ तरी क्रांतिवादी होते. आणि त्यावेळचे शस्त्रविद्यापारंगत लवजीबुवा मांग यांच्याकडे त्यावेळच्या इतर क्रांतिवादी माणसांप्रमाणे त्यांनी शस्त्रविद्या शिकायला प्रारंभ केला होता. हेतू हा की, इंग्रजांना शस्त्रबलाने हाकून लावावे आणि स्वातंत्र्य मिळवावे. परंतु केवळ इंग्रज गेल्याने जातिभेद, अज्ञान आणि विषमतेसारखे प्रगतीच्या मार्गातील इतर अडथळे समाजातून नाहीसे होणार नाहीत याची फुल्यांना जाणीव झाली आणि त्यांनी शस्त्रक्रांतीचा नाद लवकरच सोडला. नवव्या वर्षी वैधव्य आल्यामुळे वपन करून विद्रूप करण्यात आलेल्या त्यांच्या गुरुकन्येला पाहून त्यांच्या मनाला धक्का बसला. असे अघोरकृत्य करावयाला धर्माची आज्ञा हे एकमेव कारण असे त्याच गुरूच्या तोंडून ऐकल्यानंतर तर धर्माविषयी सत्यशोधन करण्याची चेतना फुल्यांच्या मनात जागृत झाली. जातिभेद आणि त्याच्या कठोर पालनामुळे माणुसकीला काळीमा लावणारी निर्दयतेची उदाहरणे त्यांना समाजात चोहीकडे प्रत्ययाला येऊ लागली. त्यांचे एक मित्र सखाराम हरी परांजपे यांच्या घरी लग्नसमारंभाचे बोलावणे आल्यावरून ज्योतिराव गेले असता वरातीच्या मिरवणुकीत त्यांनी परांजपे यांच्या बरोबरीने चाललेले इतर ब्राह्मण मंडळींना खपले नाही. फुल्यांचा तो अपमानच झाला. समाजात विषमता, जातिभेद, अज्ञान, स्त्रीदास्य या साऱ्या अनिष्ट गोष्टी केवळ 'धर्माज्ञा' म्हणून दृढमूल झालेल्या पाहून असा धर्म बदलणे अवश्य असल्याची त्यांची खातरजमा झाली. आणि त्यांनी इतर धर्मांचाही तौलनिक अभ्यास सुरू केला. ख्रिस्ती धर्मकल्पनांचा विशेष पगडा फुले यांच्या मनावर बसला हे खरे. परंतु माणुसकीची वागणूक, सेवा आणि समानता त्यांना या धर्माच्या शिकवणुकीत दिसून आली आणि हीच तत्त्वे नेमकी हिंदू धर्माच्या प्रचलित स्वरूपातून नष्ट झालेली त्यांच्या अनुभवाला आली. म्हणून हिंदू समाजाने ईश्वर आणि धर्म यांच्या बाबतीतल्या आपल्या कल्पना बदलल्या पाहिजेत हे त्यांना स्पष्टपणे कळून चुकले.

महात्मा फुले यांच्या कामगिरीचा आपण विचार केला तर असे दिसून येईल की, साऱ्या अवघड सुधारणांना त्यांनी निर्भयपणे हात घातला. समाजात दोन प्रकारचे सुधारक असतात. एक बोलके सुधारक आणि दुसरे कर्ते सुधारक. पहिल्या प्रकारचे सुधारक 'अमुक व्हायला पाहिजे' असे बोलून थांबतात. स्वतः

होऊन काही करण्याची त्यांची तयारी नसते. ज्योतिराव फुले बोलके सुधारक नव्हते— ते कर्ते सुधारक होते. त्यांनी काय सुधारणा हाती घेतल्या पाहा. पहिली अज्ञानविरोधी मोहीम. समाजाच्या मुळापासून—स्त्रियांपासून-अज्ञानाचे उच्चाटन करण्यासाठी त्यांनी पहिली मुलींची शाळा काढली ती जोगेश्वरीच्या बोळातील चिपळूणकरांच्या वाड्यात. हा भाग काही मागासलेल्या लोकांचा नव्हता. म्हणजे ही मुलींची शाळा पुढारलेल्या, ब्राह्मणवर्गातील मुलींसाठी होती. शाळा काढली पण शिक्षक मिळेना. तेव्हा फुल्यांनी आपल्या पत्नीला—सौ. सावित्रीबाईंना—शिकवून शिक्षिकेचे काम करायला लावले. स्त्रीशिक्षणाचा पाया घातल्यानंतर त्यांनी दुसरी अगदी क्रांतिकारक गोष्ट म्हणजे महारामांगांची शाळा काढावयाची ठरविले. गेल्या पाच हजार वर्षात जे झाले नाही ते त्यांनी हाती घेतले. अर्थात याला केवळ ब्राह्मणवर्गांचाच नव्हे तर ब्राह्मणेतरांचा विरोध मोठ्या स्वरूपात झाला. परंतु त्याला न जुमानता त्यांनी शाळा सुरू केली आणि त्यावेळचा ३९५ मीटगंज (आता ४०८ मीठगंज) या दलितांच्या मांगवस्तीत जाऊन ते राहिले. मागासलेल्यांना सुधारावयाचे तर त्यांच्यामध्ये जाऊन राहून त्यांनी सुधारले पाहिजे, ही गोष्ट ओळखून त्यांनी त्या वस्तीत आपले घर केले. जुन्या काळी पाण्याची सोय फक्त सदाशिव, शनिवार, नारायण आणि बुधवार या पेठांतून होती. परंतु मीठगंज भागात नागझरीशिवाय पाणी कुठले? यासाठी म. फुल्यांनी आता सावता माळी वसतिगृह आहे तिथे महारांसाठी हौद बांधला. तो हौद नगरपालिकेने बंद केला आहे. त्याला ऐतिहासिक महत्त्व आहे. महात्मा फुले पुणे नगरपालिकेचे दहा वर्षे सभासद होते. पुण्याच्या विश्रामबागवाड्यात सन १८५२ साली त्यांच्या स्त्री-शिक्षणविषयक कार्याचा गौरव करण्यासाठी सरकारतर्फे त्यांना एक शालजोडी अर्पण करण्यात आली होती.

विधवा-पतितांना त्या काळी भ्रूणहत्त्या, आत्महत्या यांशिवाय गत्यंतर नव्हते. काशीबाई या ब्राह्मण विधवेला आत्महत्येपासून परावृत्त करून ह्या महापुरुषाने तिच्या प्रसूतीची व्यवस्था आपल्या स्वतःच्या घरात केली. आणि अशाच अडचणीत सापडलेल्या अभागी स्त्रियांसाठी 'बालहत्याप्रतिबंधक गृह' स्थापन करून त्याची प्रसिद्धीही केली. 'भ्रूणहत्या, बालहत्या किंवा आत्महत्या करू नका. तुमच्यावर प्रसंग आला तर तुम्हांला या ठिकाणी आसरा मिळेल,' असे त्यांनी अभागी स्त्रियांना आश्वासन दिले. हीच खरी मानवता. यात जातिभेद असू

शकत नाही. याच काशीबाईचा मुलगा ज्योतिरावांनी पुढे दत्तक घेतला. हा दत्तक पुत्र यशवंत फुले हा ब्राह्मण होता ही गोष्ट ज्योतिरावांच्या जातिभेदातीत वृत्तीची द्योतक नाही काय? पुढे हेच उदाहरण डोळ्यांपुढे ठेवून उमाशंकर त्रिवेदी यांनी पंढरपूरचा अनाथाश्रम सुरू केला. दुष्काळाच्या काळी फुले यांनी शेतकरी चळवळ हाती घेतली. शेतकरी सुधारल्याशिवाय, त्याचे दारिद्र्य संपल्याशिवाय देश सुधारणार नाही ही गोष्ट ओळखून त्यांनी शेतकऱ्यांच्या सुधारणेसाठी प्रयत्न सुरू केले. त्यावेळच्या आंदोलनाला खतफाडीचे बंड म्हणत असत.

फुले यांची योग्यता न्यायमूर्ती रानडे यांनीच योग्य प्रकारे ओळखली होती. आगरकर वैचारिक सुधारक होते. फुले कर्ते सुधारक होते. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या बौद्धिक उंचीविषयी तिळमात्र संशय नाही; परंतु दुर्दैव असे की, त्यांच्या सनातनी प्रवृत्तीमुळे ज्योतिबा फुल्यांची पात्रता त्यांना नीट उमगली नाही. न्यायमूर्ती रानडे हे माझ्या दृष्टीने साऱ्या हिंदुस्थानात श्रेष्ठ विभूती त्या काळी होऊन गेले. त्यांनी देशाकरिता कोणते काम हाती घेण्याचे ठेवले होते हेच सांगणे कठीण. रानडे हे धार्मिक वृत्तीचे. तीच परंपरा पुढे गोखले, गांधी आणि आता जवाहरलाल या शिष्यपरंपरेमध्ये अनुभवाला येते. परमेश्वरावर परम निष्ठा हा रानडे यांचा धर्म —तोच फुले यांचा धर्म. ईश्वराविषयीची शुद्ध कल्पना जी उपनिषदात सांगितली आहे, " ईशावास्य... " एक ईश्वर—अर्थात एकच धर्म. तो म्हणजे 'सत्य' धर्म.

पुणे म्हणजे जुन्या नव्या प्रवृत्तींच्या संघर्षांचे कुरुक्षेत्रच. आर्यसमाजाचे संस्थापक दयानंद सरस्वती यांची व्याख्याने सन १८७५ साली बुधवारातील भिडे वाड्यात न्या. रानडे यांनी घडवून आणली. आर्यसमाज जातिभेद मानीत नाही, व वेदांचे अध्ययन करण्याचा सर्वांना अधिकार आहे असे मानतो. उपर्युक्त व्याख्यानांना सर्व धर्मांचे लोक येत असत. व्याख्यानमालेच्या समाप्तीनिमित्त दयानंदस्वामींची व वेदग्रंथांची हत्तीवरून मिरवणूक काढण्याचे न्यायमूर्तींनी ठरविले. परंतु त्यावेळच्या सनातन्यांचे पुण्यातील पुढारी महामहोपाध्याय राम दीक्षित आपटे यांनी या मिरवणुकीला विरोध करण्याचे ठरवून कारवाया सुरू केल्या. त्यांनी न्यायमूर्ती रानडे यांना धमकी दिली की " मिरवणूक काढाल तर मार खाल ! " तेव्हा रानडे फुल्यांकडे गेले. फुल्यांनी त्यांना साहाय्य करण्याचे आश्वासन दिले आणि आपली शेकडो माणसे मिरवणुकीत आणून मिरवणूक पार पाडली. ही

मिरवणूक ११ सप्टेंबर १८७५ या दिवशी काढण्यात आली. परंतु विरोधी गटाने एका गाढवाच्या गळयात ' स्वामी गर्दभानंद ' अशी पाटी लावून त्याची मिरवणूक काढली. या दोन मिरवणुकींची गाठ पडली, परंतु चिखलफेकी-व्यतिरिक्त अधिक अनुचित फारसे काही न होता न्या. रानडे यांनी काढलेली प्रचंड मिरवणूक निर्विघ्नपणे पार पडली. सुधारणाविरोधी प्रचाराला पुण्यात गाढव हे महत्त्वाचे साधन ठरलेले आहे.

फुले हे निर्भय वृत्तीचे होते याचे प्रत्यंतर अनेक वेळा आलेले आहे. पुणे नगरपालिकेत लॉर्ड रिपन या व्हाइसरॉयना मानपत्र देण्याचा ठराव आला तेव्हा त्यांनी त्या ठरावाला कडक विरोध केला. लॉर्ड रे मार्केट बांधण्याच्या ठरावास त्यांनी विरोध केला व तीच रकम प्राथमिक शाळांकडे खर्च करावी असे आग्रहपूर्वक सांगितले. पुढे याच मंडईला ' महात्मा फुले मंडई ' हे नाव आमच्या कारकीर्दीत देऊन आम्ही फुल्यांच्या वृत्तीचे थोडे-फार चीज केले. त्याहीपेक्षा वरकरणी विक्षिप्तपणाची वाटणारी गोष्ट ज्योतिराव फुले यांनी केली आणि आपली निर्भय, निर्भीड वृत्ती दाखवून दिली. महाराणी व्हिक्टोरिया यांचे पुत्र डयूक ऑफ कनॉट यांनी हिंदुस्थानला भेट दिली. त्या वेळी पुण्यात सोमवार पेठेतील चिपळूणकरांच्या वाड्यात त्यांना मानपत्र देण्याचा समारंभ करण्यात आला. त्या समारंभाला सर्व सरकारी अधिकारी, संस्थानिक, सरदार, इनामदार वगैरे लोक रुबाबदार पोषाखात हजर होते. ज्योतिराव फुले यांनाही निमंत्रण होतेच. परंतु ते लंगोटी नेसून खांद्यावर घोंगडी आणि डोईला मुंडासे अशा वेशात समारंभाला गेले. दरवाज्यावरच्या शिपायांनी त्यांना अडविले तेव्हा त्यांनी आपल्या नावाची निमंत्रणपत्रिका मुंडाशातून काढून दाखविली. नंतर समारंभाच्या दिवाणखान्यात गेले ते खुर्चीवर न बसता जमिनीवर बसले. अर्थात ते उपस्थितांच्या आश्चर्याचा आणि कुतूहलाचा विषय होऊन बसले. परंतु इतरांप्रमाणेच चार शब्द बोलण्याची परवानगी त्यांनी मागितली तेव्हा मात्र डयूकसाहेबांना आश्चर्याचा धक्काच बसला. त्यांच्याविषयी त्यांनी तपास केला तेव्हा ही व्यक्ती म्हणजे जनतेच्या एका भागाचे पुढारी ज्योतिराव फुले असल्याचे त्यांना सांगण्यात आले.

बोलण्याची परवानगी मिळाल्यावर ज्योतिरावांनी इंग्रजीत अस्खलितपणे सांगितले, " डयूकसाहेब, या ठिकाणी उत्तम उत्तम पोषाख करून उपस्थित

असलेले हे लोक हिंदुस्थानच्या जनतेचे प्रतिनिधी नाहीत. या देशातील बहुसंख्य जनता शेतकरी आहे आणि ते जो पोषाख वापरतात त्याच पेहेरावात मी त्यांचा प्रतिनिधी म्हणून आपल्या भेटीला आलो आहे. हिंदुस्थानच्या ह्या बहुसंख्य जनतेचे हित तुम्हांला करायचे असेल तर त्यांचे अज्ञान घालवा, त्यांना प्राथमिक शिक्षण मोफत मिळण्याची सोय करा, असा त्या लोकांचा प्रतिनिधी म्हणून माझा निरोप राणीसाहेबांना कळवा." महात्मा गांधी लुंगी नेसून जॉर्ज बादशहांच्या भेटीस गेले त्या अलीकडच्या प्रसंगाची आठवण आपल्याला होते. परंतु जवळ-जवळ ऐंशी वर्षांपूर्वी ज्योतिराव फुले यांनी जी धडाडी दाखविली तिचे महत्त्व आपण ओळखले पाहिजे.

काही लोक ज्योतिराव फुले हे जातीयवादी होते असे मानतात. पण १८८२ साली कोल्हापूरच्या छत्रपतींना वेडे ठरवून तुरुंगात डांबणाऱ्या सरकारविरुद्ध टिळक-आगरकरांनी केसरीतून प्रखर टीका केल्यामुळे त्यांच्यावर खटला भरून त्यांना १०१ दिवसांची शिक्षा देण्यात आली. याच कामी प्रत्येकाकडून ५००० रुपयांचा जामीन मागण्यात आला आणि टिळकांना रक्कम उभी करण्याची अडचण पडली, तेव्हा ज्योतिराव फुले यांनी उरवणे सावकाराकडून रु. ५००० ची रक्कम उभी करून टिळकांना साह्य केले आणि तुरुंगातून सुटून येताच टिळक-आगरकरांची मिरवणूक काढून सत्यशोधक समाजात त्यांचा सत्कार केला. यावरून फुले तिळभर देखील जातीयवादी नव्हते ही गोष्ट संशयातीत रीतीने सिद्ध होते. स्वातंत्र्याची घोषणा करणाऱ्या काँग्रेसपुढे शेतकऱ्यांचा मोर्चा नेऊन फुले यांनी दाखवून दिले की, ज्या देशाची बहुसंख्य जनता शेतकरी आहे, त्या देशाच्या स्वातंत्र्यविचारात शेतकऱ्याला स्थान नसेल तर तो विचार अपुरा आणि एकांगी होय. असाच दुसरा मोर्चा १८८५ साली फुले यांचे अनुयायी भालेकर यांनी काँग्रेसच्या अधिवेशनापुढे नेला होता.

महात्मा ही पदवी फुले यांच्या चारदोन मित्रांनी दिली नव्हती. मुंबईस फुले यांच्या कार्याचे महत्त्व ओळखणारे लोखंडे, संतुराम लाड इत्यादि मंडळींनी कोळीवाड्यात प्रचंड सभा भरविली आणि त्यावेळी जनतेने स्वयंस्फूर्तीने 'महात्मा' ही पदवी फुले यांना देऊन त्यांचा गौरव केला. महात्मा गांधींनी सत्य आणि अहिंसा या तत्त्वांच्या आधारावर बहुजनसमाजाला एकत्र आणून स्वातंत्र्यप्राप्तीचा मार्ग दाखविला. ज्योतिबा फुले यांनी सत्य आणि समता या तत्त्वाचा सक्रिय संदेश

देऊन टिकाऊ सामाजिक स्वास्थ्याचा आणि उन्नतीचा मार्ग जनतेला मोकळा करून दिला. महात्मा फुले यांची कामगिरी केवळ महाराष्ट्रलाच नव्हे तर साऱ्या हिंदुस्थानला मार्गदर्शक ठरणारी अशी आहे याची आता आपणाला कल्पना येईल. महाराष्ट्राने अशा या महात्म्याची उपेक्षा केली. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाने महाराष्ट्राचे भयंकर नुकसान केलेले आहे. काय वाटेल ते करून त्या वादाला आपण कायमची मूठमाती दिलीच पाहिजे. महाराष्ट्राचा पिंड क्रांतिकारक आहे. ज्ञानेश्वरांपासून आजच्या काळापर्यंत अनेक बुद्धिवादी क्रांतिकारकांची अखंड परंपरा महाराष्ट्राला लाभलेली आहे. आपण पुराणकालातून बाहेर पडलो आहोत. पण उत्तरेकडील हिंदुस्थानचा प्रदेश अजून कृष्णलीला, रामलीला खेळत बसलेला आहे. आपणाला सत्यधर्माची शिकवण महात्मा फुले यांनी दिलेली आहे. ईश्वराचे आणि धर्माचे सत्य स्वरूप ओळखणाऱ्या फुल्यांनी एक प्रश्न विचारला, " दुपारचे बारा वाजले असता आपल्याला सूर्याकडे पाहवत नाही. अशा अनंत सूर्यांचा निर्माता जो ईश्वर तो आपल्याला चर्मचक्षूंनी पाहता येईल ही गोष्ट शक्य आहे काय ? " या प्रश्नातच त्यांची ईश्वरविषयक शुद्ध कल्पना सामावलेली आहे.

महात्मा ज्योतिराव फुले सन १८८९ साली २७ नोव्हेंबर या दिवशी दिवंगत झाले. लकडी पुलावरील स्मशानभूमीत न्यायमूर्ती रानडे यांनी त्यांच्या गौरवपर भाषण केले. महात्मा फुले यांनी दिलेली दिव्य शिकवण, सत्य आणि समता-धर्माचा संदेश सतत डोळ्यांपुढे ठेवून महाराष्ट्राने आपला उद्धार करून घेतला पाहिजे.

क्रमांक ७५०७५ वि: निबंध
ग्रंथांक १९१८ नों. दि. २६।३।

### गीतेचे कर्मयोगी भाष्यकार

# लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे कर्तृत्व ज्यांनी अवलोकिले आहे, त्यांचे वक्तृत्व ज्यांनी ऐकले आहे, त्यांचे विद्वत्व ज्यांनी बघितले आहे आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व ज्यांनी डोळे भरून पाहिले आहे अशी अद्याप पुष्कळ मंडळी ह्या देशात आहेत. पण दिवसेंदिवस अशा मंडळींची संख्या आता कमीच होत जाणार. टिळकांची आठवण झाली म्हणजे ह्या मंडळींच्या भावना कशा हेलावतात नि सद्गदित होतात त्याची कल्पना इतरांना करून देणे कठीण आहे. आजच्या बहुजनसंख्येचे टिळकस्मरण हे व्यक्तिगत असू शकणार नाही. पण ऐतिहासिक महापुरुष ह्याच भावनेने जनता आता त्यांच्याकडे बघते. पण तेवढ्याने टिळकांच्या मोठेपणाची कल्पना लोकांना येऊ शकत नाही. आपल्या देशात निर्माण झालेल्या महापुरुषाला देशाच्या इतिहासात एकदा आपण जमा करून टाकला की त्यासंबंधीचे आपले कर्तव्य संपले अशी त्या देशातल्या लोकांची समजूत असते. जास्तीत जास्त, त्याचे चार-सहा ठिकाणी पुतळे उभारले, पांच चौकांना किंवा दहा रस्त्यांना त्यांची नावे दिली अथवा सालोसाल ठिकठिकाणी सभा भरवून पुण्यतिथ्या साजऱ्या केल्या म्हणजे त्यांजबद्दल वाटणारा आदर योग्य तऱ्हेने व्यक्त झाला असे पुष्कळांना वाटते. तीस बत्तीस वर्षे म्हणजे तसा काही फार काळ नव्हे. पण

एवढयातच लोकांना टिळकांचे विसरण पडले आहे. देशात होऊन गेलेले एक मोठे पुरुष एवढीच लोकांना त्यांच्याबद्दलची ठोकळ आठवण असेल. त्यांच्या कर्तृत्वाचा किंवा विद्वत्तेचा तपशील तर फारच थोड्यांना माहीत असेल. आजच्या राज्यकर्त्यांना तर सार्वजनिक सुट्टी देण्याच्या योग्यतेचे सुद्धा ते राष्ट्रपुरुष आहेत असे वाटत नाही. टिळकांचे दोन तृतीयांश नाव चोरणाऱ्यांची ही भावना तर इतरांना त्यांच्याबद्दल काय वाटावे बरे! टिळकांचे स्मरण हा एक नुसता उपचार होऊन बसला आहे. महात्मा गांधींपेक्षा मोठा माणूस या देशात कोणी होऊन गेला नाही अशी आजच्या राज्यकर्त्यांनी जनतेची समजूत करून दिलेली आहे. ती चूक आहे. टिळक झाले नसते, तर गांधी मुळी होऊच शकले नसते. गांधीजी हे भारतीय स्वातंत्र्याचे जनक असले, तर टिळक हे भारतीय राष्ट्रवादाचे जनक होते. स्वातंत्र्याची आरोळी पहिल्यांदा टिळकांनी ठोकली अन् राष्ट्राला जागे केले. मग गांधीजींच्या नेतृत्वाखाली त्या जागृत राष्ट्राने परकीय सत्तेशी लढा देऊन स्वातंत्र्य मिळविले. स्वराज्याच्या लढयाचे सर्व मंत्र अन् तंत्र टिळकांनी निर्माण केले. गांधीजींनी त्यांना सामुदायिक स्वरूप देऊन प्रभावी बनविले. टिळकांचे महत्त्व गांधीजींनी ओळखले होते. म्हणून त्यांचे नाव घेऊनच त्यांनी आपल्या स्वराज्य मोहिमेला प्रारंभ केला. वस्तुतः भारतीय स्वातंत्र्याचा जेथे उल्लेख होईल, तेथे तेथे गांधीजींबरोबर टिळकांचे नांव उच्चारणे आवश्यक आहे. टिळकांनी अन् गांधींनी ह्या आमच्या देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले असे म्हणण्याचा आपण प्रघात ठेवला पाहिजे. कारण असे म्हणणे हेच खरे सत्याला आणि इतिहासाला धरून होईल.

भारतीय स्वातंत्र्यवीरांच्या मालिकेत टिळकांचे नाव जसे अलौकिक आहे, त्यापेक्षाही अधिक अर्थाने आधुनिक तत्त्वज्ञानामध्ये टिळकांचे स्थान अद्वितीय आहे असे म्हणावयास हरकत नाही. गेल्या शंभर वर्षांत भारतामध्ये अनेक पंडित आणि विद्वान होऊन गेले असतील. नाही असे नाही. पण त्यांमध्ये टिळकांसारख्या तेजःपुंज प्रतिभेचा अन् बुद्धिमत्तेचा पुरुष क्वचितच आढळून येईल. विद्वान माणसे राजकारणाच्या क्षेत्रात उतरलेली बहुधा सापडणार नाहीत. सार्वजनिक जीवनाची वर्दळ ज्ञानाच्या उपासनेला बाधक ठरते. किंबहुना राजकारणाचे क्षेत्र हे अविद्वान आणि उपद्व्यापी लोकांसाठीच राखून ठेवलेले आहे अशी सार्वत्रिक समजूत आहे. आणि आजकाल तर इतके अ (आणि अल्प) विद्वान

राजकारणामध्ये प्रतिष्ठा आणि मान्यता मिळवून बसले आहेत की, बुद्धिमत्तेला राजकारणाचे जणू काही वावडे असावे असेच लोकांना वाटते. म्हणून टिळक हे केवळ ज्वलंत देशभक्त नसून अलौकिक बुद्धीचे एक महान पंडितही होते असे जर लोकांना आज सांगितले तर एखादे वेळी ते त्यांना खरे सुद्धा वाटणार नाही. देशप्रीती आणि विद्वत्ता ह्यांचा अद्‌भुत संगम टिळकांच्या ठिकाणी झालेला होता.

दादाभाई नौरोजी, रानडे, गोखले, लाला लजपतराय, मोतीलाल नेहरू किंवा चित्तरंजन दास हे आपापल्या परीने अत्यंत कर्तबगार अन् बुद्धिमान पुरुष होते ह्यात काय संशय ? पण म्हणून ज्ञानोपासनेच्या दृष्टीने त्यांपैकी कोणाची टिळकांशी बरोबरी होऊ शकेल म्हणता की काय ? छे, मुळीच नाही. गांधीजींची विरक्ती साधुपुरुषाला शोभेल अशीच होती. तथापि, त्यांच्या साधुत्वाला टिळकांच्या-सारखी ज्ञानाची आणि विद्वत्तेची जोड होती असे कोणी म्हणणार नाही. ऐन तारुण्यात स्वतःला देशकार्यासाठी सर्वस्वी वाहून घेणाऱ्या टिळकांना ज्ञानाची एवढी बलवत्तर उपासना करायला वेळ अन् सवड मिळाली तरी कधी ह्याचे सर्वांस आश्चर्य वाटते. स्वातंत्र्यासाठी टिळकांनी केलेल्या झगड्याची अन् बलि-दानाची आज कशी कल्पना करून देता येणार ? साम्राज्यशाहीच्या जळत्या कुंडात उडी मारून त्यांनी आपल्या सर्वस्वाचा होम केला म्हणानात ! पण तसे करताना त्यांनी आपल्या ज्ञानाचे अग्निहोत्र मात्र एक क्षणभरही कधी विझू दिले नाही. ज्ञानाची ही जी त्यांनी निस्सीम उपासना केली, त्यामुळेच एक प्रकारची ओजस्वी आध्यात्मिक शक्ती त्यांच्या जीवनात निर्माण झाली होती. गांधीजींच्या व्यक्ति-मत्त्वामध्येही आध्यात्मिक तेज होते. पण ते त्यांच्या लोकसेवेमधून उगम पावले होते. टिळकांप्रमाणे ज्ञानोपासनेमधून नव्हे. गांधीजी हे रंजल्यागांजल्यांचा उद्धार करावयास अवतरलेले एखादे सत्पुरुष आहेत, असे वाटते; तर अनेक वर्षांच्या उग्र तपश्चर्येने ज्याला काही तरी थोर सिद्धी प्राप्त झालेली आहे अशा एखाद्या महर्षीप्रमाणे टिळक हे भारतवर्षाला 'उत्तिष्ठत ! जाग्रत !' असा स्वातंत्र्याचा मंत्र सांगणारे एखादे उपनिषत्कार वाटतात. 'गीतारहस्य' हेच टिळकांचे ते अमर उपनिषद् होय. कुरुक्षेत्रावर हातातील धनुष्यबाण खाली टाकून आणि शोकविव्हल होऊन ज्याप्रमाणे अर्जुन बसला होता, त्याप्रमाणे कोट्यवधी लोकांचा हा देश अनेक वर्षांच्या पारतंत्र्यामुळे निःशस्त्र आणि असहाय होऊन कसे तरी आपले लाजिरवाणे जिणे जगत होता. गीता सांगून

भगवंतांनी ज्याप्रमाणे अर्जुनाच्या मनातला संदेह नष्ट केला आणि त्याला युद्धास प्रवृत्त केले, त्याप्रमाणे टिळकांनी कर्मयोग हाच मोक्षाचा मार्ग आहे हे गीतेचे रहस्य सांगून परतंत्र भारताला आपल्या स्वातंत्र्याचा आणि ऐहिक कल्याणाचा शाश्वत मार्ग दाखवून ठेविला.

भगवद्‌गीता हा आपल्या धर्मग्रंथांपैकी एक अत्यंत तेजस्वी अन् निर्मल हिरा असून सांसारिकांना शांती नि समाधान देऊन पुरुषार्थाची ओळख करून देणारा नि निष्काम कर्तव्याचरणास प्रवृत्त करणारा असा दुसरा ग्रंथ जगातल्या कोणत्याही वाङ्मयात सापडणे दुर्मिळ आहे, असे टिळकांनीच गीतारहस्याच्या प्रारंभी सांगितले आहे. अदमासे अडीच हजार वर्षांपूर्वी गीता लिहिली गेली. ह्या अडीच हजार वर्षांमध्ये भारतामध्ये जे जे कोणी लोकोत्तर बुद्धीचे पुरुष होऊन गेले त्या त्या सर्वांना गीतेने स्फूर्ती दिलेली आहे. किंबहुना गीता हीच भारतामधल्या सर्व धार्मिक अन् सामाजिक तत्त्वज्ञानाची गंगोत्री होऊन बसलेली आहे. अवघ्या सातशे श्लोकांत विश्वाचे आणि जीविताचे कोडे उलगडण्याचा एवढा धाडसी प्रयत्न जगात कोणीही केला नसेल. म्हणूनच शंकराचार्यांपासून तो ज्ञानेश्वरांपर्यंत आणि ज्ञानेश्वरांपासून तो टिळकांपर्यंत गेल्या हजार वर्षांत भारतामध्ये जे जे कोणी लोकोद्धारक निर्माण झाले त्यांनी आपल्या बुद्धिसामर्थ्याप्रमाणे ह्या गीतेचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. वयाच्या सोळाव्या वर्षापासून टिळकांनी गीता वाचण्यास प्रारंभ केला. त्यानंतर सतत त्रेचाळीस वर्षे ह्या विषयावरचे त्यांचे वाचन, मनन आणि चिंतन चालूच होते. गीतेसंबंधी त्यांच्या मनात काही शंका निर्माण झाल्या. सांप्रदायिक भाष्ये आणि टीका वाचून काही त्यांच्या या शंकांचे समाधान होईना. म्हणून स्वतंत्र बुद्धीने गीतेची पारायणे करावयास त्यांनी प्रारंभ केला. तेव्हा गीता ही निवृत्तिपर नसून कर्मयोगपरच आहे असा नवीन बोध त्यांना झाला. तथापि राजकीय जीवनाच्या गर्दीत गीतेच्या अर्थासंबंधी झालेला साक्षात्कार जनतेपुढे मांडावयास त्यांना सवड मिळणे शक्य नव्हते. १९०८ साली सहा वर्षांची शिक्षा देऊन इंग्रज सरकारने जेव्हा त्यांना ब्रह्मदेशात मंडाले येथे पाठविले तेव्हा त्या ठिकाणी 'गीतारहस्य' हा आपला अलौकिक ग्रंथ लिहून त्यांनी पूर्ण केला.

टिळकांना सहा वर्षांची शिक्षा देऊन ब्रिटिश सरकारने भारतीय तत्त्व-

ज्ञानावर फार मोठे उपकार केले ह्यात काही शंका नाही. आधुनिक काळात 'गीतारहस्या' सारखा अद्भुत ग्रंथ ह्या भारतवर्षात दुसरा झालेला आम्हांस माहीत नाही. मानवी बुद्धीचा हा एक महान विक्रम आहे. विद्वत्तेने आणि पांडित्याने ह्याजपुढे लोटांगणे घालावीत असा हा प्रतिभेचा चमत्कार आहे. मराठी भाषेच्या ओजाची आणि सामर्थ्याची तर ही परिसीमा होय. ह्यापेक्षा अधिक चांगले असे मराठी वाङ्मयात काहीही नाही. आम्ही तर असे म्हणतो की 'ज्ञानेश्वरी' आणि 'गीतारहस्य' ही मराठी साहित्याची कांचनगंगा आणि गौरीशंकर ह्यांसारखी अत्युच्च शिखरे होत. ह्या शिखरांवर जो कोणी पोहोचला तो खचित मुक्त झाला असे समजायला हरकत नाही. भारतीय तत्त्वज्ञानातले आणि साहित्यातले सारसर्वस्व एकत्र करून टिळकांनी ह्या ग्रंथात मांडलेले आहे. आध्यात्मिक आणि तात्त्विक विचारांचा हा ग्रंथ असून त्यातील विवेचन नाटकापेक्षाही चित्तवेधक आणि भाषा कादंबरीपेक्षाही मनोरंजक आहे. विज्ञानाप्रमाणे तत्त्वज्ञानात संशोधनाला विशेष अवकाश नसतो. पण गीता-सागराचे सतत बेचाळीस वर्षे मंथन करून टिळकांनी त्यातून निष्काम कर्मयोगाचे जे रहस्य बाहेर काढले आहे तो भारतीय तत्त्वज्ञानामधला न्यूटन किंवा आइन्स्टाइन ह्यांच्या तोडीचा जीवनव्यापी शोध आहे.

हिंदूंच्या प्राचीन धर्मग्रंथांचे तात्त्विक विवेचन बहुधा ऐहिक संसारापासून अलिप्त असलेल्या ऋषींनी आणि संन्याशांनी केलेले असल्यामुळे त्याजवर त्यांच्या वैराग्यपर अथवा निवृत्तिपर विचारांचीच गडद छाया पडलेली आहे. भगवद्गीता ही वस्तुतः प्रवृत्तिमार्गाचे प्रतिपादन करण्यासाठी लिहिली असतानाही सांप्रदायिकांच्या तडाख्यात सापडल्यामुळे तिच्या अर्थाचा विपर्यास झाला. सर्व कर्मे सोडून संन्यास घेतल्याखेरीज मोक्षप्राप्ती होणार नाही असे गीतेचे तात्पर्य आद्य शंकराचार्यांनी काढले. शंकराचार्यांनंतर जे जे भाष्यकार झाले त्यांनीही गीतेमधून कर्मसंन्यासाचाच संदेश बाहेर काढला. ज्ञानेश्वरांनी गीतेचा स्वतंत्र अर्थ लावण्याचा 'मऱ्हाठीचिये नगरी' प्रथम प्रयत्न केला. पण तसे करताना त्यांनी पूर्वीच्या 'भाष्यकारांनाच वाट पुसिली.' ज्ञानेश्वरांनी सर्वसामान्य सांसारिकांसाठी भक्तिमार्गाचे उद्घाटन करून दिले. पुढे महाराष्ट्रातल्या साधुसंतांनी ह्याच मार्गाने जाऊन लोकजागृतीचे प्रचंड कार्य केले हे खरे. पण ह्या सर्व साधु-संतांनी त्याजबरोबर वैराग्याचा आणि कर्मत्यागाचा संदेश दिला हे विसरून

चालणार नाही. भगवद्‌गीता कर्मयोगप्रधान आहे, हे ह्यांपैकी कोणीच सांगितले नाही. तो अर्थ बाहू उभारून प्रथम टिळकांनीच भारताला सांगितला.

ब्रह्मज्ञानाच्या आणि भक्तीच्या निवृत्तिपर मार्गाने मोक्ष कसा मिळवावा हे सांगण्यासाठी भगवंतांनी अर्जुनाला गीता सांगितली असा आजपर्यंतच्या विद्वान संन्याशांनी आणि साधूंनी जो तिचा अर्थ लावलेला आहे, तो बरोबर नसून भक्ती आणि ज्ञान ह्यांजबरोबर कर्तृत्वाची जोड घालून देणारा आणि मोक्ष-दृष्ट्या संसार कसा केला पाहिजे एवढेच नव्हे तर मनुष्यमात्राचे संसारातले कर्तव्य काय आहे हे स्पष्टपणे सांगणारा गीता हा एक अलौकिक ग्रंथ आहे असा टिळकांनी प्रथम शोध लावला. गीता ही पूजन करून देवघरात ठेवून देण्याची पोथी नसून दैनंदिन जीवनाच्या व्यवहारात प्रत्येकाला प्रकाश आणि स्फूर्ती देणारी ती तेजस्वी मशाल आहे हे टिळकांनी भारताला पहिल्यांदा सांगितले.

टिळकांप्रमाणे गांधीजींनीसुद्धा गीतेचा अभ्यास करून तिचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला. पण टिळकांच्याप्रमाणे स्वतंत्र बुद्धीने गीतेचा विचार करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात नसल्याने ते सांप्रदायिकांच्या चाकोरीत सापडले. आणि पूर्वीच्या अनेक भाष्यकारांप्रमाणे गीतेमधून त्यांनी निवृत्तिपरच अर्थ बाहेर काढला. कर्मयोग हे गीतेचे तात्पर्य आहे असे टिळकांनी सांगितले तर अनासक्ति-योग ही गीतेची शिकवण आहे असे गांधीजींचे म्हणणे पडले. गांधीजींना कर्मयोगाचे महत्त्व पटले नव्हते असे मुळीच नाही. स्वतः ते एक महान कर्मयोगीच होते. तथापि, वैदिक धर्माचा आणि भारतीय तत्त्वज्ञानाचा त्यांचा अभ्यास टिळकांप्रमाणे परिपूर्ण नसल्याने किंवा जगाच्या व्यवहाराकडे बघण्याची त्यांची दृष्टी टिळकांच्या एवढी समंजस आणि वास्तववादी नसल्याने त्यांनी संन्यासमार्ग आणि कर्ममार्ग ह्यांचा घोटाळा घडवून दिला अन् निवृत्ती आणि प्रवृत्ती ह्यांची एक विलक्षण गोधडी शिवून काढली. तीच 'गांधीवाद' म्हणून आज लोकविश्रुत आहे. मूळ वैदिकधर्म हा प्रवृत्तिपर आहे. तथापि गांधींनी हिंदू धर्मापेक्षा जैन, बौद्ध आणि ख्रिस्ती ह्या निवृत्तिपर धर्मांचा विशेष अभ्यास केला म्हणून त्या विचारांची छाया त्यांच्या तत्त्वज्ञानावर पडली असावी.

मनुष्याच्या जीवनात पावलोपावली कर्म आणि अकर्म किंवा धर्म आणि अधर्म ह्यासंबंधी संशय उत्पन्न होतो. अशा वेळी काय करावे हे मोठमोठ्या बुद्धिमान अन् कर्तृत्ववान माणसांना सुद्धा कळत नाही. मग सामान्य मनुष्याची

काय स्थिती होत असेल ह्याची कल्पना केलेली बरी. अशा प्रसंगी सर्वसामान्य नीतिनियमांनी किंवा शास्त्रोक्त मार्गांनी काम भागत नाही. अनेक वाद उत्पन्न होतात. तारतम्याने वागावे लागते. ही गोष्ट वैदिक धर्माखेरीज इतर धर्मांनी ओळखलेली नाही. हे टिळकांनी आपल्या 'गीतारहस्या' त सांगितले आहे. गीतेमधले हे रहस्य गांधींना अजिबात कळलेले नाही. सत्य आणि अहिंसा ह्या दोन पराकाष्ठेच्या नीतिधर्मांवर त्यांनी आपल्या गांधीवादाची उभारणी केली. सत्य, दया, शांती, क्षमा, अहिंसा हे नीतिधर्म समाजाच्या पूर्णावस्थेत अपवादरहित आणि नित्य रूपाने शिल्लक राहतात ह्यात संशय नाही. पण समाजाच्या अपूर्णावस्थेत या नीतिधर्मांचे निरपवाद पालन करणे अशक्य आहे; एवढेच नव्हे तर साधुपुरुषांनाही अपवादात्मक नीतिधर्म स्वीकारावे लागले आहेत ह्याचे टिळकांनी आपल्या ग्रंथात विवेचन केले आहे. 'नास्ति सत्यात् परो धर्मः' एवढी हिंदुधर्मात सत्याची महती गायलेली आहे. पण ह्या सत्यधर्माला देखील मनुस्मृतीत आणि महाभारतात अपवाद सांगितले आहेत. सत्यधर्म हा केवळ शब्दोच्चारापुरता निघालेला नसून ज्या वागणुकीने सर्वांचे कल्याण होते ती वागणूक केवळ शब्दोच्चारण अयथार्थ आहे एवढ्याचमुळे गर्ह्य मानता येत नाही हे टिळकांचे सत्यावरचे भाष्य गांधीजींच्या सर्व सत्यविषयक लेखनात तुम्हांला कुठेच आढळणार नाही.

'अहिंसा परमो धर्मः' असे सांगणाऱ्या आपल्या शास्त्रांनी अत्याचारी हिंसकाचा प्रतिकार करू नये असे कुठेही सांगितले नाही. किंबहुना महाभारतात तर अहिंसेचे खरे पालन आईबापांची सेवा करणारा एक खाटीक करीत होता असे सांगितले आहे. सत्य आणि अहिंसा ह्या शब्दांना गांधीजींनी अत्यंत ढोबळ अर्थ दिले आणि त्यांचे अक्षरशः पालन केले पाहिजे असेच जवळजवळ प्रतिपादन केले. त्यामुळे ह्या दोन सद्गुणांचा आज देशात एवढा बोजवारा उडालेला आहे. मानवाच्या शाश्वत कल्याणासाठी झगडणाऱ्या महात्म्यांनी कर्तव्याग्नीत आपल्या प्राणांची आहुती देणे हे गीतेला मान्य असले तरी हिंसकाचे हृदयपरिवर्तन व्हावे म्हणून दुर्बल किंवा निःशस्त्र माणसांनी आपले खुशाल बलिदान होऊ द्यावे ह्या गांधीजींच्या शिकवणुकीला हिंदूधर्मांचा किंवा गीतेचा कोठेही आधार नाही. केव्हाही आणि कुठेही डोळे मिटून आपले सत्याने आणि अहिंसेने वागावे हे गांधीजींचे सांगणे अशास्त्रीय आणि अव्यव-

हार्य असून, सर्वांचे कल्याण होईल अशा समबुद्धीने आपण आपले कर्तव्य करावे हे टिळकांनी गीतेचे काढलेले तात्पर्यच योग्य आणि श्रेयस्कर आहे. अहिंसेसंबंधी गांधीजींच्या भोंगळ विचारसरणीने आज देशात एवढा गोंधळ माजवून दिलेला आहे की, अफझुलखानाचा वध करणारे शिवाजीमहाराज हे कित्येक गांधीभक्तांना 'वाट चुकलेले' देशभक्त वाटतात. आता काय सांगावे? एवढेच नव्हे तर भगवद्गीतेमधून कर्मयोगाचे रहस्य बाहेर काढणारे लोकमान्य टिळक हे सुद्धा कित्येक गांधीवादी आचार्यांना हिंसावादी आणि शठनीतीचा पुरस्कार करणारे वाटतात. 'शठं प्रति शाठ्यं' ह्या तत्त्वाचा टिळक आपल्या भाषणात आणि राजकारणात नेहमी पुरस्कार करीत असत, त्यावरून ह्या गांधीवाद्यांनी आपला असा समज करून घेतला आहे की, एखाद्याने आपला डोळा फोडला किंवा एखाद्याने आपले नाक कापले तर आपण त्याचे नाक कापावे ह्या तत्त्वाचे टिळक हे पुरस्कर्ते होते. खुद्द गांधीजींचे मतही याबाबत टिळकांसंबंधी तेवढे साफ नव्हते. टिळकांच्या तत्त्वज्ञानाचा हा सर्वांत मोठा विपर्यास होय. 'गीतारहस्या'च्या बाराव्या प्रकरणात त्यांनी ह्या विषयाचे फार मार्मिक विवेचन केले आहे. नीती आणि निर्वैरत्व यांचा मेळ कसा घालावा हे मोठमोठ्या नीतिशास्त्रज्ञांना सुद्धा कोडे पडले आहे. दुर्योधनासारख्या दुष्ट माणसाने आपणास ठार मारले तरी आपण त्याच्याशी दुष्टपणाने न वागता निर्वैर मनाने स्वस्थ बसावे असे गांधीजींप्रमाणेच अर्जुन म्हणू लागला. म्हणून भगवंतांना अठरा अध्यायाची गीता त्याला सांगणे भाग पडले.

निर्वैर होणे म्हणजे निष्प्रतिकार होणे हा अर्थ गीतेला मान्य नाही. निर्वैर म्हणजे निष्क्रिय किंवा प्रतिकारशून्य हे संन्यासमार्गातल्या लोकांचे मत आहे. वैर असू नये, पण कर्म कोणालाच सुटत नाही, असे कर्मयोग्यांचे म्हणणे आहे. दुष्ट बुद्धी मनात न ठेवता लोककल्याणासाठी म्हणून जरूर व शक्य तेवढा प्रतिकार केलाच पाहिजे हे गीतेचे सांगणे आहे. 'शठं प्रति शाठ्यं' किंवा 'जशास तसे' ह्याचा अर्थ 'आघाताइतकाच प्रत्याघात' असा स्पष्ट खुलासा टिळकांनी केला आहे. जमिनीला आपण लाथ मारली तर ती आपल्या पायाला उलट जेवढा आघात करते तेवढाच प्रतिकार करणे याचेच नाव 'जशास तसे.' त्यात सूड घेण्याची किंवा आपल्या शक्तीचे प्रदर्शन करण्याची बुद्धी मुळीच असता कामा नये. दुष्ट पुरुषाचा प्रतिकार साधूपणाने होणे शक्य असेल तर तो आधी

करावा. पण सामोपचार आणि शिष्टाई निरुपयोगी ठरली, म्हणजे पोटिसाने काटा बाहेर पडला नाही, तर तो सुईनेच बाहेर काढणे भाग आहे असे टिळकांचे म्हणणे आहे. आततायी पुरुषांना मारल्याने जसा अहिंसाधर्म बिघडत नाही तद्वत् दुष्टांचे योग्य शासन केल्याने साधुपुरुषांच्या दयार्द्र बुद्धीस किंवा विश्वकुटुंबकीय वृत्तीस काहीच कमीपणा येत नाही, उलट दुष्टांच्या अन्यायाचा प्रतिकार करून इतरांस बचावल्याचे श्रेय मात्र त्यांना मिळते. ज्या परमेश्वरापेक्षा कोणाचीही बुद्धी सम नाही तो परमेश्वर जर साधूंच्या संरक्षणासाठी व दुष्टांचा नाश करण्यासाठी वेळोवेळी अवतार घेऊन लोकसंग्रह करतो तर इतर पुरुषांची हो काय कथा ?

ज्यां मुसलमान जातीयवाद्यांच्या हिंस्र अत्याचारांचे पर्यवसान परस्पर सूडात, रक्तपातात अन् अखेर देशाच्या फाळणीत झाले, त्याचा प्रतिकार गीतेच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे सम आणि निर्वैर बुद्धीने करण्याचा आदेश जर जनतेला त्या वेळेच्या पुढाऱ्यांनी धैर्याने दिला असता तर देशाचे केवढे कल्याण झाले असते ! पण पराकाष्ठेच्या अहिंसेवर आधारलेल्या अशास्त्रीय व अव्यवहार्य गांधीवादाने अज्ञ जनतेचा बुद्धिभेद करून देशाचे फार मोठे नुकसान केले. त्या वेळी जर लोकमान्य हयात असते तर फाळणीच्या खडकावर देशाचे तारू इतक्या असहायपणे किंवा हताशपणे त्यांनी फुटू दिले नसते अशी आमची खात्री आहे. स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतरही गेल्या पाच वर्षांत भारताचा जो सर्वांगीण अधःपात झालेला आहे त्यापासून त्याचे रक्षण करून भारताचा उद्धार करण्याचे सामर्थ्यसुद्धा टिळकांच्या ‘ गीतारहस्या ’ तच आहे. सर्वांशी सारखेपणाने वागण्याची आत्मौपम्य वृत्ती देशात निर्माण व्हायला पाहिजे. साम्यबुद्धी वाढविण्याचा सर्वांनी प्रयत्न केला पाहिजे. शुद्ध नि निष्काम बुद्धीने लोकसंग्रह करणारे हजारो कर्मयोगी जेव्हा या देशात निर्माण होतील, तेव्हाच ह्या देशात पुष्टी, तुष्टी आणि शांती निर्माण होऊन तो ऐश्वर्याच्या शिखरास जाऊन पोचेल, असा भारतवर्षीयांना टिळकांनी आपल्या ह्या ग्रंथात संदेश देऊन ठेवलेला आहे. आधुनिक काळातील भारताच्या या कर्मयोगी महर्षीने पुरस्कारलेल्या महान गीताधर्माचा प्रकाश सर्वत्र ह्या देशात पडो अशीच भगवंताच्या चरणी आमची उत्कट प्रार्थना आहे.

## महिलांचे उद्धारकर्ते महर्षी

# धोंडो केशव कर्वे

गेल्या शतकामध्ये या महाराष्ट्रात त्यागी आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांची जी एक तेजस्वी मालिका होऊन गेली तिची आठवण झाली की 'महाराष्ट्र हे महान कार्यकर्त्यांचे एक मनोहर मोहळ आहे' हे महात्मा गांधींचे सुप्रसिद्ध वचन माझ्या डोळ्यांपुढे उभे राहते. महाराष्ट्र हे खरोखरच महापुरुषांचे राष्ट्र आहे. दगडधोंड्यांच्या, पठारांच्या आणि पर्वतांच्या या प्रांतात पिके पिकत नसली किंवा रत्ने सापडत नसली तरी प्रत्येक शतकाशतकामध्ये आणि पिढी-पिढीमध्ये पृथ्वीमोलाची नररत्ने या खडकाळी ओसाडीत जन्माला येतात. म्हणूनच कविश्रेष्ठ 'बी' यांनी या महाराष्ट्र देशाचे 'नरनारीरत्नांचा महाराष्ट्र देश, बलविद्याचापल्यशील शोभेचा अधिवास' असे समर्पक वर्णन केले आहे. भारतवर्षामधील निरनिराळ्या प्रांतांची निरनिराळी नावे आहेत. ही नावे त्या त्या प्रांतांना का मिळाली याची कारणे नक्की सांगता येतील असे नाही. पण महाराष्ट्राच्या बाबतीत तशी अडचण मुळीच पडणार नाही. इतके यथार्थ नाव या देशातील दुसऱ्या कोणत्याही प्रांताला लाभले नसेल. महाराष्ट्र ही महान व्यक्तींची जन्मभूमी आहे. महाराष्ट्र ही महान कृतींची कर्मभूमी आहे. महाराष्ट ही अभंग उक्तींची स्फूर्तिभूमी आहे. महाराष्ट्र ही

अमर पराक्रमांची रणभूमी आहे. महाराष्ट्र ही अलौकिक त्यागाची आणि सेवेची यज्ञभूमी आहे. महाराष्ट्राच्या जीवनाची सारी अंगे त्याच्या नावाप्रमाणेच महान आहेत. गरिबांच्या घरांखेरीज नि शेतकऱ्यांच्या झोपड्यांखेरीज या महाराष्ट्रात दुसरे काहीही लहान नाही. महाराष्ट्रातील डोंगरांची शिखरे गगनचुंबी नसतील पण श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी म्हटल्याप्रमाणे मराठी मनाच्या आकांक्षा एवढ्या उत्तुंग आहेत की, यापुढे आकाशही ठेंगणेच आहे असे वाटेल. महाराष्ट्र या नावाखेरीज या प्रदेशाला देण्यासारखे असे दुसरे नावच मुळी संभवत नाही. ज्या महाराष्ट्रामध्ये श्रीज्ञानेश्वर आणि श्रीशिवछत्रपती जन्माला आले त्याला महाराष्ट्र नाही म्हणावयाचे तर दुसरे काय म्हणावयाचे ! ज्या राष्ट्रामध्ये तुकाराम आणि रामदास यांसारखे अलौकिक साधुपुरुष आणि पहिले बाजीराव, राघो भरारी व तात्या टोपे यांजसारखे अद्वितीय वीरपुरुष होऊन गेले, त्या राष्ट्राला महाराष्ट्र नाही म्हणावयाचे तर दुसरे काय म्हणावयाचे ? ज्या राष्ट्रामध्ये लोकहितवादी, महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक, कर्मवीर आगरकर आणि नामदार गोखले यांसारखे बुद्धीचे आणि सेवेचे सह्याद्री जन्माला आले, त्या राष्ट्राला महाराष्ट्र संबोधावयाचे नाही तर काय संबोधावयाचे ! आणि हजारो वर्षांच्या राक्षसी रूढीने चिरडलेल्या स्त्रियांना नि अस्पृश्यांना पुनर्जन्म देणारे महर्षी कर्व्यांसारखे अन् डॉ. आंबेडकरांसारखे महात्मे ज्या महाराष्ट्रामध्ये जन्माला आले त्या राष्ट्राला 'महाराष्ट्र'खेरीज दुसरे कोणते नाव शोभण्यासारखे आहे ! कोणी आम्हांला काहीही म्हणो, पण असंख्य महापुरुषांना प्रसवणाऱ्या या महान राष्ट्रामध्ये जन्माला आल्याबद्दल आम्हांला खरोखरच धन्य वाटते. दुसऱ्या कोणत्याही प्रांतामध्ये आम्हांला जन्माला न घातल्याबद्दल आम्ही परमेश्वराचे मनापासून आभार मानतो.

महापुरुषांच्या राष्ट्रामध्ये आम्ही जन्माला आलो एवढेच नव्हे तर त्या राष्ट्रातील काही लोकोत्तर महापुरुषांचे आम्हांला प्रत्यक्ष दर्शन घडले यापेक्षा आमचे भाग्य ते कोणते ? खरोखरच महापुरुषाचे दर्शन घडायला, त्याचे अद्वितीय कर्तृत्व डोळे भरून पाहायला, आणि त्याची अमर वाणी कानी पडून डोळे निवायला फारच मोठे भाग्य लागते. ते भाग्य आमच्या पिढीस लाभले म्हणून पुढील पिढ्या खचित आमचा हेवाच करतील. आम्ही लोकमान्य टिळकांना पाहिले, त्यांची सिंहगर्जना ऐकली. आम्ही नामदार गोखल्यांना बघितले, अमृतासारखी त्यांची गोड

वाणी आम्ही मनसोक्त प्राशन केली. स्त्रियांच्या उद्धारासाठी रात्रंदिवस चंदनाप्रमाणे झिजणारी महर्षी कर्व्यांची ऋषितुल्य मूर्ती तर आम्ही आमच्या लहानपणापासून पाहतोच आहोत. पाषाणाला पाझर फोडण्याचे आणि वैराण माळरानावर फुलबाग फुलविण्याचे त्यांनी जे अद्‌भुत चमत्कार गेल्या तीसचाळीस वर्षांत घडवून आणले ते जवळजवळ आमच्या डोळ्यासमोरच घडले असे म्हणावयाला हरकत नाही. अनेक जन्मांच्या पुण्याईनेही ज्या व्यक्ती आणि ज्या गोष्टी पाहायला मिळाल्या नसत्या त्या गोष्टी केवळ या महाराष्ट्रात जन्माला आल्यामुळे आमच्या दृष्टीस पडल्या असा विचार मनात आला म्हणजे आमच्या आनंदाला पारावार उरत नाही. साऱ्या विश्वाने ज्यांचे वंदन करावे अशी महात्मा गांधी आणि गुरुदेव टागोर यांच्या थोरवीची महर्षी कर्वे ही एक भारतीय विभूती आहे. त्यांनी निवडलेले कामाचे क्षेत्र हे कमी प्रसिद्धीचे आणि लोकांना न आवडणारे असे होते. किंबहुना समाजाने त्याकडे सर्वस्वी दुर्लक्ष करावे अशाच स्वरूपाचे ते होते. शिवाय गेल्या तीसचाळीस वर्षांत राष्ट्राचे सारे लक्ष स्वातंत्र्याच्या झगड्यावर खिळून राहिले होते. म्हणून महर्षी कर्वे यांचे व्यक्तिमत्त्व आणि कार्य देशाच्या जितके डोळ्यांत भरावे तितके ते भरू शकले नाही. ते जर दुसऱ्या कोणत्याही कालखंडामध्ये जन्माला आले असते तर आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कळसावर ते जाऊन बसले असते. महार्षी कर्वे हे लोकमान्य टिळकांसारखे विद्वान नाहीत किंवा ते महात्मा गांधींसारखे झुंजारही नाहीत. गुरुदेव टागोरांप्रमाणे त्यांनी काव्यरचना केली नाही किंवा श्रीरामकृष्ण परमहंसांप्रमाणे उपदेशाची अमृतवाणीही त्यांच्या मुखातून बाहेर पाझरली नाही. हे जरी खरे असले तरी इतर महापुरुषांची व त्यांची तुलना करणे योग्य होणार नाही. बुद्धीचे किंवा प्रतिभेचे चमत्कार दाखविण्यासाठी महर्षी कर्वे यांचा जन्म नाही. महर्षी कर्वे हे एक लोकोत्तर सेवामूर्ती आहेत. मानवतेचा उद्धार करण्यासाठी प्रत्येक शतकात अशा अद्वितीय सेवामूर्ती जन्माला येत असतात. त्या बोलत नाहीत, त्या लिहीत नाहीत, त्या गात नाहीत. त्या नुसती सेवा करतात. सेवा हीच त्यांची प्रतिभा, सेवा हेच त्यांचे काव्य आणि सेवा हेच त्यांचे साहित्य. मानवतेच्या सेवेचे व्रत स्वीकारणे हे एक कठोर अग्निदिव्य आहे. या अग्निदिव्यामधून धैर्याने जाण्यास जी माणसे सिद्ध होतात ती काही सामान्य बुद्धीची आणि साधारण पराक्रमाची माणसे नव्हेत. ज्ञान आणि स्फूर्ती देऊन मानवतेला जागृत करणारे बुद्धिमान बृहस्पती जेवढे

थोर तेवढेच मानवतेची सेवा करून तिचा उद्धार करणारे त्यागी नि सहनशील सेवकही श्रेष्ठ होत.

गेल्या शतकामध्ये अक्षरशः डोंगराएवढी माणसे या महाराष्ट्रात होऊन गेली. आजच्या पिढीला ती पाहावयाला मिळणे काही शक्य नाही. त्यांची चित्रे पाहून आणि चरित्रे वाचूनच त्यांच्या मोठेपणाची कल्पना करून घेता येईल. हे जरी खरे असले तरी त्या अद्‌भुत शतकाचा एक महान प्रतिनिधी महर्षी कर्वे यांच्या रूपाने अद्यापही आपल्यामध्ये हजर आहे, हे खरोखरच आमचे सुदैवच समजले पाहिजे. मागील पिढीत निपजलेल्या विभूतींच्या मोठेपणावर ज्यांचा विश्वास नसेल त्यांनी महर्षी कर्वे यांना बघावे आणि आपला संशय फेडून टाकावा. एखाद्या लांबलचक डोंगराच्या रांगेमधील उत्तुंग शिखरांप्रमाणे गत शतकामध्ये सुरू झालेल्या महाराष्ट्रामधील महापुरुषांच्या अखंड मालिकेतील एखाद्या निमुळत्या उंच टोकासारखे महर्षी कर्वे हे आजच्या काळात तुमच्या-आमच्यासमोर उभे आहेत. महर्षी कर्वे ही महाराष्ट्राच्या मोठेपणाची एक चालतीबोलती निशाणी आहे. प्राचीन इतिहासामध्येच केवळ जी विभूती पाहावयास सापडेल ती आधुनिक काळामध्ये आपणाला पाहावयास मिळत आहे. या दृष्टीने बघता महर्षी कर्वे हा आधुनिक काळातला महाराष्ट्रामधला एक चमत्कार आहे. वास्तविक अडीचशे-तीनशे वर्षांपूर्वी साधुसंतांचे जे एक सुंदर पीक या भूमीमध्ये उगवले होते त्याच वेळी महर्षी कर्वे हे जन्माला यावयास हवे होते. महर्षी कर्वे यांच्या स्वभावाचा पिंड आणि कामाची लक्षणे खरोखर त्याच कालखंडाला शोभून दिसण्यासारखी आहेत. चांगुलपणा, भलेपणा, सौजन्य आणि साधुत्व यांचा असा मूर्तिमंत पुतळा या काळामध्ये सहजासहजी पाहायला मिळणार नाही. त्या दृष्टीने सध्याच्या काळात महर्षी कर्वे हे कालक्रमदोषासारखेच वाटतात. नाहीतर महाराष्ट्राच्या आजच्या पिढीने त्यांच्याकडे जवळजवळ दुर्लक्ष केल्यासारखी स्थिती का झाली असती?

सत्तावनी युद्धाच्या जन्माआधी अवघे एकवीस दिवस महर्षी कर्वे यांचा जन्म झाला. हा एक योगायोग सहज लक्षात ठेवण्यासारखा आहे. तो काळच मुळी क्रांतिकारक व्यक्तींच्या आणि घटनांच्या जन्माचा होता. वास्तविक या काळामध्ये जन्माला आलेला आणि राष्ट्रहिताविषयी तळमळ वाटत असलेला कोणताही बुद्धिमान माणूस हा राजकारणामध्ये शिरायचा. पण कर्वे यांनी तो मार्ग पत्करला

नाही. महात्मा फुले, कर्मवीर आगरकर, पंडिता रमाबाई यांच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांनी सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रात प्रवेश केला. हिंदी स्त्रियांच्या अवनतीमुळेच भारताची अधोगती झाली आहे, हे रहस्य त्यांनी ओळखले. स्त्रीचा उद्धार झाल्याशिवाय देशाचा उद्धार होणे शक्य नाही हे मर्म त्यांनी जाणले. आणि पुरुषांच्या जुलमाखाली नि अन्यायाखाली दडपल्या गेलेल्या अनाथ स्त्रीजातीला सोडविण्यासाठी त्यांनी आपला कनवाळू हात पुढे केला. जगातले दुःख पाहून ज्यांची अंतःकरणे कळवळतात तेच खरे महात्मे होत. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांचा अमानुष छळ पाहून गांधीजींचे अंतःकरण तळमळले आणि त्याच क्षणी महात्मा गांधींचा जन्म झाला. ही गोष्ट आफ्रिकेमध्ये ज्या वेळी घडत होती, अगदी त्याच वेळी हिंदू समाजातील विधवांची दुःखे पाहून कर्वे यांच्या काळजाची कालवाकालव होत होती. आपल्या आवडत्या मातापितरांच्या प्रेमावर पाणी सोडून अन् लोकमताला धाब्यावर बसवून कर्वे यांनी एका विधवेशी पुनर्विवाह केला. आणि त्याच क्षणी महर्षी कर्वे यांचा जन्म झाला. या गोष्टीला आज अर्धशतक लोटून गेले आहे. अनाथ आणि विधवा स्त्रियांची सेवा करताकरताच अखिल महिलावर्गाच्या उद्धाराची कल्पना त्यांना सुचली. पुरुषांचे शिक्षण घेऊन आणि पुरुषी मार्गाचे अनुकरण करून स्त्रियांचा उद्धार होणे शक्य नाही, स्त्रियांचा अभ्यासक्रम पुरुषांच्या अभ्यासक्रमापेक्षा मूलतःच भिन्न असावयाला पाहिजे, मातृभाषेतून आपल्या संस्कृतीचे आणि संसाराचे शिक्षण त्यांना मिळावयाला पाहिजे, असे अनेक शोध आपोआप त्यांना लागत गेले. आणि त्यांमधूनच स्त्रियांच्या स्वतंत्र विद्यापीठाची कल्पना निर्माण झाली. कर्वे यांच्या कार्याचा प्रारंभ विधवाविवाहापासून झाला असला तरी त्याचे पर्यवसान स्त्रियांचे स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्यात झाले आहे. या प्रारंभात आणि पर्यवसानात कोणाला विसंगती वाटण्याचा संभव आहे. पण त्यात कसलीही विसंगती नसून ती उत्क्रांतीच झालेली आहे. शिक्षण देऊन स्त्रियांना स्वावलंबी केल्यावाचून त्यांची अनंत दुःखे दूर होणार नाहीत ही महर्षी कर्वे यांना खात्री पटली तेव्हा विधवाविवाहाचे आकुंचित क्षेत्र सोडून महिलाशिक्षणाच्या मूलगामी प्रश्नाकडे ते वळले. स्वातंत्र्याच्या वेडाने भारलेले आधुनिक हिंदुस्थानातील नवे स्वाभिमानी पुरुष लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी यांनी निर्माण केले असतील तर पुरुषांच्या गुलामगिरीतून आणि सामाजिक

परावलंबीपणातून स्वाभिमानाने सुटका करून घेण्याचा मार्ग महर्षी कर्वे यांनी स्त्रियांना दाखविला आणि भारतातल्या नव्या स्त्रीला जन्म दिला.

महर्षी कर्वे यांच्या कार्याप्रमाणेच त्यांचे व्यक्तिमत्त्वहं' हळूहळू उत्क्रांत होत गेले. या बाबतीत महात्मा गांधींशी त्यांची तुलना करता येईल. इच्छेच्या आणि निर्धाराच्या जोरावर आपल्या मूळच्या सामान्य जीवनाला त्यांनी असामान्य स्वरूप प्राप्त करून दिले. आपल्या वर्तनातल्या प्रत्येक बारीकसारीक गोष्टीवर काटेकोर नजर ठेवण्याच्या बाबतीत आणि विवेकाच्या भट्टीत आधी तावून सुलाखून घेतल्यावाचून कोणतीही उक्ती न बोलण्याच्या अन् कसलीही कृती न करण्याच्या बाबतीत या दोन्ही विभूती सारख्याच चोखंदळ होत्या असे म्हटले पाहिजे. दोघांच्याही आयुष्यातील शिस्त अगदी पराकाष्ठेच्या अतिरेकाला जाऊन पोचली होती असे म्हणायला हरकत नाही. एक वर्ष नाही, दोन वर्षे नाही, सतत साठ–सत्तर वर्षे रात्रंदिवस तीच तीच गोष्ट एकसारखी न चुकता न विसरता करीत राहणे हे काही सामान्य माणसाचे लक्षण नव्हे. कठोर तपश्चर्येने ज्यांनी आपले आध्यात्मिक सामर्थ्य वाढवून घेतलेले आहे, अशा योग्यांनाच केवळ हे शक्य आहे. त्या दृष्टीने महर्षी कर्वे हे एक योगीच आहेत, असे म्हणायला हरकत नाही. स्वतःच्या मनाला जे जिंकू शकतात तेच केवळ योगी होतात. निर्धारशक्ती पराकोटीला पोहोचवल्यावाचून मन जिंकता येत नाही. महर्षी कर्वे यांच्या हातून आजपर्यंत जी जी थोर कार्ये घडली त्यांचे श्रेय आम्ही त्यांच्या लोकोत्तर निर्धारशक्तीला देतो. या एकाच वैशिष्ट्यामुळे ते महाराष्ट्रात जन्माला आलेले असूनही इतर महाराष्ट्रीयांपेक्षा वेगळे वाटतात. गेल्या शतकात महाराष्ट्रीयांच्या अंगभूत गुणांचा हळूहळू लोप होत चाललेला असून त्यांच्या तन्हेवाईक दोषांचा मात्र भरपूर विकास होत चाललेला आहे. हे दोष महर्षी कर्वे यांच्या अंगी औषधालासुद्धा सापडावयाचे नाहीत. आपल्या व्यवसायबंधूंचा मत्सर करणे, आपल्याहून अधिक थोर असणाऱ्या व्यक्तींचा द्वेष किंवा निंदा करणे, स्वतःचा उद्योग सोडून दुसऱ्याच्या भानगडींमध्ये कारण नसता तोंड खुपसणे, ही आजच्या महाराष्ट्रीयांची अगदी ठळक स्वभाववैशिष्ट्ये होत. त्यांपैकी एकाचाही संपर्क महर्षी कर्वे यांनी आपल्याला लावून घेतलेला नाही. किंबहुना अनासक्ती आणि अलिप्तपणा यांतच त्यांच्या मोठेपणाचे रहस्य आहे. विशेषतः पुण्याच्या परिसरात इतकी वर्षे राहूनही पुण्यामधील सार्वजनिक जीवनाच्या

मोहक जाळ्यात स्वतःला गुरफटून न घेण्यात महर्षी कर्वे यांनी असामान्य संयम दाखविलेला आहे. पुण्यामध्ये व्याख्यानांचे, उत्सवांचे आणि समारंभांचे एवढे प्रचंड उरूस दरसाल भरत असताही अण्णांची मूर्ती कधीही त्या ठिकाणी मिरवताना कुणाला दिसली नाही. प्रत्येक सभेच्या व्यासपीठावर निष्कारण खुर्च्या अडवून बसणारी जी ठराविक माणसे पुण्यामध्ये दिसतात, त्यांमध्ये महर्षी कर्वे यांचा चेहरा क्वचितच कोणाला दिसला असेल. कर्वे यांच्यासारख्या कट्टर सुधारकाला पुण्यासारख्या सनातनी, टवाळ आणि कुटाळ शहरात इतकी वर्षे अब्रूनिशी जे जगता आले ते याच त्यांच्या गुणांमुळे. मोठ्या मोठ्या माणसांच्या अब्रूची पुणेकरांनी राळ उडवली. पण महर्षी कर्वे यांच्या एका केसालाही धक्का लावण्याचे कुणाला कधी धैर्य झाले नाही.

महर्षी कर्वे यांच्या कार्याचे कौतुक जेवढे व्हावयाला पाहिजे होते तेवढे आजपर्यंत महाराष्ट्रात किंवा हिंदुस्थानात झाले नाही ही गोष्ट अगदी खरी आहे. त्याचे कारण म्हणजे स्त्रियांच्या उद्धाराच्या प्रश्नाबाबत देश अद्यापही उदासीन आहे. देशातील पुरुषवर्ग राजकीय गुलामगिरीचा प्रश्न सोडविण्यात इतकी वर्षे गुंतला असल्याकारणाने स्वतःच्या दास्यात खितपत पडलेल्या स्त्रीवर्गाच्या हालअपेष्टांकडे त्याचे जावे तितके लक्ष गेले नाही. आज भारताला राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झालेले आहे. तथापि समाजातील प्रत्येक शक्ती स्वतंत्र झाल्यापासून या राजकीय स्वातंत्र्याचा आस्वाद आपणास घेता येणार नाही. निरनिराळी रूपे घेऊन गुलामगिरी आज समाजामध्ये ठिकठिकाणी दबा धरून बसलेली आहे. ती आधी नष्ट झाली पाहिजे. स्त्रीवर्ग स्वतंत्र झाल्यावाचून देशाचा उद्धार होणे शक्य नाही हा बोध पुरुषांना अद्याप झालेला नाही. अठरा साली ' मासिक मनोरंजन ' ने कर्वे यांच्या एकसष्ठाव्या वाढदिवशी जो विशेषांक काढला होता, त्यामध्ये महात्मा गांधींनी लेख लिहून असे स्पष्टपणे सांगितले होते की, ' जोपर्यंत हिंदुस्थानमध्ये स्त्रियांवरील एक रतिभरही अन्याय कायम राहील अथवा त्यांचे योग्य हक्क पूर्णपणे त्यांना उपभोगावयास मिळणार नाहीत, तोपर्यंत देशाचा खरा उद्धार होणे शक्य नाही. ' त्याच लेखात गांधीजींनी असेही पण म्हटले होते–की, ' स्त्रियांच्या उन्नतीचा प्रयत्न स्वतः स्त्रियांनीच केला पाहिजे. दुसऱ्याने तपश्चर्या करून जशी आपल्याला मोक्षप्राप्ती व्हायची नाही, त्याप्रमाणे पुरुषांनी प्रयत्न करून स्त्रियांची खरी व टिकाऊ उन्नती होणार नाही. ' स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नवभारताच्या

निर्मितीचे कार्य आता आपल्याला झपाट्याने करावयाचे आहे. हे काम एकट्या पुरुषांना करता येणार नाही. स्त्रियांनीही त्यात भागीदारी पत्करली पाहिजे. महिलांच्या उन्नतीच्या आणि कल्याणाच्या योजना आता महिलांनीच स्वतः आखल्या पाहिजेत. हे कार्य करताना महर्षी कर्वे यांनी दाखवून ठेवलेल्या आत्मोद्धाराच्या आणि स्वावलंबाच्या मार्गानेच त्यांना जावे लागेल. स्त्रियांसाठी जे स्वतंत्र विद्यापीठ महाराष्ट्रात कर्वे यांनी स्थापन करून ठेवले आहे, तशी शेकडो विद्यापीठे देशामध्ये निरनिराळ्या प्रांतांत निर्माण झाली, तर एका तपाच्या आत भारतवर्षातील सर्व महिलावर्ग जागृत झाल्यावाचून राहणार नाही. तो काळ काही आता फार दूर नाही. देशाच्या क्षितिजावर उगवलेला स्वातंत्र्याचा नवा प्रकाश थोड्याच काळात समाजाच्या सर्व थरांपर्यंत जाऊन पोहोचेल. समाजपुरुषाच्या पायांखाली हजारो वर्षे दडपले गेलेले दलित वर्ग आपापली दडपणे दूर करून आज ना उद्या बाहेर आल्याखेरीज राहणार नाहीत. पाश्चात्त्य देशांतील स्त्रियांप्रमाणे भारतवर्षातील महिलाही लौकरच खडबडून जाग्या होतील आणि पुरुषांचे आर्थिक वर्चस्व झुगारून देऊन स्वाभिमानाने अन् स्वतंत्रपणाने जगू लागतील. भारतामधील या उद्याच्या जागृत महिलेला आपल्या उद्धाराचा मार्गदर्शक म्हणून कृतज्ञतेने महर्षी कर्वे यांचेच स्मरण करावे लागेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.
.......... विभाग ..........
अ. क्र. .......... नों दि. ..........
क्रमांक ..........

## कुशाग्र बुद्धीची महत्त्वाकांक्षी महिला

# पंडिता रमाबाई

गेल्या शतकात महाराष्ट्रामध्ये ज्या बुद्धिमान, विद्वान आणि कर्तबगार स्त्रिया होऊन गेल्या त्यांमध्ये पंडिता रमाबाई यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. जुन्या पिढीतल्या बहुतेक लोकांना पंडिता रमाबाई यांचे नाव आणि कामगिरी परिचयाची आहे. पण आजच्या काळात त्या जवळजवळ नामशेषच झालेल्या आहेत असे म्हणावयाला हवे. पुण्यापासून काही अंतरावर केडगाव म्हणून जे गाव आहे तेथे 'मुक्तिसदन' नावाची खिस्ती मुलींच्या आणि स्त्रियांच्या उद्धाराचे कार्य करणारी एक संस्था आहे. ह्या संस्थेत जवळजवळ दीड हजार खिस्ती स्त्रिया शिक्षण घेत आहेत. या संस्थेच्या नावाचा आणि कामाचा जनतेमध्ये आज फारसा गाजावाजा नाही. कारण या संस्थेला पैशाची मदत अमेरिकेकडून मिळते असे म्हणतात. त्यामुळे इकडच्या लोकांशी तिचा प्रत्यक्ष असा संबंध येत नाही. त्याखेरीज, बाहेरच्या लोकांना ही संस्था पाहावयाला सुद्धा मिळत नाही इतका तेथे कडेकोट बंदोबस्त ठेवलेला आहे. म्हणजे आतील रहिवाशांना बाहेरच्या जगाचा संपर्क नाही आणि बाहेरच्या जगाला 'मुक्ति-सदना' तील प्राण्यांचीही दखलगिरी नाही. अशी ही मुलखावेगळी संस्था अठ्ठावन्न वर्षांपूर्वी पंडिता रमाबाई यांनी मुंबई येथे स्थापन केली.

त्या वेळी या संस्थेचे नाव ‘ शारदासदन ’ असे होते. काही दिवसांनंतर ही संस्था पुण्यात आणण्यात आली आणि नंतर पुण्याहून ती केडगावला नेण्यात आली. या संस्थेमुळे महाराष्ट्राच्या आयुष्यामध्ये काही वर्षे तरी प्रचंड वादळ उठलेले होते. पंडिता रमाबाई यांच्या बुद्धिमत्तेचे महाराष्ट्राने एक वेळ जितके कौतुक केले तितकाच त्या खिस्ती झाल्यानंतर महाराष्ट्राने त्यांचा तिरस्कारही पण केला. एका वरंदाज आणि विद्वान अशा सनातनी ब्राह्मणाच्या कुळात जन्माला आलेल्या या स्त्रीने हिंदूधर्माचा त्याग करून शेवटी खिस्ती धर्माचा स्वीकार केला हे जरी खरे असले तरी त्यामुळे तिच्या मोठेपणाला बाध येतो असे कोणालाही म्हणता येणार नाही. खचित अनेक दृष्टींनी ही एक लोकोत्तर स्त्री होऊन गेली. रमाबाईंचे चरित्र आजच्या हिंदू समाजाला आवडणार नाही हे खरे. तथापि तिचे आयुष्य अनेक अद्भुत आणि नाट्यपूर्ण प्रसंगांनी भरून गेले असल्यामुळे तिचे चरित्र जाणण्याची उत्सुकता प्रत्येकाला वाटल्यावाचून राहणार नाही.

रमाबाईंच्या वडिलांचे नाव अनंतशास्त्री डोंगरे असे होते. पश्चिम घाटाच्या पायथ्याशी मंगळूर जिल्ह्यामधले हे मूळचे राहणारे. दुसऱ्या बाजीराव पेशव्यांचे गुरू रामचंद्रपंत साठे म्हणून होते. त्यांच्यापाशी यांनी संस्कृतचे अध्ययन केले. त्यानंतर काही वर्षे म्हैसूर येथे त्यांनी विद्याध्ययन केले. तेथे त्यांना पुष्कळ पैसा आणि मानमान्यता मिळाली. त्यांनी आपल्या पत्नीला उत्तम तऱ्हेने संस्कृत शिकविले होते. एकदा ते काशीयात्रेस जात असताना त्यांचे कुटुंब वारले. तेव्हा काशीला राहून त्यांनी आणखी शास्त्राध्ययन केले. त्यानंतर ते हिंदुस्थानात प्रवास करावयास निघाले. फिरता फिरता एकदा ते पैठण मुक्कामी आले असता त्यांना तेथे कोणी वाईचे माधवराव अभ्यंकर भेटले. त्यांना आपल्या आयुष्याचा वीट आलेला होता. म्हणून वैतागाने साष्टांग नमस्कार घालीत घालीत ते सहकुटुंब काशीला चालले होते. त्यांच्याबरोबर अंबाबाई नावाची त्यांची एक लहान कन्या होती. अनंतशास्त्र्यांना बघून माधवरावांनी या आपल्या मुलीचे त्यांच्याशी लग्न लावून टाकले. या वेळी अनंतशास्त्री चव्वेचाळीस वर्षांचे होते आणि अंबाबाई नऊ वर्षांची होती. लग्न झाल्यानंतर अनंतशास्त्री आपल्या लहानग्या पत्नीला घेऊन परत गावी गेले व लोकांची टीका चुकविण्यासाठी लांब एका जंगलात जाऊन त्यांनी आश्रम स्थापन केला आणि तेथेच ते राहू

लागले. या आश्रमाची जागा अत्यंत मनोहर होती. कारण तुंग आणि भद्रा या नद्या तेथेच जवळपास उगम पावतात. आजूबाजूची झाडी तोडून अनंतशास्त्री आणि अंबाबाई यांनी तेथे शेतीसाठी उत्तम जमीन तयार केली आणि फुलझाडांच्या सुंदर सुंदर बागा लावल्या. त्याचप्रमाणे शे-दोनशे गुरेही तेथे त्यांनी पाळली. त्यामुळे प्राचीन काळामधल्या एखाद्या ऋषीच्या आश्रमाची शोभा त्या जागेला आली. अनंतशास्त्र्यांची कीर्ती ऐकून लांबलांबचे अनेक विद्यार्थी त्यांच्या या गुरुकुलात येऊन राहिले. पतीच्या सहवासामुळे आणि शिकवणीमुळे अंबाबाई ही लौकरच गार्गीमैत्रेयीप्रमाणे संस्कृत भाषेत आणि शास्त्रात पारंगत झाली. ह्या दोघांच्या पोटी अठ्ठावन्न साली एप्रिल महिन्यात पंडिता रमाबाईचा जन्म झाला.

रमाबाई आणि तिचा धाकटा भाऊ श्रीनिवास यांचे सारे बालपण संस्कृत भाषेच्या आणि विद्येच्या वातावरणात गेले. दोघेही मुले बुद्धीने अतिशय हुशार असल्यामुळे अगदी अल्पवयात त्यांना हजारो संस्कृत श्लोक मुखोद्‌गत झाले आणि संस्कृत भाषेत तासन्‌तास बोलण्याचे किंवा चर्चा करण्याचे सामर्थ्य त्यांना प्राप्त झाले. पुढे अनंतशास्त्र्यांना अकस्मात दारिद्र्य आले आणि त्यांच्यावर अनेक संकटे कोसळली. त्यामुळे बिचारा बेजार होऊन मरण पावला. त्यांच्या पाठोपाठ अंबाबाई हीही लौकरच मरण पावली. त्यानंतर अनाथ झालेली ही दोन मुले आपला मुलूख सोडून प्रवासाला निघाली. या गावाहून त्या गावाला भटकत भटकत आणि आपल्या विद्वत्तेने लोकांना आश्चर्यचकित करीत शेवटी ही भावंडे कलकत्त्याला आली. तेथे पोहोचताच धाकटा भाऊ श्रीनिवास हा मरण पावला आणि त्यामुळे रमाबाई सर्वस्वी निराधार झाली. तथापि तिने धीर सोडला नाही. तिने आपल्या पांडित्याने आणि शीघ्रकवित्वाने कलकत्ता शहरातील मोठमोठ्या विद्वान पंडितांना चकित करून जवळ जवळ सर्व हिंदुस्थानचे लक्ष आपणाकडे वेधून घेतले. तिच्या सन्मानासाठी कलकत्त्यात अनेक जाहीर सभा भरल्या आणि तिला कित्येक मानपत्रे मिळाली. या सर्व सभांमधून रमाबाई संस्कृतमध्येच भाषणे करीत असत. वयाच्या तेविसाव्या वर्षी आसाममधील बिपिन मेधावी या एका विद्वान वकिलाशी ब्राह्मो पद्धतीने रमाबाईचा विवाह झाला. तथापि लग्न झाल्यानंतर अवघ्या एकोणीस महिन्यांच्या आत पतिनिधनाची कुऱ्हाड आकाशातून त्यांच्यावर पडली. पतिनिधनाचे वेळी रमाबाई गरोदर होत्या. त्यांना मुलगी

झाली. तिचे नाव मनोरमा. कौटुंबिक आणि सांसारिक सुखाच्या दृष्टीने पंडित रमाबाई या दुर्दैवी होत्या असेच म्हटले पाहिजे.

रमाबाईंच्या विद्वत्तेचा सुगंध महाराष्ट्रात येऊन पोहोचण्याला फारसा वेळ लागला नाही. त्यांना आपण केव्हा डोळ्यांनी पाहतो आहोत आणि त्यांची संस्कृत भाषणे केव्हा कानांनी ऐकतो आहोत असे त्या वेळी महाराष्ट्राला होऊन गेले. मुंबईपुण्याला येऊन भेट देण्याबाबत इकडून त्यांना अनेक आमंत्रणे गेली. शेवटी ब्यायशी साली, म्हणजे वयाच्या चोविसाव्या वर्षी, त्या पुण्यास एकदम येऊन दाखल झाल्या. त्यांच्या विद्वत्तेचे तेज बघून पुणे दिपून गेले, आणि ऐन तारुण्यात प्राप्त झालेले त्यांचे वैधव्य बघून पुणेकरांना एकदम त्यांच्याविषयी आदर वाटू लागला. महादेव गोविंद रानडे, डॉ. रामकृष्ण भांडारकर, वामन आबाजी मोडक यांच्यासारख्या मोठमोठ्या विद्वानांना रमाबाईंना कोठे ठेवू आणि कोठे नाही असे होऊन गेले. रानड्यांना तर उपनिषत्कालामधील एखादी महान विदुषीच आधुनिक काळात प्रत्यक्ष अवतीर्ण झाल्याचा भास झाला. पुण्यामध्ये पंडिताबाईंची अनेक जाहीर पुराणे आणि व्याख्याने होऊ लागली. या तिच्या कार्यक्रमांना सुशिक्षित आणि सनातनी अशा दोन्ही तऱ्हेच्या लोकांची अगदी झुंबड उडून राहिली. पंडिताबाईंच्या अस्खलित, निर्भय आणि अनेक कोटिक्रमांनी युक्त असलेल्या वक्तृत्वाच्या प्रवाहात पुणेकर जनता चारदोन महिने चांगल्याच गटांगळ्या खात होती. पुण्यातील टवाळ लोक स्त्रियांची निंदा करण्यात इतके पटाईत. पण त्यांनी देखील पंडिता रमाबाईंपुढे आपली नांगी टाकली. स्त्रीशिक्षणाचा प्रसार करण्याच्या दृष्टीने पुण्यामुंबईच्या सुधारकांना रमाबाई हे एक मोठे घबाड सापडले. म्हणून रमाबाईंनी सुरू केलेल्या स्त्रीशिक्षणाच्या कार्यास त्यांनी सढळ हाताने मदत करण्यास सुरवात केली. पुण्यास आल्यावर पंडिता रमाबाईंनी इंग्रजी शिकण्यास प्रारंभ केला. तोपर्यंत त्यांना इंग्रजीचे एक अक्षरही येत नव्हते. उत्तम इंग्रजी शिकून विलायतेला जाण्याची महत्त्वाकांक्षा त्यांच्या मनात उत्पन्न झाली. याच सुमारास पुण्यातील मिशनऱ्यांची आणि त्यांची ओळख झाली. आपल्या कळपात ओढावयाला हे एक फार उत्तम साधन आहे अशा कल्पनेने विलायतेला जाण्याची रमाबाईंची इच्छा सफल करण्यास मिशनऱ्यांनी साहाय्य केले. विलायतेमधील पाश्चात्त्य संस्कृतीचा झगझगाट बघून रमाबाईंचे डोळे दिपून गेले आणि लौकरच त्यांनी आपल्या मुलीसह बाप्तिस्मा घेऊन ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. इंग्लंड-

मध्ये राहून त्यांनी इंग्रजी भाषेवर चांगलेच प्रभुत्व मिळविले आणि तेथील चालीरीतींचा व समाजव्यवस्थेचा सूक्ष्म अभ्यास केला. त्यानंतर त्या अमेरिकेत गेल्या. त्यांच्या विद्वत्तेची अमेरिकन लोकांवर चांगलीच छाप पडली. हिंदुस्थानात जाऊन स्त्रीशिक्षणाचे कार्य केल्यास दहा वर्षेपर्यंत आपण पैशांची मदत देऊ असे अमेरिकन मिशनऱ्यांकडून अभिवचन घेऊन त्या हिंदुस्थानात आल्या आणि त्यांनी मुंबई येथे ' शारदासदन ' नावाची आपली संस्था स्थापन केली. निराश्रित विधवा आणि अनाथ स्त्रिया यांना या संस्थेत फुकट राहण्याची, जेवणाची आणि शिक्षणाची सोय केलेली होती. ख्रिस्ती धर्माचे शिक्षण या संस्थेत दिले जाणार नाही असे बाईंनी जनतेला आश्वासन दिले होते म्हणून रानडे, पंडित, भांडारकर, तेलंग अशा मोठमोठ्या हिंदू पुढाऱ्यांनी या संस्थेच्या सल्लागार मंडळात आपली नावे घालण्याला मान्यता दिलेली होती. परंतु रमाबाईंनी आपले वचन इमानाने पाळले नाही. संस्थेतील मुलींना ख्रिस्ती धर्माचे शिक्षण गुप्तपणे देण्यात येते अशा बातम्या हळूहळू बाहेर उठू लागल्या आणि ' शारदासदन ' ही संस्था ख्रिस्ती आहे अशा तऱ्हेचे आक्षेप तिजवर वर्तमानपत्रांतून राजरोसपणे घेण्यात येऊ लागले. या आरोपाचे निरसन करण्यासाठी रमाबाईंनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. हिंदू मुलींना सोवळे, उपवास, तुळशीपूजा वगैरे धार्मिक बाबतीत स्वातंत्र्य देण्यात येते असे त्यांनी परोपरीने सांगितले. आणि हिंदू जनतेची भरपूर आर्थिक मदत मिळाल्यास आपण ख्रिस्ती मिशनऱ्यांकडून एक कवडीही घेणार नाही अशीही त्यांनी ग्वाही दिली. आरंभी आरंभी सल्लागार मंडळीतील विद्वान पुढाऱ्यांचा आणि ' केसरी ' पत्राचा रमाबाईंना पाठिंबा होता. तथापि हिंदू मुलींना ख्रिस्ती धर्मात ओढण्याची ' शारदासदना 'तील अनेक धूर्त कारस्थाने निरनिराळ्या मार्गांनी जशी उघडकीला येऊ लागली तसे पंडिता रमाबाईंचे समर्थन करणे त्यांच्या पुरस्कर्त्यांना देखील कठीण झाले. शेवटी ब्याण्णव साली रानडे आणि भांडारकर यांनी राजीनामे देऊन या संस्थेशी असलेले आपले संबंध कायमचे तोडून टाकले. ते गेल्यानंतर सदनातील हिंदू मुलींना बाटवण्याचे आपले कार्य पंडिता रमाबाईंनी अगदी मुक्तहस्ताने सुरू केले आणि संस्थेचे नाव बदलून तिला त्या केडगावला घेऊन गेल्या. सत्याण्णव साली देशात जो मोठा दुष्काळ पडला त्यामुळे अनाथ झालेल्या शेकडो मुली आणि स्त्रिया रमाबाईंनी आपल्या ' मुक्तिसदना 'त आणून त्यांना ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली. या

सदनामध्ये मुलींना फूस लावून नेण्यात येते आणि तेथे गेल्यानंतर त्यांना अतिशय वाईट रीतीने वागवण्यात येते अशा तऱ्हेच्या कागाळया अनेक वेळा सरकारकडे करण्यात आलेल्या होत्या. तथापि, गोऱ्या खिस्ती अधिकाऱ्यांची बाईंना आतून सहानुभूती असल्याकारणाने या तक्रारीतून काहीही निष्पन्न होऊ शकले नाही. एकोणीसशे साली पंडिता रमाबाई पुन्हा दुसऱ्यांदा अमेरिकेला गेल्या आणि धर्मांतराच्या कार्यासाठी त्यांनी तेथे पुष्कळच पैसा जमा केला. या सफरीमध्ये हिंदूधर्मावर प्रखर टीका करण्याची संधी मात्र त्यांनी भरपूर साधून घेतली.

रमाबाईंच्या उत्तर आयुष्याबद्दल विशेष काहीच सांगण्यासारखे नाही. त्यांनी आपला सर्व जन्म 'मुक्तिसदन' ही संस्था उत्तम तऱ्हेने चालविण्यात आणि अनाथ खिस्ती स्त्रियांचा उद्धार करण्यासाठी घालविला. आयुष्याच्या पूर्वार्धात संस्कृत भाषेवर अणि विद्येवर त्यांनी मिळवलेल्या प्रभुत्वाला दृश्य असे काहीही फळ पुढे येऊ शकले नाही. मराठी आणि इंग्रजी या दोन भाषांत त्या उत्तम शैलीदार लेखन करीत असत. अमेरिकेच्या प्रवासवर्णनाचे त्यांचे पुस्तक मराठी भाषेचे एक अमर भूषण आहे. महाराष्ट्रातल्या लोकांनी आपली अनास्था केली म्हणून त्यांच्यावर सूड उगवण्यासाठी बाई खिस्ती झाल्या असा त्या वेळी एक प्रवाद होता. तो खोटा आहे. त्या काळात महाराष्ट्रातली अनेक बुद्धिमान माणसे खिस्ताच्या तत्त्वज्ञानाने मोहित झाली होती हे अगदी खरे आहे. बाई त्यांपैकीच एक होत्या. खिस्ती धर्माचा स्वीकार करून त्यांनी हिंदी खिस्ती समाजाची फार मोठी सेवा केली यात संशय नाही. पण ज्या हिंदू समाजात त्यांचा मूळ जन्म झाला होता आणि ज्या हिंदू समाजाने त्यांच्या पांडित्याचे एवढे कोडकौतुक केले होते त्या समाजाला त्यांच्या थोर बुद्धीचा, ज्ञानाचा आणि कर्तृत्वाचा मुळीच फायदा मिळू शकला नाही असे मात्र खेदाने म्हणावे लागते. धर्मांतर न करता पंडिता रमाबाई यांनी विद्यादानाचे आणि समाजसुधारणेचे कार्य जर आपल्या समाजात केले असते तर विष्णुशास्त्री चिपळूणकर, रानडे, टिळक, आगरकर आणि धोंडोपंत कर्वे यांच्या तेजस्वी मालिकेत पंडिता रमाबाईंचेही नाव महाराष्ट्राला आज निःसंशय घालावे लागले असते.

## महाराष्ट्राचे समाजवादी संत

# गाडगे महाराज

रस्त्याच्या कुठेतरी एका कोपऱ्यावर एखाद्या लहानशा कागदावर किंवा लाकडाच्या फळीवर वेड्यावाकड्या अक्षरांत लिहिलेले असते, "आज रात्री गाडगे महाराज ह्यांचे कीर्तन येथे आहे."

दिवसभर तेथून हजारो लोक चाललेले असतात. रस्ता वाहत असतो. कोणी त्या मजकुराकडे बघतही नाही. कोणी तो वाचीतही नाही. ज्यांना वाचता येते ते तर मुळीच वाचीत नाहीत. पण संध्याकाळ झाली, अंधार पडला, की त्या ठिकाणी हजारो निरक्षर आणि अडाणी गरीब लोक गुपचुप जमा झालेले दृष्टीस पडतात. पंधरा हजारांपासून तो पन्नास हजारांपर्यंत गर्दीचा विस्तार असतो. गुळाचा खडा रस्त्यावर पडला म्हणजे जशा हजारो मुंग्या आपोआप गोळा होतात तसे गाडगे बाबांचे कीर्तन असले की समाजातल्या क्षुद्र आणि कष्टकरी मुंग्या हजारोंच्या संख्येने त्यांच्याभोवती जमा होतात. तुकोबा म्हणतात,

मुंगीचिया घरी कोण जाय मूळ
देखोनिया गूळ धाव घाली
याचकावीण काय खोळंबला दाता
तोचि धावे हिता आपुलिया

उदक अन्न काय म्हणे मज खाय
भुकेला तो जाय चोजवीत
व्याधीपिडिला धावे वैद्याचिया घरा
दुःखाच्या परिहरा आपलिया
तुका म्हणे जया आपले स्वहित
कारण तोचि प्रीत धरि कथे

याचक जसा दात्याकडे जातो, भुकेला जसा अन्नाकडे धावतो, व्याधिग्रस्त जसा वैद्याकडे पळतो, तसे महाराष्ट्रातले हजारो कंगाल—भुकेकंगाल, रोगी-महारोगी स्वहिताच्या लाभासाठी गाडगे बाबांची कथा असली म्हणजे देहभान विसरून धावत सुटतात. गाडगे बाबा स्वतः निरक्षर आहेत. त्यांना लिहिता येत नाही, वाचता येत नाही. त्यांच्या सहीची निशाणी आंगठा. समाजातल्या धनिक श्रीमंतांबद्दल आणि सुसंस्कृत सुशिक्षितांबद्दल त्यांना काडीइतके आकर्षण नाही. कवडीइतके प्रेम नाही. ‘ जे का रंजले गांजले ’ त्यांसी आपुले म्हणणारे बाबा आहेत. जगात दुःख पाहून द्रवणारे ते ‘ नवनीताचा गोळा ’ आहेत. ज्यांना कोणी अपंगिता नाही, त्यांना हृदयाशी धरून त्यांच्या डोळयांतील अश्रू पुसणारे आणि त्यांच्या जखमांवर फुंकर घालणारे ते साक्षात ‘ भगवंताची मूर्ती ’ आहेत. गेली पन्नास वर्षे गाडगे बाबा महाराष्ट्राच्या सर्व भागांतून अहोरात्र संचार करीत आहेत. गरिबांची आणि दुःखितांची नाना परीने सेवा करीत आहेत. ‘ झाडूचे तंत्र ’ ह्या देशात महात्मा गांधींनी आणले अशी सुशिक्षितांची समजूत आहे. साफ खोटी गोष्ट आहे. डोक्यावर खापर आणि हातात खराटा घेऊन बाबा अक्षरशः पन्नास वर्षे हिंडताहेत. ते खराट्याचे बादशहा आहेत. कोणत्याही गावात त्यांनी पाऊल टाकले की, पहिल्याने त्यांच्या हातातला झाडू चालू लागतो. मग लोक जागे होतात आणि हातात खराटे घेऊन धावतात. सकाळी गावातली घाण झाडूने साफ केली, म्हणजे मग संध्याकाळी लोकांच्या डोक्यातली घाण आपल्या कीर्तनाने ते साफ करतात. हे गाडगे बाबांच्या जीवनाचे आणि सेवेचे तंत्र आहे. हा महान समाजसेवक तब्बल अर्धशतक जनतेच्या कल्याणासाठी चंदनासारखा झिजतो आहे, आपल्या देहाचे कण रात्रंदिवस घासतो आहे. पण सुशिक्षित महाराष्ट्राला त्याची जाणीव नाही.

कोणत्याही वर्तमानपत्रात त्यांच्या कीर्तनाची बातमी नाही, त्यांच्या उपदेशाचा सारांश नाही, त्यांच्या कार्याची ओळख नाही. सुशिक्षित महाराष्ट्राला दोरे, गंडे, ताईत नि गुरुमंत्र देणारे अन् चमत्कार करणारे 'बाबा' अन् 'महाराज' लागतात. कोणाला पोरे पाहिजे असतात, कोणाला पैसे पाहिजे असतात, कोणाला काही, कोणाला काही. अशा लोकांना गाडगे बाबांजवळ स्थान नाही. कीर्तनाखेरीज त्यांच्याजवळ जनतेला देण्यासारखे दुसरे काही नाही. कोणी त्यांच्या पायाला हात लावला की त्याच्या पाटीत ते खराटा मारतात. त्यांना कोणी नमस्कार करण्याच्या आधीच हात जोडून ते त्याच्यासमोर लोटांगण घालतात. चमत्कारांचा नि गाडगे बाबांचा काही एक संबंध नाही. स्वतः तेच ह्या भारता-मधला आजच्या घटकेचा एक चालताबोलता चमत्कार होत.

कोणत्याही एका गावात दोन दिवसांपेक्षा ते अधिक राहत नाहीत. वाऱ्या-सारखे ते रात्रंदिवस वाहत असतात. नदीसारखे ते अष्टौप्रहर झुळझुळत असतात. कोणाच्याही घरात ते मुक्कामाला जात नाहीत. रात्रौ रस्त्याच्या कडेला एखाद्या झाडाखाली झोपतात. सतरंजीवर किंवा घोंगडीवर बसत नाहीत. घरात आलेच तुमच्या, तर ते जोड्यासारखे कुठेतरी बाजूला जमिनीवर बसतील. तुम्ही फुले, हार त्यांना दिलेत, तर ते पुन्हा तुमचे तुम्हालाच परत देतील. वाटेत जाता जाता भाकरीचा एखादा शिळापाका तुकडा कोणाकडे तरी मागावयाचा, तेवढा खायचा आणि परळातून पाणी प्यायचे. गेली चार वर्षे तोही आहार त्यांनी आता बंद केला आहे. नुसते वरणाचे किंवा आमटीचे प्यालाभर पाणी आणि थोडीशी भाजी एवढ्यावर आज ते जगताहेत. आज त्यांचे वय ऐशीच्या घरात असेल. कोणी म्हणतात त्यांची उमर पंचायशी आहे. कोणास ठाऊक? त्यांचा जन्म कोठे झाला अन् केव्हा झाला ह्याची तपशीलवार माहिती कोणालाच नाही. ते आपले चरित्र कोणासच सांगत नाहीत. त्यांच्याबद्दल लोकांच्या आठवणी हेच त्यांचे चरित्र. एवढे त्यांचे वय झाले असून, केस पांढरे करण्यापलीकडे म्हातारपणाने अद्याप त्यांच्या शरीराला स्पर्श केलेला नाही. रात्रीचे दोन अडीच तास ते झोपतात. बाकीचा सारा वेळ ते पायांवर उभे असतात. तीनतीन तास खड्या आवाजात ते कीर्तन करतात. डोक्यावर खापरांच्या तुकड्याचे शिरस्त्राण, अंगावर रंगीबेरंगी चिंध्या, एका कानात एक कवडी लोंबत आहे, दुसऱ्या कानात फुटक्या बांगडीची काच डुलते आहे

असा बाबांचा अवतार असतो. देशाच्या दारिद्र्याचे ते मूर्तिमंत प्रतिनिधी आहेत. अंगावर चिंध्या घातल्याखेरीज आणि हातात खापर घेतल्याखेरीज समाजसेवकांना दरिद्री-नारायणाची पूजा करता येणार नाही ह्या त्यांच्या शिकवणुकीचे ते स्वतःच एक चालतेबोलते प्रतीक आहेत.

बाबा एरवी कोणाशी बोलत नाहीत, गप्पा मारीत नाहीत. एका ठिकाणी मुळी ते बसतच नाहीत, तर बोलणार कोणाशी काय? नुसते त्यांना पाहून ते तुम्हांला समजणार नाहीत. तुम्हांला वाटेल, कोण हा वेडपट दुधखुळा माणूस आहे! त्यांचे सामर्थ्य तुम्हाला एरवी मुळीच कळणार नाही. सिंहाला पाहावे वनात, हत्तीला पाहावे रानात, तसे गाडगे बाबांना पाहावे कीर्तनात. हजारो माणसांच्या प्रचंड समुदायामध्ये बाबा एकदा उभे राहिले, म्हणजे पावसाळ्यातल्या मेघासारखे आभाळभर गडगडू लागतात. आणि डोक्यावर साहित्याचा, सद्भावनेचा आणि सद्विचाराचा असा काही जबरदस्त मारा सुरू होतो की श्रोते अक्षरशः त्या कीर्तनाच्या सरोवरात देहभान विसरून तासन्तास डुंबत राहतात. कीर्तनासाठी बाबांना साहित्य लागत नाही. टाळ नको, वीणा नको, बाजाची पेटी नको. मिळाले तरी बाहवा, न मिळाले तरी बाहवा. रस्त्यावरचे दोन दगड वेचून ते वाजवायला लागतात. श्रोत्यांच्या टाळ्या आणि घोष हेच त्यांच्या कीर्तनाचे सारे भांडवल. बाबांना वाचता येत नाही, लिहिता येत नाही. पण तुकोबांचे अभंग त्यांच्या जिभेवर नाचताहेत. कोणताही एक अभंग त्यांना सबंध येत नाही. कोणती ओळ कोणत्या अभंगात आहे हे त्यांना सांगता येत नाही. पण निरूपणाच्या ओघात एखाद्या अभंगाचा चरण त्यांच्या तोंडून अशा काही प्रभावाने आणि दिमाखाने बाहेर पडतो की, सारे श्रोते त्याचा एकमुखाने उच्चार करतात. साहित्याचा आणि वक्तृत्वाचा बाबांनी कुठे अभ्यास केला आहे? पण मराठी भाषा त्यांच्याजवळ पाणी भरते आहे असे म्हटले तरी चालेल. अशी सोपी, बाळबोध, ओघवती आणि लाडकी भाषा ते बोलतात की जन्मभर साहित्याशी कुस्त्या खेळत बसलेले आमच्यासारखे 'भाषाप्रभू' तोंड वासूनच त्यांच्याकडे पाहत राहतात. जनतेची भाषा बोलणारा असा प्रभावी आणि जबरदस्त वक्ता दुसरा महाराष्ट्रात नाही. सर्व रसांची तुडुंब मेजवानी त्यांच्या भाषेत भरलेली आहे. आणि त्यांच्या रसवंतीच्या पायांत तर विनोदाची मधुर आणि मंजुळ घुंगुरे एकसारखी खुळखुळत असतात.

बाबांचे कीर्तन-श्रवण हा एक महान अनुभव आहे. तो ज्याने घेतला नसेल तो करंटा, तो दुर्दैवी, तो अभागी! तो कशाला ह्या महाराष्ट्रात जन्माला आला? आमच्या पंचावन्न वर्षांच्या आयुष्यात बाबांचे कीर्तन आम्ही परवा ऐकले. आमची पंचावन्न वर्षे आतापर्यंत फुकट गेली होती. ती त्या रात्री सार्थकी लागली आणि जीवन कृतार्थ झाले. बाबांचे कीर्तन आमच्याप्रमाणेच आतापर्यंत न ऐकलेले महाराष्ट्रात लक्षावधी सुशिक्षित आहेत. त्यांची आम्हांला कीव वाटते. बाबांचे कीर्तन ऐकलेले कित्येक सुशिक्षित आम्हांला भेटले. त्यांना आम्ही विचारले, "तुम्ही गाडगे महाराजांचे कीर्तन ऐकले?" ते म्हणाले, "हो." आम्ही विचारले, "कसे वाटले?" ते म्हणाले, "चांगले वाटले." आम्ही विचारले, "काय होते चांगले त्यात?" ते म्हणाले, "काही आठवत नाही, पण चांगले होते." बाबांच्या कीर्तनाचे वर्णन शब्दांनी करता येणार नाही आणि त्याचे रहस्य मध्यमवर्गीय सुशिक्षितांना आणि पांढरपेशा समाजाला तर मुळीच कळणार नाही. बाबांचे कीर्तन अज्ञांसाठी आहे, गरिबांसाठी आहे, दलितांसाठी आहे, दुःखितांसाठी आहे. त्यात योग नाही, अध्यात्म नाही, पोथी नाही, पुराण नाही, देवांची वर्णने नाहीत, पूजा-यात्रा यांचा उपदेश नाही. त्यात शुद्ध जीवन आहे. हजारो वर्षे समाजाच्या आर्थिक सत्तेखाली आणि धार्मिक रूढीखाली भरडून निघाल्यामुळे दूधखुळ्या, देवभोळ्या अन् आंधळ्यापांगळ्या झालेल्या हीनदीन समाजाच्या उद्धाराचा झगझगीत प्रकाशझोत म्हणजे गाडगे बाबांचे कीर्तन! कम्युनिस्टांना आणि आम्हां समाजवाद्यांना वाटेल की, आर्थिक समतेचा संदेश भारतातल्या जनतेला आम्हीच दिला आणि आम्हीच सध्या तो देत आहोत. मार्क्स हा माणूस आहे की माकड आहे हे देखील गाडगे बाबांना ठाऊक नाही. पण गेली पन्नास वर्षे आपल्या जीवनामधून आणि कीर्तनामधून गाडगे महाराज हे शुद्ध मार्क्सवादाचीच अज्ञ जनतेला शिकवणूक देत आहेत. गाडगे बाबा हे महाराष्ट्रातले समाजवादाचे एक प्रचंड व्यासपीठ आहे. स्वतः गाडगे महाराज आपल्या उभ्या आयुष्यामध्ये एकाही देवळात गेलेले नाहीत. पंढरपूरच्या विठोबाच्या देवळात त्यांनी अद्याप पाऊलही टाकले नाही. एवढेच नव्हे तर त्या देवळाचे तोंड कोणत्या दिशेला आहे हे देखील त्यांना माहीत नाही.

शेंदूर माखोनिया धोंडा
पाया पडती पोरे रांडा

देव दगडाचा केला
गवंडी त्याचा बाप झाला
देव सोन्याचा घडविला
सोनार त्याचा बाप झाला
सोडोनिया खऱ्या देवा
करी म्हसोबाची सेवा

ही दगडधोंड्यांच्या देवाकडे पाहण्याची तुकोबांची दृष्टी होती, आणि तोच गाडगेबाबांचा त्याच्याबद्दलचा दृष्टिकोण आहे. गाडगेबाबांसारखा मूर्तिपूजेचा जळजळीत निषेध हिंदुद्वेष्ट्या मुसलमानांनीसुद्धा कधी केला नसेल. दगडाधोंड्यांची पूजा करण्यात काळाचा नि पैशाचा व्यय करू नका. त्याच्यापुढे बकऱ्या आणि कोंबड्या मारू नका. तीर्थक्षेत्रांना जाऊ नका. गंगास्नानाने पापे जातात असे म्हणणे हा धर्माचा शुद्ध काळाबाजार आहे. कर्ज काढून सणसमारंभ करू नका, हा उपदेश बाबांच्या प्रत्येक कीर्तनात शिगोशीग भरलेला असतो. पण हा उपदेश करताना कोणत्याही जातीच्या किंवा वर्गाच्या द्वेषाचे एक अक्षरसुद्धा बाबांच्या तोंडून कधी निघत नाही. तुडुंब भूतदया ही त्यांच्या अंतःकरणात भरलेली आहे. सर्वांच्या प्रेमावर आधारलेल्या समतावादी तत्त्वज्ञानाचा प्रचार कसा करावा ह्याचा सोज्वळ आणि सात्त्विक आदर्श बाबांच्या कीर्तनामध्येच पाहावयाला मिळतो.

बाबांच्या कीर्तनाचे तंत्र मोठे विलक्षण आहे. सर्व श्रोत्यांना दोन्ही हात वर करून टाळ्यांच्या तालावर ते एक भजन करायला सांगतात. ‘ गोपाला। गोपाला। देवकीनंदन गोपाला । ’ अर्धे मिनीट हे भजन चालते आणि मग बाबांच्या समाजवादी कीर्तनाचे कारंजे उचंबळू लागते. त्यांच्या कीर्तनात शेकडो प्रश्न आणि मुद्दे येतात. एकेका मुद्द्याचा ते एकेक टप्पा करतात, आणि तो टप्पा लाटेसारखा वाढवीत असा काही वर नेतात अन् ‘ गोपाला। गोपाला। देवकीनंदन गोपाला। ’ ह्या सांघिक भजनाच्या खडकावर एकदम नेऊन तो आदळतात. त्यामुळे त्यांचा तो उपदेश थेट श्रोत्यांच्या हृदयात तर शिरतोच, पण श्रोते तल्लीन होऊन जेव्हा डोलू लागतात तेव्हा तो उपदेश त्यांच्या रक्तामध्ये आणि देहकणांमध्ये जाऊन भिनतो. बाबांच्या सबंध कीर्तनात ‘ गोपाला। गोपाला। देवकीनंदन गोपाला। ’ एवढाच परमेश्वराच्या

नावाचा उल्लेख येतो. पण त्याचाही उपयोग श्रोत्यांची भाविकता वाढविण्यापेक्षा आपला उपदेश त्यांच्या मनावर नीट ठसावा म्हणून ते करतात. त्यांच्या ह्या तंत्राची दोनच उदाहरणे देतो. कीर्तनात बाबांचा आणि श्रोत्यांचा समोरासमोर संवादच चालू असतो.

बाबा : देव किती ?

श्रोते : एक.

बाबा : तुमच्या गावी खंडोबा आहे का ?

श्रोते : आहे.

बाबा : मग देव किती झाले ?

श्रोते : दोन.

बाबा : आपल्या गावी भैरोबा आहे का ?

श्रोते : आहे.

बाबा : मग आता देव किती झाले ?

श्रोते : तीन.

बाबा : आपल्या गावी मऱ्याई आहे का ?

श्रोते : आहे.

बाबा : मग देव किती झाले ?

श्रोते : चार.

अशी वाढवीत वाढवीत देवांची संख्या ते दहाबारावर नेतात. श्रोत्यांच्या डोक्यात आपोआप प्रकाश पडू लागतो. त्यांची मने आता तयार झाली असे बाबांना वाटले की, एकदम तुकोबांचा अभंग त्यांच्या मुखातून उचंबळतो. " ' वेड लागले जगाला ! देव म्हणती धोंड्याला. ' बोला, ' गोपाला । गोपाला । देवकीनंदन गोपाला । ' " त्याबरोबर हजारो श्रोते टाळ्यांच्या गजरात घोष करू लागतात आणि ह्या जगाची सूत्रे चालविणारी शक्ती एकच आहे हे त्यांना मनोमन पटते. आम्ही परवा ज्या कीर्तनाला गेलो होतो, त्या कीर्तनामध्ये देवापुढे होणाऱ्या पशुहत्येबद्दल बाबा बोलत होते. त्यांनी विचारले, ' श्रीखंड चांगले की बकरे चांगले ? (श्रोते : श्रीखंड.) बासुंदी चांगली की बकरे चांगले ? (श्रोते : बासुंदी.) दूध चांगले का बकरे चांगले ? (श्रोते : दूध). असे इथे बोलता अन् घरी जाऊन बकऱ्याचे मांस खाता, काय

म्हणावं तुम्हांला ? ( हशा ). गुजराती अन् मारवाडी देवाला जातात. ते कधी त्याला बकरे देतात का ? ( श्रोते : नाही. ) मग त्यांना देव कसा पावतो अन् तुम्हांला का पावत नाही ? एकेका गुजरात्याच्या दहा दहा मजली इमारती इथे मुंबईत आहेत ! अन् तुम्ही फूटपाथवर झोपताहात. ( हशा ). तुमचे धंदे म्हणजे ( नक्कल करीत ) मी ऽठ ! कल्ह ऽ ऽई ! कां ऽ ऽदे–बटा ऽ ऽटे ! नाहीतर ( दांडा हलविण्याचा अभिनय करीत ) उसाचा चरक ( हशाच हशा ). शेटाणीचे पाच फुटी पातळ पाचशे रुपयांचे. त्याच्यातला परकर तीनशे रुपयांचा अन् तुमच्या बायकोच्या नऊवारी पातळाची किंमत किती ? पाच रुपये अन् पावली ! ( हशा ). देवाला बकरेच द्यायचे, तर ते त्याच्या देवळात सोडून द्या. त्याच्या पोटात सुरी कशाला खुपसता ? अन् ( अभिनय करीत ) मसाला कशाला वाटता ! ( हशा) तुम्ही इकडे त्याचा मसाला वाटता आणि यम तिकडे तुमचा मसाला वाटतो ! ( प्रचंड हशा ). बोला, गोपाला ! गोपाला ! देवकीनंदन गोपाला ! ”

असा थोडक्यात गाडगे बाबांच्या कीर्तनाचा नमुना आहे. स्वच्छता, शिक्षण आणि स्वावलंबन ह्यांवाचून अज्ञ जनतेचा उद्धार होणार नाही हे एकसारखे आपल्या कीर्तनात ते उपदेशीत असतात. गरिबांच्यासाठी आजपर्यंत लाखो रुपयांच्या धर्मशाळा, घाट, अन्नछत्रे, पाणपोया, पूल, त्यांनी महाराष्ट्रात बांधले. पण त्याचा कुठे गाजावाजा नाही. अस्पृश्यांच्या उद्धाराचा ज्यावेळी कुठे शब्दही ऐकू येत नव्हता, तेव्हा पंढरपुरला त्यांनी लाख रुपये खर्चून अस्पृश्यांसाठी ‘ चोखामेळा धर्मशाळा ’ बांधली. डोंगराएवढे विधायक कार्य त्यांनी या देशात करून ठेवले आहे. आम्ही एक रस्ता साफ केला किंवा एक तळे उकरले तर केवढा गाजावाजा करतो ! प्रत्येक माणूस हेच एक परमेश्वराचे देऊळ आहे, माणसाची सेवा हीच ईश्वराची पूजा आहे, असा सर्व भूतांमध्ये ज्यांना भगवंताचा प्रत्यक्ष साक्षात्कार झालेला आहे, असे गाडगे महाराज हे महाराष्ट्रामधले एक महान समाजवादी संत आहेत. तुकाराममहाराजांचे तर ते अवतार आहेत. गरिबांची नि दलितांची ज्यांना त्यागपूर्वक सेवा करावयाची आहे आणि प्रेमावर आधारलेली समता समाजात प्रस्थापित व्हावी असे ज्यांना अंतःकरणापासून वाटते, त्यांना आपल्या स्फूर्तीचे घट गाडगे बाबांच्या जीवनातून आणि कीर्तनामधूनच भरून घ्यावे लागतील.

## भारतीय क्रांतिकारकांचे कुलपुरुष

# स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर

वीर सावरकर हा भारतीय इतिहासातील एक चमत्कार आहे. पौराणिक काळामध्येच चमत्कार घडत होते असा ज्यांचा भ्रम आहे त्यांनी त्यांच्या चरित्राकडे एकवार दृष्टी टाकावी. डोळे दिपवून टाकतील असे अनेक अद्‌भुत पराक्रम त्यांच्या जीवनात भरलेले आहेत. इंग्रजांनी हा देश जिंकून निःशस्त्र केल्यानंतर ह्या देशातल्या शौर्याच्या आणि धैर्याच्या सर्व लढाऊ परंपरा हळूहळू नष्ट झाल्या. इतक्या की स्वातंत्र्याचा शाब्दिक उच्चार करण्याचेही सामर्थ्य पुढे कुणात राहिले नाही. परकीय राज्यकर्त्यांच्या लांगुलचालनाचे पर्व सर्वत्र सुरू झाले. पौरुषाची आणि पराक्रमाची राखरांगोळी होऊन गेली. ती राख पुन्हा पेटवून तिच्यातून स्वातंत्र्यप्रीतीचा आणि देशभक्तीचा अंगार ज्यांनी बाहेर काढला, त्या ज्वलज्जहाल क्रांतिकारकांचे वीर सावरकर हे निःसंशय कुलपुरुष आहेत. भारतीय शौर्याचा आणि पराक्रमाचा तेजस्वी वारसा घेऊन सावरकर जन्माला आले. इतिहासाच्या धगधगत्या कुंडामधून त्यांचा पिंड आणि प्रज्ञा तावूनसुलाखून निघाली. सत्तावनच्या स्वातंत्र्यसमराची धग देशातून नष्ट झालेली नव्हती. किंबहुना, वासुदेव बळवंताच्या आत्मयज्ञाच्या वातावरणामध्येच धूसावरकरांचा जन्म झाला. चापेकरबंधूंनी दोन जुलमी इंग्रज अधिकाऱ्यांचे

क्रांतिदेवतेच्या चरणी बलिदान केले. त्याच वेळी सावरकरांच्या स्वातंत्र्यप्रीतीला बहर आला. स्वदेशाच्या छळाचा सूड घेऊन चाफेकर फासावर चढले, त्यांच्या प्राणज्योतीने चेतवलेले यज्ञकुंड एकसारखे भडकवीत टेवणे हे आपले कर्तव्य आहे, असा त्यांना साक्षात्कार झाला. घरातल्या अष्टभुजादेवीपुढे त्यांनी शपथ घेतली की, 'देशाचे स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून मी मरता मरता मरेतो झुंजेन !' वयाच्या चौदाव्या वर्षी मृत्यूला आव्हान देण्याची प्रतिज्ञा सावरकरांनी केली आणि ती विलक्षण रीतीने खरी करून दाखविली. साक्षात मृत्यूच्या जबड्यात जाऊनच मुळी त्यांनी बारा वर्षे मुक्काम ठोकला. मृत्यूची फजीती आतापर्यंत कोणी केली नसेल म्हणून की काय त्यांच्यावर प्रसन्न होऊन मृत्युंजयाने त्यांना दीर्घायुष्याचा वर दिला आहे.

सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने जाण्याची केवळ प्रतिज्ञा करूनच सावरकर स्वस्थ बसले नाहीत, तर त्यासाठी त्यांनी क्रांतिकारकांच्या गुप्त मंडळाची स्थापना करून श्रीशिवजयंतीच्या आणि गणेशोत्सवाच्या निमित्ताने समाजातील तरुण मंडळींची मने स्वातंत्र्याच्या ज्योतीने पेटवण्यास प्रारंभ केला. लोकमान्य टिळक आणि शिवरामपंत परांजपे ह्यांच्या तेजस्वी लेखनाने आणि वक्तृत्वाने राजकीय जागृतीचे वातावरण समाजात आधीच निर्माण झाले होते. पण परकीय राज्यकर्त्यांविषयी द्वेष आणि पारतंत्र्याबद्दल चीड ह्या भावनांची आग तरुणांच्या हृदयामध्ये पेटवून त्यांची डोकी भडकवण्याचे कार्य सतरा-अठरा वर्षांच्या सावरकरांनी मोठ्या प्रखरतेने आणि प्रभावाने केले. अग्निरसाच्या कारंज्याप्रमाणे स्वातंत्र्याची ज्वलजहाल काव्ये सावरकरांच्या अलौकिक प्रतिभेमधून उचंबळू लागली आणि महाराष्ट्रातील आबालवृद्धांच्या ओठावर नाचू लागली. स्वातंत्र्यासाठी भारताच्या इतिहासात ज्या वीरांनी आपले रक्त सांडले होते त्यांची स्फूर्तिदायक चरित्रे आपल्या प्रतिभेच्या हजाऱ्यामधून सावरकरांनी सर्वत्र उधळून दिली आणि स्वातंत्र्याच्या नि देशभक्तीच्या उन्मादक सुगंधाने सारा समाज धुंद करून टाकला. स्वातंत्र्यलक्ष्मीला 'अरिरुधिराचे स्नान' घातल्यावाचून ती प्रसन्न होणार नाही, ह्या मंत्राची जाहीर दीक्षा देशातील तरुणांना देऊन सशस्त्र क्रांतीची मुहूर्तमेढ सावरकरांनी ह्या शतकाच्या प्रारंभी रोवली ह्यात काय संशय ?

ह्याच सुमारास बंगालची फाळणी करण्याची लॉर्ड कर्झनने घोषणा केली. जनतेच्या स्वातंत्र्यावर चहूबाजूंनी आक्रमणे होऊ लागली. दडपशाहीने अक्राळ-

विक्राळ स्वरूप धारण केले, आणि देशातील क्रांतिकारांना जणू काही आव्हानच दिले. विलायती कपड्यांची जाहीर होळी पुण्यामध्ये पेटवून ते आव्हान छाती-ठोकपणे सावरकरांनी स्वीकारले. ह्या होळीच्या उजेडाने साऱ्या भारताचे डोळे दिपले. त्यानंतर कॉलेजच्या वसतिगृहातच काय, पण ह्या देशामधल्या पारतंत्र्याच्या वातावरणात राहणेसुद्धा सावरकरांना अशक्य होते. म्हणून 'सशस्त्र क्रांतीचे शास्त्र' हस्तगत करण्यासाठी मातृभूमी सोडून ते विलायतेला गेले. देशातील अनेक बुद्धिमान आणि श्रीमान तरुण त्या काळी विलायतेला जात असत. पण ते परकीय राज्यकर्त्यांचे गुलाम होण्यासाठी अन् स्वदेशाभोवतीचे पारतंत्र्याचे पाश अधिक बळकट करण्यासाठी. पण मातृभूमीला स्वतंत्र करण्याची भीष्मप्रतिज्ञा करून परकीय राज्यकर्त्यांच्या गुहेत बेगुमानपणे शिरलेला सावरकर हाच पहिला तरुण होय.

इंग्लंडमधल्या स्वतंत्र वातावरणात पाश्चात्य क्रांतिकारकांच्या जीवनाचा आणि तत्त्वांचा यथेच्छ अभ्यास करण्याची सावरकरांना चांगली संधी मिळाली. मॅझिनी, गॅरिबाल्डी आणि काव्हूर ह्या इटालियन देशभक्तांच्या विचारांची आणि क्रांति-तंत्राची सावरकरांच्या मनावर विशेष छाप पडली. हळूहळू सावरकरांच्या भोवती भारतीय क्रांतिकारक तरुणांचा गट जमू लागला आणि 'अभिनव भारत' ची लंडनमध्ये स्थापना झाली. या मंडळाचे नेतृत्व अर्थातच सावरकरांकडे आले. आयर्लंड, इजिप्त आणि रशिया यांमध्ये सशस्त्र क्रांतिकारकांच्या संघटना स्थापन झाल्या होत्या त्यांचा पाठिंबा मिळविण्याचा जसा सावरकरांनी प्रयत्न केला त्याप्रमाणे मॅझिनीचे चरित्र आणि सत्तावनी स्वातंत्र्ययुद्धाचा इतिहास लिहून भारतीय क्रांतिकारकांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. 'सत्तावनी स्वातंत्र्यसमर' ह्या ग्रंथासारखा ज्वालाग्राही ग्रंथ तर जगाच्या वाङ्मयात दुसरा नाही. असा हा अलौकिक ग्रंथ वयाच्या पंचविसाव्या वर्षी सावरकरांनी लिहिला हा त्यांच्या प्रतिभेचा अद्भुत चमत्कारच म्हटला पाहिजे. ह्या ग्रंथाला पुढे तर सारे भारतीय क्रांतिकारक 'सशस्त्र क्रांतीच्या तत्त्वज्ञानाची गीता' असे संबोधू लागले. नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांनाही 'आझाद हिंद सेना' तयार करण्याची स्फूर्ती याच ग्रंथाने दिली. सत्तावनी स्वातंत्र्यसमराला ह्याच सुमाराला पन्नास वर्षे पूर्ण होत होती. भारताच्या राष्ट्रीय उत्थानाचा अर्धशतकोत्सव लंडनमध्ये जाहीरपणे साजरा करण्याची अभिनव कल्पना

ह्या वेळी सावरकरांच्या डोक्यात आली आणि लगलीच ती त्यांनी अमलात आणली. सावरकरांच्या क्रांतिपर्वाला येथूनच प्रारंभ झाला असे म्हणावयास हरकत नाही.

सात साली हे क्रांतिपर्व सुरू झाले. ह्या क्रांतिपर्वाचा पांचजन्य सहा सालच्या अखेरीस कलकत्ता येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात भीष्माचार्य दादाभाई नौरोजी ह्यांनी फुंकून ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या काळजात भीतीचा कंप उठवला. स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण ह्या शस्त्रांच्या सामर्थ्यावर भारताचे स्वराज्य मिळविण्याची घोषणा दादाभाईंनी केली. ह्या घोषणेला बंगाल, महाराष्ट्र आणि पंजाब ह्या भारतातल्या तीन प्रांतांमध्ये विलक्षण साद मिळाली. त्याचा परिणाम असा झाला की, सात साली सत्तावनी क्रांतियुद्धाचे अर्धशतक ज्या दिवशी पूर्ण होत होते, त्या दिवशी बंडाचा वणवा पंजाबमध्ये भडकणार असे परकीय सरकारला भय वाटल्यावरून त्यांनी भारतीय राष्ट्रवाद्यांचे लोकप्रिय पुढारी लाला लजपतराय ह्यांना चौकशीवाचून हद्दपार केले अन् ब्रह्मदेशात नेऊन ठेवले. पंजाबात लष्करी अंमल सुरू झाला. लजपतरायांच्या मागोमाग सरदार अजितसिंगांनाही हद्दपार करण्यात आले. ब्रिटिश सरकारच्या ह्या जुलमी धोरणाने सारा भारतवर्ष प्रक्षुब्ध झाला. ह्या प्रक्षोभाचे पडसाद वृत्तपत्रांत आणि विद्यार्थीवर्गात उमटू लागले, असे पाहताच राजकारणात भाग घेण्यास सरकारने विद्यार्थ्यांना प्रतिबंध केला. आणि प्रेस ॲक्टचा वरवंटा वृत्तपत्रांच्या डोक्यात घालून वृत्तपत्रांना ठेचून काढावयाचे ठरविले. ब्रिटिशांनी भारतात सुरू केलेले हे दडपशाहीचे सत्र म्हणजे सशस्त्र क्रांतीचे तंत्र लंडन शहरी शिकत असलेल्या सावरकरांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना उघड आव्हानच होते. ते आव्हान त्यांनी स्वीकारले आणि सर्व भारतात क्रांतिकारकांच्या गुप्त संघटना स्थापन करण्याकरिता आणि त्यांना स्फोटकांची विद्या शिकविण्याकरिता त्यांनी आपल्या काही क्रांतिकारक सहकाऱ्यांची तावडतोब भारतात रवानगी केली.

परकी सरकारच्या वाढत्या दडपशाहीने हैराण झालेल्या भारतात स्फोटक विद्येची पेरणी होण्यास फारसा विलंब लागला नाही. सात सालच्या अखेर-पासून देशात बाँबचे आणि पिस्तुलाचे आवाज ऐकू यायला लागले. बाँबचे पहिले दोन बळी आठ सालच्या प्रारंभी खुदीराम बोस ह्या अठरा वर्षांच्या क्रांतिकारक तरुणाने मुझफरपूर येथे घेऊन सशस्त्र क्रांतीचा मुहूर्त केला. सत्तावनी

क्रांतियुद्धात अमर झालेल्या हुतात्म्यांची शपथ घालून सावरकरांनी भारतामधल्या क्रांतिकारकांना त्या वेळी बजावले की, " १० मे १८५७ रोजी सुरू झालेला संग्राम अद्याप संपला नाही. भारतीय राष्ट्राचे ऐतिहासिक अस्तित्व खंडित झाले नाही. सौंदर्यसंपन्न भारताच्या डोक्यावर विजयाचा दैदीप्यमान मुकुट जेव्हा चढेल तेव्हाच हा स्वातंत्र्यसंग्राम संपेल. " अशा रीतीने वयाच्या अवघ्या पंचविसाव्या वर्षी सावरकर हे भारतातल्या सशस्त्र क्रांतीचे सूत्रधार बनले. त्यांचे अनेक समवयस्क हिंदी तरुण सशस्त्र क्रांतीच्या सर्व विद्या आणि शास्त्रे विलायतेमध्ये शिकून स्वदेशी भराभर रवाना होत होते अन् त्याच वेळी स्वातंत्र्यविद्येची जिवंत आणि ज्वलंत पार्सले सावरकर विलायतेमधून स्वदेशाला पाठवीत बसले होते. ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या राजधानीमध्ये राहून भारतामधील तिच्या साम्राज्याला सुरुंग लावण्याचा पराक्रम करणारा सावरकरांसारखा झुंजार क्रांतिकारक ह्या भारतामध्ये दुसरा झालेला नाही हे का आम्ही सांगायला हवे ?

नामदार गोखले त्याच सुमारास इंग्लंडला गेले होते. त्यांनी सावरकरांना सांगितले की, " सध्याच्या परिस्थितीत भारताने स्वातंत्र्याची मागणी करणे अशक्य आहे. आणि तुम्ही ज्या साधनांचा आणि मार्गांचा पुरस्कार करीत आहात ते अव्यवहार्य आहेत. " सावरकरांनी त्यांना उत्तर दिले की, " मी इतिहाससिद्ध मार्गाने जातो आहे. इतिहासाचा तुम्हांला पाठिंबा नाही. मला आहे. "

' सशस्त्र क्रांती ही भारताचे स्वातंत्र्य मिळविण्याच्या दृष्टीने अव्यवहार्य आहे. ' असे नामदार गोखले यांचे मत तर शस्त्राचार हा अधार्मिक आणि पापमय आहे असे महात्मा गांधी म्हणत. तात्त्विक दृष्ट्या सशस्त्र क्रांतीमध्ये काही चूक नाही असा लोकमान्य टिळकांचा अभिप्राय होता. पण त्यासाठी देश तयार व्हायला पाहिजे एवढाच त्यांचा कटाक्ष होता. सारांश, अशा रीतीने मोठमोठ्या भारतीय नेत्यांचा सशस्त्र क्रांतीला विरोध असतानाही केवळ इतिहासाच्या पाठिंब्यावर विसंबून वधस्तंभामधून जाणाऱ्या त्या भयानक मार्गाने जाण्याचे सावरकरांनी ठरविले. ह्यावरून त्यांच्या लोकोत्तर धैर्याची कल्पना येते. क्रांतिविद्येच्या पिकाला जशी ठिकठिकाणी बॉंबची घोसदार कणसे येऊ लागली, तशी देशातील राष्ट्रवादी पुढाऱ्यांची राजद्रोहाच्या आरोपावरून उचलबांगडी करण्याचा सरकारने सपाटा लावला. आठ सालच्या जुलै महिन्यात लोकमान्य टिळकांना सहा वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा सांगण्यात आली. एवढेच नव्हे तर महाराष्ट्रातल्या

अनेक पत्रकारांना नि मुद्रकांना धडाधड तुरुंगामध्ये पाठविण्यात येऊ लागले. सरकारच्या ह्या अत्याचाराच्या आणि दडपशाहीच्या धोरणाला पिस्तुलांनी आणि बॉम्बनी उत्तरे देण्याचा क्रांतिकारकांनीही तडाखा लावला. आपल्या क्रांतिकारक सहकाऱ्याची बातमी सरकारला पुरविणाऱ्या देशद्रोही नरेंद्र गोस्वामीचा त्यांनी तुरुंगातच खून केला. खुदीराम बोसला पकडणारा पोलीस अधिकारी जो बानर्जी त्याला गोळी घालून त्यांनी मारले. बंगालच्या गव्हर्नराला ठार करण्याचा प्रयत्न करण्यात आला, पण तो फसला. भारतातील सर्व क्रांतिकारक कृत्यांचा सूत्रधार लंडनमध्ये वावरतो आहे ही गोष्ट ह्यानंतर ब्रिटिश सरकारच्या लक्षात यावयाला फारसा वेळ लागला नाही. पण त्याला पकडण्याएवढा पुरावा त्यांना मिळेना. म्हणून जणू काही चिडून जाऊन सावरकरांच्या थोरल्या बंधूंना सरकारने नऊ सालच्या जूनमध्ये आक्षेपार्ह कविता प्रसिद्ध करण्याच्या क्षुद्र आरोपावरून काळ्या पाण्याची शिक्षा सांगितली. सरकारच्या या अत्याचाराला अवघ्या बावीस दिवसांनीच लंडन येथे उत्तर मिळाले. विलायतेतील भारतमंत्र्याचे साहाय्यक कर्झन वायली ह्यांना एका मेजवानीच्या प्रसंगी मदनलाल धिंग्रा ह्या पंचवीस वर्षांच्या तरुणाने गोळ्या घालून ठार केले. भारतीय सशस्त्र क्रांतीचा रक्तरंजित झेंडा खुद्द लंडन शहरात फडकलेला पाहून ब्रिटिश साम्राज्यात केवढा हाहाकार उडाला असेल ह्याची कल्पना करता येणार नाही. ब्रिटिश न्यायालयापुढे मदनलालने छातीठोकपणे जबाब दिला की, " जर्मनांना जसा इंग्लंडवर आक्रमण करण्याचा अधिकार नाही, तसा इंग्रजांनाही हिंदुस्थानवर राज्य करण्याचा अधिकार नाही. जर्मनांनी इंग्लड देश जिंकल्यास त्यांच्याशी झगडणारा इंग्रज जेवढा देशाभिमानी ठरेल तेवढाच इंग्रजांचा प्रतिकार करणारा मी देशाभिमानी आहे. मला देहांताचीच शिक्षा मिळाली म्हणजे माझ्या देशबांधवांमध्ये प्रखर सूडभावना उत्पन्न होईल. " मदनलालच्या मुखामधून ही त्वेषाची आणि शौर्याची भाषा बोलविणारे धनी सावरकर होते हे सांगायची जरूरी नाही. धिंग्राला फाशी दिल्यानंतर लाला हरदयाळ उद्गारले, " भविष्यकाळी ब्रिटिश साम्राज्य जेव्हा भारतामधून नष्ट होईल, तेव्हा भारतातल्या प्रमुख शहरांत धिंग्राजींचे पुतळे उभारले जातील ! " स्वतंत्र भारताला धिंग्राजींची आठवणही नाही. त्यांचा पुतळा केवळ सावरकरांच्या अंतःकरणातच आज असेल !

ब्रिटिश सरकार आणि भारतीय क्रांतिकारक ह्यांचा झगडा त्या वेळी जणू टेनिसच्या खेळाप्रमाणे चालला होता. एकाने एका बाजूने प्रहार केला की दुसऱ्याने दुसऱ्या बाजूने अधिक जोराने प्रहार करावयाचा. नऊ सालच्या ऑगस्टमध्ये धिंग्राजींना फाशी देऊन सरकारने क्रांतिकारकांच्या काळजाचा लचकाच तोडला. त्यामुळे क्रांतिकारकांच्या संतापाला आणि प्रक्षोभाला सीमाच राहिली नाही. एवढ्यात अहमदाबादेमध्ये व्हाइसरॉयवर बॉंब फेकल्याच्या भानगडीत सावरकरांच्या धाकट्या बंधूंना पकडण्यात आले. तेव्हा सावरकरांच्या नाशिक येथील ' अभिनव भारता ' मधल्या क्रांतिकारक सहकाऱ्यांनी ते आव्हान पत्करायचे ठरविले. शस्त्राचाराची सर्व साधनसामग्री सावरकरांकडून त्यांना आधी मिळालीच होती. धिंग्राजींच्या फाशीनंतर अवघ्या साडेचार महिन्यांनी नाशिकचे कलेक्टर जॅक्सन ह्यांना भर नाटकगृहात अनंत कान्हेरे नि त्याचे दोघे सहकारी ह्यांनी गोळ्या घालून ठार केले. ब्रिटिश सरकारवर क्रांतिकारकांनी एवढी चढाई केल्या-नंतर ते त्यापुढे सावरकरांना लंडनमध्ये आपले क्रांतिकार्य निर्वेधपणे करू देईल हे मुळी शक्यच नव्हते. त्यांनी सावरकरांच्या भोवती आपले पोलादी जाळे टाकले आणि अडीच महिन्यांच्या आतच त्यांच्यावर झडप घातली. इंग्लंडचा किनारा सोडताना आता कदाचित आपणाला देहांताची व काळेपाण्याची शिक्षा होईल ह्या कल्पनेने आपल्या सहकाऱ्यांचा सावरकरांनी जो ' निरोप ' घेतला ते स्वातंत्र्याचे एक अमर वाङ्मय आहे. ' मोरीया ' बोटीमधून त्यांना स्वदेशी परत आणीत असताना मार्सेल्सच्या बंदरात एका पहाटे त्यांनी पोलिसांचा पहारा चुकवून समुद्रात उडी मारली आणि दीडदोनशे फुटांचे अंतर कापीत त्यांनी किनारा गाठला. रस्त्यावरून ते पळू लागले. पण फ्रेंच पोलिसांनी त्यांना पकडून परत ब्रिटिश पोलिसांच्या ताब्यात दिले. तथापि, सावरकरांनी मोरीया बोटीवरून समुद्रात मारलेली ही उडी म्हणजे त्यांच्या पराक्रमाचा सुवर्णकळसच होय. ही उडी त्रिखंडात गाजली. आणि आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये तिने खळबळ उडवून दिली. त्यानंतर मुंबई हायकोर्टात ' खास न्यायाधीश मंडळा ' पुढे सावरकरांवर आणि त्यांच्या सदतीस सहकाऱ्यांवर खटला होऊन त्यात त्यांना जन्मठेप काळे-पाण्याची शिक्षा झाली. एवढ्याने ब्रिटिश सरकारच्या सूडबुद्धीचे जणू काही समाधान झाले नाही म्हणून की काय महिन्याभराने सरकारने दुसरा एक खटला त्यांच्यावर भरला आणि त्यात त्यांना दुसऱ्या जन्मठेपेची शिक्षा दिली. अशा

रीतीने दोन जन्मठेपींची भयंकर शिक्षा सावरकरांना ठोठावून अकरा सालच्या जून महिन्यामध्ये ब्रिटिश सरकारने त्यांची रवानगी अंदमानच्या नरकपुरीत केली. सावरकरांना फाशी दिले असते तर जणू काही त्यांच्यावर दयाच झाली असती म्हणून की काय अनंत मरणांच्या भीषण हालअपेक्षा पन्नास वर्षेपर्यंत त्यांना एकसारख्या भोगावयाला लावावयाच्या आणि जगात कोणी कोणावर घेतला नसेल एवढा राक्षसी सूड त्यांच्यावर घ्यावयाचा असा ब्रिटिश सरकारचा डाव होता. जगात कोणत्याही राजसत्तेने आपल्या शत्रूला असा दुष्टपणा दाखवला नसेल.

सात साली सावरकरांच्या ज्या सशस्त्र क्रांतिपर्वाला प्रारंभ झाला तो अकरा साली समाप्त झाला. त्या वेळी सावरकर अवघे अठ्ठावीस वर्षांचे होते. भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाला आंतरराष्ट्रीय स्वरूप देणारे सावरकर हे पहिले क्रांतिकारक होते. म्हणूनच ‘ भारतीय क्रांतिकारकांचे मुकुटमणी ’ असे त्यांना म्हटले जाते. क्रांतिकारक सावरकरांचे अवतारकार्य येथेच समाप्त झाले. पहिल्या महायुद्धाच्या वेळी जर सावरकर युरोपमध्ये मोकळे असते, तर ‘ आझाद हिंद ’ चा झेंडा त्याच वेळी त्यांनी तेथे फडकविला असता ह्यात काय संशय ? म्हणूनच भारताच्या सशस्त्र क्रांतीचा सावरकर हे ‘ पाया ’ आणि सुभाषचंद्र हे ‘ कळस ’ आहेत असेच म्हणणे युक्त होईल. वीस सालापासून महात्मा गांधींच्या अहिंसात्मक क्रांतिपर्वाला प्रारंभ झाला आणि त्याचे पर्यवसान सत्तेचाळीस साली भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीमध्ये झाले. पण तेव्हापासून एका विचित्र आणि विकृत तत्त्वज्ञानाचा पगडा सध्यांच्या राज्यकर्त्यांच्या मनावर बसलेला आहे. सशस्त्र क्रांती आणि हिंसा हे एक महान पाप आहे असे त्यांचे म्हणणे असून रक्ताचा थेंब न सांडता देशाला स्वातंत्र्य मिळालेले आहे असा त्यांचा दावा आहे. म्हणजे भारताच्या स्वातंत्र्यासाठी सावरकरांपासून सुभाषचंद्रांपर्यंत ज्या असंख्य देशभक्तांनी सशस्त्रक्रांतीचा मार्ग पत्करला आणि आपल्या रक्ताचे नि प्राणाचे अर्घ्य ओतले त्यांचे ते बलिदान व्यर्थ होते असाच आजच्या राज्यकर्त्यांच्या तत्त्वज्ञानाचा निष्कर्ष निघतो. एवढेच नव्हे तर भारताचा पूर्वीचा सर्व इतिहासच मुळी चूक आहे असे ठरविण्यापर्यंत कित्येक काँग्रेस नेत्यांची मजल गेली आहे. इतिहासाशी कृतघ्न होणे हा राजकारणातला नित्याचाच निर्दय खेळ आहे. स्टॅलिनने ट्रॉटस्कीला रशियाच्या इतिहासातून ज्या न्यायाने उखडून टाकले, त्याच न्यायाने भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातून आज सावरकर

सुभाषचंद्रांची नावे पुसून टाकण्याचा प्रयत्न चालू आहे. देशाच्या इतिहासाशी राज्यकर्ते कृतघ्न झाले म्हणून जनतेला कृतघ्न होऊन चालत नाही. भारताच्या इतिहासातला एक तेजस्वी कालखंड रक्तामांसाच्या रूपात जिवंतपणे आज समोर वावरतो आहे हे देशाचे केवढे मोठे भाग्य आहे! देशाच्या स्वातंत्र्याखेरीज उभ्या आयुष्यात ज्यांनी दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा विचार केला नाही, स्वातंत्र्य-लक्ष्मीला प्रसन्न करण्यासाठी ज्यांनी अनंत मरणांचे हलाहल पचविले, त्या भारताच्या पहिल्या क्रांतिकारकाच्या चरणी कृतज्ञतापूर्वक अभिवादन.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
नौपाडा ठाणे.
अ. क्र. ................ दिनांक ................
क्रमांक ................ नों दि. ................

## मानवी कारुण्याचा शाहीर

# नाट्यछटाकार दिवाकर

१९१५ सालची गोष्ट. पावसाळ्यातल्या एका संध्याकाळी शनिवारमारुतीवरून खाली जाणाऱ्या ओंकारेश्वराच्या रस्त्याने गडकऱ्यांबरोबर मी चाललो होतो. ओंकारेश्वराच्या दर्शनाला जाण्याची गडकऱ्यांना कधीमधी हुक्की येत असे. न्यू इंग्लिश स्कूलच्या बोर्डिंगवरून दक्षिणोत्तर येणारा बोळ या रस्त्याला जेथे मिळतो त्या तिवाठ्यावर एक लहानसे घर टाकून एक माडी आहे. त्या माडीच्या खिडकीत एक वाटोळ्या चेहऱ्याचा, सावळ्या रंगाचा आणि काळ्या पिळदार मिशांचा गृहस्थ निर्विकार चेहऱ्याने आभाळातल्या ढगांकडे पाहत बसला होता. त्याला पाहताच गडकरी चालता चालता एकदम थबकले आणि खालून ओरडले, "काय हो, काय चाललंय ?" तेव्हा तो गृहस्थ एकदम चमकून भानावर आला आणि खाली गडकऱ्यांकडे पाहत म्हणाला, "अहो या ना मास्तर !" गडकरी म्हणाले, "जरा ओंकारेश्वराला जाऊन येतो !" तो गृहस्थ म्हणाला, "पण याल ना नक्की ? मी वाट पाहतो." त्याबरोबर गडकऱ्यांचा मिष्किल विनोद एकदम त्यांच्या मुखामधून उचंबळून बाहेर पडला, "येण्याचा प्रयत्न करतो. कारण या वाटेने गेलेला माणूस कधी परत येत नाही, हे तुम्ही रोज पाहताच !" गडकऱ्यांच्या ह्या उत्तराने त्या गृहस्थाच्या गंभीर चेहऱ्यावर विषण्ण हसू

चमकल्यासारखे दिसले. पण तोपर्यंत आम्ही झपाझप पावले टाकीत पुढे गेलो होतो. गडकऱ्यांच्या परिचयाची बहुतेक लेखक मंडळी मला माहीत होती. पण ह्या खिडकीतल्या गृहस्थाला मी पूर्वी त्यांच्याकडे कधी पाहिले नव्हते. म्हणून मी थोड्याशा आश्चर्याने त्यांना विचारले, " कोण हो हे ? " गडकरी चटकन म्हणाले, " म्हणजे, तुम्हांला माहीत नाहीत हे ? अहो, हे नाटयछटाकार दिवाकर ! " मी जरा वात्रटपणाने म्हणालो, " म्हणजे ते ' ह्यः ! ह्यः ! ह्यः ! ' " ही नाटयछटा प्रसिद्ध झालेली मी वाचली होती. माझ्या बोलण्याने गडकऱ्यांना हसू न येता उलट ते किंचित रागावल्यासारखेच दिसले. त्यांनी डोळे वटारून माझ्याकडे पाहिले सुद्धा. पण मी काही दबकला नाही. मी आणखीन पुढे म्हणालो, " चेहऱ्यावरून तर काही मला ते ' ह्यः ह्यः वाटले नाहीत ! " " मग कसे वाटले तुम्हांला ते ? " गडकऱ्यांनी वळून विचारले. " पोलीस खात्यातले कोणीतरी दिसतात "— मी एकदम बोलून गेलो. चालता चालता गडकरी थांबले अन् मग मात्र मनापासून हसले. " त्यांच्या त्या पोलिसी थाटाच्या मिशांवरून म्हणता ना तुम्ही ! " हसता हसता गडकरी म्हणाले, " पण तुमचा तर्क बरोबर आहे. तीन-चार वर्षांपूर्वी ते पोलीस खात्यात होतेच मुळी ! " कॉनन डॉइलच्या ' शेरलॉक होम्स ' च्या गोष्टी त्या काळात मी सपाटून वाचीत असे. त्यामुळे माणसाच्या चर्येवरून किंवा पोषाखावरून त्याच्या व्यवसायासंबंधी अटकळ करण्याचा मला नाद लागला होता. म्हणून माझे अनुमान बरोबर ठरलेले पाहून मला साहजिकच आनंद झाला. " सध्या हे कुठे तरी मास्तर असतील झाले ! " माझ्यातला जागा झालेला ' शेरलॉक होम्स ' धीटपणे पुन्हा उद्गारला ! गडकरी डोळे वासून माझ्याकडे बघू लागले. " कमाल केलीत तुम्ही ! कसे ओळखलेत ? " ते म्हणाले. " पण बरोबर आहे ना माझी अटकळ ? " मी ऐटीने विचारले. " अगदी शंभर टक्के बरोबर ! सध्या ते ' नूतन मराठी ' त मास्तर आहेत । " गडकऱ्यांनी सांगितले. असल्या गोष्टी ओळखणे तर आपल्या हातचा मळ आहे असा आविर्भाव तोंडावर घेऊन मी म्हणालो, " त्या ह्यः ह्यः मध्ये शेक्सपिअर आणि ब्राउनिंग ह्यांचे उल्लेख आहेत त्यावरून मी ओळखले. वास्तविक कुठल्यातरी कॉलेजात ते प्रोफेसर असावेत असे मला त्या वेळी वाटले होते. पण त्यांचा चेहरा आणि राहण्याची जागा आता प्रत्यक्षपणे पाहिल्यानंतर ते मास्तरच असावेत अशी माझी खात्री झाली ! " गडकऱ्यांनी

माझी मनापासून पाठ थोपटली. आणि ते म्हणाले, " शाबास, मग आता गर्गे मास्तरांची न् तुमची मला ओळख करून दिलीच पाहिजे ! " " गर्गे मास्तर कोण ? " मी चमकून म्हणालो. तेव्हा गडकऱ्यांनी खुलासा केला, " दिवाकर हे त्यांच्या पहिल्या घरचे आडनाव. ते गर्ग्यांकडे दत्तक गेले. त्यांचे सध्याचे नाव शंकर काशीनाथ गर्गे. तथापि त्यांचे लिखाण ' दिवाकर ' ह्या नावाखालीच प्रसिद्ध होत असते. "

ओंकारेश्वराचे दर्शन घेऊन परत येताना आम्ही दिवाकरांकडे गेलो. माडीवर असलेल्या त्यांच्या लहानशा खोलीत प्रवेश केल्यानंतर मात्र आपण एका लेखकाच्या घरात शिरत आहोत हे तावडतोब जाणवले. दोन खणांचीच त्यांची ती खोली होती, पण स्वच्छता आणि टापटीप ह्यांचा तो एक वस्तुपाठच होता. छोटी छोटी कपाटे, त्यांत ओळीने व्यवस्थितपणे लावून ठेवलेली पुस्तके, भिंतीवर लावलेली महान लेखकांची चित्रे, सुंदर सारवलेली जमीन, त्यावर साफ अंथरलेली बैठक ! मला तर एखाद्या देवघरात आल्यासारखे वाटले. आणि अशा पवित्र ठिकाणी ज्ञानाची निष्ठेने उपासना करीत असलेल्या त्या थोर माणसाबद्दल आरंभी ओवळेपणाचे उद्गार काढल्याबद्दल मला मनापासून अगदी लाजल्यासारखे वाटले ! दिवाकरांच्या संथ नि गंभीर मुद्रेकडे आणि त्यांच्य कपाटातल्या पुस्तकांकडे मी आळीपाळीने टकमक पाहतच राहिलो. त्या मनःस्थितीत माझ्या तोंडून अक्षरही निघणे शक्य नव्हते " ' मनोरंजन 'ने उदयोन्मुख कवी " म्हणून गडकऱ्यांनी दिवाकरांशी माझी ओळख करून दिली. दिवाकर माझ्याकडे बघून किंचितसे हसले. पण एकंदरीत मला त्यांचा स्वभाव अबोलच वाटला. अर्थात गडकऱ्यांच्या टकळीपुढे त्यांना त्या वेळी बोलावयाला अवकाशच मिळाला नाही ती गोष्ट निराळी. दिवाकरांचा निरोप घेऊन परत रस्त्यावर आल्यानंतर काही वेळाने गडकरी आपल्या मिशा चावीत चावीत उद्गारले, " मोठा नमुनेदार माणूस आहे दिवाकर म्हणजे ! " मी लहान तोंडी मोठा घास घेऊन म्हणालो, " त्यांचा नमुना तुम्ही तरी आपल्या डोळ्यांसमोर ठेवण्यासारखा आहे. " गडकरी एकदम चमकून म्हणाले, " म्हणजे काय ? " " माझं म्हणणं आपलं त्यांच्या खोलीपुरतं आहे ! " मी हलकेच म्हणालो, " दिवाकरांच्या खोलीशी तुमच्या जागेची तुलना केली तर—" माझे वाक्य मध्येच तोडून गडकरी म्हणाले, " बरोबर आहे तुमचं म्हणणं. असं कर

तुम्ही उद्या सकाळी लौकर या. माझी सारी खोली आपण व्यवस्थित लावून टाकू या—" अर्थात गडकऱ्यांनी आपली खोली नीटनेटकी लावून ठेवण्याचा तो 'उद्या' कधीच उगवला नाही, हे सांगायला नकोच.

छत्तीस वर्षांपूर्वी घडलेल्या ह्या प्रसंगाचे चित्र अद्यापही माझ्या डोळ्यांपुढे ठळकपणे उभे आहे. त्यापूर्वी दोन वर्षे आधी, म्हणजे तेरा साली, दिवाकरांच्या काही, 'नाट्यछटा' 'केसरी' मध्ये प्रसिद्ध झाल्या होत्या. तथापि, त्या वाचून हा काही तरी एक नवीन वाङ्मयप्रकार मराठी वाङ्मयात अवतीर्ण झाला आहे अशी त्या वेळी कोणाची समजूत झाली असेल, असे मला वाटत नाही. सुप्रसिद्ध आंग्ल कवी रॉबर्ट ब्राउनिंग ह्यांच्या आत्मगत नाट्यभाषणावरून आपल्याला 'नाट्यछटा' लिहिण्याची स्फूर्ती झाली आहे, असे दिवाकरांनी आपल्या रोजनिशींत एके ठिकाणी नमूद करून ठेवलेले आढळते. हे खरे असेल; पण बरीच वर्षे आधीपासून कित्येक मराठी मासिकातून आणि विशेषतः 'मासिक मनोरंजना'तून 'नेपथ्यपाठ' ( curtain lectures ) ह्या मथळ्याखाली जो वाङ्मयप्रकार प्रसिद्ध होत असे, तो वाचून दिवाकरांना 'नाट्यछटा' लिहिण्याची प्रेरणा झाली नसेल असे म्हणवत नाही. एक जहांबाज बायको स्वयंपाकघरातून, आपल्या नवऱ्याल उद्देशून तक्रारीचे अन् उपदेशाचे जळजळीत डोस पाजते आहे, असे या 'नेपथ्य पाठां'चे स्वरूप असे. त्यांपैकी कित्येक नेपथ्यपाठ तर अतिशय मनोरंजक आणि नाट्यपूर्ण असल्याचे मला अजून आठवत आहे. दिवाकरांच्या प्रारंभीच्या 'नाट्यछटां'चे आणि ह्या नेपथ्यपाठांचे स्वरूप सकृद्दर्शनी तरी पुष्कळच सारखे वाटते. तथापि, पुढे दिवाकरांच्या 'नाट्यछटां'चे अंतरंग हळुहळू निश्चितपणे बदलत गेले. त्यामध्ये नवीन आशय अन् कला प्रकट झाली. आणि मग रॉबर्ट ब्राउनिंगच्या आत्मगत नाट्यभाषणापेक्षा किंवा नेपथ्यपाठापेक्षा एक निराळेच तेजस्वी वैशिष्ट्य दिवाकरांच्या 'नाट्यछटां'ना प्राप्त झाले. केवळ मराठी साहित्यातच काय पण कोणत्याही साहित्यात स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून ज्याची गणना करता येईल अशी दिवाकरांच्या 'नाट्यछटां'ची योग्यता आहे यात मुळीच शंका नाही. तसे म्हटले तर दिवाकरांनी 'नाट्यछटा' किती थोड्या लिहिल्या बरे? सतरा—अठरा वर्षांमध्ये अवघ्या पंचेचाळीस! आणि त्यांतल्या अगदी उत्कृष्ट अशा निवडूनच काढावयाच्या ठरविल्या तर त्या फक्त आठदहाच निघतील. इतक्या थोडक्या भांडवलावर साहित्यामध्ये आपले स्थान अढळ करून जाणारे

लेखक जगामध्ये फार थोडे आढळून येतील, नाही ? मानवी अंतःकरणाचा आणि स्वभावाचा दिवाकरांनी जबरदस्त अभ्यास केला होता यात शंका नाही. क्रूरता, स्वार्थ, अहंकार, कृतघ्नता, रुढिप्रियता, हावरेपणा, अन्याय, विषमता आणि ढोंग हे एकापेक्षा एक भयंकर दोष माणसाच्या स्वभावात आणि समाजात खोल रुतून बसलेले आहेत. त्यामुळे या जगाला नरकाची कळा आलेली असून गरीब, कष्टाळू, गुणी आणि ध्येयवादी माणसांनी येथे जगणे अगदी अशक्य आहे, अशी दिवाकरांची अगदी ठाम समजूत झाली होती. त्यांची एकेक नाटयछटा म्हणजे ह्या मानवी दोषांवर आणि विसंगतीवर घातलेला घणाचा एकेक प्रचंड घाव आहे. ह्या घणाखाली माणसांचा अगदी चेंदामेंदा होतो; इतर लेखक सोनाराप्रमाणे जिथे शंभर घाव घालतील तिथे लोहाराप्रमाणे दिवाकर एकच घाव घालीत, हा इतर लेखकांमधला आणि त्यांच्यामधला फरक आहे. नाटयछटेच्या त्रोटकपणात आणि आटोपशीरपणात केवळ कला नसून सामर्थ्य आहे, हे दिवाकरांच्या तंत्राचे वैशिष्ट्य आहे. ज्या काळात दिवाकर वावरत होते त्या काळात इतके प्रभावी आणि कलात्मक तंत्र वापरणारे लेखक मराठी भाषेत फारच थोडे होते. त्यामुळे वैचारिक दृष्टया आपल्या समकालीनांमध्ये दिवाकर आघाडीवर होते असेच म्हणावयाला हवे.

दिवाकर हे केशवसुतांचे निःसीम उपासक होते. ह्याचे कारणही अगदी उघड आहे. मानवतेसंबंधी उभयतांना अपरंपार प्रेम वाटत होते आणि मानवतेची विटंबना करणाऱ्या सामाजिक आचारविचारांवर निर्दयपणे फटके मारावयाला हातात चाबूक घेऊन दोघेही सारखे उभे होते. दिवाकरांची एकेक नाटयछटा म्हणजे केशवसुतांच्या काव्याच्या तोडीचे एकेक गद्यकाव्य होते, असे म्हणावयाला मुळीच हरकत नाही. केशवसुतांप्रमाणेच दिवाकर अगदी काळजाला हात घालतात आणि आतडी पिळून काढतात.

चुलत बहीण आणि तिचा मुलगा प्लेगमध्ये मेल्यानंतर तिचे किडूकमिडूक आणि घरदार स्वतःच कबजात घेणारा पाऊणशे वर्षांचा थेरडा; ' पंत ' मेल्याने त्यांची बायको तिकडे लोकांच्या घरी भांडी घासू लागते आणि मुलगा चौपदरी हातात घेऊन माधुकरी मागावयाला अनवाणी पायांनी उन्हात पळत जातो, तर ' पंतां ' च्या मोकळ्या जागेवर आपली नेमणूक होऊन पाच रुपयांची बढती मिळाल्यामुळे इकडे आपल्या घरात पेढे वाटणारे ' राव ' सत्यनारायणाची तयारी

करतात; वर्डस्वर्थची ‘ फुलपाखरू ’ ही कविता वाचून सृष्टीतील कृमिकीटकांवरील त्यांच्या अमर्याद प्रेमाचे सद्गदित अंतःकरणाने कौतुक करणारा आणि नंतर त्याच पुस्तकात सापडलेल्या ढेकणाला चिमटीत चिरडणारा काव्याचा इरसाल रसिक; शेक्सपिअरचे आयागोचे चित्रण अतिशयोक्त झाले अशी नावे ठेवणारा आणि शेजारच्या घरातल्या एका दुःखी विधवेभोवती आपल्या पापी कारस्थानांचे जाळे विणणारा नाट्याचा पाजी टीकाकार; बाळंतरोगाने वर्षभर कुजत पडलेली बायको लौकर मरत नसल्याने जिवाची ‘ मुंबई ’ करण्याचा आपला बेत लांबणीवर पडत असल्याबद्दल चरफडणारा नवरा; गावातील सुप्रसिद्ध व्यक्तीच्या स्मशानयात्रेला केवळ ‘ ज्ञानप्रकाशा ’त आपली नावे छापून यावीत म्हणून हजर राहू इच्छिणारे प्रसिद्धीलोलुप प्राध्यापक; मेल्यानंतर माणसाची कीर्ती मागे उरली पाहिजे अशी आकांक्षा बाळगणारी, पण कीर्तिरूपाने मागे उरलेल्या महापुरुषांच्या पवित्र नावांची ‘ वेलिंग्टन चिरूट, नेपोलियन शू, सॉक्रेटिस बूट ’ अशी विटंबना करणारी जनता; अशी भिन्न भिन्न मानवी स्वभावांची दिवाकरांनी रेखाटलेली चित्रणे केशवसुतांच्या काव्याइतकी मराठी साहित्यात अमर आहेत यात काय शंका !

दिवाकरांच्या नाट्यछटांकडे मराठी टीकाकारांचे जेवढे लक्ष जावयाला पाहिजे होते, तेवढे गेलेले नाही. त्यांच्या एकेका नाट्यछटेचे जर आपण विश्लेषण करू लागलो, तर त्यात त्यांच्या प्रतिभेच्या सूक्ष्म आणि तरल छटा आढळून आल्याखेरीज राहणार नाहीत. त्यांच्या कल्पनेची झेपही भारी विलक्षण आहे. ‘ म्याऊ–म्याऊ–म्याऊ ’ या नाट्यछटेत मेलेली आई मांजरीचा जन्म घेऊन पुन्हा आपल्या घरी आली आहे. तिची मुले तिचे श्राद्ध करीत असताना मांजरीच्या स्वरूपात ‘ म्याऊ–म्याऊ–म्याऊ ’ करणाऱ्या आपल्या आईच्या पाठीत लाटणे घालून तिला हाकून देतात ही कल्पना इतकी हृदयभेदक आहे की, तिने मस्तक सुन्न होऊन जाते ! ‘ रूढ परंपरेच्या आहारी गेलेला मनुष्यप्राणी किती कृतघ्न आणि भावनाशून्य आहे ’ हे ह्या नाट्यछटेमध्ये दिवाकरांनी दाखविले आहे. अंधाऱ्या बाळंतघरात उष्णतेने आणि घाणीने गुदमरलेल्या चिमुकल्या बालकाचा आत्मा “ अरे, मला ‘ घोडा घोडा ’ खेळायला कोणी एक तरी सूर्यकिरण द्या रे ” असा टाहो फोडीत असलेला दिवाकरांनी एका नाट्यछटेत दाखविलेला आहे. हा टाहो कोणाच्या काळजाला

पाझर फोडणार नाही ? ' राजहंस माझा निजला ' ह्या कवितेत एकाच अपत्याच्या मृत्यूबद्दल रडणाऱ्या मातेचा शोक आहे. पण दिवाकरांच्या ह्या नाट्यछटेत बाळंतघराच्या नरकात गुदमरून मरणाऱ्या सहस्रावधी अर्भकांच्या करुण आरोळ्या आहेत ! दिवाकरांच्या प्रतिभेचे असे निरनिराळे चमत्कार त्यांच्या त्रोटक लेखन-संग्रहात आढळून येतात. ' प्रवासी ' ह्या नाट्यछटेत भूत, भविष्य आणि वर्तमान ह्यांवर आधारलेल्या मानवी जीवनातील तत्त्वज्ञानाच्या झगड्याचे मोठे मार्मिक चित्र रेखाटलेले आहे. शहराच्या सार्वजनिक चौकातल्या गर्दीमध्ये एका वेळी ऐकू येणारे निरनिराळ्या माणसांचे उद्‌गार एकत्रित करून मानवी जीवनाचे अत्यंत क्षुद्र आणि बकाली चित्र दिवाकरांनी आपल्या डोळ्यांपुढे उभे केले आहे. ' निजलेले मूल ' ह्या नाट्यछटेत मानवाच्या उत्क्रांतीचा आणि त्याच्या आनुवंशिक संस्कारांचा एवढा भव्य आणि विचित्र नकाशा दिवाकरांनी रेखाटला आहे की, तो बघून वाचक थक्कच होतो ! तंत्राच्या दृष्टीने दिवाकरांच्या ह्या दोन नाट्यछटा अपूर्व होत. त्यांच्या प्रतिभेचा काहीतरी अद्‌भुत मार्गाने विकास होत चालल्याचा प्रत्यय या नाट्यछटांवरून निश्चितपणे येतो. ' ॲलिस इन वंडरलँड ' लिहिणाऱ्या ' ल्युई कॅरोल ' प्रमाणे शेवटी शेवटी दिवाकरांची प्रतिभा विडंबनाच्या आणि वक्रोक्तीच्या अत्यंत दिव्य व भव्य क्षेत्रातून विहार करावयाला लागली होती.

आपल्या प्रतिभेच्या चमत्कारांनी बुद्धीला थक्क करून टाकण्यापेक्षा हृदयाला पीळ घालण्याकडे त्यांचे अधिक लक्ष होते. कथा, कादंबरी, काव्य किंवा नाटक ही प्रदीर्घ आणि लोकप्रिय माध्यमे न निवडता ' नाट्यछटा ' हे त्रोटक आणि लोकविलक्षण माध्यम दिवाकरांनी निवडले ह्यातच त्यांच्या बुद्धीचे असामान्यत्व दिसून येते. लोकोत्तर बुद्धिमत्ता ही सूत्रमयच असते. द्रष्टे पुरुष एकेका सूत्रात किंवा एकेका वाक्यात ब्रह्म व्यक्त करून ठेवतात. त्याप्रमाणे दिवाकरांच्या एकेका छटेमधून मानवी जीवनातील अंतःकलहाचे केवढे भव्य दृश्य दृष्टीस पडते ते पाहण्यासारखे आहे. रंगभूमीवरच्या नाट्यापेक्षा जीवनातील नाट्याचे त्यांना जास्त आकर्षण होते. हे जीवनातील नाट्य मानवाच्या प्रत्येक सूक्ष्म कृतीत आणि विकृतीत दृष्टीस पडते. आपल्या काटेकोर दृष्टीने ते वेचून समाजापुढे मांडण्याचे अत्यंत कष्टकारक काम दिवाकरांनी केले आहे. ह्यामुळेच ते नाट्यछटाकार झाले, नाटककार झाले नाहीत. इंग्रजी नाटकांचा त्यांचा अभ्यास मोठा होता. महाराष्ट्रातल्या नामांकित नटांशी व नाटकमंडळ्यांशी त्यांचा

प्रत्यक्ष परिचय होता, तथापि, लोकांचे केवळ मनोरंजन करण्यासाठी नाटककारांना आपल्या नाटकांत जो वराचसा भाग लिहावा लागतो, तो लिहिण्यास दिवाकरांची बुद्धी कधीच तयार झाली नसती. दिवाकर हे जीवनातल्या निर्मळ अर्कांचे कारखानदार होते. हा अर्क रंगभूमीच्या सामान्य प्रेक्षकांना कधीच पचविता आला नसता! ‘ कारकून ’ ही वीस पानांची आणि तीन अंकांची एकच नाटिका दिवाकरांनी लिहिली; पण त्यात ‘ कारकुना ’च्या दुःखकारक जीवनाचे जे भयाण आणि हृदयद्रावक चित्र दिवाकरांनी रंगविले ते रंगभूमीवर वठणे अगदी अशक्य झाले. म्हणून चार–दोन प्रयोगांपेक्षा ह्या नाटिकेचे जास्त प्रयोग होऊ शकले नाहीत. भीषण कारुण्याने आमूलाग्र ओथंबलेली अशी चिमुकली नाटिका मराठीमध्ये तरी दुसरी नाही. दिवाकरांना मोठे नाटक लिहिता आले नसते असे नाही. पण प्रेक्षकांना ते बघवले नसते. जीवनातील दुःखे तेवढ्याच तीव्र स्वरूपात शब्दामध्ये व्यक्त करण्याचे विलक्षण कौशल्य दिवाकरांच्या प्रतिभेत होते. त्यांच्या लोकप्रियतेत ह्याच्यामुळे एक प्रकारे दोष उत्पन्न झाला.

दिवाकरांचे जीवन समजावून घेतल्याखेरीज त्यांच्या वाङ्मयाचा अर्थ समजणार नाही. दिवाकरांच्या जीवनाचे संपूर्ण प्रतिबिंब त्यांच्या वाङ्मयात उमटलेले आहे; किंबहुना त्यांचे चिमुकले वाङ्मय हेच त्यांचे चरित्र होय. त्यांचा सारा जन्म दुःखाशी आणि दारिद्र्याशी झगडण्यात गेला होता. आपल्या अत्यंत आवडत्या माणसांच्या मृत्यूने हलाहल त्यांनी शांतपणे पचविले होते. ‘ कारकून ’ नाटिकेच्या नायकाप्रमाणे डोळे बिघडल्याच्या कारणावरून सरकारी नोकरीत ‘ अनफिट ’ ठरून त्यांना काढून टाकण्यात आले होते. आपल्या बौद्धिक योग्यतेला आणि ज्ञानाच्या तपश्चर्येला समाजात मान नाही, ह्याचे त्यांना मनातून फार दुःख होत असावे. तथापि, त्यांच्या ध्येयवादाची झेप फार मोठी होती. काय वाटेल ते झाले तरी शिक्षक म्हणून मी मरणार नाही, असा मनातला पीळ ते आपल्या निकटच्या मित्रमंडळीमध्ये कधी कधी प्रकट करून दाखवीत असत. ( शिक्षकाची वृत्ती जरी त्यांना आवडत नव्हती, तरी पहिल्या तीन इयत्तांचे इंग्रजीचे ते एक आदर्श शिक्षक होते हे या ठिकाणी नमूद करून ठेवणे जरूर आहे. ) घर आणि शाळा ह्यांव्यतिरिक्त समाजात ते फारसे फिरकत नसत. त्यांना ओळखणाऱ्या चारदोन विद्वानांखेरीज ते हृदय खुले करून कोणाशी चर्चा करीत नसत. मृत्यूच्या वाटेवर असलेल्या आपल्या घराच्या माडीवर अहर्निश बसावे आणि

खिडकीमधून जगाच्या अश्रूंचे, दुःखाचे आणि आक्रोशाचे सदोदित अवलोकन करावे हा त्यांचा व्यवसाय असे. त्यामुळे त्यांचे हृदय कारुण्याने आणि सहानुभूतीने काठोकाठ भरून गेले होते. ओंकारेश्वराच्या वाटेवर जर त्यांचे घर नसते आणि जगातल्या शोकाची नदी जर अष्टौप्रहर त्यांच्या घरावरून वाहत नसती, तर त्यांच्या वाङ्मयात मानवी दुःखाचे एवढे पडसाद कदापि उमटले नसते. त्यांना आपल्या खिडकीतून जेवढे जग दिसत होते तेवढे पुरे होते. त्याच्या पलीकडे जाण्याची त्यांना कधीही जरूर पडली नाही. अवचितराव करकऱ्यांची विधवा सून वारली म्हणून शेजाऱ्यांनी ' विधवा मेली ना ? बरे झाले ! सुटली एकदाची ! ' हे काढलेले समाधानाचे उद्गार त्यांना आपल्या खिडकीमध्येच बसल्या बसल्या ऐकू आले. ' अहो मला वाचता येतंय् ! ' म्हणून सिनेमाची जाहिरात मागायला आपल्या वाड्यातून बाहेर धावत आलेला सहासात वर्षांचा मुलगा त्यांनी आपल्या खिडकीतून पाहिला. अन् रोज त्या मुलाला जाहिरातीचा कागद देणारा तो मुसलमान, पुढे त्या मुलाच्या मृत्यूची बातमी ऐकून कसा कळवळला अन् मग त्यानंतर तो वाड्याच्या दारात जाहिरातीचा एक कागद मुकाट्याने टाकून कसा जात असे, हे हृदयभेदक दृश्य दिवाकर आपल्या माडीवरून रोज पाहत असत. ' अहो, मला वाचता येतंय् ! ' एवढी एकच गोष्ट जरी दिवाकरांनी लिहिली असती, तरी मराठी वाङ्मयातील त्यांचे स्थान अमर झाले असते. अशाच तऱ्हेच्या आणखी दोन तीन करुण कथा दिवाकरांनी लिहिलेल्या आहेत. त्या वाचताना काळीज अगदी गलबलून जाते. मराठीतल्या कथाकारांत दिवाकरांचे नाव घेतले जात नाही, अशा टीकाकारांची दया वाटते.

त्यांच्या वाङ्मयातील बहुतेक सर्व प्रसंग शनिवार-मारुती ते अमृतेश्वर अन् कबूतरखाना ते ओंकारेश्वर एवढ्या चौकोनात घडलेले आहेत पण त्यांत सर्व जग आलेले आहे.

त्यांचा सारा लेखनसंसार दोनशे पानांच्या आतच आहे. पण पानेच्या पाने लिहिणाऱ्या मोठमोठ्या नाटककारांना किंवा कथाकारांना वाचकांच्या मनावर जो परिणाम करता आलेला नाही, तो दिवाकरांनी आपल्या थोडक्याशा लेखनाने करून दाखविला आहे. त्यांच्या ' नाट्यछटां ' च्या प्रयोगासाठी नटीची आणि रंगभूमीची मुळीच आवश्यकता नाही. कोणीही बसल्याबसल्या त्यांपैकी एखादी वाचावी. म्हणजे नाना तऱ्हेच्या भावनांनी आपले हृदय व्याकुळ होत असल्याचा

अनुभव त्याला येईल. जीवनाशी इतक्या निष्ठेने समरस झालेला दिवाकरांसारखा लेखक कोणत्याही वाङ्मयात विरळाच. त्यांचे चरित्र त्यांच्या चिमुकल्या लेखनात ठिकठिकाणी विखुरलेले आहे. पण ' फाटलेला पतंग ' ह्या नाट्यछटेत मात्र त्यांचा आत्माच बोलतो आहे असे वाटते. उत्तुंग आकाशात आशेने भराऱ्या मारण्याची इच्छा जगातल्या पुष्कळशा स्वप्नाळू पतंगांना असते. पण नतद्रष्ट जग त्यांना जोराने खाली खेचते अन् मग ते पतंग कुठल्यातरी काटेरी बाभळीच्या झाडावर अडकून फाटतात, अन् ' भराऱ्या मारू नकोस—नाही तर असा फाटून जन्मभर रडत बसशील ! ' असे मनातल्या मनात कण्हत बसतात. दिवाकरांच्या ' नाट्यछटा ' म्हणजे जगाच्या नि स्वर्गाच्या ओढाताणीत फाटलेल्या दुर्दैवी आणि ध्येयवादी पतंगाचा आत्मगत आक्रोशच होय !

भारताचा द्रष्टा महापुरुष

# आचार्य विनोबा भावे

साधुसंत हे भूतकाळातच होऊन गेले. आधुनिक काळात ते निर्माण होणे शक्य नाही अशी सर्वसामान्य समजूत आहे. लहानपणी खुद्द विनोबांची सुद्धा तशी कल्पना होती. ती त्यांच्या आईने दूर केली. एक दिवस त्यांची आई 'भक्ति-विजय' वाचीत होती. तेव्हा विनोबा म्हणाले, "आई, असे संत फक्त प्राचीन काळातच होऊन गेले, नाही का ग?" आई म्हणाली, "विन्या, अरे आजच्याही काळात संत आहेत, पण आपणाला ते माहीत नाहीत एवढेच. संत जर नसते तर ही पृथ्वी कोणाच्या पुण्याईने टिकली असती?" भारतवर्ष तर बोलूनचालून साधुसंतांचीच भूमी. या भूमीत साधुसंतांच्या परंपरेचा आजपर्यंत कधी खंड पडलेला नाही. आजही भारतात अनेक संत असतील. सर्वच आपणाला कोठून ठाऊक असणार? पण या घटकेला सर्व भारताला माहीत असलेला एकच महान संत म्हणजे विनोबा. ह्यात काय संशय? गांधीजींनंतर भारताची प्रतिष्ठा आज त्यांनीच राखली आहे. आद्य शंकराचार्यांनंतर एवढा बुद्धिमान आणि विचारी पुरुष या भारतात झालेला नाही. किंबहुना श्री-शंकराचार्यांचा ते अवतार होत, असे म्हणावयास हरकत नाही. मानवतेच्या चिरंतन कल्याणाचा एक नवीन धर्मच स्थापन करण्याचे कार्य ते आज करीत

आहेत. विनोबांचा प्रकाश आता भारतात सर्वांच्या डोळ्यांपर्यंत पोहोचला आहे. पण त्यांच्या चरित्राचा नि कार्याचा तपशील फारच थोडयांना माहीत आहे. त्यांचे चरित्र लिहिणे काय सोपे आहे ? विनोबा स्वतःच एकदा म्हणाले, " माझे जीवनचरित्र कोणी लिहू नये. कारण माझ्या जीवनाचा मोठा भाग आंतरिक आहे. तो फक्त मलाच माहीत आहे. इतरांना कसा माहीत असणार ? मी माझे आत्मचरित्र जर लिहिले तरच माझे जीवन जगाला कळेल." असे जरी असले तरी विनोबांचे जेवढे जीवन म्हणून आज जगापुढे प्रकट आहे तेवढे सुद्धा असे काही अद्‌भुतरम्य आहे की, ते जितके जितके कळेल तितके तितके जाणून घ्यावे, त्यांची अमृतवाणी जेवढी म्हणून प्राशन करता येईल तेवढी करावी, अशी सर्वांना जणू काही तहानच लागून राहिली आहे.

कुलाबा जिल्ह्यामध्ये पेण तालुक्यात गागोदे हे भाव्यांचे इनामी गाव आहे. तेथे ११ सप्टेंबर १८९५ रोजी विनोबांचा जन्म झाला. त्यांचे आजोबा शंभूराव भावे हे अग्निहोत्री होते. विनोबांच्या वडिलांचे नाव नरहरी आणि आईचे नाव रुक्मिणीबाई. त्यांना पांच अपत्ये झाली. चार मुलगे नि एक मुलगी. सर्वांत थोरले विनोबा, त्यांच्यानंतर बाळकोबा, शिवाजी आणि दत्तात्रेय. दत्तात्रेय लहानपणीच वारला. विनोबांचे वडील नरहरिपंत ह्यांना शास्त्रीय आणि औद्योगिक ज्ञानाची फार आवड होती. म्हणून श्रीमंत सयाजीराव महाराज ह्यांनी बडोद्यात जेव्हा ' कलाभुवन ' सुरू केले तेव्हा नरहरपंत तेथे जाऊन दाखल झाले. तेथला अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर नरहरपंतांना चांगली नोकरी मिळाली. पण वारंवार बदली होऊ लागल्याने मुलांच्या शिक्षणाची आबाळ होईल एवढ्यासाठी त्यांनी ती नोकरी सोडून दिली आणि श्रीमंतांच्या खासगीकडे कारकुनाची नोकरी पत्करली. १९०७ साली वयाच्या बाराव्या वर्षी विनोबा बडोदा हायस्कूलमध्ये दाखल झाले. त्यापूर्वीचे त्यांचे सारे बाळपण जन्मग्रामच्या डोंगराळ आणि जंगली प्रदेशामध्ये भटकण्यात अन् वीरांच्या नि साधुसंतांच्या कथा श्रवण करण्यात गेले. त्यामुळे भक्ती, पावित्र्य आणि देशप्रेम ह्या भावनांनी त्यांचे अंतःकरण बालपणापासूनच ओथंबून गेले. आजन्म ब्रह्मचर्य पाळण्याची प्रतिज्ञा त्यांनी वयाच्या दहाव्या वर्षीच स्वतःच्या मनाशी केली. आई एकदा त्यांना म्हणाली, " विन्या, लग्न केलेस तर स्वतःच्या आईबापांचा उद्धार होईल, पण ब्रह्मचारी राहिलास तर बेचाळीस पिढयांचा उद्धार होईल." त्या शब्दांचा

त्यांच्या मनावर परिणाम झाला. कठीण जमिनीवर झोपणे, गोड किंवा मसाल्याचे पदार्थ न खाणे, अनवाणी चालणे, सत्याने वागणे, आचारविचारांत संयम पाळणे, ब्रह्मविद्येचा अभ्यास करणे ही सर्व व्रते बाळपणापासून तो आतापर्यंत विनोबा अगदी अखंडपणे पाळीत आले आहेत. कोणतीही गोष्ट दुसऱ्याला देण्यात विनोबांना लहानपणापासून आनंद वाटत असे. त्यांच्या घरात फणसाचे झाड होते. त्यांच्या फणसाचे दोन दोन गरे साऱ्या गावाला वाटण्याचे काम आईने विनोबांकडे सोपविले होते. आणि ते काम करून आल्यानंतर मग आई दोन गरे विनोबाला खायला देई. आधी नाही. त्या वेळी दुसऱ्याला चांगली गोष्ट देण्यामध्ये काय आनंद असतो ह्याचा अनुभव विनोबांना आला. विनोबा नेहमी म्हणतात, "स्वतः खाण्यामध्ये जो आनंद असतो त्याचा अनुभव प्रत्येकाला आहेच. जनावरांना देखील तो असतो. पण दुसऱ्याला खाऊ घालण्यात जो आनंद आहे, त्याचा अनुभव घेऊन पाहण्यासारखा आहे." दानाच्या अमृताचा आस्वाद अगदी लहानपणापासून विनोबांनी चाखला आहे. 'जो देतो तो देव, अन् राखतो तो राक्षस' या विनोबांच्या आजच्या तत्त्वज्ञानाचे बीज अगदी बाळपणी त्यांच्या मनात त्यांच्या आईने लावले.

जंगलात हिंडण्याच्या लहानपणाच्या या नादामुळे स्वतःच्या शरीराबद्दल अन् कपड्यांबद्दल विनोबा पहिल्यापासूनच बेपर्वा असत. डोक्यावरचे केस लांब लांब वाढलेले, नखे वाढलेली, पायात काही नाही, असा त्यांचा अवतार असे. कुणी विचारले, "अरे विनायक, केस का रे वाढवलेस?" तर ते तांडकन त्याला विचारीत, "तुम्ही न्हाव्याचा धंदा करता की काय?" अगदी लहानपणापासून विनोबांची वृत्ती अशी मनस्वी आणि तेजस्वी आहे. पहिल्यापासूनच त्यांचा बाणा अगदी स्वतंत्र. समर्थ रामदासस्वामींचे ते स्वतःला शिष्य म्हणवीत. समर्थांची एक गोष्ट विनोबा नेहमी सांगत. समर्थ लहानपणी एका हरिदासाचे कीर्तन ऐकावयाला गेले होते. हरिदास पुराणातल्या कोणातरी राजाची गोष्ट सांगताना त्याची अशी काही भरमसाट स्तुती करू लागला, "वाहवा, काय तो राजा! काय त्याचे एकेक गुण! काय त्याचा पराक्रम!" त्याबरोबर समर्थ एकदम चिडून त्या हरिदासाला म्हणाले, "काय हो बुवा, तो राजा तेवढा 'नर' होता, अन् आपण सारे लोक काय 'खर' आहोत?" समर्थांचा हा आत्मविश्वास आणि स्वाभिमान विनोबांनी आपल्या अंगी पुरेपूर बाणविलेला आहे. आपण शुद्ध

' जंगली ' आहोत, ' सभ्यते ' चे नियम आपल्याला काही माहीत नाहीत असे विनोबा नेहमी सांगतात. ते म्हणतात, " माझा जन्मच मुळी कोकणच्या जंगलात झालेला आहे. ज्याला आजकाल ' शिक्षण ' म्हणतात ते मला काही फारसे मिळाले नाही. त्यापूर्वीच मला ' उपनिषदे ' वाचावयाचा नाद लागला. ' उपनिषद् ' हे जंगली साहित्य आहे. संस्कृतात त्याला ' आरण्यक ' म्हणतात. ह्या उपनिषदात ब्रह्माच्या स्वरूपाचे ' अवाकी आणि अनादरः ' म्हणजे ' अबोल अन् बेपर्वा ' असे वर्णन केले आहे. ही ब्रह्माची दोन लक्षणे माझ्या अगदी हाडीमासी खिळून बसली आहेत. "

बडोद्याच्या दुय्यम शाळेत नाव घातल्यावर वडिलांनी विनोबाला दुसरी भाषा फ्रेंच घ्यायला लावली. वडिलांची इच्छा विनोबांनी उच्च शिक्षणासाठी परदेशी जावे अशी होती. पण त्या काळात स्वदेशाच्या नि स्वभाषेच्या प्रेमाला विलक्षण भरती आलेली होती. लाल, बाल आणि पाल ही तरुणांची त्या वेळी दैवते होती. सयाजीरावांनी बडोद्यात एक उत्कृष्ट ग्रंथालय उघडून ठेवले होते. त्याचा विनोबांनी जेवढा फायदा घेता येईल तेवढा घेतला. प्राचीन मराठी वाङ्मयाचा सर्व अभ्यास विनोबांनी शाळेत असतानाच केला. मोरोपंतांचे ' आर्या भारत ' आणि ' केकावली ' त्यांना अतिशय आवडे. ' केकावली ' तर त्यांनी मुखोद्गत करून टाकली. रोज मोठमोठ्याने ' केकावली ' तले श्लोक गळ्यावर म्हणायचा त्यांना त्या वेळी नादच लागून राहिला. विनोबांनी शाळेत फ्रेंच घेतले, याबद्दल त्यांच्या आईला वाईट वाटे. ती म्हणे, " मग आपल्या धर्माची भाषा जी संस्कृत, ती तुला कधी येणारच नाही. " विनोबा म्हणत, " त्याची काळजी तू करू नकोस. संस्कृत जर मला येणारच असेल, तर ते आल्यावाचून कसे राहील ? प्रत्येक गोष्ट शाळेत शिकली म्हणजेच येते असे थोडेच आहे ? " केकावलीच्या अभ्यासामुळे विनोबांना संस्कृत शिकायला मुळीच कष्ट पडले नाहीत. ते म्हणतात, " केकावलीमुळे संस्कृत भाषेचा ध्वनी माझ्या कानातच शिरून बसला होता. केकावलीतील शब्दाशब्दाचा मी अत्यंत बारकाईने अभ्यास केला असल्याने संस्कृत क्रियापदांची रूपे मला क्लिष्ट वाटली नाहीत. तीन आठवड्यांत संस्कृत व्याकरणाचा अभ्यास करून मी सरळ संस्कृतातले धर्मग्रंथ वाचू लागलो. कॉलेजात मला संस्कृत शिकावे न लागल्यामुळे संस्कृतातील विलासी काव्याचा कचरा माझ्या डोक्यात शिरला नाही, हा माझा फायदाच झाला. त्याखेरीज

फ्रेंच भाषा शिकल्याने व्हिक्टर ह्यूगोची ‘ ला मिझराब्ल ’ ही फ्रेंच भाषेतील अप्रतिम कादंबरी मला मुळातूनच वाचायला मिळाली. ” प्राचीन काव्याखेरीज त्या काळी इंग्रज सरकारने आक्षिप्त ठरवलेले सर्व वाङ्मय विनोबांनी मोठ्या प्रयत्नाने मिळवून वाचून काढले. आणि आपल्या मित्रमंडळीत त्याचा प्रचार केला. सावरकरांचे ‘ १८५७ चे स्वातंत्र्यसमर ’ आणि ‘ मॅझिनीचे चरित्र ’, पांगारकरांचा ‘ रामदासी बुवा ’ ही पुस्तके विनोबांनी पुन्हा पुन्हा वाचून जवळजवळ मुखोद्गत केली होती. अशा वाङ्मयाचे वाचन, मनन, चिंतन आणि चर्चा करण्यासाठी विनोबांनी एक ‘ विद्यार्थी मंडळ ’ काढले होते. जहाल राजकीय विचाराने विनोबा आणि त्यांचे विद्यार्थी मित्र ह्यांची डोकी त्या वेळी भडकून गेली होती. भारताच्या विशाल जनशक्तीची जाणीव करून देण्यासाठी लाला लजपतराय त्या वेळी एका भाषणात म्हणाले होते की, “ हिंदुस्थानातले तेहतीस कोटी लोक नुसते एकत्र थुंकले तरी त्या थुंकयाच्या प्रवाहात एक लाख इंग्रज लोक वाहून जातील. पण हे तेहतीस कोटी लोक एकत्र मिळून थुंकतील तेव्हा ना ? ” ह्या विचाराचा विनोबांच्या ‘ विद्यार्थी मंडळा ’ वर फार परिणाम झाला. एकेका इंग्रजाला एक एक गोळी घालून ठार करणाऱ्या एक लाख तेजस्वी तरुणांची संघटना केली की, स्वराज्य मिळावयाला काय उशीर असा त्यांनी युक्तिवाद केला. ह्या संघटनेचे नेतृत्व विनोबांनी स्वीकारावे असे सर्वांचे मत पडले. भय हा शब्द विनोबांना माहीत नव्हता. पण ‘ संघटने ’ चे त्यांना पहिल्यापासून वावडे होते. ते आपल्या मित्रांना म्हणाले, “ तुम्ही अशी संघटना तयार केलीत तर मी त्याचा सभासद होईन. कोणावर बॉंब टाकायला सांगितला तरी टाकीन. पण संघटनेचे पुढारीपण मला झेपायचे नाही. तुकोबाला कोणी बँकेचा मॅनेजर नेमले असते काय ? ” विनोबा पहिल्यापासून ‘ संस्थे ’ च्या विरुद्ध. ‘ संस्था नसावी. व्यवस्था असावी. ’ हे त्यांचे मत सुप्रसिद्धच आहे.

विद्यार्थी मंडळासाठी महिना साडेतीन रुपये भाड्याची एक खोली विनोबांनी घेतली होती. पण हे भाडे महिन्याच्या महिन्याला द्यायचे कसे ? आईजवळ पैसे मागण्याचा विनोबांना संकोच वाटे. म्हणून पैसे मिळवण्याची त्यांनी एक अद्भुत युक्ती शोधून काढली. विनोबा आणि त्यांचे मित्र निरनिराळ्या घरांत जाऊन दळणाची कामे करू लागले. त्याचे त्यांना जे पैसे मिळत त्यांतून ते खोलीचे भाडे देत. कोणतीही नवीन गोष्ट शिकण्याचा विनोबांना कंटाळा म्हणून कधी वाटला

नाही. हा गुण त्यांना त्यांच्या वडिलांपासून मिळाला. त्यांचे वडील नरहरपंत पंचावन्नाव्या वर्षी गाणे शिकावयाला गेले. एवढेच नव्हे तर, गाण्यात तरबेज होऊन ते दुसऱ्याला गाणे शिकवू लागले. आणि संगीतशास्त्र वर त्यांनी एक पुस्तक पण लिहिले. विनोबासुद्धा पंचेचाळिसाव्या वर्षी अरबीचा अभ्यास करून कुराण वाचू लागले. त्यांचे अरबी उच्चार ऐकून मौलाना आझाद इतके खूप झाले की, त्यांनी विनोबांना 'हाफीज' ही पदवी देऊन टाकली. तथापि वडिलांपेक्षा विनोबांच्या जीवनावर त्यांच्या आईचा संस्कार अधिक झाला. 'आईपासून मी काय काय शिकलो त्या गोष्टी मोजता देखील येणार नाहीत, असे विनोबा नेहमी म्हणतात. संत-वाङ्मयाची गोडी विनोबांना आईपासून लागली. त्यांच्या आईला साधुसंतांची कितीतरी गाणी आणि भजने पाठ येत होती. न्हाताना किंवा स्वयंपाक करताना ती त्यांतली काही सारखी तोंडाने म्हणत असावयाची. भावभक्तीच्या आनंदात ती सदैव तल्लीन असे. त्यामुळे कित्येक वेळा सैपाकाकडे तिचे दुर्लक्ष होई. वरणात किंवा भाजीत मीठ किंवा तिखट टाकावयाचे ती विसरून जाई. पण विनोबांच्या ते कधी लक्षातच येत नसे. कारण आईप्रमाणे तेही कसल्या तरी चिंतनात किंवा विचारात सदैव गुंतलेले असत. धाकटा बाळकोबा जेव्हा ओरडे, "ए आई, भाजीत मीठ नाही" तेव्हा विनोबांच्या ध्यानात येई. विनोबा त्याला म्हणत, 'अरे, भाजीत मीठ असले काय अन् नसले काय? त्याने काय तुझी एखादी साधना वाया जाणार आहे ! असल्या बारक्यासारक्या गोष्टीत कशाला मन घालतोस ?" एकदा एक धष्टपुष्ट भिकारी दाराशी आला. त्याला आई भिक्षा घालू लागली. तेव्हा विनोबा म्हणाले, "अग आई, अशा माणसाला भिक्षा घालणे म्हणजे आळसाला उत्तेजन देण्यासारखे आहे. दान करताना 'देशे काले च पात्रे'च विचार करावा असे गीतेने सुद्धा सांगितले आहे." तेव्हा आई म्हणाली, "कोण कशाला पात्र आहे किंवा नाही हे आपण ठरविणारे कोण ? दारी आलेला भिकारी हा भगवंतच ते रूप घेऊन आलेला आहे असेच आपण नेहमी समजावे." दानात अभिमान नसावा, अहंकार नसावा, बुद्धीत भक्ती आणि नम्रता असावी ही शिकवणूक आईनेच विनोबांना दिली. कन्येचे दान करताना सासरा जावयाचे पाय धुतो आणि त्याची पूजा करतो. ही वृत्ती प्रत्येक दानाच्या वेळी असावयाला हवी. दान म्हणजे भिक्षा नव्हे. दान म्हणजे दीक्षा. 'गीते'चे

मराठीमध्ये समश्लोकी भाषांतर करण्याची प्रेरणाही विनोबांना आईकडूनच मिळाली. आई त्यांना एकदा म्हणाली, " विन्या, मला गीतेचा अर्थ समजावून सांग रे ! " विनोबांनी ग्रंथालयातून गीतेचे चारदोन मराठी अनुवाद तिला आणून दिले. आई म्हणाली, " हे घेऊन मी काय करू ? मला समजेल अशा भाषेत तूच गीता लिही. " 'गीताई' हे याच प्रयत्नाचे फळ होय. १९१८ मध्ये इन्फ्लुएंझाची साथ आली. त्यात विनोबांची आई मरण पावली. विनोबा त्या वेळी तेवीस वर्षांचे होते. आईवर विनोबांचे एवढे प्रेम. तिच्या आजारात शेवट-पर्यंत त्यांनी तिची सेवा केली. पण ती मरण पावल्यानंतर ते तिच्याबरोबर स्मशानात गेले नाहीत. ब्राह्मणाच्या हातून प्रेताची विधिपूर्वक पूजा करणे हा आसुरी मार्ग आहे असे त्यांचे मत होते. म्हणून ते घरी राहिले. नित्याप्रमाणे त्यांनी दूधभाकरी खाल्ली आणि गीतेचा नि उपनिषदांचा पाठ म्हटला. श्री-शंकराचार्य त्यांचे गुरु होते. प्रेताकडे बघण्याची शंकराचार्यांची हीच गोष्ट होती. शंकराचार्यांची आई वारली, तेव्हा तिला स्मशानात नेण्यासाठी खांदा द्यायला कोणीच मिळेनात. कारण समाजाने शंकराचार्यांवर बहिष्कार टाकला होता. शंकराचार्य हे तर्कवादी होते. त्यांनी विचार केला की, मेलेल्या शरीरात अन् लाकडात काहीच फरक नाही. तेव्हा आईच्या मृत शरीराला लाकूड समजून त्यांनी त्याचे लहान लहान तुकडे केले आणि अंगणात आणून ते जाळून टाकले. आई वारल्यानंतर थोड्याच दिवसांनी विनोबा, बाळकोबा आणि शिवाजी हे नरहरपंतांचे तिन्ही पुत्र एकामागून एक घर सोडून घराबाहेर पडले, ते पुन्हा घरी परत आले नाहीत. त्यांपैकी कोणीही लग्न केले नाही. सर्वांनी आपले आयुष्य जनताजनार्दनाच्या चरणी समर्पण करून टाकले.

१९१९ मध्ये विनोबांनी घर सोडले. त्या वेळी ते बडोदा कॉलेजमध्ये इंटरच्या वर्गात होते. घर सोडून काशीला जायचे, तेथे ब्रह्मविद्या शिकून मग मोक्षप्राप्ती-साठी हिमालयात जावयाचे हा विचार त्याच वेळी त्यांनी मनात पक्का केला. आपण घरातून बाहेर पडणार असल्याचे त्यांनी आपल्या मित्रांना सांगितले. मित्र म्हणाले, " घरातून बाहेर पडून तू काय करणार ? " विनोबा म्हणाले, " अथातो ब्रह्मजिज्ञासा. मला ब्रह्म जाणावयाचे आहे. " मित्र म्हणाले, " आणखी दोन वर्षे थांब. बी. ए. हो. अन् मग तुला काय करायचे ते कर. " विनोबा म्हणाले, " माझी विचार करण्याची पद्धत तुमच्यापेक्षा फार निराळी आहे. कोणतीही गोष्ट सावकाशीने

किंवा धीमेधींमे मला करता येत नाही. मी मुळाशीच कुऱ्हाडीचा घाव घालून ती तोडून टाकतो." घरातून बाहेर पडण्यापूर्वी विनोबांनी आपली निरनिराळ्या विषयांत मिळालेली आणि परीक्षेची अशी सर्व सर्टिफिकिटे बाहेर काढली अन् चुलीत घालून जाळून टाकली. "अरे, ही सर्टिफिकिटे का जाळतोस?" कोणीतरी विनोबांना विचारले. विनोबा म्हणाले, "ह्यांची मला जरुरीच काय?" "अरे जरुरी नसली म्हणून जाळण्याचे काय कारण? घरात पडून राहिली तर तुझे काय बिघडते?" विचारणाराने सांगितले. विनोबा म्हणाले, "फार बिघडते. कारण पुढेमागे त्यांचा उपयोग करण्याचा मला मोह झाला तर?" सूर्याजीने ज्याप्रमाणे सिंहगडावरून पळून जाणाऱ्या शिपायांना परावृत्त करण्यासाठी दोरच कापून टाकला, त्याप्रमाणे ती सर्टिफिकिटे जाळून पुन्हा गृहस्थाश्रमी संसाराकडे वळण्याचे आकर्षण विनोबांनी अजिबात नाहींसे करून टाकले. पण घर सोडण्याची ही गोष्ट आपल्या वडिलांपासून मात्र विनोबांनी गुप्त राखली. इंटरच्या परीक्षेकरिता मुंबईला जाण्यासाठी ते निघाले. पण वाटेत सुरतेला उतरून त्यांनी वडिलांना एक लहानसे पत्र टाकले, अन् सरळ आपली काशीची वाट धरली. देशाच्या स्वातंत्र्यासाठी झगडणारे त्या वेळचे लोकमान्य टिळक किंवा अरविंद घोष ह्यांच्यासारखे जे महापुरुष होते, त्यांच्यावर भारताच्या प्राचीन आध्यात्मिक संस्कृतीचा फार मोठा प्रभाव पडलेला आहे हे विनोबांनी ओळखले. म्हणूनच काशीला जाऊन ब्रह्मविद्येचा गड्डा हस्तगत करण्याचे त्यांनी ठरविले. काशीला जाऊन विनोबांनी कुठे आणि कसा अभ्यास केला हे आज कळण्याला काही साधन नाही. विनोबा स्वतः जेव्हा त्यावर प्रकाश टाकतील तेव्हाच ते कळेल. पण संस्कृत वेदवेदांग व छंदशास्त्र ह्यांचा त्यांनी त्या ठिकाणी अभ्यास केला असावा असे वाटते ह्या काळात त्यांची काव्यप्रतिभा जागृत झालेली होती. गंगेच्या काठी जाऊन कविता लिहीत बसावे आणि कविता लिहून झाल्यानंतर ती गंगेच्या पाण्यात सोडून द्यावी हा विनोबांचा काशीमधला अत्यंत आवडता व्यवसाय होता. काही थोड्या काव्यमय कल्पना त्यांनी त्या वेळी ज्या शिल्लक ठेवल्या त्या त्यांच्या 'विचार–पोथी' मध्ये वाचावयास मिळतात. तथापि, काशीमधल्या जुनाट आणि सनातनी धार्मिकतेचे नि संस्कृतीचे वातावरण काही विनोबांना विशेष आवडले नाही. ते नवयुगधर्माच्या संशोधनासाठी तेथे गेले होते. पण त्या बाबतीत त्यांची निराशा झाली. ह्याच सुमारास

बनारस विश्वविद्यालयाच्या स्थापनेचा समारंभ काशीला भरला. व्हाइसरॉय-साहेब आणि मोठमोठे राजेमहाराजे त्या समारंभाला आले होते. गांधीजींचे नाव नुकतेच त्या वेळी लोकांना माहीत होऊ लागले होते. त्यांनाही त्या समारंभाला आमंत्रण होते. निरनिराळ्या वक्त्यांची भाषणे झाली. त्यांत गांधीजींना ' दोन शब्द ' सांगण्याची विनंती करण्यात आली. गांधीजी व्यास-पीठावर उभे राहिले आणि दोनच शब्दांत त्या सभेवर त्यांनी बाँबगोळा टाकला. अंगावर रत्नजडित दागदागिने घालून आलेल्या राजेमहाराजांना उद्देशून गांधीजी म्हणाले, " हिंदुस्थानात अठरा विश्वे दारिद्र्य असताना स्वतःच्या अंगावर ही संपत्ती मिरवायला तुम्हांला शरम वाटली पाहिजे. " व्हाइसरॉयच्या भोवती पोलिसांचा सशस्त्र पहारा होता. त्याला उद्देशून ते म्हणाले, "व्हाइसरॉयसाहेब ह्या देशातल्या जनतेला एवढे का घाबरतात ? " क्रांतिकारकांना उद्देशून ते म्हणाले, " चोरून दुसऱ्यावर बाँब टाकण्यात किंवा दुसऱ्याचे खून करण्यात काय बहाद्दुरी ? इंग्रज जर आपणाला या देशात नको असतील तर मग त्यांना सरळ सांगा ' चालते व्हा. ' मग असे बोलण्याबद्दल तुम्हांला फाशी जावे लागले तर हसत हसत जा. " अध्यक्षस्थानी ॲनी बेझंट होत्या. त्यांनी गांधींना भाषण बंद करायला सांगितले. राजेमहाराजे खुर्च्यांवरून पटापट उठून निघून गेले. सभेत खूप गोंधळ झाला आणि गांधीजींच्या अलौकिक धैर्याची देशभर प्रशंसा झाली. स्वातंत्र्यप्रेम आणि आध्यात्मिक सामर्थ्य ह्यांचा समन्वय ज्याच्या व्यक्तिमत्त्वात झालेला होता असा महापुरुष विनोबांना अखेर सापडला. त्याबरोबर काशी सोडून ते तडक अहमदाबाद येथील गांधीजींच्या सत्याग्रहाश्रमात येऊन दाखल झाले. विनोबांना हिमालयात जायची इच्छा होती. ती त्यांची इच्छा गांधीजींच्या सहवासात पूर्ण झाली.

गांधीजींच्या आश्रमात विनोबा जेव्हा आले तेव्हा पुराणातला ' जडभरत ' हा त्यांचा आदर्श होता. आपल्या बुद्धीची आणि व्यासंगाची दुसऱ्या कोणालाही कल्पना न येईल अशा रीतीने रात्रीच्या वेळी अगदी गुप्तपणे विद्येची उपासना करावयाची आणि दिवसभर आश्रमात पाणी काढणे, दळणे, शौचकूप साफ करणे असली अंगमेहनतीची कामे करीत राहावयाचे हा विनोबांनी क्रम ठेवला. तथापि, हा कोणीतरी विलक्षण माणूस आहे हे ओळखावयाला गांधीजींना फारसा वेळ लागला नाही. ' विनोबा ' या नावाने गांधीजींनीच त्यांना

प्रथम हाक मारली. गांधीजी त्यांना म्हणाले, " अरे विनोबा, शरीराने तर तू असा दुबळा दिसतो आहेस. तुला एवढी मेहनत कशी सहन होईल ? " विनोबांनी उत्तर दिले, " मी इच्छाशक्तीने श्रम करतो. अंगबळाने नव्हे. " गांधीजी त्यांचे उत्तर एकून चकितच झाले. एकदा एका प्रसंगी गांधीजी सहज म्हणाले, " माणसाच्या आहारात दुधाची काही आवश्यकता नाही. " विनोबा म्हणाले, " तसे कशाला, मी त्याचा प्रयोगच करून पाहतो. " दुसऱ्या दिवसापासून विनोबांनी दूधच सोडून दिले. त्यामुळे त्यांचे शरीर इतके बिघडले की, प्रकृती सुधारण्यासाठी आश्रम सोडून ते वाईला येऊन काही काळ राहिले वाईला आल्यानंतर त्यांनी दूध प्यायला सुरुवात केली. रोज ते दीडशेर दूध पीत. त्याखेरीज चार पैशांची केळी अन् लिंबू आणि दोन भाकरी असा त्यांचा आहार असे. मीठमिरची खायचे त्यांनी अजिबात सोडून दिले. अकरा पैशांत त्यांनी आपला रोजचा आहार बसविला. रोज ते दहा–बारा मैल चालत, नंतर आठ शेर दळण दळीत आणि तीनशे नमस्कार घालीत. त्यामुळे विनोबांची प्रकृती पूर्वीपेक्षाहि जास्त सुधारली. ' आहारात दूध असायला पाहिजे.' हा अनुभव या साऱ्या प्रयोगांत विनोबा शिकले. वाईला ' प्राज्ञपाठशाळे ' त श्री नारायणशास्त्री मराठे ह्यांच्याजवळ उपनिषदं, शांकरभाष्य, ब्रह्मसूत्रे ह्यांचा त्यांनी अभ्यास केला. उरल्यासुरल्या वेळात त्यानी गीता, ज्ञानेश्वरी आणि उपनिषदांचे विद्यार्थ्यांसाठी वर्ग चालविले. चारशे मैल पायांनी प्रवास करून रायगड, तोरणा, सिंहगड हे किल्ले पाहून टाकले. सदरा, कोट, टोपी आयुष्यात कधीही न वापरण्याची त्यांना पूर्वीच प्रतिज्ञा केली होती. लाकडाची एक थाळी, वाटी, लोटा, धोतर, घोंगडी आणि पुस्तके एवढाच त्यांचा त्या वेळी ' प्रपंच ' असे. वाईला ते एक वर्ष होते. ह्या वर्षात आपण काय काय केले याचा तपशीलवार वृत्तांत विनोबांनी गांधीजींना पत्र लिहून पाठविला. तो वाचून गांधीजींच्या तोंडून एकदम उद्‌गार बाहेर पडले, " वा रे वा ! गोरखाने मच्छिंद्रनाथाचा पराभव केला. भीम आहे भीम ! " त्या पत्राच्या अखेर विनोबांनी गांधीजींना अशी विनंती केली होती की " पुत्र म्हणून तुम्ही माझा स्वीकार करावा. " गांधीजींनी उत्तर लिहिले, " तुझी उत्कट इच्छा आहे म्हणूनच मी तुझे पितृपद स्वीकारीन आणि त्या पदवीची लायकी माझ्या अंगी आणण्याचा मी प्रयत्न करीन. पण माझी तुला एक विनंती आहे, की मी

ज्या ज्या वेळी हिरण्यकश्यपूसारखा वागेन, त्या त्या वेळी मात्र माझी कदर बाळगताना तू भक्त प्रल्हादासारखे पुत्रकर्तव्य करीत राहा!" पत्राच्या शेवटी गांधीजींनी आशीर्वाद दिला– "ईश्वर तुला दीर्घायू करो आणि हिंदुस्थानच्या उन्नतीसाठी तुझा जास्तीत जास्त उपयोग होवो एवढीच माझी इच्छा आहे!"

विनोबा परत गांधीजींच्या आश्रमात आले त्या वेळी विद्यापीठाचे काम तेथे सुरू झालेले होते. 'धर्मतत्त्व' हा विषय शिकविण्याचे काम विनोबांकडे आले. सर्व अध्यापकांत विनोबा हेच वयाने लहान म्हणजे तेवीस वर्षांचे होते. तथापि, त्या वयातही विनोबांची तर्कशक्ती एवढी प्रखर होती की, मोठमोठ्या विद्वानांना त्यांनी चकित करून सोडले. विनोबांच्या वैशिष्ट्यपूर्ण तर्कपद्धतीला आश्रमात 'विनोबिक लॉजिक' असे कौतुकाने संबोधण्यात येऊ लागले. गांधीजींच्या आश्रमाचे वातावरण विनोबांच्यामुळे खूपच बदलले. आश्रमीयांच्या मुलांना शाळा नव्हती. ती दंगा करीत आश्रमातून हिंडत होती. त्यांच्या शिक्षणाची विनोबांनी व्यवस्था केली आणि त्यांना शिस्त लावली रिकाम्या वेळात किंवा काम करताना संस्कृत श्लोक, सुभाषिते, भजने आणि गीतापाठ म्हणण्याची पद्धती विनोबांनीच आश्रमात सुरू केली. अहमदाबादला असताना विनोबा एकदा साबरमती नदीमध्ये आंघोळ करायला गेले. तिथे पाय घसरून ते पाण्यात पडले आणि प्रवाहात वाहून जाऊ लागले. जेव्हा 'मला वाचवा' असा आक्रोश करण्याऐवजी ते काठावर असलेल्या पुंडलीकजी कातगड्यांना ओरडून सांगू लागले की, "बापूजींना माझे प्रणाम सांगा— त्यांना म्हणावे विनोबा वाहून गेला—अन् आणखी सांगा की आत्मा अमर आहे!" तथापि विनोबांना वाचविण्यासाठी काठावरच्या लोकांनी धावपळ केलीच. इतक्यात नदीच्या पाण्यामध्ये एक खडक होता. तो विनोबांच्या हाताला लागला तेव्हा विनोबा त्यावर चढून बसले अन् "आत्मा अमर आहे! आत्मा अमर आहे!" असे मोठमोठ्याने स्वतःशीच म्हणू लागले. देह आणि आत्मा ह्यांतला भेद ओळखून देहाची जाणीव सर्वस्वी विसरून जगण्याची कला विनोबा शंकराचार्यांपासून शिकले होते. 'शरीरनाश हा नाशच नव्हे. आत्म्याचा नाश कधी होत नाही. नाश म्हणजे बुद्धीचा नाश.' हे विनोबांचे तत्त्व होते. १९२० साली नागपूरची कॉंग्रेस भरली. जमनालाल बजाज स्वागताध्यक्ष होते. गांधीजी त्यांना आपले पाचवे पुत्र मानीत. विनोबांच्या अलौकिक चारित्र्या-

वर जमनालालजी खूष झाले आणि त्यांना १९२१ च्या गुढीपाडव्याच्या दिवशी वर्ध्याला घेऊन गेले. तेथे विनोबांनी आपला ‘ सत्याग्रहाश्रम ’ उघडला. कर्म आणि ज्ञान ह्यांची सतत सांगड घातली पाहिजे ही विनोबांची पहिल्यापासून वृत्ती होती. आश्रमात ते दिवसभर शरीरश्रम करीत. आणि त्याचबरोबर वेद, उपनिषदे नि भाषा ह्यांचा ते सतत अभ्यास करीत. रोज काहीतरी नवीन शिकायचे अन् दुसऱ्याला ते शिकवायचे हे विनोबांचे तंत्र असे वर्ध्याला आल्यावर ‘ महाराष्ट्रधर्म ’ नावाचे एक अठ्ठेचाळीस पानांचे मासिक विनोबांनी काढले. ह्या मासिकाचे पाच अंक निघाले नाहीत तो झेंडा सत्याग्रहात भाग घेतल्यामुळे विनोबांना पहिल्याप्रथमच कारागृहात जावे लागले. त्या वेळी कारागृहातले जीवन अतिशय कष्टाचे होते. विनोबांकडे खडी फोडण्याचे काम आले होते. तुरुंगातील अधिकाऱ्यांचे वर्तन तर अमानुष होते. सकाळपासून संध्याकाळपर्यंत कैद्यांना त्यांच्या शिव्या खाव्या लागत. विनोबांच्या एका मित्राची पत्नी त्यांना एकदा भेटायला तुरुंगात आली. तिने विचारले, “ कसे काय आहे तुरुंगातले आयुष्य ? ” विनोबा म्हणाले, “ तुम्ही सर्कस पाहिली आहे ना ? सर्कशीत माणसे पशूंवर जुलूम करतात. पण तुरुंगात पशू माणसांवर जुलूम करतात. ” काही दिवसांनी चक्रवर्ती राजगोपालाचारियर तुरुंगात काही राजकीय कैद्यांना भेटायला गेले. तेव्हा विनोबांना पाहून त्यांनी पुढील उद्गार काढले, “ वाहवा, विनोबा म्हणजे साक्षात् देवदूत वाटले ! त्यांचे पावित्र्य, विद्वत्ता आणि तत्त्वज्ञान ह्यांचे काय वर्णन करावे ? धर्माच्या उच्चतम शिखरावरच ते सदैव विहार करताहेत ! आणि एवढे असून ह्या महापुरुषाची नम्रता केवढी ? तुरुंगातल्या अधिकाऱ्यांना ह्याची काय योग्यता आहे याचा पत्ता नाही ! ” ह्याच सुमारास महादेवभाई देसाई ह्यांनी ‘ नवजीवन ’ मध्ये विनोबांवर एक लेख लिहिला होता. तो वाचण्यासारखा आहे. “ मौनाच्या दुर्भेद्य कवचामध्ये हा माणूस सदैव लपून बसला आहे. जणू काही हे एक गुप्त रत्नभांडारच आहे. प्रचंड साधुता, धर्मशास्त्र आणि तत्त्वज्ञान ह्या विषयांत प्रकांड विद्वत्ता, तपश्चर्या नि संयम ह्यांचे अद्वितीय सामर्थ्य आणि सर्वांतून निपजून वर आलेले नम्रतेचे नवनीत ! त्यांची तुलना ज्याच्याशी करता येईल असा माणूसच दिसत नाही. ध्रुव, प्रल्हाद आणि नचिकेत ह्या बालकांच्या आध्यात्मिक सामर्थ्याच्या आणि चमत्काराच्या गोष्टी आपण वाचतो. त्यांच्यावर कधी कधी आपला विश्वास बसत

नाही; पण तुम्ही विनोबांना पाहा. म्हणजे त्या बालकांच्या पराक्रमाची तुम्हांला कल्पना येईल!" पंचवीस वर्षांच्या आत राजाजी आणि महादेवभाई ह्यांना ज्यांनी अशी मोहिनी घातली, त्यांच्या उग्र तपश्चर्येचे आणि प्रखर व्यक्तिमत्त्वाचे आणखी काय वर्णन करावे ?

तुरुंगातून सुटल्यावर विनोबा आपल्या सहकाऱ्यांबरोबर तडक वर्ध्याला आश्रमात आले आणि ताबडतोब आपल्या दैनंदिन कार्यक्रमाला लागले. तुरुंगातून सुटले तेव्हा एखाद दुसरा दिवस विश्रांती घ्यायची हा विचारही त्यांच्या डोक्यात आला नाही. विनोबा म्हणाले, "धुळ्याच्या :तुरुंगातून आता आश्रमाच्या तुरुंगात आपली बदली झाली आहे!" तुरुंगात आपल्याला आश्रमीय जीवनातल्या अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या असे विनोबा सांगत. गोणपाटाचे खडबडीत कपडे अंगावर घालायचे, पाण्याचे टमरेल अन् कांजीची थाळी एवढीच भांडी जवळ बाळगायची, ह्यापेक्षा 'असंग्रहा'च्या व्रताचे अधिक काटेकोर पालन कुठे करता येईल? अगदी ठरलेल्या वेळी आंघोळ करायची, खायचे, कामे करायची, घंटेच्या ठोक्याबरोबर झोपेतून उठावयाचे या दैनंदिन क्रमबद्ध जीवनाचा अनुभव तुरुंगाखेरीज दुसरीकडे कोठे येणार? भोजनात तर 'अस्वाद व्रता'चे तेथे रोजच पालन होई. तुरुंगातल्या या सर्व गोष्टी विनोबांनी आश्रमीय जीवनात आणल्या. १९२४–२५ साली त्रावणकोरमध्ये वायकोम गावी अस्पृश्यांच्या मंदिर-प्रवेशाचा सत्याग्रह काँग्रेस कार्यकर्त्यांनी सुरू केला. केळ्ळापन हे त्या सत्याग्रहाचे नेते होते. सर्व कार्यकर्ते तुरुंगात गेल्यानंतर आंदोलन ढिले पडल्यासारखे झाले. म्हणून गांधीजींनी विनोबांना वायकोमला पाठविले. विनोबांनी आपल्या प्रभावी वाणीने आणि प्रखर शिस्तीने निस्तेज पडलेल्या सत्याग्रहात नवचैतन्य निर्माण केले. त्यानंतर १९३२ साली सरकारने काँग्रेस बेकायदा ठरविली. त्या वेळी विनोबांना तुरुंगाची वारी करावी लागली; पण १९२३ पासून तो १९४० पर्यंत जवळजवळ अठरा वर्षे म्हणजे दीड तप विनोबांनी आपल्या आश्रमात कर्माची आणि ज्ञानाची उच्च आणि अखंड साधना चालविली. ह्या काळात अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र, धर्मशास्त्र, खादीशास्त्र, भारतीय समाजशास्त्र, या विषयांचे त्यांनी केवळ खोल अध्ययन केले असे नाही, पण त्यासंबंधी नाना तऱ्हेचे प्रयोग करून स्वतःचे अनेक सिद्धान्त बसविले. प्राचीन सत्य आणि अर्वाचीन काळ ह्यांचा नित्य

व्यवहारात कसा समन्वय करता येईल ह्याचा त्यांनी मूलभूत विचार केला. हे सर्व होत असता शिस्तबद्ध आणि ज्ञानी कार्यकर्ते नि शिष्य तयार करण्याचे विनोबांचे कार्य एकसारखे चालूच होते. भारताच्या राजकीय रणक्षेत्रावर या काळात गांधीजी मोठमोठे पराक्रम गाजवीत असता, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते ज्याच्या शक्तीवर टिकवावयाचे त्या रचनात्मक कार्यक्रमाचे संशोधन विनोबा शांतपणे आपल्या प्रयोगशाळेत करीत बसले होते. ह्या काळात 'महाराष्ट्र–धर्म' साप्ताहिक स्वरूपात त्यांनी सुरू केले. ह्या साप्ताहिकात बहुतेक सर्व लिखाण एकट्या विनोबांचेच असे. विनोबांचे लेखन म्हणजे त्यांचे जीवन, साधना आणि अध्ययन ह्यांचे सारच होय. ह्या साप्ताहिकातील त्यांचे निवडक लिखाण 'मधुकर' ह्या पुस्तकात एकत्रित केलेले आहे. गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह जेव्हा पुकारला तेव्हा विनोबा त्यात सामील झाले नाहीत. तेव्हा काहीजण आश्चर्याने विनोबांना म्हणाले, "तुम्ही स्वतः योगी आहात. तुम्हांला निंदास्तुतीची काही पर्वा नाही. पण मिठाच्या सत्याग्रहात तुम्ही भाग घेतला नाहीत याबद्दल लोक तुम्हांला ज्या शिव्या देताहेत त्या आम्हांला ऐकवत नाहीत." विनोबा हसून म्हणाले, "बरोबर आहे. लोक शिव्या देणारच!" त्याबाबत विनोबांचा युक्तिवाद असा होता, "राजकीय सागराच्या पृष्ठभागावर वादळे निर्माण करण्याचे कार्य गांधीजींसारख्या महान् सूर्यचंद्रांचे आहे. आपले नाही. आपण आपले सागराच्या तळाशी शांतपणे बसून मोती बनविण्याचा प्रयत्न करणार." बत्तीस साली धुळ्याच्या तुरुंगात विनोबांची रवानगी झाली, त्या वेळी तेथे जमनालालजी, ऋषभदास रांका, साने गुरुजी वगैरे थोर थोर मंडळी होती. त्यांनी विनोबांना गीतेवर प्रवचने सांगण्याचा आग्रह केला. त्याप्रमाणे दर रविवारी एका अध्यायावर एक अशी गीतेच्या अठरा अध्यायांवर अठरा प्रवचने त्यांनी सांगितली. साने गुरुजींनी अक्षर अन् अक्षर ती टिपून घेतली. त्यांचे बंधू शिवाजी ह्यांनी ती विनोबांकडून सुधारून अन् वाढवून घेतली आणि पुस्तकरूपाने प्रसिद्ध केली. विनोबांची ही सर्वोत्कृष्ट कृती होय. गीतेवर अशी सुंदर प्रवचने आजपर्यंत कोणीही सांगितलेली नाहीत. विनोबांनासुद्धा आपल्या सर्व पुस्तकांत हेच पुस्तक आवडत असावे असे वाटते. कारण हे पुस्तक जो खरेदी करील त्याला आणि त्याच पुस्तकावर विनोबा 'स्वाक्षरी' देतात. धुळ्याच्या तुरुंगातून सुटल्यानंतर विनोबांनी वर्ध्यापासून काही अंतरावर

असलेल्या नालवाडी गावी आश्रम काढला. तेथे हरिजनांची वसती होती. गांधीजींनी त्या काळात हरिजनांच्या प्रश्नावर विशेष भर दिला होता. नालवाडीला हरिजनसेवा नि ग्रामसेवा ही विनोबांची कार्ये चालू असताच त्यांनी खेडेगावातील जनतेचा बेकारीचा प्रश्न हाती घेतला. नालवाडीला त्यांनी एक 'परिश्रमालय' काढले. तेथे सूतकाम शिकविण्यासाठी त्यांनी एक शिक्षक ठेवला होता. ज्याला काम पाहिजे आहे त्याने तेथे यावे, सूत कातायला शिकावे अन् मग त्यावर आपली कमाई करावी. हा प्रयोग चालू असता विनोबांना असे आढळून आले की, सूतकताईने मजुराला पोटापुरते वेतन मिळत नाही. विनोबांचा हा अनुभव गांधीजींच्या कानावर गेला. स्वराज्य मिळविण्यासाठी राष्ट्राला चरख्याचा मंत्र शिकविण्याऱ्या महापुरुषाला ते ऐकून धक्का बसल्याशिवाय राहिला नाही. सूतकताईची कला सुधारून कातणाराची कमाई वाढविण्याचे प्रयोग विनोबांनी करून पाहिले होते. त्या विषयावर त्यांनी 'मूळ उद्योग : कातणे' हे पुस्तक पण लिहिले होते. विनोबा एक वर्षभर रोजचे सारा दिवसभर सूत कातीत बसत. एका दिवसात सुताच्या सोळा लडी तयार होत. यापेक्षा एका दिवसात कोणाच्याही हातून अधिक कानून होणार नाही हे त्यांना कळून आले. चरखा संघाच्या मजुरीच्या हिशेबाने एवढ्या कामाचे वेतन सव्वा दोन आणे होई. विनोबा गांधीजींना म्हणाले, "दिवसभर काम करून मी सव्वा दोन आणे कमावतो. अन् माझा रोजचा खर्च आहे आठ आण्यांचा." गांधीजी म्हणाले, "याचा अर्थ हा की, दिवसभर कातण्याचे काम करूनही कारागिराचे पोट भरणे शक्य नाही" तेव्हापासून सूत कातणाराला निदान जीवन-वेतन तरी मिळेल एवढे कताईचे दर चरखा संघाकडून गांधीजींनी वाढवून घेतले. विनोबांना त्यामुळे फार आनंद झाला. ते म्हणाले, "मी पण एक मजूर आहे. दुःखिताची व्यथा दुःखितच जाणतो."

काही दिवसांनी विनोबांनी नालवाडी सोडली. तेव्हा धाम नदीच्या काठी असलेल्या पवनार ह्या गावी त्यांनी आपला आश्रम स्थापन केला. आणि त्या आश्रमाला 'परंधाम' असे नाव दिले. येथे त्यांनी शेती, ग्रामोद्योग नि ग्रामसफाई यांसंबंधी प्रयोग सुरू केले. खेडेगावच्या लोकांचे जीवन जगण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे ही विनोबांची विचारसरणी होती. गीतेच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे दुसऱ्यामध्ये आपल्याला आणि आपल्यामध्ये दुसऱ्याला

पाहण्याच्या ' साम्ययोगा ' ची विनोबांची ही साधना होती. यानंतर दुसरे महायुद्ध सुरू झाले. त्या वेळी निरनिराळ्या प्रांतांत काँग्रेसची मंत्रिमंडळे अधिकारारूढ होती. त्यांना विचारल्याखेरीज युद्धाच्या कुंडात इंग्रजांनी भारताला ढकलले होते. त्याला तात्त्विक विरोध तरी करणे आवश्यक होते. म्हणून गांधीजींनी व्यक्तिगत सत्याग्रहाची योजना तयार केली. आणि ' पहिला सत्याग्रही ' म्हणून विनोबांची निवड केली. तोपर्यंत विनोबांचे नाव सर्वसामान्य लोकांना आणि सरकारला विशेष माहीतही नव्हते. गांधीजींनी विनोबांची निवड केलेली बघून सर्वांनाच धक्का बसला. जो तो ' हा विनोबा कोण ' म्हणून विचारू लागला. तेव्हा गांधीजींना ' हरिजन ' मधून विनोबाचा सर्वांना परिचय करून द्यावा लागला. महादेवभाईंनीही त्यांच्यावर एक सुंदर लेख लिहिला. तो असा : " योगः कर्मसु कौशलम्. योग म्हणजे कर्मातील कुशलता असे गीतेत म्हटले आहे. विनोबांनी जे जे काही केले त्यात प्रभुत्व मिळविले आहे. म्हणून ते योगी आहेत. डाव्या आणि उजव्या अशा दोन्ही हातांनी चरखा आणि टकळी ते सारख्याच कौशल्याने चालवतात. त्यांच्यासारखा आदर्श सूत कातणारा सापडणेच शक्य नाही. त्यांची विद्वत्ता अगाध आहे. पण खेडेगावच्या माणसांना ते अगदी आपल्यापैकी आहेत असे वाटते. त्यांची वाणी अत्यंत सोपी अन् ओजस्वी असल्याने आणि गोष्टी नि दृष्टान्त देऊन समजावण्याच्या त्यांच्या पद्धतीने अडाणी श्रोत्यांवरही त्यांच्या भाषणाचा परिणाम होऊ शकतो. ' गीते 'चे समश्लोकी भाषांतर ' गीताई ' म्हणून त्यांनी केले आहे. त्याच्या एक लाख प्रती आतापर्यंत खपल्या आहेत, पवनार येथे सूतकताईचे त्यांचे प्रयोग चालू असताच त्यांनी कुराणाचा अभ्यास करायला सुरुवात केली. अन् मौलाना आझादांपुढे ' अलफातेहा ' म्हणून दाखवून आपल्या शब्दोच्चारांनी त्यांना चकित करून सोडले ! " सत्याग्रहात विनोबांना पकडून सरकारने तुरुंगात धाडले. पुढे बेचाळीस साली ' चले जाव ' चळवळीच्या वेळी राष्ट्राचे सर्व मोठमोठे पुढारी सरकारने स्थानबद्ध केले, तेव्हा पुन्हा विनोबांना पकडण्यात आले. त्यांची रवानगी वेलूरच्या तुरुंगात झाली. तेथे दक्षिण हिंदुस्थानातील अनेक काँग्रेस कार्यकर्ते त्यांच्याबरोबर कैदेत होते. त्यांच्याकडून विनोबा तामीळ, तेलगू, कन्नड आणि मल्याळी या चार भाषा शिकले. ' तामीळ ' म्हणजे ' अमृत ' आणि ' तेलगू ' म्हणजे ' मधाप्रमाणे गोड भाषा ' हा शोध विनोबांना त्याच वेळी लागला. तुरुंगात असताना विनोबांनी कपाशीच्या झाडाची लागवड

केली आणि त्याचा कापूस काढून आपले कातण्याचे काम चालूच ठेवले. पंचेचाळीस साली विनोबा तुरुंगातून बाहेर आले. पण ह्या तीन वर्षांच्या काळात विचारसागराचे खोल मंथन करून त्यांनी अनेक सिद्धान्तरत्ने त्यातून बाहेर काढली होती. ती घेऊनच ते बाहेर आले. हे सिद्धान्त भारतीय जनतेला उघडपणे सांगण्याचा नि शिकवण्याचा अधिकार आता विनोबांना निश्चितपणे प्राप्त झाला होता. विनोबांची तपश्चर्या आता पूर्ण झाली होती.

सत्तेचाळीस साली देशाला स्वराज्य मिळाले. पण देशाची फाळणी झाली. देशात जातीयवादी अत्याचाराचा नि रक्तपाताचा प्रचंड डोंब उसळला. हिंदू-मुसलमानांचे ऐक्य साधण्यासाठी प्राणाचीही पर्वा न करता अठ्ठ्याहत्तर वर्षांचे गांधीजी नौखालीच्या हिंस्र नि खुनी वातावरणात एकटेच हिंडू लागले. पण देशातील जातीय द्वेषाचा अन् वैराचा वणवा वाढतच गेला. त्यामध्येच गांधीजींचा बळी पडला. गांधीजींच्या आकस्मिक मृत्यूची वार्ता ऐकून विनोबांचे मानसिक स्थैर्य यत्किंचितही ढळले नाही. एकनाथमहाराजांनी एका रडक्या गुरूची गोष्ट सांगितली आहे : एक गुरू होता. त्याला वाटले आपण मरणार. 'अरे, आता मी मरणार' असे मोठ्याने ओरडून रडू लागला. त्याला रडताना पाहून शिष्यही रडू लागले. त्याच्या रडण्यामुळे गुरूचा उपदेश आणि शिष्यांचे ज्ञान दोन्ही वाया गेली—ही गोष्ट विनोबांना त्या दिवशी आठवली. ते म्हणाले, "गांधी हे काही मृत्यूला भिणारे रडके गुरू नव्हते. आणि ते गेले म्हणून रडत बसणारा मीही त्यांचा काही रडका चेला नव्हे." तथापि 'सेवाग्राम' मध्ये गांधीजींच्या मृत्यूसंबंधी प्रथमच भाषण करायला जेव्हा विनोबा उभे राहिले, तेव्हा त्यांच्या डोळ्यांमधून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. तेव्हा कोणीतरी म्हणाले, "अरे, विनोबा रडताहेत." विनोबा म्हणाले, "होय, मी रडतो आहे. ईश्वराने मलाही हृदय दिले आहे. पण गांधीजींच्या मृत्यूसाठी मी रडत नाही. देशातील हिंसावृत्ती त्यांना सुद्धा नष्ट करता आली नाही, या विचाराने मला या क्षणी अपरंपार दुःख होत आहे. त्याचे हे अश्रू होत !" आपल्या भाषणात विनोबा म्हणाले, "राष्ट्रपित्याने आपल्याला अद्वितीय विचारांचा वारसा ठेवला आहे. पण आपण महान पुरुषार्थ केल्यावाचून मात्र तो आपल्याला साध्य होणार नाही, हे लक्षात ठेवा !" गांधीजींच्या दुसऱ्या मासिक श्राद्धाच्या दिवशी दिल्ली येथे भाषण करताना विनोबा म्हणाले, "चंद्रावर चंद्राचे वातावरण असते. मंगळावर मंगळाचे.

त्याप्रमाणे आपल्याभोवती आपले स्वतःचेच वातावरण असते. लोक म्हणतात, कलीयुग आले. कशाचे कलीयुग? तुमचे युग तुमच्यापाशी. हिंदुस्थानजवळ एकच शक्ती आहे आणि ती म्हणजे नैतिक शक्ती. गांधीजींनी दाखवलेल्याच मार्गाने जगात शांती आणि स्वतंत्रता प्रस्थापित होईल. मनूने हजार वर्षांपूर्वी सांगून ठेवले आहे की, जगाचे मार्गदर्शन करणारा विचारवंत पुरुष हिंदुस्थानातच जन्माला येईल. गांधीजींच्या शिकवणुकीप्रमाणे आपण वागलो तर सारे जग गुरु म्हणून भारताची पूजा करील!" गांधीजींच्या मृत्यूनंतर थोड्याच दिवसांनी सेवाग्राम येथे गांधीजींच्या सर्व अनुयायांचे संमेलन भरले. जवाहरलाल देखील आले होते. त्या वेळी विनोबांच्या प्रेरणेने 'सर्वोदय' समाजाची स्थापना झाली. सर्वोदय समाजाचे सभासद होण्याला फी नाही की नियम नाही. या समाजाला मुळी घटनाच नाही. सर्वोदयावर ज्याची श्रद्धा आहे त्याला या समाजाचा सभासद होता येते. विनोबा म्हणतात, "सर्वोदय समाज ही तुकारामाची बँक आहे. इथे सर्वांना संपूर्ण आचार-स्वातंत्र्य आहे. विचार करण्यासाठी वर्षातून एकदा एकत्र यायचे, आणि विचारविनिमय करून झाल्यावर स्वतःच्या कार्यक्षेत्रात जाऊन आपापल्या मतीप्रमाणे आणि शक्तीप्रमाणे कार्य करावयाचे. व्यक्तिस्वातंत्र्य आणि एकत्र विचारविनिमय, केंद्रित विचार आणि विकेंद्रित आचार, ह्यांचा सुंदर समन्वय म्हणजे सर्वोदय समाज! राजकीय पक्षाप्रमाणे एकाने दुसऱ्याला अमुक कर असे सांगण्याची किंवा त्याने तसे केले नाही तर शिस्तभंग होण्याची या समाजात मुळी भीतीच नाही." अधिकार न भोगता सेवा कशी करावी ह्यासंबंधी गांधीजींचाही अखेरच्या दिवसांत विचार चालू होता. काँग्रेसचे रूपांतर 'लोकसेवक समाजात' व्हावे ही आपली इच्छा मरणाच्या आदल्या दिवशीच गांधीजींनी लिहून ठेविली होती. गांधीजींची ही अंतिम इच्छा 'सर्वोदय समाज' स्थापन करून विनोबांनी काही अंशी सफल केली असे म्हटले पाहिजे.

पंचेचाळीस साली विनोबा तुरुंगातून बाहेर पडले, त्या वेळी 'साम्ययोगी स्वावलंबना'चा ठेवा ते आपल्याबरोबर घेऊन आले. अठ्ठेचाळीस सालच्या अखेरीस लिहिलेल्या एका लेखात ते म्हणतात, "आजकाल माझ्या मनात धनाचा तिरस्कार उत्पन्न झाला आहे. जीवनातून पैशाचे मूळ उखडून टाकण्यात माझ्या देहाचा बळी पडला तरी त्याची मला फिकीर नाही. गांधीजी गेल्यानंतर

देशात जीवननिष्ठेने काम करणाऱ्या सेवकांची एक कडवी आघाडी उभी करावी आणि तिच्या मार्फत नवसमाजाची रचना घडवून आणावी असा एक विचार माझ्या मनात उत्पन्न झाला आहे, आज सभोवती सर्वत्र अंधार आहे. म्हणूनच प्रकाशाची आपण उपासना करायला हवी. मला संस्था नको, व्यवस्था हवी आहे. मला असंबद्धता नको, व्यक्तिगत स्वतंत्रता पाहिजे आहे. " ह्यानंतर स्वावलंबी साम्ययोगाचा प्रयोग त्यांनी सुरू केला. अन्न, वस्त्र, शिक्षण आणि आरोग्य ह्या बाबतीत चतुर्विध स्वावलंबन, आठ तास शरीर-परिश्रम, सगळया कामाला सारखेच दाम, सर्वांना सारखे वेतन, सर्वांचे एकाच ठिकाणी भोजन हा कार्यक्रम ठरविण्यात आला. ह्याच सुमारास विनोबांना पोटात ' अल्सर ' झाला. डॉक्टर मंडळी आणि त्यांचे मित्र घाबरून गेले. म्हणून विनोबांनी अंगमेहनत कमी केली. पण सोडली नाही. विनोबांचा उपवासावर विश्वास नाही. पण त्या वेळी त्यांनी तीन दिवसांचा उपवास केला. तो सोडताना त्यांनी संकल्प सोडला, " आजपर्यंत मी भिक्षेवरच आपली उपजीविका केली. पुढेही करीन. पण श्रम केल्याबाचून कधीही भिक्षा घेणार नाही. " त्याच दिवशी त्यांनी ' वापी-यज्ञ ' सुरू केला. म्हणजे विहीर खोदण्याचे सामुदायिक काम सुरू करून ते दोन-तीन महिन्यात पूर्ण केले. त्या विहिरीच्या पाण्यावर एक एकराच्या शेतात सर्वांनी मिळून उत्तम शेती केली. विनोबांचे म्हणणे असे आहे की, " शेतीप्रधान देशात शेतीला अधिक महत्त्व आहे. चरख्याने कपडा मिळेल, अन्न मिळणार नाही. आंबा लावल्याने आंबाच मिळेल, केळी मिळणार नाहीत. त्याचप्रमाणे चरखा फिरवून अंग झाकेल. पोट भरणार नाही. पोट भरण्यासाठी शेतीच करणे जरूर आहे. " अशी गांधीजींच्या चरख्याच्या तत्त्वज्ञानाला विनोबांनी पुरवणी जोडली. साम्ययोगाची ही प्रेरणा विनोबांना गीतेवरून झाली. विनोबा म्हणतात, " गीतेला सर्वसमावेशक असे एकच नाव द्यावयाचे झाल्यास साम्ययोग हेच नाव देता येईल, गीतेच्या सहाव्या अध्यायातील २९ ते ३२ ह्या चार श्लोकांतच गीतेचे सार आले आहे.

भूतात भरला आत्मा भूते आत्म्यात राहिली,  
योगाने जोडिला देखे हेचि सर्वत्र दर्शन  
मज सर्वांत जो पाहे; पाहे माझ्यात सर्वही  
त्या मी आणि तो माझा एकमेकास अक्षय

स्थिर होऊनि एकत्वी सर्वभूती भजे मज
राहो कसाहि तो योगी माझ्यामध्येचि राहतो.
जो आत्मौपम्य बुद्धीने सर्वत्र सम पाहतो
जसे सुख तसे दुःख तो योगी थोर मानिला.
( गीताई )

श्रीकृष्णाचे हे शब्द ऐकून अर्जुनाने विचारले, " जनार्दना, तू जो आता साम्ययोग सांगितलास, तो माझ्या चंचल मनामुळे आजपर्यंत माझ्या लक्षात आला नाहीं. " या ठिकाणी विनोबांच्या ' साम्ययोगा ' ची कल्पना गीतेत प्रथम आलेली आहे. स्वतः शेतकरी बनल्याखेरीज शेतकऱ्यांचे जीवन कळणार नाही हा विनोबांचा ' साम्ययोगा ' चा प्रयोग होय.

हैद्राबाद संस्थानात शिवरामपल्ली येथे ' सर्वोदय संमेलन ' भरणार होते. सेवाग्रामपासून शिवरामपल्ली ३०१ मैल दूर आहे. तेथे पायांनी चालत जावयाचे विनोबांनी ठरविले. सेवाग्रामहून दुसऱ्या दिवशी विनोबा परंधाम येथे आले. त्या ठिकाणी जमीन खोदताना भरत आणि राम ह्यांच्या भेटीची एक सुंदर मूर्ती विनोबांना पूर्वी सापडली होती, तिची प्राणप्रतिष्ठा त्यांनी ' भरत-राम मंदिरा 'त केलेली होती. एकदा विनोबांना कोणी विचारले की, "काय हो, तुम्ही पण मूर्तिपूजक आहात ! " तेव्हा विनोबा म्हणाले, " मूर्तिपूजेबद्दल माझा आग्रह नाही. पण भगवान आपण होऊन माझ्या दारी चालत आले, तर त्यांचा अनादर करण्याइतका मी अभक्त नाही. " ह्या भरतरामांच्या मंदिरात येऊन विनोबांनी त्यांचा प्रार्थनापूर्वक निरोप घेतला. वस्तुतः शिवरामपल्लीचे संमेलन हे एक तिकडे जाण्याचे नुसते निमित्त होते. तेलंगणात जमीनदारांचे खून आणि कत्तल करून त्यांच्या जमिनी कम्युनिस्टांनी शेतकऱ्यांना वाटून टाकल्या होत्या. चीनप्रमाणे तेलंगणात शेतकरी क्रांती करण्याचा कम्युनिस्टांनी प्रयोग सुरू केला होता. तो प्रत्यक्ष जाऊन पाहण्याची विनोबांची इच्छा होती. जमीनदारांच्या जुलुमापासून गरीब शेतकऱ्यांची अहिंसेच्या मार्गाने कशी सुटका करावी याबद्दलचा कसलाही विचार विनोबांच्या डोक्यात त्या वेळेपर्यंत स्पष्ट झालेला नव्हता. तथापि असा अहिंसक उपाय सापडला पाहिजे ह्या गोष्टीवर मात्र त्यांची अढळ श्रद्धा होती. त्यांना भेटण्यासाठी खेडेगावांतल्या लोकांची रीघ लागू लागली. त्यांच्याशी प्रेमाने

बोलून त्याची परिस्थिती विनोबा समजावून घेऊ लागले. अशा रीतीने दरिद्री जनता-जनार्दनाचे दर्शन घेत घेत आणि त्यांच्या प्रेमाचा प्रसाद स्वीकारीत एकतीस दिवसांनी विनोबा शिवरामपल्लीला पोहोचले. देशाच्या दूरदूरच्या भागांतून शिवरामपल्लीला जमलेल्या सर्वोदयी कार्यकर्त्यांना विनोबांनी सांगितले की, "आता देशात समता कशी प्रस्थापित करावयाची हाच एक प्रश्न उरला आहे. त्यासाठी किसानांबरोबर आपण एकरूप झाले पाहिजे. प्रत्येक कार्यकर्त्याने एकेक गाव निवडून तेथेच कार्याला प्रारंभ केला पाहिजे. हे कार्य असे :

अंतः शुद्धिः बहिः शुद्धिः श्रमः शांतिः समर्पणम्

म्हणजे स्वतःची शुद्धी, बाह्य शुद्धि, श्रमपूर्ण जीवन आणि शांती प्रस्थापित करण्यासाठी आत्मसमर्पण करण्याची सिद्धता असा पंचविध कार्यक्रम प्रत्येकाने आमलात आणला पाहिजे." ह्या संमेलनात जमिनीच्या प्रश्नाकडे सर्वांचे लक्ष वेधले. पण जमिनीची समान वाटणी कशी करावी ह्याचा उपाय मात्र कोणालाही सुचेना. विनोबांच्या डोक्यात त्या वेळी भूदानाची कल्पना नव्हती. काश्मीरप्रमाणे कायद्याच्या जोरावर जमिनीची फेरवाटणी करण्यात यावी, असे त्या वेळी त्यांचे मत होते. पण तेलंगणात कम्युनिस्टांनी हिंसात्मक मार्गाने हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न चालविला होता. त्या ठिकाणी जर तो प्रयोग यशस्वी झाला, तर साहजिकच हिंदुस्थानात साम्यवादी क्रांतीची लाट उसळावयाला फारसा वेळ लागणार नाही ही गोष्ट विनोबांनी तावडतोब ओळखली. कम्युनिस्टांचा प्रतिकार सरकारनेही हिंसात्मक मार्गाने चालविला होता. त्यामुळे एका बाजूला सरकार व दुसऱ्या बाजूला कम्युनिस्ट ह्यांच्या गोळीबाराने तेलंगणाची प्रजा अगदी हैराण झाली होती. म्हणून तेलंगणातील सर्व परिस्थिती प्रत्यक्ष डोळ्यांनी बघून येण्याचे विनोबांनी ठरविले. १५ एप्रिल १९५१ रोजी 'रामनवमी' च्या पवित्र दिवशी रामाचे नाव घेऊन विनोबांनी हातात काठी-सुद्धा न घेता तेलंगणात प्रवेश केला.

श्रीरामाच्या काळी ह्याच तेलंगणाला 'दंडकारण्य' म्हणत. राक्षसांच्या पीडे-पासून तपस्वी लोकांचे रक्षण करण्यासाठी ह्याच दंडकारण्यात श्रीरामचंद्र गेले होते. जमीनदारांच्या जुलमांनी व कम्युनिस्टांच्या अत्याचारांनी संत्रस्त झालेल्या अनाथ आणि दरिद्री जनतेला सोडविण्यासाठी रामभक्त विनोबा ह्याच भूमीत

आता प्रवेश करीत होते. तीन दिवसांनी सकाळी सात साडेसात वाजता विनोबा पोचमपल्लीला पोहोचले. पोचमपल्लीची लोकसंख्या ३००० होती. त्यापैकी २००० लोकांना स्वतःची जमीन नव्हती. गावात एकंदर २५०० एकर जमीन होती. म्हणजे प्रत्येकाच्या वाट्याला अजमासे पाऊण एकर जमीन येत होती. हरिजन शेतमजुरी करीत. त्याबद्दल त्यांना वर्षातून शेतीच्या उत्पन्नाचा तिसावा भाग आणि एक घोंगडी मिळे. त्यावर ते कसे जगत ते परमेश्वरासच माहीत. कामही नाही आणि जमीनही नाही अशी त्यांची स्थिती होती. विनोबाजींनी त्यांना विचारले, " तुम्हांला किती जमीन पाहिजे ? " त्यांच्या पुढऱ्याने आपआपसात विचारविनिमय करून उत्तर दिले, " चाळीस एकर जिराईत आणि चाळीस एकर बागाईत. " विनोबांनी विचारले " एवढ्यात तुमचं भागेल ? " ते म्हणाले, " होय, दुसरेही काही काम करू. " विनोबांनी विचारले, " तुम्हांला जमीन दिल्यास तुम्ही ती सर्वजण मिळून कसाल की एकएकटे कसाल ? " ते म्हणाले, " सर्वजण मिळून ! " गावकरी त्या ठिकाणी जमले होते. त्यांना उद्देशून विनोबा म्हणाले, " सरकारकडून ह्या लोकांना जमीन मिळायला उशीर लागला, तर गावकरी यांना जमीन देऊ शकतील की नाही ? " तेथे रामचंद्र रेड्डी ह्या नावाचे गृहस्थ उभे होते. ते म्हणाले, " माझ्या स्वर्गस्थ पित्याची अशी इच्छा होती की, ह्या लोकांना काही जमीन द्यावी. तेव्हा मी व माझे पाच भाऊ ह्यांच्या वतीने शंभर एकर जमीन ह्या लोकांना मी भेट म्हणून देतो." विनोबा एकदम आनंदाने नाचू लागले. त्या दिवशी प्रार्थनेच्या भाषणात ते म्हणाले, " अशा प्रकारे जमीन मागितल्याचे आणि ती इतक्या सहजासहजी मिळाल्याचे उदाहरण आजपर्यंत कोठे घडलेले नाही. मंदिरांना किंवा मठांना अशा जमिनी मिळू शकतात. पण भूमिहीनांना जमीन मिळण्याचा हा प्रकार सर्वस्वी नवीन आहे. पांडवांनी पाच गावे मागितली. सुईच्या टोकावर राहील एवढी जमीनही देण्याचे दुर्योधनाने नाकारले. जमीन देण्याला कोणीही तयार होत नाही. अशा तऱ्हेने भूमिहीनांना आपली जमीन देणारे भूमिवान जर पुढे येतील, तर समाजवाद्यांना आपल्याला प्रभावी उत्तरे देता येतील ! "

अशा तऱ्हेने पोचमपल्ली येथे भूदान यज्ञाचा पाया घातला गेला. दुसऱ्याच दिवसापासून या यज्ञाला प्रारंभ झाला. दोन महिन्यांच्या आत जवळजवळ १२०० एकर जमीन विनोबांना मिळाली. सर्व देशाचे लक्ष विनोबांच्या या

नवीन कार्याकडे एकदम वळले. गांधीजींनंतर एका क्रांतिकारक कार्याला प्रारंभ झाल्याचा सर्वांना साक्षात्कार झाला. विनोबा परत सेवाग्रामला आले. आश्रमात त्यांचे हृदयस्पर्शी स्वागत झाले. सर्वांनी मिळून सूरदासाचे ' सुनेरी मैंने निर्बल के बल राम ' हे भजन म्हटले. सद्‌गदित कंठाने व अश्रुपूर्ण नेत्रांनी विनोबा म्हणाले, " जनतेच्या हृदयातला राम प्रकट होऊन त्याने बलिष्ठांकडून निर्बल भूमिहीनांना जमीन द्यायला लावली."

सरकारने तेलंगणात लष्कर धाडले. त्याला दरसाल पाच कोटी रुपये खर्च होत होते. पण असले प्रश्न लष्कराच्या बळावर सुटत नाहीत असे विनोबा म्हणतात. वाघाची शिकार बंदुकीने होईल, पण एखाद्या विचारसरणीला तोंड द्यायचे असेल, तर ते विचारसरणीनेच देता येईल. तेलंगणात कम्युनिस्टांना जे यश मिळाले, त्याचे कारण आजच्या काळातला मुख्य प्रश्न भूमीचा आहे. हा प्रश्न आज ना उद्या साऱ्या हिंदुस्थानात उत्पन्न झाल्यावाचून राहणार नाही. अहिंसक मार्गाने जर हा प्रश्न सुटू शकेल, तर ती एक महान् शांततापूर्ण क्रांती होईल. क्रांती टाळणे हा विनोबांचा उद्देश नाही. हिंसक क्रांती टाळून ते अहिंसक क्रांती करू इच्छितात. ते जे काही करताहेत, ती इतिहासाची गरज आहे. ती काळाची मागणी आहे. क्रांती म्हणजे हिंसक क्रांती असे आज जगात सर्वत्र समजले जाते. या देशात क्रांती अटळ आहे. पण ती चीन आणि रशिया यांच्यासारखीच हिंसक नको असेल तर विनोबांच्या मार्गानेच ती अहिंसक होऊ शकेल. तेलंगणात हिंसेचा आणि कायद्याचा असे दोन्ही मार्ग कुचकामी ठरले. जगातील सर्व समस्या सोडविण्याचा साम्यवाद आज दावा करतो आहे. आता यापुढे जगात जर दोन शक्तींमध्ये संघर्ष होणार असेल तर तो कम्युनिझम म्हणजे साम्यवाद आणि सर्वोदयविचार किंवा साम्ययोग ह्यांच्यामध्ये असे विनोबांचे म्हणणे आहे.

विनोबांच्या छप्पन्नाव्या वाढदिवशी पंडित जवाहरलालांचे त्यांना दिल्लीहून बोलावणे आले. पंचवार्षिक योजनेबाबत त्यांना विनोबांशी चर्चा करावयाची होती. विनोबांना उत्तर भारतात भूदानयज्ञाचा प्रचार करण्यास काहीतरी निमित्त पाहिजेच होते. ते वर्ध्याहून दिल्लीला पायी जाण्यास निघाले. ज्या ज्या गावी विनोबा जात, तेथे जनतेपुढे भूदानाचा कार्यक्रम ते ठेवीत. लोकांच्या मनांवर त्याचा एवढा परिणाम झाला की, अक्षरशः पावसाच्या पाण्याप्रमाणे जागजागी भूदानाचा वर्षाव झाला. सारे वातावरण बदलून गेले. कार्यकर्त्यांच्या

उत्साहाला अमर्याद भरती आली. भूदानाच्या प्रवाहाला विशाल स्वरूप येऊ लागले. एका ठिकाणी व्याख्यान देताना विनोबा म्हणाले, " या यज्ञात दानाला महत्त्व नाही. समविभागणीला महत्त्व आहे. शंकराचार्यांनी म्हटले आहे, ' दानं संविभागः ' दानाचा हा अर्थ आपल्याला रूढ केला पाहिजे. समाज हा आपल्या कुटुंबातला एक भागीदार आहे ही कल्पना लोकांना पटवली पाहिजे. " दुसऱ्या एका ठिकाणी ते म्हणाले, " आधुनिक वामनाचा अवतार आता या देशात झालेला आहे. वामनासारखीच माझी आकृती लहान आहे. पण विराट दरिद्रीनारायणासाठी मी देशातल्या बळीराजाकडून जमीन मागतो आहे. लागवड करण्यासाठी लायक अशी देशात तीस कोटी एकर जमीन आहे. मी तिचा सहावा हिस्सा म्हणजे पाच कोटी एकर जमीन मागतो आहे. सामान्यतः आपल्या कुटुंबात पाच माणसे असतात. दरिद्रीनारायण हा त्या कुटुंबाचा सहावा घटक आहे असे समजा आणि त्याचा सहावा वाटा त्याला देऊन टाका ! " अशा रीतीने भूदानाचा क्रांतिकारक संदेश आपल्या ऋषितुल्य वाणीने आणि आकृतीने मध्यप्रदेश, विंध्यप्रदेश, मध्यभारत, राजस्थान आणि उत्तर प्रदेश भागांतील जनतेला देत देत काही महिन्यांनी विनोबा दिल्लीला पोहोचले. बावन्न सालच्या एप्रिलमध्ये सेवापुरीमध्ये संमेलन झाले. तोपर्यंत एकंदर एक लक्ष एकर जमीन भूदानयज्ञाला विनोबांनी मिळवली होती. कोणीतरी विनोबांना उपहासाने म्हणाले, " अशा तऱ्हेने पाच कोटी एकर जमीन मिळवायला तुम्हांला पाचशे वर्षे लागतील ! " तेव्हा विनोबा हसून म्हणाले, " मी एकटा हे काम करीन तर मला पाचशे वर्षे लागतील. पण तुम्ही सारे लोक जर माझ्या मदतीला धावलात तर पाच वर्षांत हे काम पूर्ण होऊन देशात क्रांती होईल ! " सत्तावन्नाव्या वाढदिवसानंतर बिहारमधल्या भूदानयात्रेस विनोबांनी सुरुवात केली. चांडील या गावी विनोबा पोहोचले तोच तापाने अतिशय आजारी पडले. सारे चिंताक्रांत झाले. विनोबा औषध घेईनात. ते म्हणू लागले, " विनोबांच्या नाटकाचा पाचवा अंक आता सुरू झाला ! " पण ईश्वरीकृपेने त्या संकटातून ते वाचले. चांडील येथे ' सर्वोदय संमेलन ' भरले. त्या वेळपर्यंत सर्व देशातून भूदानयज्ञाला एकंदर सात लाख एकर जमीन मिळाली होती. त्यानंतर पुन्हा विनोबांनी बिहारमध्ये आपली पदयात्रा सुरू केली. एका महिन्याच्या आत त्यांना चार लाख एकरांपेक्षा अधिक जमीन मिळाली. रोज पहाटे उठून एका

गावाहून दुसऱ्या गावाला जायचे आणि तेथील जनतेला भूदानाची दीक्षा द्यावयाची. एका गावी एका दिवसापेक्षा जास्त राहावयाचे नाही. अशा रीतीने बिहारच्या गावागावात 'सबै भूमि गोपालकी' हा क्रांतिकारक संदेश देत गेले. दोन वर्षे विनोबा फिरताहेत. कालपरवापर्यंत झोपी गेलेल्या या बिहारची ग्रामीण जनता आता खडबडून जागी झाली आहे. आणि विनोबांच्या क्रांतिकार्याला तिने सर्वांत जास्त पाठिंबा दिला आहे. बुद्धाच्या या भूमीमध्ये बत्तीस लाख एकरांची मागणी विनोबांनी केली आहे. तेवढी मागणी पूर्ण झाली तरच बिहार-मधील भूमिहीनांचा प्रश्न सुटणार आहे; विनोबा म्हणाले, "बिहारचा हा प्रश्न मला सोडविता आला नाही तर माझी हाडे या भूमीवर पडतील." विनोबांच्या हाकेला बिहारने अपूर्व साद दिली आहे.

कोणी किती जमीन दिली हा प्रश्न नाही. भूदान हे एक साधन आहे. ह्या साधनाने विनोबांना लोकांच्या हृदयांत क्रांती घडवून आणावयाची आहे. सर्वांच्या अंतःकरणात त्यांना समानतेची भावना प्रस्थापित करावयाची आहे. चरख्याच्या साधनाने गांधीजींनी देशाला ज्याप्रमाणे राजकीय स्वातंत्र्य मिळवून देण्याचा प्रयत्न केला, त्याप्रमाणे भूदानाच्या नि संपत्तिदानाच्या साधनाने विनोबांना या स्वतंत्र भारतात साम्यवादी क्रांती घडवून आणावयाची आहे. सर्वस्वामित्वाची भावना विनोबांना विसर्जन करावयाची आहे. विनोबा म्हणतात, "लोकांना वाटते, आपण जमिनीचे मालक आहोत. वेडे कुठले! लोक मरून त्यांची माती होते आणि जमिनीत जाते. आपण जमिनीचे मालक नाही. जमीन आपली मालक!" सगळी संपत्ती ईश्वराची आहे. आपण फक्त तिचा उपभोग घ्यावयाचा आहे. तो सर्वांनी समभावनेने आणि प्रेमभावनेने घेतला, तरच या पृथ्वीवर ईश्वराचे राज्य प्रस्थापित होईल हा विनोबांचा मानवतेला संदेश आहे. मंत्रिपदावर आरामशीर मुक्काम करून जनतेला 'गांधीजींच्या मार्गाने जा!' असे सांगणारे आजचे कॉंग्रेसश्रेष्ठी गांधीजींचे मुळीच वारस नव्हत. गांधीजींच्या मार्गाने प्रत्यक्ष जात असलेले आणि गांधीजींच्याही पुढे चार पावले जाऊन पोहोचलेले विनोबा हेच गांधीजींचे खरे वारस होत. गीतामाउलीचा हा लाडका पुत्र, साम्ययोगाचा हा महान उद्गाता आणि भूदानयज्ञाचा हा द्रष्टा महर्षी विनोबा ह्या भारताला काही अपघाताने लाभला नाही. भारतीय ऋषिश्रेष्ठांच्या आणि साधुसंतांच्या तपश्चर्येला आणि पुण्याईला आलेले हे पवित्र फळ आहे. तेहतीस साली

विनोबांनी गांधीजींकडे आशीर्वाद मागितला होता. “ बापूजी, या जगात आपल्या आशीर्वादावाचून बाकी सर्व शून्य आहे. आपल्या आशीर्वादाने मी ओतप्रोत भरलो आहे हे मला माहीत आहे. तरीपण पुन्हा पुन्हा मी त्याची याचना करतो. आपल्या या क्षुद्र सेवकाला आपण संभाळून घ्या. आपल्या महायज्ञातील एक आहुती बनविण्याची पात्रता ईश्वराकडून ह्या सेवकाला आपण देववा. ” तेव्हा गांधीजींनी विनोबांना लिहिले, “ तुमची भक्ती आणि श्रद्धा बघून डोळ्यात आनंदाश्रू येतात. माझी योग्यता असो वा नसो, माझा तुम्हांला आशीर्वाद आहे ! माझी खात्री आहे की महान सेवेचे तुम्ही निमित्त व्हाल ! ” विनोबा दीर्घायू होवोत अन् गांधीजींच्या आशीर्वादानुसार, भारताच्याच नव्हे तर मानवतेच्या महान सेवेचे ते प्रभावी निमित्त होवोत !

ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात् पूर्णमुदच्यते
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते
ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अ. क्र. ........
विभाग
क्रमांक ........
नों. दि. ........

७५०७५ ... वि: निबंध
१०१४ ... नोंद दि. ...
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.
अ. क्र. ... विभाग ...
क्रमांक ... नों. दि. ...
१६५८५

## महाराष्ट्राचा तेजस्वी ज्ञानयोगी

## डॉ. भीमराव आंबेडकर

अस्पृश्य वर्गाचे महान पराक्रमी आणि क्रांतिकारक पुढारी डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांच्या अगाध बुद्धिमत्तेबद्दल, विशाल विद्वत्तेबद्दल आणि प्रचंड कर्तृत्वाबद्दल आमच्या मनात पहिल्यापासूनच नितांत आदर आहे. हा आदर आम्ही अनेक वेळा व्यक्त केलेला आहे. तथापि, राजकीय मतभेदामुळे गेली कित्येक वर्षे त्यांच्यावर आणि त्यांच्या पक्षावर आम्हांला टीका करावी लागली. अत्यंत कठोर शब्दामध्ये त्यांच्या धोरणावर आम्हांला प्रहार करावे लागले. महात्मा गांधींच्या आणि कॉंग्रेसच्या राजकारणावर आंबेडकरांनी आजपर्यंत जे निकराचे हल्ले चढविले तेही काही कमी क्रूर आणि प्राणघातक नव्हते. आंबेडकरांनी कॉंग्रेसचे जेवढे वाभाडे काढले, तेवढे कॉंग्रेसभक्तांनीही त्यांच्या पक्षाचे काढले. कोणी कोणाची गय केली नाही किंवा कोणी कोणावर दया दाखवलेली नाही. प्रांतिक कायदेमंडळांच्या निवडणुकीमध्ये दोघा पक्षांमधील हा विरोध फारच विकोपाला गेला. निवडणुकी जिंकण्यासाठी दोघांनाही आकाश–पाताळ एक करावे लागले. कारण अपयश म्हणजे आत्मघात हे दोनही पक्ष ओळखून होते. दोघांनाही आपल्या सामर्थ्याचा सारखाच गर्व होता. म्हणून ‘माझा ह्या निवडणुकीत पराभव झाला तर मी डोक्यावर गांधीटोपी चढवीन !’ असे आंबेडकरांनी

काँग्रेसला छातीठोक आव्हान दिले ! काँग्रेसने त्या आव्हानाचा स्वीकार केला. आणि आंबेडकरांच्या एकूणएक उमेदवारांचा पराभव करून 'आता कधी घालता डोक्यावर गांधीटोपी !' असा त्यांनाच उलटा सवाल केला.

मध्यवर्ती आणि प्रांतिक निवडणुकांत काँग्रेसला प्रचंड यश मिळाले. साऱ्या देशात काँग्रेसचा जयजयकार झाला. त्या जयजयकाराला 'पुणे करार रद्द करा !' अशा हजारो आरोळ्यांचा जबाब मिळाला. प्रांताप्रांतामधल्या काँग्रेस सरकारविरुद्ध आंबेडकरांनी सत्याग्रहाची मोहीम सुरू केली. या मोहिमेमुळे स्पृश्य आणि अस्पृश्य समाजातील तेढ जास्तच वाढली आणि पक्षविरोधाला जातीय कलहाचे हिंस्र स्वरूप मिळाले. धर्मांतराच्या चळवळीपासून सामान्य हिंदुसमाज आंबेडकरांवर आधीपासूनच उखडला होता. त्याने या रागाचा या जातीय दंगलीत चांगलाच वचपा काढून घेतला. त्यामुळे अस्पृश्य वर्गाचा संताप अधिकच अनावर झाला आणि मुस्लिम लीगला जाऊन मिळण्याची भाषा तो उघडपणे बोलू लागला. स्पृश्य आणि अस्पृश्य समाज एकमेकापासून कायमचे दुरावले जाणार एवढेच नव्हे तर जगाच्या अंतापर्यंत ते परस्परांचे कट्टर दुष्मन राहणार, अशी भयाण चिन्हे जेव्हा दिसू लागली, तेव्हा आमच्यासारख्या काही पुरोगामी काँग्रेस-भक्तांच्या काळजाचा ठावच सुटला. नऊ कोट मुसलमानांना खूष करण्यासाठी काँग्रेस आपल्या जिवाचा जेवढा आटापिटा करते, त्याच्या निम्म्याने सुद्धा सहा कोटी अस्पृश्यांचे समाधान करण्याचा ती प्रयत्न करीत नाही, हा उघड उघड अन्याय आहे असे उद्‌गार अनेक प्रामाणिक काँग्रेसजनांच्या तोंडून निघू लागले. अशा परिस्थितीत सतरा डिसेंबर रोजी घटनासमितीमध्ये डॉ. आंबेडकर यांनी अखंड हिंदुस्थानची आणि जातीय ऐक्याची प्रचंड गर्जना केली ! ती ऐकून काँग्रेसमधले त्यांचे सारे विरोधक अक्षरशः कोलमडून पडले आणि त्यांच्यावर दगड मारण्यासाठी उगारलेले हिंदू समाजातील लक्षावधी हात त्यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यासाठी एकदम वर आले. जगातील कोणतीही संस्था या देशातील ऐक्याच्या आड येऊ शकणार नाही, आणि अखंड हिंदुस्थानातच आपले कल्याण आहे असे आज ना उद्या मुसलमानांनाही कळून येईल, ही आंबेडकरांच्या मुखातून बाहेर पडलेली दोन अमर सत्ये होत. ती ऐकून आम्ही स्वतः आंबेडकरांवर एवढे खूष झालो की, यापुढे त्यांच्याविरुद्ध एक अक्षरही आपण आता लिहावयाचे नाही अशी गेल्या स्वातंत्र्यदिनाच्या पवित्र दिवशी आम्ही शपथ घेतली. देशाच्या

स्वातंत्र्यप्रयत्नात आंबेडकर आणि त्यांचे कोट्यवधी अनुयायी सामील व्हावेत म्हणून ते जे मागतील ते कॉंग्रेसने त्यांना देण्यास आता कबूल व्हावे असे त्या दिवसापासून आमचे मत झाले. वीस फेब्रुवारीला ब्रिटिश पंतप्रधान ह्यांनी 'छोडेंगे हिंद 'ची घोषणा केल्यानंतर तर हे मत अधिक दृढ झाले. कारण देशाच्या राजकीय स्वातंत्र्याचा प्रश्नच आता मिटला. आता जातीय ऐक्याचा प्रश्नच काय तो बाकी उरला आहे. अठ्ठेचाळीसच्या जूनच्या आत काय वाटेल ते करून हा प्रश्न आपल्याला मिटवलाच पाहिजे, म्हणून आंबेडकर आणि त्यांचा अस्पृश्य पक्ष अन् कॉंग्रेस आणि स्पृश्य हिंदुसमाज ह्यांची तडजोड कशी घडवून आणता येईल याचा आम्ही उत्कटतेने विचार करू लागलो. आंबेडकरांबद्दलचा पूर्वीचा विरोध आम्ही विसरलो आणि मनातले पूर्वग्रह आम्ही काढून टाकले. प्रेमाने आणि आपलेपणाने आम्ही त्यांच्याकडे पाहू लागलो. त्याबरोबर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि कर्तृत्वाचे जे आम्हांला ओजस्वी दर्शन झाले त्याने आमचे डोळे आणि अंतःकरण अक्षरशः दिपून गेले, आणि आमची मान आदराने एकदम खाली नमली !

गेल्या पन्नास वर्षांमध्ये तरी माणसाचे मूल्यमापन राष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीने करण्याची हिंदुस्थानच्या जनतेला सवय जडलेली आहे. त्यामुळे अराष्ट्रीय राजकारणाचा जो पुरस्कार करतो त्याला लोक पायांखाली तुडवितात. मनुष्य कितीही विद्वान असो, कर्तृत्ववान असो किंवा चारित्र्यसंपन्न असो, त्याची राजकीय मते जर राष्ट्रीय चळवळीच्या विरुद्ध असतील तर लोक त्याच्या विद्वत्तेकडे, कर्तृत्वाकडे किंवा चारित्र्याकडे ढुंकूनही पाहावयास तयार होत नाहीत; किंबहुना असा माणूस हा विद्वान, कर्तृत्ववान किंवा नीतिमान मुळी असूच शकत नाही असेच लोक धरून चालतात. हे लिहीत असताना नामदार गोखले यांचे उदाहरण डोळ्यांसमोर उभे राहते. लोकमान्य टिळकांच्या प्रभावी राजकारणावर आषक्त झालेली जनता, त्यांना त्या वेळी विरोध करणाऱ्या नामदार गोखल्यांना काय शिव्या देत होती हे लहानपणी आमच्या कानांनी आम्ही ऐकलेले आहे. त्या शिवीगाळीत कधी कधी आम्ही देखील सामील झालो होतो. टिळकप्रेमाने आंधळ्या झालेल्या महाराष्ट्राने त्या वेळी गोखल्यांचा जो अनन्वित छळ केला त्याची आठवण झाली की खरोखरच अंगावर शहारा येतो. गोखल्यांच्या विरुद्ध काहीही लिहावयाचे किंवा बोलावयाचे लोकांनी बाकी ठेवले नाही. पण अलीकडच्या कॉंग्रेसच्या जमान्यात

गोखल्यांपेक्षाही आंबेडकरांचा जास्त छळ झाला. कारण गोखले ब्राह्मण होते, स्पृश्य हिंदू होते; पण आंबेडकर पडले अस्पृश्य महार. शिवाय गोखल्यांपेक्षा त्यांची वृत्ती पडली जास्त लढाऊ आणि बंडखोर! त्यामुळे त्यांच्या छळाला काही सीमाच राहिली नाही. त्यांच्याबद्दल जेवढे म्हणून गैरसमज करून घेता येतील आणि त्यांच्या कार्याचा जेवढा म्हणून काही विपर्यास करून घेता येईल, तेवढा बहुसंख्य समाजाने आजपर्यंत करून घेतला. त्यामुळे आंबेडकरांच्या जीवनाबद्दल, त्यांच्या आचारांबद्दल, त्यांच्या विचारांबद्दल, त्यांच्या मतांबद्दल, त्यांच्या आकांक्षांबद्दल बहुसंख्य समाजाला काहीएक माहिती नाही. आंबेडकर हे हिंदू धर्माला, काँग्रेसला आणि गांधींना शिव्या देतात; वेद, पुराणे आणि मनुस्मृती जाळून टाका असे म्हणतात, आणि हिंदूधर्म सोडून आपण दुसऱ्या धर्मात जाणार असे मधूनमधून सांगतात, एवढेच काय ते त्यांच्याबद्दल सामान्य माणसांना ठाऊक आहे. म्हणून राजकीय पूर्वग्रहाचा काळा चष्मा डोळ्यांवरून काढून टाकल्यावाचून आंबेडकरांच्या जीवनाचे आणि व्यक्तिमत्त्वाचे देदीप्यमान स्वरूप जनतेला कळून यावयाचे नाही. आणि आंबेडकरांचे हे तेजस्वी दर्शन झाल्याखेरीज त्यांच्याबद्दल आदर आणि प्रेम स्पृश्य समाजाच्या अंतकरणात निर्माणही होणार नाही.

डॉ. आंबेडकरांएवढा प्रचंड बुद्धीचा, विद्वत्तेचा आणि कर्तृत्वाचा दुसरा एकही महाराष्ट्रीय माणूस आज आम्हांला तरी दिसत नाही! भांडारकर, टिळक, रानडे, तेलंग, केतकर आणि राजवाडे ह्यांची निर्भेळ ज्ञानोपासनेची परंपरा तितक्याच तपश्चर्येने आणि अधिकाराने पुढे चालवणारा महर्षी महाराष्ट्रात आज कोण आहे हे आम्ही विचारतो! वाचन, चिंतन आणि लेखन ह्यांखेरीज आंबेडकरांना दुसरे जीवनच राहिलेले नाही. ज्या ज्या विद्वानांना आपल्या व्यवसायाचा आणि व्यासंगाचा अभिमान वाटत असेल, त्यांनी ज्ञानाचे अग्निहोत्र आपल्या प्रचंड ग्रंथालयात अहर्निश पेटवून बसलेल्या ह्या ज्ञानयोग्याचे एकवार दर्शन घ्यावे म्हणजे त्यांचा तो वृथा अभिमान तेथल्या तेथे जिरून जाईल! महार जातीत जन्माला आलेला हा माणूस वृत्तीने, व्यासंगाने आणि अधिकाराने ब्राह्मणापेक्षाही अधिक श्रेष्ठ आणि पवित्र असा ब्राह्मण आहे! एवढेच नव्हे तर 'ब्रह्मर्षी' ह्या श्रेष्ठ पदवीपर्यंत जाऊन तो पोहोचला आहे. ज्या कोणा सनातनी ब्राह्मणाला आपल्या जन्मजात ब्राह्मण्याची घमेंड असेल त्याने ह्या कर्मजात 'ब्राह्मणा'च्या घरात जाऊन त्याचे शुचिर्भूत, सोज्वळ आणि ज्ञानमय जीवन पाहावे, म्हणजे

श्रीमुखात बसल्यासारखा चेहरा करून नाही तो बाहेर पडला तर तुम्ही सांगाल ते आम्ही मान्य करू! आतापर्यंत आंबेडकरांनी लिहिलेले ग्रंथ पाहिले आणि पुढे ते लिहिणार असलेले ग्रंथ विचारात घेतले, म्हणजे त्यांची विशाल विद्वत्ता बघून कोणीही थक्क झाल्यावाचून राहणार नाही! धर्मशास्त्रापासून घटना-शास्त्रापर्यंत असा कोणताही एक कठीण विषय नाही की, ज्यामध्ये त्यांची प्रतिभा लीलेने विहार करू शकत नाही. गहन विषयाचे संशोधन करण्याचा त्यांचा व्यास तर कोशकार केतकर आणि इतिहासाचार्य राजवाडे ह्यांच्या जातीचा आहे. आंबेडकरांच्या विद्वत्तेचे आणि व्यासंगाचे प्रतिबिंब त्यांच्या धार्मिक आणि राजकीय विचारसरणीमध्ये पूर्णपणे पडलेले आहे; त्यामुळे त्यांच्या उच्चाराला आणि विचाराला एक प्रकारचा भारदस्त वजनदारपणा प्राप्त झाला आहे. मूळच्या त्यांच्या बंडखोर स्वभावात सतत अभ्यासाने प्राप्त झालेल्या खंबीर आत्मविश्वासाची भर पडल्याने, त्यांच्या भाषणात आणि लेखनात एक प्रकारची बेदरकार निर्भयता निर्माण झालेली आहे. म्हणून आपण जे बोलतो आहोत किंवा सांगतो आहोत ते खोटे आहे असे दाखविण्याची प्रत्यक्ष परमेश्वराची देखील प्राज्ञा नाही असा आवेश आणि उद्दामपणा त्यांच्या भाषणात किंवा लेखनात धगधगत असल्याचा आपल्याला भास होतो. त्यातून, पहिल्या दर्जाचे ते कायदेपंडित असल्याने तर्कशुद्ध वादविवाद करण्याच्या कामी ते कोणालाही सहजासहजी हार जाणारे नाहीत. आपल्या बिनतोड कोटिक्रमाने ते आपल्या प्रतिस्पर्ध्यांची भंबेरी उडवून टाकतात. त्यांचे विरोधक त्यांच्याविरुद्ध मनातून खूप चरफडतात. पण त्यांच्या भेदक कोटिक्रमाला प्रत्युत्तर देण्याचे त्यांना धैर्य होत नसल्यामुळे, त्यांची उपेक्षा किंवा उपहास करणे एवढाच आत्मसंरक्षणाचा मार्ग त्यांना मोकळा राहतो. आंबेडकरांच्या बौद्धिक तपश्चर्येचे सामर्थ्य ज्यांना माहीत आहे ते त्यांना अतिशय वचकून तरी असतात नाहीतर ते त्यांच्या कधी वाटेलाही जात नाहीत!

भारतीय जीवनात जे जे म्हणून काही उज्ज्वल आणि उदात्त आहे, त्या-बद्दल डॉक्टरांच्या अंतःकरणात अभिमानाचे ज्वलंत भांडार भरलेले आहे. किंबहुना डॉक्टर म्हणजे स्वाभिमानाचा एक जळता ज्वालामुखीच होत. अखंड हिंदुस्थान-बद्दल त्यांना प्रचंड अभिमान आहे. कोणत्याही प्रश्नाकडे प्रांताच्या किंवा भाषेच्या कोत्या दृष्टीने पाहावयाला ते मुळी तयारच नाहीत. या देशामध्ये प्रत्येक प्रांताची किंवा जातीची निरनिराळी संस्कृती असू शकते आणि त्या भिन्न भिन्न संस्कृतीचे

विशेष जपणुकीने रक्षण केले पाहिजे असा कांगावा करणाऱ्यांना कच्चे खाऊन टाकावे असे त्यांना वाटते. " संस्कृती म्हणजे काय आहे ? " असे ते नेहमी रागाने ओरडून विचारतात. " डाव्या बाजूने पदर घ्यायचा की उजव्या बाजूने ? मिरची कमी खायची का जास्ती ? हीच ना तुमची संस्कृती ? " एक देश, एक भाषा आणि एक संस्कृती हा राष्ट्रीय उद्धाराचा महामंत्र ते एकसारखे जपत असतात. सबंध हिंदुस्थानची एक भाषा असावी याची डॉक्टरांना विलक्षण तळमळ लागून राहिली आहे. " प्रांतिक भाषांची मला मुळीच पर्वा नाही, त्याची मागाहून व्यवस्था करता येईल ! साऱ्या देशाला आधी एका भाषेत बोलायला शिकवा, म्हणजे बघा काय चमत्कार होतो आहे तो । " असे ते नेहमी म्हणत असतात. एकराष्ट्राचा हा कट्टर पुरस्कर्ता महाराष्ट्राच्या पराक्रमी परंपरेचा, भाषेचा आणि प्राचीन साहित्याचा तितकाच कडवा अभिमानी आहे. डॉक्टरांच्यासारखी सोपी, सुंदर आणि प्रभावी मराठी भाषा लिहिणारे आणि बोलणारे विद्वान महाराष्ट्रात कितीसे आहेत ? मराठी संतवाङ्मय तर अहर्निश त्यांच्या मनीमुखी घोळते आहे. संस्कृत भाषेवरील त्यांच्या प्रेमाला तर मर्यादाच नाही ! त्या भाषेत ज्ञानाचा आणि सौंदर्याचा महासागर हेलावतो आहे असे ते म्हणत असतात. आणि आपल्या अस्पृश्यतेमुळे आपल्याला संस्कृत भाषेऐवजी दरिद्री पर्शियन भाषा शिकावी लागली या विचाराने तर त्यांच्या सर्वांगाचा संताप होतो.

आंबेडकर हे हिंदुधर्मावर प्रखर टीका करतात, आणि ' मनुस्मृति जाळा ' असे म्हणतात. यावरून ते चार्वाकापेक्षाही भयंकर नास्तिक आणि गझनीच्या महमदापेक्षाही क्रूर हिंदुद्वेष्टे असले पाहिजेत अशी पुष्कळांनी आपली समजूत करून घेतलेली आहे. पण ही समजूत पार खोटी आहे. एका भाविक आणि श्रद्धाळू पित्याच्या पोटी त्यांचा जन्म झाला आहे. आणि शुचिर्भूत धार्मिक वातावरणात यांचे सारे लहानपण गेलेले आहे. हिंदू, बुद्ध, ख्रिस्त आणि इस्लाम या ह्या जगातील प्रमुख धर्मांचा अभ्यास करण्यात त्यांचा तर सारा जन्म गेलेला आहे. ह्यात त्यांच्या चिंतनशील स्वभावाची भर पडली असल्यामुळे, त्यांची वृत्तीच मुळी अध्यात्म बनलेली आहे. मनुष्याच्या शरीरापेक्षा त्याचा आत्मा अधिक महत्त्वाचा आहे आणि धर्मावाचून आत्म्याचा विकास होणे अशक्य आहे असे त्यांचे निश्चित मत आहे. मनुष्याच्या शरीराचा, बुद्धीचा आणि आत्म्याचा कोणत्या धर्मामध्ये जास्तीत जास्त विकास होईल ह्याची त्यांना चिंता लागून राहिलेली आहे. किंबहुना, ते त्यांच्या

जीवनामधले एक महान प्रश्नचिन्हच होऊन बसलेले आहे ! हिंदुधर्मातील चातुर्वर्ण्याच्या चौकटीने त्या धर्माचा आणि ह्या देशाचा नाश झाला ह्याबद्दल त्यांची खात्री झालेली आहे. चातुर्वर्ण्याच्या दडपशाहीमुळे हिंदुधर्मात मनुष्याची बौद्धिक आणि आध्यात्मिक उंची वाढू शकत नाही. म्हणूनच केवळ त्यांना धर्मांतराची आवश्यकता वाटते. त्यांना हिंदुधर्म पाहिजे आहे, पण चातुर्वर्ण्य नको आहे. हिंदुधर्मातील काही दोष काढून टाकले तर तो धर्म किती महान होईल ह्या त्यांच्या पुष्कळ ठिकाणच्या उद्गारांवरून त्यांच्या अंतःकरणाच्या तळाशी हिंदुधर्माविषयी गाढ प्रेम असावे असे निश्चित वाटते. त्यांची धर्मांतराची चळवळ ही हिंदुधर्माच्या विध्वंसाची नसून ती हिंदुधर्माच्या सुधारणेची चळवळ होती. चातुर्वर्ण्याची हुकूमशाही नष्ट करून हिंदुधर्माची रचना समतेच्या आणि लोकशाहीच्या पायावर करा, असे टाहो फोडून ते सांगत आहेत. ह्यावरून ते काय हिंदुसमाजाचे आणि हिंदुधर्माचे कट्टर दुष्मन ठरतात होय ? धर्मांतराविषयी बोलताना ते एकदा म्हणाले, "मी आणि माझे अनुयायी मुसलमान झालो असतो तर कोट्यवधी रुपये आमच्या समाजाच्या पायावर ओतले गेले असते हे तुम्ही निश्चयाने समजा ! माझ्या मनात तसा सूड आणि द्वेष असता तर पाच वर्षांच्या आत मी ह्या देशाचे वाटोळे करू शकलो असतो. पण ह्या देशाच्या इतिहासात विध्वंसक म्हणून स्वतःच्या नावाची नोंद करून घेण्याची मला मुळीच इच्छा नाही !"

स्पृश्य-समाज आंबेडकरांवर सर्वांत जास्त कशामुळे जळत असेल तर तो महात्मा गांधी आणि काँग्रेस यांवरील त्यांच्या प्रखर आणि दाहक टीकेमुळे ! त्यामुळे ते हिंदी राष्ट्राचे आणि स्वातंत्र्याचे दुष्मन आहेत, असा त्यांच्याविरुद्ध काँग्रेसनिष्ठ जनतेमध्ये वारंवार प्रचार केला जात असे. जनाब जिनांच्या पावलावर पाऊल टाकून ते आपल्या जमातीसाठी स्वतंत्र मतदारसंघ मागत आहेत, अस्पृश्य जनतेसाठी गावोगाव 'अस्पृश्यस्थाने' त्यांना हवी आहेत आणि देशातील प्रतिगामी गटांशी संगनमत करून ते हिंदी स्वातंत्र्याच्या प्रगतीचा मार्ग रोखून धरीत आहेत, असे विपर्यस्त स्वरूप सामान्य माणसाच्या दृष्टीने त्यांच्या राजकारणाला प्राप्त झाले. किंबहुना अस्पृश्य वर्गातील लोकांना भारी पगाराच्या आणि मोठमोठ्या नोकऱ्या मिळवून देण्यापलीकडे त्यांच्या राजकीय आकांक्षांना अधिक उदात्त आणि व्यापक स्वरूप नसले पाहिजे, अशीच पुष्कळांनी आपली

कल्पना करून घेतली. म्हणून आंबेडकरांच्या राजकारणाविषयी लोकांच्या झालेल्या ह्या सर्व समजुती चुकीच्या कशा आहेत हे आपण आधी समजावून घेतले पाहिजे. ब्रिटिश सत्ता हा हिंदी स्वातंत्र्याच्या मार्गातला एक मोठा अडथळा आहे ह्या एकाच कल्पनेवर गेली पंचवीस वर्षे कॉंग्रेसने आपले राजकारण चालविलेले आहे. त्यामुळे ब्रिटिश लोक ह्या देशातून गेले की स्वातंत्र्य मिळाले अशी कॉंग्रेसने आपली समजूत करून घेतली होती. ही समजूत किती चुकीची आहे याचा सध्या आपणाला जितका पडताळा येत आहे, तितका पूर्वी कधीच आलेला नाही. आंबेडकर हे लोकशाहीचे आणि समाजवादाचे कट्टर पुरस्कर्ते आहेत. जातिभेदाप्रमाणे पैशाचेही सारे भेद त्यांना तोडून टाकावयाचे आहेत! स्वतंत्र हिंदुस्थानात लोकशाही आणि समाजवाद प्रस्थापित करण्याच्या मार्गात हिंदू समाजातले उच्चनीच जातिभेद आणि अस्पृश्यता, हे एकाहून एक असे प्रचंड अडथळे आहेत, अशी त्यांची समजूत आहे. देशात चातुर्वर्ण्यप्रधान समाजरचना जोपर्यंत आहे, तोपर्यंत समाजवाद या देशात मूळ धरणे अशक्य आहे, असे त्यांना निश्चयाने वाटते. भांडवलशाहीची तर त्यांना अतिशयच चीड आहे, सत्ताधारी आणि धनिक वर्गाने श्रमजीवी अस्पृश्यांची धार्मिक छळाबरोबर किती राक्षसी आर्थिक पिळवणूक केली ह्याची कल्पना त्यांच्याखेरीज दुसऱ्या कोणाला असणार बरे ? राष्ट्रवादाच्या सोज्वळ नावाखाली शेतकरी आणि कामकरी वर्गाला गिळणाऱ्या भेसूर भांडवलशाहीचे प्रतिनिधी कॉंग्रेसच्या छावणीमध्ये उजळ माथ्याने वावरत असलेले आंबेडकरांच्या भेदक दृष्टीला दिसले नसतील, असे कसे म्हणावे ?

अशाही परिस्थितीत साम्राज्यशाहीविरोधाच्या पातळीवर आंबेडकर आणि कॉंग्रेस यांची एकजूट होऊ शकली असती. पण अस्पृश्यतानिवारणाबाबत कॉंग्रेसने जी एक भूमिका घेतली तिच्यामुळे कॉंग्रेसशी सहकार्य करणे आंबेडकरांना अगदी अशक्य होऊन बसले. अस्पृश्यतानिवारण हा महात्मा गांधींच्या जीवनातला एक महान निदिध्यास आहे. त्यांच्याच प्रयत्नामुळे हा प्रश्न कॉंग्रेसच्या कार्यक्रमामध्ये समाविष्ट झाला हे खरे. पण अस्पृश्यतानिवारणाकडे बघण्याचा गांधीजींचा दृष्टिकोण हा सर्वस्वी भूतदयावादी आणि भावनाप्रधान आहे. अस्पृश्यतानिवारणाकडे आंबेडकर हे शुद्ध न्यायाच्या नि समतेच्या दृष्टीने पाहतात. कायद्याच्या मदतीने स्पृश्य समाजाइतकी सामाजिक आणि आर्थिक प्रतिष्ठा अस्पृश्य वर्गाला प्राप्त करून देणे हा अस्पृश्यतानिवारणाचा एकच मार्ग आहे,

असे त्यांना वाटते. महाराला 'हरिजन' म्हणून त्याला 'सोवळा आणि पवित्र' बनविणे म्हणजे त्याच्या आत्मोद्धाराच्या बुंध्याशी कुऱ्हाड घालण्यासारखे आहे, असे म्हणतात. 'महाराला महार' आणि 'भंग्याला भंगी' म्हटले तरच तो अस्पृश्यतेविरुद्ध चवताळून उठतो आणि बंड करायला तयार होतो असे त्यांचे मत आहे. महात्मा गांधींनी आणि कॉंग्रेसने अस्पृश्यतानिवारणाचे काहीही कार्य केलेले नाही, ही आंबेडकरांची भूमिका आम्हांला मान्य नसली तरी, ब्रिटिश साम्राज्यशाही देशातून उखडून टाकण्यासाठी महात्माजींनी जसे निकराचे युद्ध केले, तसे समाजातील अस्पृश्यतेचे निर्दाळण करण्यासाठी स्पृश्य समाजाविरुद्ध त्यांनी बंड का पुकारले नाही, हा आंबेडकरांचा आक्षेप मात्र आम्हांला रास्त वाटतो. स्पृश्य समाजाच्या भावना न दुखविण्याच्या बाबतीत महात्माजी जो एवढा हळवेपणा दाखवितात, तो आम्हांला पटत नाही!

अस्पृश्यता हे स्पृश्य जनतेच्या हातून शतकानुशतके घडलेले एक पाप आहे; ते त्यांनीच पश्चात्तापपूर्वक धुऊन काढले पाहिजे, ही महात्माजींची भूमिका आहे. तर स्पृश्य समाजाला झालेल्या पश्चात्तापाबद्दल आणि अस्पृश्यतानिवारण करण्याच्या त्यांच्या पात्रतेबद्दल आंबेडकर हे पूर्णपणे उदासीन आहेत. अस्पृश्यांचा उद्धार अस्पृश्यच करू शकतील आणि अस्पृश्यांनीच तो केला पाहिजे, हे त्यांचे सांगणे आहे. कॉंग्रेसने आरंभापासून ही अस्पृश्यतानिवारणाची जोरदार भूमिका घेतली असती आणि आंबेडकरांशी सहकार्य करून तो कार्यक्रम सर्वस्वी त्यांच्याकडेच सोपवून दिला असता, तर आज सहा कोटी अस्पृश्य जनता कॉंग्रेसच्या बरोबर असल्याचे दृश्य जगाला दिसले असते! 'हिंदुस्थानातील अस्पृश्य वर्गाचा मीच केवळ एक नेता आहे' हा गर्व महात्माजींनी बाळगून आंबेडकरांच्या स्वाभिमानाला डंख केला नसता, तर सर्व अस्पृश्यांचा आपल्या नेतृत्वाखाली एक कॉंग्रेसविरोधी गट बनविण्याची इच्छा त्यांना कधीही झाली नसती. 'शेड्यूल्ड कास्ट्स् फेडरेशन' हे महात्मा गांधींच्या अहंकाराला आंबेडकरांनी दिलेले प्रखर उत्तर आहे. ह्या पक्षातील लोकांची आंबेडकरांबद्दलची जाज्वल्य निष्ठा बघून डोळ्यांत पाणी येते. आंबेडकर हे त्यांचे एकमेव दैवत होऊन बसलेले आहेत. आंबेडकर सांगतील त्याकरिता प्राण देण्याची आणि सर्वस्वाचा होम करण्याची ह्या लोकांची तयारी आहे. इतकी लढाऊ संघटना देशातील कोणत्याही राजकीय पक्षाची नसेल! महात्मा गांधींच्याबद्दल मनात विरोधाची एवढी भावना

असतानाही केवळ त्यांच्या इच्छेला मान देऊन आणि त्यांचे प्राण वाचविण्यासाठी आंबेडकरांनी 'पुणे करारा' वर सही केली, आणि अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी त्यांनी मागे घेतली. 'पुणे करारा' ने अस्पृश्य-वर्गांचा फायदा झाला नाही, असे नाही. स्पृश्य हिंदूंच्या न्याय्य हक्काचा चांगलाच लचका तोडून महात्माजींनी तो अस्पृश्यांच्या पदरात टाकला. तथापि, ज्या भावनेने आणि खेळाडू वृत्तीने आंबेडकरांनी 'पुणे करारा' वर सही केली, ते सहकार्य आणि तो खेळाडूपणा काँग्रेसने मात्र पुढे आंबेडकरांशी दाखविला नाही, हे अगदी सत्य! 'स्पृश्य हिंदूंच्या बहुमताच्या आधारावर माझे आणि माझ्या पक्षाचे राजकीय जीवन नेस्तनाबूत करण्याचा गांधीजींनी आणि काँग्रेसने प्रयत्न केलेला आहे' ह्या आंबेडकरांच्या आरोपाला उत्तर देण्याला निदान आमच्याजवळ तरी मुळीच तोंड नाही.

गांधीजी आणि आंबेडकर ह्यांच्या मनोभूमिकेत आणि स्वभावात एवढा मूलभूत विरोध असूनही दोघांच्यामध्ये काही काही बाबतीत विलक्षण साम्य आहे. असे जर आम्ही म्हणालो तर ऐकणाराला आश्चर्य वाटल्यावाचून राहणार नाही. सत्याबद्दल दोघांनाही विलक्षण प्रेम आहे. सत्याच्या आग्रहासाठी साऱ्या जगाशी झुंज खेळण्याची दोघांची तयारी आहे. दोघांच्याही जीवनावर बुद्धधर्माचे विलक्षण संस्कार झालेले आहेत. आंबेडकर हे गांधीजींइतके अतिरिक्त अहिंसावादी नसले तरी हिंसेचा आंबेडकरांना मनापासून तिटकारा आहे. त्यांचा पिंड सनदशीर घटनावाद्याचा आहे. आणि म्हणूनच हिंसेपासून किंवा यादवीपासून काहीही निष्पन्न होणार नाही, असे ते आग्रहाने सांगतात. आत्म्याच्या उन्नतीसाठी धर्माची आवश्यकता आहे, हे दोघांनाही मान्य आहे. अध्यात्ममार्गावरून जाण्याची दोघांचीही मनःप्रवृत्ती सारखीच आहे. अस्पृश्यतेबद्दल दोघांच्या मनांत अतोनात चीड आहे. आंबेडकर हे जातीने 'महार' असले, तर महात्माजींनी 'भंगी' जातीचा स्वीकार केलेला आहे. त्यावरून अस्पृश्यतानिवारण्याचे कार्य केवळ अस्पृश्य जातीमधले लोकच करू शकतील हे आंबेडकरांचे म्हणणे महात्माजींनाही मान्य असल्याचे दिसते. हिंदूमुसलमान ऐक्याची दोघांनाही तळमळ आहे; पण मुसलमानांना खूष करण्यासाठी त्यांना 'पाकिस्तान' देऊन टाकावे असे गांधीजी म्हणतात, तर मुसलमानांना आपला मूर्खपणा कळून यावा म्हणून त्यांना पाकिस्तान द्यावे असे आंबेडकर म्हणतात. अखंड हिंदुस्थानाबद्दल

आणि हिंदुस्थानी राष्ट्रभाषेबद्दल दोघांनाही सारखीच आस्था आहे. दोघांचेही नैतिक चारित्र्य सारखेच शुद्ध आणि उज्ज्वल आहे. ब्रह्मचर्याचे पालन दोघेही आज तितक्याच निष्ठेने करीत आहेत. दोघेही सारखेच हट्टी आणि बंडखोर आहेत. 'शरणागती' हा शब्दच मुळी दोघांच्या शब्दकोशात नाही. 'मोडू, मार खाऊ. मरू; पण वाकणार नाही' अशी दोघांचीही जबरदस्त जिद्द आहे! ह्या दोन विभूतींमध्ये इतके साम्य असूनही दोघांच्या स्वभावात एक महत्त्वाचा फरक आहे. महात्माजींबद्दल आमच्या मनात नितांत आदर असूनही आम्ही असे म्हणतो की, दुसऱ्याच्या विचारस्वातंत्र्याला अवसर देण्याची उदारता महात्माजीं-मध्ये नाही. महात्माजींचे म्हणणे ज्यांना मान्य नाही त्यांना त्यांच्याजवळ स्थान नाही. त्यांनी त्यांचे म्हणणे मुकाट्याने एक मान्य तरी करावे, नाहीतर त्यांना सोडून दूर तरी निघून जावे. याखेरीज त्यांच्याशी वागण्याचा दुसरा मार्गच नाही, महात्माजींच्या चुका दुसऱ्यांनी दाखविल्या तर ते मान्य करीत नाहीत. आपल्या चुका जाहीरपणे कबूल करण्याचा हक्क जणू काही त्यांनी स्वतःकडे राखून ठेवलेला आहे. बहुतेक गांधीवादी लोक जे निर्जीव, नेभळे आणि गांधीजींच्या विडंबनासारखे हास्यास्पद भासतात ह्याचे कारण गांधीजींच्या स्वभावातला हा प्रेमळ निष्ठुरपणा होय! गांधीजींचा हा स्वभावदोष थोड्याफार प्रमाणात कॉंग्रेससंघटनेमध्येही उतरलेला दिसत आहे. त्यामुळे कॉंग्रेसमध्ये ढोंग आणि बुवाबाजी यांचा फार सुळसुळाट झालेला आहे. महात्माजींना खूष करण्यासाठी 'टिळा-टोपी' चे वरकरणी सोंग केले आणि कॉंग्रेसमध्ये सांगतील तेव्हा मान डोलावली किंवा हात वर केले म्हणजे कॉंग्रेसमध्ये त्याला प्रतिष्ठा प्राप्त होते, अशी आजची स्थिती आहे. आंबेडकरांसारखा स्वतंत्र प्रज्ञेचा आणि पराक्रमाचा महापुरुष गांधीजींच्या आणि कॉंग्रेसच्या अशा पोलादी चौकटीत आणि शिस्तीत समाविष्ट होणे ही अशक्यच गोष्ट होती. निरर्थक परंपरेचे, शिस्तीचे आणि नियमांचे अवडंबर आंबेडकरांनी कधीही मान्य केले नव्हते! आंबेडकर हे सर्वांत कशाचे अधिक कट्टर शत्रू असतील तर ते ढोंगाचे! त्यांना जे वाटते ते बोलायला ते कधीही कोणाला भिणार नाहीत! अंगाला शेंदूर फासून जे दगड आज समाजात देव बनून राहिलेले आहेत, त्यांच्या तोंडावर 'तुम्ही देव नसून दगड आहात!' असे सांगावयाला आंबेडकर कधीही मागेपुढे पाहणार नाहीत. ज्या मोठ्या मूर्ती आज समाज डोक्यावर घेऊन नाचतो आहे, त्या मूर्तींचे खरे स्वरूप जगाला दाखविण्यासाठी

त्या मूर्तींच्या डोक्यावर हातोडयाचे घाव घालवयाला ह्या ‘ भीम ’ कधीही कमी करणार नाही ! अशा मूर्ती फोडण्याचा त्यांनी प्रयत्न केला म्हणूनच समाजाच्या द्वेषाला आणि निंदेला आजपर्यंत त्यांना बळी पडावे लागले. खरोखर एवढा निर्भय मूर्तिभंजक भारतवर्षात आज तरी दुसरा कोणी नाही.

उद्याच्या स्वतंत्र हिंदुस्थानात आंबेडकरांसारख्या अद्वितीय नेत्याला आपले कर्तव्य करून दाखविण्याला फार मोठा वाव मिळणार आहे. राजकीय स्वातंत्र्याचा प्रश्न आता सुटलेला आहे. तथापि देशाला मिळालेले हे स्वातंत्र्य मघल्यामध्ये भांडवलशाही गिळंकृत करण्याचा फार संभव आहे; म्हणून समतेच्या आणि लोकशाहीच्या तत्त्वावर देशातील आम जनतेची एक बलशाली आघाडी उभारण्याच्या काम देशामध्ये लौकरच सुरू करावयाला हवे. अशी आघाडी बनविण्याच्या कामी आंबेडकरांचे नेतृत्व अतिशय प्रभावी ठरल्याशिवाय राहणार नाही. ‘ संयुक्त हिंदुस्थान ’ ची भावी राज्यघटना कशी असावी याबद्दलची एक सुंदर योजना त्यांनी नुकतीच प्रसिद्ध केलेली आहे. त्यामध्ये देशातील सर्व मूलभूत आणि प्रधान उद्योगधंदे आणि शेती ही राष्ट्रीय सरकारच्या मालकीची असावी असे त्यांनी म्हटलेले आहे. सामुदायिक शेतीचा त्यांनी पुरस्कार केलेला आहे. कोणीही कोणत्या जमिनीचा मालक नाही, कोणीही कोणाचे कूळ नाही, आणि ज्याला जमीन नाही असा कोणीही मजूर नाही, अशा तऱ्हेने शुद्ध समाजवादी पायावर शेतकीची पुनर्घटना त्यांनी सुचविलेली आहे. कम्युनिस्टांचा हुकूमशाही समाजवाद आंबेडकरांना मुळीच मान्य नाही. रशियाचा सध्याचा समाजवाद म्हणजे ‘ शुद्ध ढोंग ’ ( Fraud ) आहे असे ते म्हणतात. लोकशाहीशी ज्या समाजवादाचा समन्वय बसू शकेल, तोच समाजवाद त्यांना मान्य आहे. ह्या दृष्टीने हिंदुस्थानातील ‘ समाजवादी पक्षा ’ शी आंबेडकरांच्या पक्षाचे यापुढे अधिक सूत जमू शकेल. देशाचा राज्यकारभार चालविण्याचे काम हे दिवसेंदिवस अधिक अवघड होत जाणार आहे. त्या कामासाठी देशाला अद्वितीय बुद्धीच्या प्रतिभाशाली तज्ज्ञांची आता जास्त जरुरी पडणार आहे. पंडित जवाहरलाल, राजेन्द्रबाबू किंवा मौलाना आझाद ह्या थोडयाशा अधिकारी व्यक्ती वजा केल्या तर काँग्रेसमध्ये अशा तज्ज्ञांची फार वाण आहे. सामान्य बुद्धीच्या नुसत्या निष्ठावंत काँग्रेसजनांच्या साहाय्याने राज्यकारभार चालविण्याचा प्रयत्न केला तर तो किती निष्फळ आणि हास्यास्पद होतो, याचे प्रत्यंतर निर

निराळ्या प्रांतांच्या कारभारांवरून आता आलेले आहे. अमेरिका आणि रशिया यांच्याशी स्पर्धा करण्याइतके सामर्थ्य या देशाच्या अंगी यावे असे आपल्याला जर वाटत असेल, तर आपण ह्या देशाच्या भवितव्याची सूत्रे जवाहरलाल नेहरू-सारख्या आणि आंबेडकरांसारख्या अद्वितीय बुद्धिमत्तेच्या मुत्सद्द्यांच्या हातांतच सोपविली पाहिजेत! आंबेडकरांची विद्वत्ता आणि कर्तृत्व राष्ट्राच्या कामी लावून घेणे किंवा न घेणे हे सर्वस्वी आपल्या हातांत आहे. "उद्या देशाच्या घटनेत तुम्ही म्हणता तसे अस्पृश्य वर्गाला योग्य ते संरक्षण मिळाले म्हणजे मग पुढे तुम्ही काय करणार?" असे मी त्यांना विचारले. तेव्हा ते म्हणाले, "मग मी राहतो आहे कशाला या जंजाळात? आध्यात्मिक चिंतनाचे आणि लेखनाचे केवढे तरी क्षेत्र मला मोकळे आहे!" त्या वेळी मला लोकमान्य टिळकांची आठवण झाली. टिळक म्हणत, "मला गणिताचा प्रोफेसर होण्याची खरी आवड, पण सुशिक्षित लोक आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी काहीएक करीत नाहीत, म्हणून मला माझा धंदा सोडून ह्या राजकारणाच्या उचापती कराव्या लागत आहेत!" अशाच तऱ्हेने राजकारणाचे क्षेत्र सोडून कदाचित हा विरक्त ब्रह्मर्षी ज्ञानाच्या कोठल्या तरी अत्युच्च शिखरावर जाऊन त्या ठिकाणी आमरण तपश्चर्या करीत बसण्याचाही फार संभव आहे, हे मी याच ठिकाणी बजावून सांगतो!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा
अ. क्र. ........ विभाग ........
क्रमांक ........ नों. दि. ........

## महाराष्ट्राचे 'बालविकासी' फूल

# साने गुरुजी

काही फुले सूर्याच्या प्रकाशाने फुलतात. काही चंद्राच्या किरणांनी उमलतात; सूर्यविकासी फुले रात्री झोपी जातात, तर चंद्रविकासी फुले दिवसा घट्ट डोळे मिटून बसतात. साने गुरुजी हे असलेच एक तऱ्हेवाईक फूल होते. मी त्यांना बालविकासी फूल म्हणतो. लहान मुले भोवताली जमली की हे फूल आपोआप उमलू लागे, हसू लागे, डोलू लागे नि बोलू लागे. पण मोठी माणसे दिसली की हे फूल गपकन आपले डोळे मिटून घेई किंवा ओशाळ्या नजरेने खाली पाहू लागे, अन् ओठांच्या पाकळ्या घट्ट मिटून घेई. गुरुजी फक्त मुलांपुढे फुलत आणि मुलांशी बोलत. केवळ मुलांच्या भावनेनेच ते विचार करीत आणि त्यांच्याच भाषेत बोलत. त्यांचे सारे लेखनच मुळी मुलांशी बोलणे होते. मुलांना जोजवताना आई जशी गाणी गाते, तसे गुरुजींचे सारे लिहिणे होते. प्रीतीने आणि ममतेने ओथंबलेले. सोपे सोपे. गोडगोड अन लाडके लाडके. गुरुजींचे वाङ्मय म्हणजे एक अखंड अंगाईगीतच आहे म्हणानात. म्हणूनच गुरुजींची सारी मैत्री मुलांशी. आणि त्यांच्या ओळखी आपल्या मुलांमध्ये. त्यांनी आपल्या आठवणी अन् पत्रे मुलांमध्येच विखरून ठेवलेली आहेत; मुलांनीच गुरुजींच्या आठवणी सांगाव्यात अन् लिहाव्यात. आपल्या आईशिवाय मन मोकळे करून

उभ्या आयुष्यात मोठ्यांशी ते क्वचितच बोलले असतील. मोठयांच्या संगतीत त्यांचे मन आणि शरीर लाजाळूच्या लहानग्या पानांप्रमाणे एकदम संकोचच पावत असे. मग मोठयांना ते कसे दिसणार अन् कसे समजू शकणार ! उलट मोठयांना त्यांचे लाजणे, हसणे अन् वागणे भारी चमत्कारिक वाटे. कामानिमित्त मोठयांशी त्यांचा संबंध येई. त्यांच्यामधून त्यांना उठावे—बसावे लागे. त्यांपैकी अनेकांशी तर त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. पण गुरुजींची आणि आपली मैत्री होती असे त्यांपैकी फारच थोडयांना म्हणता येईल. गुरुजींची मैत्री आपली मुलांशीच. म्हणून अनेक वर्षे गुरुजींशी परिचय असूनही त्यांच्यासंबंधी सांगण्यासारख्या अशा आठवणी प्रौढांजवळ फारच थोडया निघू शकतील.

त्रेचाळीस सालापर्यंत गुरुजींचा अन माझा संबंध मुळी आलाच नाही. काही कारणच नव्हते. दोघांचेही मार्ग निरनिराळे. एवढेच काय पण तोपर्यंत मी त्यांना पाहिलेही नव्हते किंवा त्यांचे व्याख्यानसुद्धा ऐकले नव्हते. कॉंग्रेसच्या प्रचारकार्यातही त्यांची माझी कधी गाठ पडली नव्हती. एकदा दोनदा कुठेतरी ते व्याख्यानाला येऊ शकले नाहीत, म्हणून त्यांची गैरहजेरी मला भरून काढावी लागली. एवढाच काय तो त्यांचा न् माझा अप्रत्यक्ष संबंध आला. पुढे त्यांचा न् माझा समक्ष भेटीचा जो प्रसंग आला तो जितका अनपेक्षित तितकाच अतिशय मौजेचा होता. ऑगस्ट आंदोलनाच्या काळात काही भूमिगत नेते अधूनमधून माझ्या घरी मुक्कामाला येत असत. एकदा अच्युत पटवर्धन असेच मजकडे असताना त्यांना भेटण्यासाठी म्हणून साने गुरुजी माझ्या घरी आले. दुपारचा दीडदोनचा सुमार असेल. अच्युतराव बाहेर गेले होते. एका वाटाड्याने गुरुजींना आणून माझ्या घरी पोहोचविले व तो निघून गेला. कोणाच्या घरात आपण तुम्हांला नेत आहोत हे वाटाड्याने गुरुजींना सांगून ठेवले असेल, अशी माझी कल्पना होती. पण गुरुजींना त्याबद्दल त्याने यत्किंचितही सुगावा लागू दिलेला नसावा, हे माझ्या लक्षात यायला काही फार वेळ लागला नाही. मी कोण आहे हे गुरुजींना माहीत असावे अशा अपेक्षेने अन् विश्वासाने मी गुरुजींशी एखाद्या परिचितासारखा बोलू लागलो. पण गुरुजींच्या तोंडावर त्याचा उलट परिणाम होत आहे असे मला आढळून आले. मला ओळखल्याची एकही खूण त्यांच्या चेहऱ्यावर तर मला दिसेनाच. पण मी जसजसा अधिक मोकळेपणाने त्यांच्याशी बोलू लागलो, तसतसा त्यांचा निर्विकार चेहेरा मला जास्तजास्तच

बुजल्यासारखा अन् गोंधळल्यासारखा दिसू लागला. आरंभी आरंभी ते एखादा शब्द तरी बोलत; पण थोड्या वेळातच ते निःशब्द हुंकारावरून नुसत्या मानेच्या होकारापर्यंत येऊन ठेपले. आता काय करावे? मोठा चमत्कारिक प्रसंग होता तो. त्यांच्या अबोलपणामुळे मीच मनातल्या मनात जास्त वरमलो नि शरमलो. अच्युतराव येईपर्यंत गुरुजींना विरंगुळा वाटावा म्हणून काहीतरी वाङ्मयविषयक संभाषणात त्यांना गुंतवून ठेवण्याचा जो मी आगंतुक प्रयत्न केला, तो सपशेल माझ्या अंगावर उलटला आणि अगदी वेडयासारखी माझी स्थिती झाली. कुठून आपण ह्या भानगडीत पडलो असा क्षणभर जरा पश्चात्ताप झाला. " बरं आहे. मी जातो. अच्युतराव येतील इतक्यात, " मध्येच संभाषण तोडून मी एकदम उठलो. त्याबरोबर माझ्या स्वरातील तुटकपणाची भावना गुरुजींनी ओळखली. ससासारखे आपले भित्रे आणि ओलसर डोळे किंचित वर करून धैर्याने त्यांनी मला विचारले, " क्षमा करा. मी आपल्याला ओळखले नाही. " मी हसून जेव्हा त्यांना माझे नाव सांगितले, तेव्हा गुरुजींच्या चेहऱ्यावर ज्या भावना एकदम प्रकट झाल्या त्यांचे वर्णन शब्दांनी करणे अशक्य आहे. आपल्या दोन्ही हातांनी त्यांनी माझे हात दाबून घट्ट धरले. आणि मान खाली वाकवून अन् सारे अंग घुसळून असे गमतीदार ते हसले की काही विचारू नका. शब्द न बोलता गुरुजींनी आपले सारे अंतःकरण एकदम मजपुढे उघडे केले. त्यात सगळा खुलासा अन् सगळी भरपाई आली. संकोचाची अन् अनोळखीपणाची टरफले आपोआपच गळून खाली पडली. गुरुजींच्या भाबडेपणाचे आणि जिव्हाळ्याचे ते विलक्षण तेज बघून मी दिपलो, थिजलो, कोसळलो, अन् जिंकलो गेलो. त्याच क्षणी उभयतांच्या मनात परस्परांबद्दल एक नाजुक दुवा निर्माण झाला. गुरुजींचा आणि माझा तसा पुढे फारच थोडा संबंध आला. आम्ही वरचेवर थोडा वेळ भेटलो असू किंवा फारच थोडे बोलले असू. पण त्यांना माझी फारच आठवण होई. मीही त्यांच्या संबंधीची माहिती मिळेल त्याच्याकडून विचारून घेई. अगदी अखेरपर्यंत त्यांचे आणि माझे असे अगत्याचे नि जिव्हाळ्याचे संबंध होते.

गुरुजी सदैव कामात असत अन् फिरतीवर असत. म्हणून पत्र लिहून किंवा भेटून त्यांचा विनाकारण वेळ घेणे मला आवडत नसे. पण तेच मला कधीमधी एखादे पत्र लिहीत असत. ' नवयुग ' साठी त्यांनी काहीतरी

लिहावे असे मला मनातून वाटे. पण मी त्यांना तसे विचारण्याचे कधी धाडस केले नाही. पण त्यांच्याच ते लक्षात आले. कसे कोणास ठाऊक, एकदा त्यांनी आपण होऊनच मला लिहिले, " ठिकठिकाणी मी हिंडतो व व्याख्याने देतो. त्यांचा सारांश तुमच्या ' नवयुग ' साठी लिहून पाठवण्याचे माझ्या मनात आलेले आहे, म्हणजे माझ्याही व्याख्यानांची नोंद राहील अन् तुमच्यासाठी काही लिहावे असे वाटते ती माझी इच्छाही पूर्ण होईल. " ते वाचून मला साहजिकच आनंद झाला. तसे मी तावडतोब गुरुजींना कळविले. पण पुढे कामाच्या गडबडीत गुरुजींना ते आपले वचन कधीच पुरे करता आले नाही. गुरुजी ' नवयुग ' वाचीत असतील की नाही ह्याची मला शंका होती. कसे विचारावे त्यांना ? एखादे वेळी त्यांना माझे लिहिणे आवडतही नसेल. कुणी सांगावे ? पण एकदा एका पत्रात त्यांनी ' नवयुग ' ला अनाहूतपणे उत्कृष्ट शिफारसपत्र देऊन टाकले, त्यांनी लिहिले, " मी जेथे जातो तेथे लोक तुमचा ' नवयुग ' आवडीने वाचीत असलेले मला दिसून येतात. ' नवयुग ' ने महाराष्ट्राला काँग्रेसभक्ती शिकविली ! " काका गाडगिळांसारखी माणसे त्या काळात माझ्या काँग्रेससेवेबद्दल पुष्कळदा हेटाळणीने बोलत, " ह्याने काँग्रेसचे काय काम केले ? हा काय तुरुंगात थोडाच गेला ? " हे उद्‌गार ऐकून माझे मन पुष्कळदा खिन्न होई. पण सानेगुरुजींनी ' नवयुग ' ची मुक्तकंठाने प्रशंसा केल्यापासून मात्र मला मनापासून समाधान झाले. एवढेच नव्हे तर अगदी कृतकृत्य झाल्यासारखे वाटले. गुरुजींना माझ्याबद्दल किती आपलेपणा वाटे ह्याचा एकाच उदाहरणावरून मला प्रत्यय आला. एकदा कुठे तरी ते व्याख्यानाला गेले होते. त्यांच्या खादीच्या सदऱ्याच्या खिशात एक हजार रुपयांची नोट होती. व्याख्यानाच्या गर्दीत कुणीतरी त्यांचा खिसा कापला व त्यांची हजार रुपयांची नोट चोरली. त्यांना ते पैसे कोणाला तरी द्यावयाचे होते. दुसऱ्या दिवशी त्यांनी मला पत्र लिहिले की, "असा असा प्रकार झाला. मला हजार रुपयांची गरज आहे. तरी तुम्ही मला ते दिल्यास तुमच्यासाठी लेख लिहून वा अन्य तऱ्हेने मी ते परत फेडीन " मी उलटटपाली त्यांना एक हजार रुपये पाठवून दिले. पुढे वर्षभर त्यांना माझ्यासाठी काहीच लिहिता आले नाही. तेव्हा त्यांनी माझे एक हजार रुपये एके दिवशी गुपचुप परत करून टाकले. त्याच सुमारास ' मुंबई सरकारने ' माझ्याकडून सहा हजारांचा जामीन मागितला होता. म्हणून गुरुजींकडून परत

आलेले हजार रुपये मला अगदी वेळेवर उपयोगी पडले. पुढे काही दिवसांनी आपल्या ' चिंतनिके 'चे हस्तलिखित त्यांनी माझ्या ' समीक्षक ' साठी आपण होऊन पाठवून दिले. तिचा पूर्वार्ध ' समीक्षका 'त हप्त्याहप्त्याने प्रसिद्ध झालेला आहे.

पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरामध्ये हरिजनांना प्रवेश मिळावा म्हणून गुरुजींनी जेव्हा प्राणांतिक उपोषण करावयाचे ठरविले, तेव्हा ' नवयुग 'चा एक विशेषांक काढावयाचे मी ठरविले. तेवढ्यासाठी गुरुजीचे मला चार दोन फोटो पाहिजे होते. जुन्या फोटोंपेक्षा नवीनच फोटो घेतलेले बरे असा मी मनात विचार केला. सुदैवाने गुरुजी त्या वेळी मुंबईतच होते. पण फोटो घ्यायची गोष्ट गुरुजीं जवळ काढावयाची कुणी ? आणि फोटोग्राफरकडे त्यांना घेऊन जायचे कसे ? गुरुजी त्या वेळी अशा व्याकुळ आणि प्रक्षुब्ध मनःस्थितीत होते की त्यांची मुद्रा बघून फोटोसंबंधी त्यांना विचारण्याचे कोणाला धाडसच होणे शक्य नव्हते. एकदम संतापून ते उसळले तर ? म्हणजे सगळेच बिघडायचे. गुरुजींच्या प्रेमा-प्रमाणे त्यांचा रागही भयंकर होता. तथापि काय वाटेल ते झाले तरी गुरुजींचा नवा फोटो हा घ्यायचाच, अशी मी माझ्या मनाशी प्रतिज्ञा केली. पण गुरुजींना कुठे गाठायचे ? ते एका ठिकाणी थोडेच सापडायचे ? तेव्हा नेवाळकरांना घेऊन मी गुरुजींना शोधण्याच्या मोहिमेवर निघालो. कारण, माझ्यापेक्षा नेवाळकरांचा गुरुजींशी जास्त परिचय होता. ज्या ठिकाणी गुरुजींना भेटायला जावे त्या ठिकाणी आताच तुम्ही यायच्या आधी गुरुजी इथून गेले असे उत्तर आम्हांला मिळे. शेवटी दादरला एका घरात गुरुजी आम्हांला सापडले. तेव्हा विशेष गांभीर्य चेहऱ्यावर किंवा आवाजात न दाखवता एखादी क्षुल्लक गोष्ट विचारावी तितक्या निष्काळजीपणाने मी त्यांना म्हणालो, " गुरुजी, ' नवयुग 'च्या त्या अंकासाठी तुमचा फोटो पाहिजे होता. तुम्ही माझ्याबरोबर फोटोग्राफरकडे याल तर पाचदहा मिनिटांत मोकळा करतो." गुरुजी क्षणभर थांबले अन् चटकन ' हो ' म्हणून गेले. मग काय, पडत्या फळाची आज्ञा. मी त्यांना माझ्या मोटारीत घालून जवळजवळ पळवूनच नेले. फोटोग्राफरना मी खुणेने सांगितले की, काम अगदी झटपट व्हायला पाहिजे. पण फोटोग्राफरच्या काही ते लक्षात आले नाही. त्याच्याही स्वतःच्या काही खोडी होत्या. त्याने गुरुजींच्या गालांना आणि हनुवटीला हात लावून त्यांचे डोके पुन्हा पुन्हा आपल्याला पाहिजे होते तसे खालीवर करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे

गुरुजी असे काही लाजत होते आणि संकोचत होते की आम्हांला हसू आवरेना. वरे, हे गृहस्थ कोण आहेत अन् त्यांच्याशी तुम्ही कसे वागले पाहिजे हे त्या फोटोग्राफरलाही आम्हांला उघडपणे सांगता येईना. अशी आमची अगदी पंचाईत उडाली. मला सारखे भय वाटत होते की फोटोग्राफर ' रेडी ' म्हणायच्यां वेळी गुरुजींनी रामदासाप्रमाणे एखाद्या वेळी त्या स्टूडिओमधून धूम ठोकली तर काय करायचे ? पण तसा काही प्रसंग आला नाही. त्या फोटोग्राफरने जेवढे जेवढे म्हणून हाल केले, तेवढे त्यांनी हसतमुखाने सहन केले, आणि आमचे फोटोचे काम अगदी व्यवस्थितपणे पार पडले. गुरुजींना परत पोहोचवून आल्या-नंतर एखाद्या अग्निदिव्यातून आपण बाहेर पडलो अशा सुटकेचा मी मोठा निःश्वास टाकला. त्या फोटोवरून गुरुजींचे जे तीनरंगी चित्र आम्ही बनविले अन् ' नवयुग 'च्या खास अंकावर छापले ते पुष्कळांना पसंत पडले. महाराष्ट्रात अनेक घरांत चौकट करून ते भिंतीवर लावलेले आढळून येईल.

पंढरपूरला उपोषण आरंभण्यापूर्वी गुरुजींनी ' नवयुग 'च्या वाचकांसाठी एक खास संदेश पाठवून दिला तो त्यांच्या हस्ताक्षरात मी ' नवयुग ' मध्ये त्या वेळी छापलेला आहे. गुरुजींच्या उपोषणाच्या आठव्या दिवशी मी पंढरपूरला गेलो. पलंगावर झोपलेली गुरुजींची क्षीण शांत मूर्ती दृष्टीस पडताच माझ्या डोळ्यांत एकदम अश्रू उभे राहिले. मला पाहताच गुरुजींच्या डोळ्यांतून आसवांच्या धारा वाहू लागल्या. किती वेळ तरी माझा हात आपल्या हातात धरून ते निपचित पडले होते. ओठातून शब्द बाहेर पडण्याच्या स्थितीत दोघेही नव्हतो. अन् बोलणार तरी काय ? न बोलण्यातच सगळे बोलणे आले. त्या रात्री पंढरपुरात माझे जाहीर व्याख्यान होते. हरिजनसेवक काकासाहेब बर्व्यांनी मला बजावले, " बेताने बोला. बडव्यांना भडकावू नका. " मी त्यांना म्हणालो, " मी गुरुजींचे प्राण वाच-वायला इथे आलो आहे. " त्या रात्रीचे माझे भाषण अतिशय प्रभावी झाले. लोक ढळढळा रडले. जणू काही गुरुजींचाच संचार माझ्या अंगात झाला होता. दुसरे दिवशी मी पुण्याला परतलो. गुरुजींचा निरोप घेण्याचे धैर्यच मला झाले नाही. त्या रात्री पुण्याला रास्ता पेठेत गुरुजींच्या उपोषणावर माझे जाहीर व्याख्यान होते. श्रोत्यांच्या अंतःकरणाला पीळ पडेल अन् पाझर फुटेल असाच माझ्या व्याख्यानाचा पूर्वार्ध होता. इतक्यात एक माणूस हातात एक तार घेऊन धावत आला, ' पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात हरिजनांना प्रवेश मिळाला. गुरुजींचे उपोषण

सुटले.' तारेतला मजकूर मी श्रोत्यांना सांगताच टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला अन् श्रोते हर्षाने नाचू लागले. त्यानंतर मग सभेचा साराच रंग बदलला. पूर्वीची रागदारी एकदम बदलून, नवीन स्वरात अन् नवीन रागात माझ्या व्याख्यानाला मी सुरुवात केली. व्याख्यानाच्या पूर्वार्धात एक रस अन् उत्तरार्धात अजिबात निराळा रस असे अद्भुत आणि नाट्यपूर्ण भाषण मी माझ्या आयुष्यात कधी केले नसेल. म्हणून त्या रात्रीचे ते माझे भाषण मी तरी कधी विसरणार नाही. वक्तृत्वाची ती एक विलक्षण कसोटीच होती म्हणानात!

माझे कविमित्र सोपानदेव चौधरी यांची गुरुजींशी फार दोस्ती होती. त्यामुळे माझ्या हकीकती गुरुजींना जशा सोपानदेवांकडून कळत, तशा गुरुजींच्या गमतीदार गोष्टीही मला सोपानदेवच सांगत. सोपानदेवांचे अवलोकन आणि विनोदबुद्धी मोठी सूक्ष्म आहे. त्यामुळे ते एकेक गोष्टी सांगू लागले म्हणजे गुरुजी अगदी पोट धरधरून हसत. आभाळातून गारा पडताना पाहून सोपानदेवांच्या धाकट्या मुलाने मोठा काव्यमय प्रश्न केला की, "काय हो, ह्या पावसाच्या बिया काय?" सोपानदेवांनी ही गोष्ट जेव्हा गुरुजींना सांगितली, तेव्हा त्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले आणि त्यांच्या अंगावर रोमांच तरारले. त्यांनी आपल्या एका भाषणात या गोष्टीचा मुद्दाम उल्लेखही पण केला आहे. गुरुजी तुमच्याशी जसे खुलेपणाने बोलतात, तसे माझ्याशी बोलत नाहीत, अशी सोपानदेवांकडे मी एकदा तक्रार केली. ती सोपानदेवांनी गुरुजींच्या कानावर घातली, तेव्हा गुरुजी त्यांना म्हणाले, "मी काय बोलू त्यांच्याशी? मला त्यांच्याशी बोलण्याचे भय वाटते. उलट ते काय म्हणतात तेच मला ऐकावेसे वाटते." सोपानदेवांनी जेव्हा हा निरोप सांगितला तेव्हा मला भारी ओशाळल्यासारखे झाले. 'स्वातंत्र्यदिना'च्या आधी दोन दिवस माझा वाढदिवस येतो. माझ्या पन्नासाव्या वाढदिवशी खंडाळ्याच्या माझ्या जागेत मी हापूस आंब्याच्या शंभर कुंड्या लावल्या. सोपानदेवही माझ्या मदतीला होते. पाऊस मुसळधार पडत होता. तरी अशा चिखलात कपडे ओलेचिंब भिजले असताना आम्ही कलमे लावीत होतो. पुढे सोपानदेवांनी ही गोष्ट गुरुजींना सांगितली. तेव्हा त्याना अतिशय हर्ष झाला. वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा करण्याची कल्पना त्यांना अतिशय काव्यमय वाटली. ते म्हणाले, "सृष्टीशी अशा रीतीने आपण तादात्म्य पावलो तरच आपला विकास होईल." खंडाळ्यासाठी मला चिकूची रोपे पाहिजे होती, तेव्हा 'तुम्हांला चांगली चांगली

चिकूची रोपे मी बोर्डीहून पाठवून देईन हो ' असा त्यांनी मला निरोप पाठविला. तेव्हा मी त्यांना एकदा म्हणालो की, " गुरुजी, ही रोपे तुमच्या पन्नासाव्या वाढदिवशी तुम्ही स्वतः आपल्या हातांनी माझ्या जागेत येऊन लावावीत अशी माझी इच्छा आहे. " गुरुजींच्या डोळ्यांत टचकन पाणी आले. ते हलकेच पुटपुटले, " जशी प्रभूची मर्जी. " पण दुर्दैवाने तो योग कधी आलाच नाही. कारण प्रभूची मर्जी निराळी होती. पण कधी भेटले की ते नेहमी हसून म्हणायचे, " तुमच्या खंडाळ्याला यायचे माझ्या लक्षात आहे. मी विसरलो नाही ! "

शेवटच्या वर्षादीडवर्षांत मात्र गुरुजी आणि मी पुष्कळच एकमेकांच्या जवळ आलो. एका व्यासपीठावरून कित्येकदा तरी त्यांची आणि माझी व्याख्याने झाली. गुरुजींना विनोद आवडत असेल की नाही याबद्दल मी सांशक होतो. पण माझ्या कित्येक कोटयांना ते ओठ मिटून अन् अंग घुसळून घुसळून हसत असत. विद्यार्थ्यांना राजकारणात भाग घेण्यास बंदी करणाऱ्या सरकारी पत्रकाच्या निषेधाच्या सभेत मी सहज बोलून गेलो की, " रामाच्या राज्यामध्ये राजकारणात भाग घेण्याची माकडांना देखील परवानगी होती. मग रामराज्य स्थापू इच्छिणाऱ्या कॉंग्रेसच्या राज्यात राजकारणात भाग घ्यावयाला विद्यार्थ्यांना का बंदी असावी बरे ? " तो कोटिक्रम ऐकून गुरुजी इतके मनापासून हसले की काही विचारू नका. गुरुजींच्या वक्तृत्वाचे चमत्कार मलाही मनसोक्त पाहावयाला मिळाले. त्यांच्या भाषणाची तऱ्हाच काही निराळी होती. भाषणाला उठेपर्यंत हा माणूस एक शब्द तरी बोलू शकेल काय, असा श्रोत्यांना संशय वाटे. एकसारखे ते स्वतःशीच कण्हत असत. त्यांच्या सगळ्या अंगात जणू काय कणकण भरलेली आहे असे वाटे. ध्वनिक्षेपकापुढे उभे राहताना त्यांना अतिशय कष्ट पडत आहेत असे दिसे. पण एकदा उठून त्यांनी आपल्या भाषणास सुरुवात केली की त्यांची चर्या अन् आवाज हळूहळू बदलत जाऊन अंगात जणू काही संचार व्हावा तसे त्यांचे व्यक्तिमत्त्व पार बदलून जाई. व्याख्यानाची त्यांची सुरुवात फारच हलक्या आवाजात होई. तोंडातल्या तोंडात त्यांचे शब्द निघत. प्रारंभीचे त्यांचे मराठीचे उच्चारही चमत्कारिक भासत. एखादा मिशनरी जसा मराठी बोलेल तसे ते बोलताहेत असा भास होई. हे पुष्कळदा मी अगदी लक्षपूर्वक ऐकून स्मरणात साठवून ठेवले आहे. ते शब्दांच्या आद्याक्षरांवर आघात देत कुणी मला सांगितले की, शब्दोच्चार करण्याची ही खानदेशी तऱ्हा आहे. पण तसे उच्चार मी खानदेशातल्या

कोणत्याच माणसाच्या तोंडून ऐकले नाहीत. पण गुरुजींच्या भाषणाची एकदा गती वाढली अन् त्यांच्या वक्तृत्वात वेग निर्माण झाला म्हणजे मग त्यांचा पहिला आवाज अन् उच्चाराची आरंभीची तऱ्हा पार बदलून जाई. विजेच्या चमकाऱ्याप्रमाणे एकामागून एक तेजस्वी वाक्ये अन् विचार धडाक्याने त्यांच्या मुखामधून बाहेर पडत. अन् त्यांच्या तेजाने श्रोते अगदी दिपून जात. त्यांनी सारे ब्रह्मांड वाचले होते. अन् त्यांची स्मरणशक्ती अतिशय तल्लख होती. वाङ्मयातली उत्तम उत्तम रसस्थळे त्यांना माहीत असत अन् साधुसंतांच्या अन् थोरामोठयांच्या जीवनातले सर्व हृदयस्पर्शी प्रसंग त्यांना मुखोद्‌गत असत. ह्या सर्व निवडक अन् काव्यमय संदर्भांचा उल्लेख जेव्हा त्यांच्या तोंडून होऊ लागे तेव्हा निरनिराळ्या भावनांचा श्रोत्यांच्या अंतःकरणात अगदी कल्लोळ उडून राही. विषयांचा नि विचारांचा तुटवडा कसा तो त्यांना माहीतच नव्हता. ते तासन् तास बोलत अन् ते कितीही वेळ बोलत राहिले तरी श्रोत्यांना त्याचे भानच राहत नसे. त्यांचे व्याख्यान कधी कधी संपत आल्यासारखे वाटे, इतक्यात नवीन एखादा मुद्दा त्यांना आठवे अन् मग पुन्हा पहिल्या वेगाने त्यांच्या व्याख्यानाचे चक्र उसळी मारून फिरू लागे. व्याख्यान संपण्यापूर्वी असे चारपाच वेळा तरी होई. अलीकडे अलीकडे देशातील परिस्थिती बघून ते इतके कावून अन चिडून गेले होते की त्यांच्या संतापाच्या ज्वाला त्यांच्या व्याख्यानातून वारंवार भडकून उठत. त्यांच्या सर्वांगाचा दाह झाल्यासारखा वाटे. पायापासून डोक्यापर्यंत त्यांचे शरीर थरथर कापत असे. अन् त्यामुळे कित्येकदा तर सारे व्यासपीठ गदगदा हलू लागे. शेवटी शेवटी मी ऐकलेली त्यांची बहुतेक सर्व व्याख्याने अनावर संतापाच्या उद्रेकाने अशा तऱ्हेने धगधगलेलीच असावयाची. भाषा, भावना, विचार आणि वक्तृत्व यांचा एवढा कोमल अन् प्रखर संगम पुन्हा महाराष्ट्रात पाहावयाला सापडावयाचा नाही.

कासेगावाला गुरुजींच्या अध्यक्षतेखाली समाजवादी तरुणांची परिषद भरली होती. या परिषदेचे उद्‌घाटन माझ्या हस्ते झाले. मुंबईहून परिषदेला जाण्यासाठी आम्ही बरोबर निघालो. सोबत मुंबईचे पाचपंचवीस तरुण कार्यकर्ते होते. तिसऱ्या वर्गाचा एक अर्धा डबाच आम्ही व्यापला होता. गुरुजी दाटीवाटीने एका कोपऱ्यात उकिडवे बसले होते. तिसऱ्या वर्गातून मी सहसा प्रवास करीत नसे; पण गुरुजींच्या संगतीचा मोह मला आवरणे शक्य नव्हते. म्हणून मीही त्या

गर्दीत त्यांच्या शेजारी जाऊन बसलो. मुलांच्या घोळक्यामध्ये ' गुरुजी ' अगदी प्रसन्न चेहरा करून बसले होते. मुलेही त्यांना जेवढे छळून घ्यावयाचे तेवढे घेत होती. मला तर पुढे पुढे गुरुजींचे हाल बघवेनातच. गुळाच्या ढेपेवर मुंगळे जसे तुटून पडतात तशी मुले त्यांच्यावर तुटून पडत होती. अन् त्यांचे अक्षरशः लचके तोडीत होती. कुणी त्यांना म्हणे, " गुरुजी, आम्हांला ही गोष्ट सांगा, " तर कुणी म्हणे, " आम्हांला ती गोष्ट सांगा. " गुरुजी आपले प्रत्येकाला हो हो म्हणत होते. गाडी पुण्याला येईपर्यंत गुरुजी जागेवरून हलले नाहीत. आणि पोरांनीही त्यांच्या जिभेला खळ पडू दिला नाही. पुण्याहून कऱ्हाडला जाणाऱ्या गाडीत पुन्हा तिसऱ्या वर्गाने गुरुजींबरोबर प्रवास करण्याची माझी हिंमतच झाली नाही. नारायणराव गोरे आणि एस. एम् ह्यांनी पुण्याच्या स्टेशन-वर मला स्पष्टपणे बजावून सांगितले की, " तुम्ही गुरुजींच्या नादाला लागू नका. तुम्ही त्यांच्याबरोबर टिकायचे नाहीत. तुम्ही आपले मुकाट्याने सेकंड क्लासमध्ये जाऊन निजा कसे. " त्याप्रमाणे मी सरळ सेकंड क्लासमध्ये जाऊन माझी वळकटी सोडली आणि झोपी गेलो. इकडे गुरुजींना सबंध रात्रभर मुलांनी काही झोपू दिले नाही. पहाटे चारच्या सुमारास आम्ही कऱ्हाडला पोचलो. तोपर्यंत गुरुजींचे गोष्टीपुराण आपले चाललेलेच होते.

ओगले कारखान्यात मुखमार्जन अन् न्याहारी करून आम्ही दहा वाजता कासे-गावाला पोहोचलो. तेथे आमच्या मिरवणुकीची सर्व तयारी झालीच होती. गुरुजी ओशाळून म्हणाले, " कशाला तुम्ही आमची ही धिंड काढता आहात ? " एका बैलगाडीवर टाकलेल्या आडव्या फळीवर मी, गुरुजी व नारायणराव गोरे बसलो होतो व पुढे पाचपन्नास का शंभर बैल लागले होते. सबंध मिरवणुकीत गुरुजी अत्यंत अस्वस्थ होते. तथापि, हात जोडून दुतर्फा उभ्या असलेल्या लोकांना अतिशय आदबीने ते नमस्कार करीत होते. जेवावयाच्या वेळी आम्ही शेजारी शेजारी बसलो होतो; त्या वेळी गुरुजींचा आहार अगदी भरपूर असल्याचे मला आढळून आले. माझा आहार अतिशय कमी आहे हे पाहून त्यांना आश्चर्य वाटले. गुरुजी बोलले नाहीत तरी आपण त्यांच्याशी एकसारखे बोलत राहायचे किंवा मधून मधून त्यांना प्रश्न विचारायचे असा मी त्या वेळी खाक्या ठेवला. त्याचा परिणाम असा झाला की, हळूहळू गुरुजींचा मजबद्दलचा संकोच नाहीसा झाला व ते माझ्याशी मनमोकळेपणाने बोलू लागले. ह्या दौऱ्यात माझे हात

हातात घेऊन गुरुजी किती वेळ तरी मनापासून हसले असतील.

दुपारी तास दीडतास एके ठिकाणी आम्ही एकाच वळकटीवर डोके ठेवून कलंडलो होतो. त्या खोलीत आमच्याखेरीज दुसरे कोणीही नव्हते. गुरुजी पोटाशी, पाय मुडपून एखाद्या लहान पोराप्रमाणे निपचित पडले होते. रात्रभर जागरण झाल्यामुळे त्यांना झोपेची जरूर आहे असे ओळखून मी किती वेळ तरी त्यांच्याशी बोललोच नाही. मला वाटले त्यांना झोप लागली असेल. पण ते जागेच होते. नुसते डोळे मिटून पडले होते. काही वेळाने ते आपण होऊनच माझ्याशी बोलू लागले. मी म्हणालो, " गुरुजी, एवढे जागरण करून तुम्हांला झोप कशी नाही ! " गुरुजी म्हणाले, " मला दिवस दिवस झोप येत नाही. " मी म्हणालो; " तिसऱ्या वर्गातून प्रवास करावयाची माझी खोड तर काल चांगलीच मोडली, ह्या हालअपेष्टा तुमच्या तुम्हीच सहन करू जाणे. " तेव्हा गुरुजी हसून म्हणाले; " अहो. आमचे सेनापती बापट म्हणतात त्याप्रमाणे तिसऱ्या वर्गातच खरा ' मास कॉंटॅक्ट ' घडतो. त्यांच्या मास कॉंटॅक्टची गोष्ट सांगू का तुम्हांला ? एकदा आम्ही असेच आगगाडीच्या तिसऱ्या वर्गातून प्रवास करीत होतो. डब्यात खूपच गर्दी होती. पण सेनापती बापट डब्याच्या तोंडाशी उभे राहून प्रत्येक स्टेशनवर उतारूंना हातांनी ओढून ओढून आत घेत. शेवटी आत गर्दी इतकी झाली की, सांगायची सोय नाही. कुणी सेनापतींना विचारले की हे तुम्ही काय करता आहात ? तेव्हा सेनापती म्हणाले, ' जेवढी जास्त गर्दी तेवढा जास्त मास कॉंटॅक्ट घडतो, अन् त्याचे आपणाला पुण्य लागते. " असे म्हणून गुरुजी अगदी खदखदून हसले.

इतक्या निवांतपणे गुरुजींच्या सान्निध्यात बसून बोलण्याची ती माझी पहिली अन् शेवटची संधी. रात्री जेवण झाल्यानंतर शेजारच्या एका खेडेगावातील पाच सात मुले गुरुजींना भेटायला आली. त्यांची वये सात ते बारा वर्षांपर्यंत असतील. थंडी पडली होती म्हणून त्यांनी आपली अंगे धोतरांनी लपेटून घेतली होती. गुरुजी त्यांच्याशी जवळ जवळ तासभर बोलत बसले होते. एवढ्या चिमुकल्या मुलांशी गुरुजी इतका वेळ काय बोलत होते ते परमेश्वरालाच ठाऊक. मी शेजारी असूनसुद्धा त्यांच्या बोलण्यातले एक अक्षर देखील मला उमगले नाही. मुंग्या जशा एकमेकांना मुकाट्याने भेटतात, तशी त्यांची ती सांकेतिक मुलाखत चालली होती. गुरुजी त्या रात्री आमच्याबरोबर मुंबईस परतणार होते. ते अतिशय दमले

होते, थकले होते. विश्रांतीची त्यांना फार जरूरी होती. पण कुठल्या तरी गावची मंडळी आली. अन् गुरुजींना व्याख्यानासाठी धरून घेऊन गेली. त्यांना नकार देण्याची गुरुजींची छातीच नव्हती. गुरुजी जितके मऊ तितकेच लोक कठोर होते. निर्दय होते. त्यांनी गुरुजींना अगदी मुळासकट चावून घेतले. गुरुजींनाही पण ते आवडत होते. त्याला कोण काय करणार ? त्या रात्री कऱ्हाडहून पुण्याला परत येताना तिसऱ्या वर्गात अशी काही गर्दी भरली होती म्हणता; मला शौचकूपाच्या दारात जागा मिळाली. सबंध रात्रभर माझा डोळ्याला डोळा लागला नाही. आजूबाजूच्या लोकांच्या लाथा आणि धक्के खाताना, ' मास कॉंटॅक्ट ' चे फार मोठे पुण्य आपल्या खात्यात जमा होत आहे, एवढ्या एकाच विचाराने मी माझे समाधान करून घेतले.

काही दिवसांनी जळगाव येथे पुन्हा एक समाजवादी युवक परिषद भरली. अध्यक्ष होते एस्. एम्. गुरुजींना अन् मलाही त्यांनी उद्घाटनाला का आशीर्वादाला बोलाविले होते. तेव्हा पुन्हा दोनतीन दिवस मला त्यांच्याबरोबर प्रवास करण्याचा आणि त्यांच्या सान्निध्यात राहण्याचा योग आला. जळगावात मोटारीतून मिरवणूक निघाली. सारे खानदेश लोटले होते. अन् खानदेश तर गुरुजींचे माहेर. जवळजवळ प्रत्येक माणूस त्यांच्या ओळखीचा होता हे मला त्या वेळी दिसून आले. ह्या म्हाताऱ्याला मोटारीत घे, त्या मुलाला आत बोलाव अशी मिरवणुकीची मोटार त्यांनी अगदी भरून टाकली. रात्री जळगावच्या बाजारात तीसचाळीस हजारांची प्रचंड सभा झाली. ह्या सभेत आमची दोघांची भाषणे झाली. इतरांची झाली. पण गुरुजींनी आपल्या वक्तृत्वाची पराकाष्ठा केली. " तुमचे भाषण फार चांगले झाले " असे म्हटलेले गुरुजींना आवडत नसे. ते एकदम उसळून म्हणत, " भाषण चांगले होऊन करायचे काय ? लोकांच्या मनावर त्याचा काय परिणाम झाला ? लोकांनी ते ऐकून काय केले ? ", जळगावलाही मुलांनी आणि माणसांनी गुरुजींना अगदी छळूनछळून आणि खाऊन खाऊन घेतले. एकाच वेळी दोन मुलांनी त्यांना जेवायचे निरनिराळे आमंत्रण दिले. गुरुजींच्या काही ते लक्षात राहिले नाही. एका मुलाकडून ते जेवून आले तर दुसरा मुलगा त्यांना बोलावण्यासाठी येऊन बसला होता. गुरुजी म्हणाले, " अरे बाळ, मी जेवून आलो आहे. " तेव्हा तो मुलगा लागला रडायला. तेव्हा गुरुजींचे अंतःकरण द्रवले. ते चटकन उठले आणि पुन्हा त्या मुलाच्या घरून

जेवून आले. गुरुजींचे आयुष्य हे असे होते. मुलांना व तरुणांना संतुष्ट करणे हा त्यांच्या जीवनातला सर्वांत मोठा आनंद होता. आणि त्यांच्यासाठी आपल्याला काही करता येत नाही, हे त्यांच्या आयुष्यातले सर्वांत मोठे दुःख होते. शेवटी शेवटी हे दुःख त्यांना आवरेनासे झाले. एकदा एका तरुणाला चिठी देऊन त्यांनी माझ्याकडे पाठविले. त्यात त्यांनी लिहिले होते, " अनेक तरुण माझ्याकडे येतात, म्हणतात मला काम द्या, नोकरी द्या. मी एकटा त्या सर्वांना कुठून नोकरी देऊ ? माझी स्थिती ही अशी. त्यांचे दुःख मला पाहवत नाही. तुमच्या ओळखी पुष्कळ आहेत. तुम्हीच ह्या मुलाला कुठेतरी लावून द्या. " मी तरी त्या मुलाला कुठून काम देणार ? देशाला स्वातंत्र्य मिळूनही राष्ट्रातील तरुणांचे जीवन आणि सामर्थ्य वाया चालले आहे हे गुरुजींच्या हृदयाला जाळणारे सर्वांत मोठे शल्य होते. त्यामुळे त्यांना जगणे अशक्य झाले. मुलांची उपासमार आणि विटंबना जशी आईला बघवत नाही, तिला त्यापेक्षा मरण बरे वाटते, तसे गुरुजींचे झाले. तरुणांचा नि जनतेचा आक्रोश त्यांना ऐकवेना. त्यांच्या अंगाचा अगदी तडफडाट झाला. ते म्हणाले, " हे पाहायला मी जगणार नाही. त्यापेक्षा मी मरून जाईन ! " हा विचार मनात यायचा काय तो अवकाश, काडकन त्यांनी आपल्या देहाचे मडके फोडून घेतले आणि ' अनंताच्या सिंधूत त्यांनी आपल्या जीवनाचा बिंदू मिसळून टाकला. जीवनाचा मोह अन् मरणाचे भय तुम्हाआम्हांला. गुरुजींना त्याचे काय ?

गुरुजी गेले त्या वेळी मी पुण्याला होतो. ती शेवटची हृदयद्रावक हकीकत नारायणराव गोऱ्यांनी मला सांगितली. नारायणराव म्हणाले, " त्या दिवशी मी पुणेमेलने मुंबईला आलो. दादरहून गुरुजींच्या मेघाभुवनात असा साडेअकरा-बाराच्या सुमारास मी आलो. तो गुरुजी आंघोळ करून धोतराच्या निऱ्या बोटाने साफ करीत करीत बाहेर आलेले मला दिसले. मला बघून ते नेहमी-प्रमाणे हसले व माझा हात त्यांनी आपल्या हातात घट्ट धरला. नंतर अर्धा तास-पर्यंत पलंगावर आम्ही इकडच्या तिकडच्या गोष्टी करीत बसलो. मी विचारले, ' आज रात्रीं तुम्ही खानदेशात जाणार ना ? ' तेव्हा गुरुजी हसले नि काही बोललेच नाहीत. इतक्यात आतून जेवणाचे बोलावणे आले. मी म्हणालो, ' गुरुजी, चला जेवायला. ' गुरुजी म्हणाले, ' आज शुक्रवार. मी जेवत नाही. झोपतो जरा. ' मी जेवून बाहेर येतो आहे, तो आतल्या खोलीत गुरुजी काही

तरी लिहीत होते. मी जवळ जाऊन किंचित डोकावून पाहिले, तो गुरुजींनी कागद आपल्याकडे कलता केला. ते मला जरा चमत्कारिकच वाटले. कारण गुरुजी कोणतीही गोष्ट कोणापासून लपवीत नसत. तेव्हा मी बाहेर आलो. आत पलंगावर एक मुलगा झोपला होता. आपले पत्र लिहून झाल्यावर गुरुजींनी त्याला उठवले. अन् सांगितले, "मला इथे झोपायचे आहे. तू बाहेर जाऊन झोप." हेही गुरुजींचे करणे नेहमीपेक्षा निराळेच होते. कारण निजलेल्या मुलाला ते कधीही उठवत नसत. मी पुन्हा आत जातो आहे तो गुरुजी पलंगावर गाढ झोपले होते आणि हळूहळू घोरू लागले होते. तेव्हा मी त्यांच्याशेजारी जमिनीवर झोपलो. दोन वाजता उठलो तो गुरुजी गाढ झोपले होते. मी त्यांच्याकडे क्षणभर पाहिले अन् माझ्या कामाला बाहेर निघून गेलो. त्यानंतर दुपारी गुरुजींना भेटायला काही लोक आले. संध्याकाळच्या गाडीची तिकिटे घेऊन मधू लिमये आले. चहाची वेळ झाली तरीपण गुरुजी झोपलेच होते. त्यांना कुणी उठवलेच नाही. रात्री जागरण होणार आहे. तेव्हा आता ते झोपले आहेत तर झोपू द्या त्यांना स्वस्थपणे, असेच बाहेरच्या खोलीत बसलेल्या मुलांना वाटले. मी सायंकाळी सातच्या सुमारास आलो. 'मेघाभुवन'मध्ये चांगला अंधार पडला होता. तरी पण गुरुजी झोपलेले आहेत, हे बघून मला धक्काच बसला. मला ते फारच चमत्कारिक वाटले. मी म्हणालो, 'अरे, सबंध दिवसभर गुरुजी झोपले आहेत हे काय आहे? उठवा त्यांना.' एक मुलगा पाय न वाजवता हलकेच त्यांच्या खोलीत गेला व त्याने दिवा लावला. तरी गुरुजींनी हूं की चूं केले नाही. तेव्हा मात्र माझ्या छातीत धस्स झाले. मला गुरुजींचे तसे नेहमीच भय वाटत असे. मी त्यांना जोरजोराने हलवू लागलो. पण ते शुद्धीवर कुठे होते? त्याबरोबर एक अशुभ कल्पना डोक्यात सळक मारून गेली. दुपारी गुरुजी जे पत्र लिहीत बसले होते त्यामध्ये ह्या त्यांच्या स्थितीचा काहीतरी उलगडा असेल अशा विचाराने डॉक्टरांना बोलावणे पाठवून आम्ही ते पत्र शोधू लागलो. शेवटी त्यांच्या अंगावर सदऱ्याच्या एका खिशात ते पत्र सापडले. त्यावरील 'मधू लिमये यास' अशी अक्षरे वाचून पुढील सर्व प्रकार ध्यानात आला. दुसऱ्या खिशात त्यांचा अकाली मरण पावलेला आवडता पुतण्या वसंत याचा फोटो होता. त्याच्या पाठीवर त्यांनी आपल्या अक्षरात लिहिले होते, 'सर्वांबरोबर तुझेही स्मरण.' नारायणरावांच्या तोंडून ही हकीकत ऐकत असता माझ्या शरीरातले

रक्त अक्षरशः गोठून गेले. मी निर्जीवपणे त्यांना विचारले, “मग गुरुजींनी त्या गोळ्या घेतल्या केव्हा? अन् कुठे?” नारायणराव म्हणाले, “आंघोळीच्या खोलीत आंघोळ करून जेव्हा ते बाहेर आले किंवा मी आलो तेव्हा, त्याच वेळी त्या गोळ्या त्यांनी घेतल्या होत्या!” गुरुजींच्या अंतकाळची नारायण-रावांनी सांगितलेली ही हकीकत जेव्हा जेव्हा मला आठवते, तेव्हा तेव्हा माझे मस्तक बधिर होऊन जाते आणि काही सुचेनासे होते. गुरुजींचे जीवन जसे अलौकिक, तसे त्यांचे मरणही पण अलौकिक!

ठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
क्रम ७५०७५ वि: निबंध
क्र ९०९६ नों: दि: १६।३।७९

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६५९५
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0016595